# मिरा भाईंदर महानगरपालिका

## मुख्य कार्यालय, तिसरा मजला, छत्रपती शिवाजी महाराज सभागृह

**मा. महासभा दि. ०४/०९/२०१५**

आज शुक्रवार दि. ०४/०९/२०१५ रोजी मिरा भाईंदर महानगरपालिकेची मा. महासभा सकाळी ११.०० वाजता सभा सुचना क्र. ०६ दि. २५/०८/२०१५ रोजीच्या विषयपत्रिकेवर विचार विनिमय करणेकरिता महापालिका सभागृह, ३ रा मजला, छत्रपती शिवाजी महाराज सभागृह येथे मा. महापौर यांच्या अध्यक्षतेखाली भरली असता खालीलप्रमाणे सदस्य हजर होते.

**उपस्थित सदस्य**

| | | |
|---|---|---|
| १) | जैन गिता भरत | महापौर |
| २) | प्रविण मोरेश्वर पाटील | उपमहापौर |
| ३) | केळुसकर प्रशांत नारायण | सभापती, स्थायी समिती |
| ४) | पाटील रोहिदास शंकर | सभागृह नेता |
| ५) | सँन्ड्रा जेफ्री रॉड्रीक्स | सदस्या |
| ६) | असेन्ला मेंडोन्सा परेरा | सदस्या |
| ७) | ॲड. रवि व्यास | सदस्य |
| ८) | कोठारी सुमन रमेश | सदस्या |
| ९) | कांगणे यशवंत ठकाजी | सदस्य |
| १०) | सिंग मदन उदितनारायण | सदस्य |
| ११) | म्हात्रे कल्पना महेश | सदस्या |
| १२) | पिसाळ मनिषा नामदेव | सदस्या |
| १३) | पांडे हंसूकुमार कमलकुमार | सदस्य |
| १४) | निलम हरिश्चंद्र ढवण | गटनेता, शिवसेना |
| १५) | जाधव मोहन महादेव | सदस्य |
| १६) | पाटील सुनिता कैलास | सदस्या |
| १७) | वेतोसकर राजेश शंकर | सदस्य |
| १८) | अरविंद दत्ताराम ठाकुर | गटनेता, महाराष्ट्र नवनिर्माण सेना |
| १९) | प्रभात प्रकाश पाटील | सदस्या |
| २०) | प्रेमनाथ गजानन पाटील | सदस्य |
| २१) | शर्मा सुनिला सत्येंद्र | सदस्या |
| २२) | मेहता डिंपल विनोद | सदस्या |
| २३) | जयंतीलाल गुरुनाथ पाटील | सदस्य |
| २४) | संध्या प्रफुल्ल पाटील | सदस्या |
| २५) | पाटील वंदना विकास | सदस्या |
| २६) | आमगावकर हरिश्चंद्र रामचंद्र | सदस्य |
| २७) | भानुशाली वर्षा गिरीधर | सदस्या |
| २८) | पाटील वंदना मंगेश | सदस्या |
| २९) | मुन्ना सिंग | गटनेता, अपक्ष |
| ३०) | रावल भगवती जयशंकर | सदस्या |
| ३१) | शाह राकेश रतिशचंद्र | सदस्य |
| ३२) | शरद केशव पाटील | सदस्य |
| ३३) | मेघना दिपक रावल | सदस्या |
| ३४) | पाटील ध्रुवकिशोर मन्साराम | सदस्य |
| ३५) | डॉ. जैन रमेश धरमचंद | सदस्य |
| ३६) | शुभांगी महिन कोटियन | सदस्या |
| ३७) | डॉ. राजेंद्र जैन | सदस्य |
| ३८) | प्रतिभा प्रकाश तांगडे-पाटील | सदस्या |
| ३९) | डॉ. आसिफ गुलाब शेख | सदस्य |
| ४०) | जयमाला किशोर पाटील | सदस्या |
| ४१) | डिमेलो बर्नड अल्बर्ट | गटनेता, राष्ट्रवादी कॉंग्रेस पार्टी |
| ४२) | बगाजी शर्मिला विन्सन | सदस्या |
| ४३) | परमार अनिता भरत | उप-सभापती, महिला व बालकल्याण समिती |
| ४४) | रकवी सुहास माधवराव | सदस्य |

| | | |
|---|---|---|
| ४५) | झिनत रऊफ कुरेशी | सदस्या |
| ४६) | खण्डेलवाल सुरेश | सदस्य |
| ४७) | पाटील नरेश तुकाराम | सदस्य |
| ४८) | शेख शबनम लियाकत | सदस्या |
| ४९) | सुजाता रविकांत शिंदे | सभापती, महिला व बालकल्याण समिती |
| ५०) | मेहता नरेंद्र लालचंद | सदस्य |
| ५१) | पुजारी कांचना शेखर | सदस्या |
| ५२) | इनामदार जुबेर | गटनेता, भारतीय राष्ट्रीय कॉंग्रेस |
| ५३) | शेख अशरफ मोहम्मद इब्राहिम | सदस्य |
| ५४) | म्हात्रे सुर्यकांत खंडोजी | सदस्य |
| ५५) | डिसा मर्लिन मर्विन | सदस्या |
| ५६) | शाह सिमा कमलेश | सदस्या |
| ५७) | कासोदरिया अश्विन श्यामजी | सदस्य |
| ५८) | डॉ. नयना मनोज वसानी | सदस्या |
| ५९) | जैन दिनेश तेजराज | सदस्य |
| ६०) | दळवी प्रशांत ज्ञानदेव | सदस्य |
| ६१) | विराणी रेखा अनिल | सदस्या |
| ६२) | सामंत प्रमोद जयराम | सदस्य |
| ६३) | अनिता जयवंत पाटील | सदस्या |
| ६४) | म्हात्रे परशुराम पद्माकर | सदस्य |
| ६५) | भोईर भावना राजू | सदस्या |
| ६६) | भोईर राजू यशवंत | सदस्य |
| ६७) | अरोरा दिपिका पंकज | सदस्या |
| ६८) | भावसार शिल्पा कमलेश | सदस्या |
| ६९) | वंदना रामदास चक्रे | सदस्या |
| ७०) | कमलेश यशवंत भोईर | सदस्य |
| ७१) | गावंड मंदाकिनी आत्माराम | सदस्या |
| ७२) | प्रभाकर पद्माकर म्हात्रे | सदस्य |
| ७३) | मीरादेवी रामलाल यादव | सदस्या |
| ७४) | अनिल बाबुराव भोसले | सदस्य |
| ७५) | रविंद्र भिमदेव माळी | सदस्य |
| ७६) | दक्षता राजेंद्र ठाकूर | सदस्या |
| ७७) | भगवती शर्मा | नामनिर्देशित सदस्य |
| ७८) | दिनेश दगडू नलावडे | नामनिर्देशित सदस्य |
| ७९) | डॉ. सुशिल अग्रवाल | नामनिर्देशित सदस्य |
| ८०) | हेमंत सदानंद म्हात्रे | नामनिर्देशित सदस्य |

**गैरहजर सदस्य –**

| | | |
|---|---|---|
| १) | घरत तारा विनायक | सदस्या |
| २) | बाबरा डॉनल्ड रॉड्रीक्स | सदस्या |
| ३) | मेंन्डोंसा स्टिवन जॉन | सदस्य |
| ४) | रॉड्रीक्स मॉरस जोसेफ | सदस्य |
| ५) | ग्रिटा स्टिफन फॅरो | सदस्या |
| ६) | गोविंद हेलन जॉर्जी | सदस्या |
| ७) | लियाकत ग. शेख | सदस्य |
| ८) | कॅटलीन ऍन्थोनी परेरा | सदस्या |
| ९) | काझी रशीदा जमील | सदस्या |
| १०) | सय्यद नुरजहॉं नझर हुसेन | सदस्या |
| ११) | वेंचर गिल्बर्ट मेंन्डोंसा | सदस्य |
| १२) | सुमबंड महरूनीसा हारूनरशीद | सदस्या |
| १३) | धनेश परशुराम पाटील | नामनिर्देशित सदस्य |

**रजेचा अर्ज –**

| | | |
|---|---|---|
| १) | अशोक सुर्यदेव तिवारी | सदस्य |
| २) | संदिप मोहन पाटील | सदस्य |
| ३) | पाटील प्रणाली संदिप | सदस्या |

**नगरसचिव :-**

मा. महापौरांच्या परवानगीने, मिरा भाईंदर महानगरपालिकेची मा. महासभा शुक्रवार दि. ०४/०९/२०१५ रोजी सकाळी ११.०० वाजता मिरा भाईंदर महानगरपालिका, स्व. इंदिरा गांधी भवन, मुख्य कार्यालय, तिसरा मजला, छत्रपती शिवाजी महाराज सभागृहात महासभा सुचना क्र. ०६, दि. २५/०८/२०१५ रोजी सोबतच्या विषयपत्रिकेवरील प्रकरणांवर विचार विनिमय करण्यासाठी आयोजित करण्यांत येत आहे. प्रश्नोत्तराच्या तासाला सुरुवात होते. ११.३० मिनिट झालेली आहेत. सौ. निलम ढवण यांचा प्रश्न आहे.

**निलम ढवण :-**

मा. महापौर मॅडम प्रथमतः धन्यवाद देते. कारण हा प्रश्नोत्तरासाठी घेतलेला विषय आहे. गेले ८ ते १० सभा निघून गेल्या तरी प्रश्नोत्तराच्या तासामध्ये प्रश्नोत्तर कधी झाले नाही. त्यामुळे कृपया सदस्यांना देखील विनंती आहे की माझ्या या विषयावर मला बोलु द्यावे. आणि नंतर तुमचे जे सभा चालु झाल्यावर जे विषय असतील ते घ्या. कारण ८ ते १० मिटींग झाल्या आहेत हा विषय पुढे ढकलण्यात आला आहे हा विषय देखील तेवढाच महत्वाचा आहे.

**जुबेर इनामदार :-**

सन्मा. सदस्या खरोखरच मी तुमच्या भावनेशी सहमती दर्शवितो.

**मा. महापौर :-**

निलम ताई आपण चालु करा. मी त्यांना बोलायची परवानगी दिलेली नाही.

**जुबेर इनामदार :-**

फक्त विषय असा आहे की आम्हाला माहिती पाहिजे की सभा कामकाज चालताना कोणत्या आधारावर चालेल.

**मदन उदितनारायण सिंह :-**

नंतर माहिती घ्या ना. पहिले प्रश्नोत्तराचा तास होऊ द्या. नंतर माहिती घ्या.

**जुबेर इनामदार :-**

सचिव महोद्यांनी मला सांगाव आणि ते कोणत्या आधारावर चालवणार ते आम्हाला सांगाव. विषय संपून जातो.

**मा. महापौर :-**

जुबेरजी आप बैठ जाइए। मैने आपको कोई भी प्रश्न पुछने की अनुमती नही दी। प्लीज सिट डाऊन. निलम ताई बोला.

**जुबेर इनामदार :-**

ऐसा है यह सभा कामकाज की बात है। इसका स्पष्टीकरण सचिव साहब को देना पडेगा। आपको इसका स्पष्टीकरण देना पडेगा।

**मा. महापौर :-**

आप नियम की बात कर रहे आपको मालुम है महापौर ने आपको बैठने को बालने के बाद आपको बैठना चाहिए।

**जुबेर इनामदार :-**

आपकी बात सराखो पे मॅडमजी लेकिन जाने तो सही कम से कम हम चाहते है की हमारा भी प्रश्न आए।

**मा. महापौर :-**

अभी मैंने निलमजी को बोलने की परमिशन दी है वो ही बोलेंगे। आपको जब बोलना होगा तब पुछ लिजीएगा प्लीज सिट डाऊन।

**ध्रुवकिशोर पाटील :-**

महापौर मॅडम बोलने का उनको भी नही लेकिन वो जो पुछ रहे है उनके सवाल का कम से कम जवाब तो दिजीए।

**मा. महापौर :-**

प्लीज सिट डाऊन.

**जुबेर इनामदार :-**

हम तो सिर्फ आपसे सिधा-सिधा प्रश्न का जवाब चाहते है। आपका अधिकार है सभा कामकाज चलाने का तो चलाइए अच्छी तरह से। हम तो चाहते है अच्छी तरह से चले।

**ध्रुवकिशोर पाटील :-**

हम आपके साथ है। इस सभा को अच्छी तरह से चलाने के लिए हम साथ देंगे लेकिन कम से कम जुबेरजी ने जो पुछा है उसका पहले जवाब दिजीए ना।

**मा. महापौर :-**

आप बैठ जाइए आपको नियम पता होना चाहिए।

**निलम ढवण :-**

सन्मा. सदस्यांना पुन्हा विनंती आहे की कृपया माझा प्रश्नोत्तराचा विषय होऊ द्या आणि नंतर तुमच घ्या.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

पण आमची जी मागणी आहे ती तर पूर्ण होऊ द्या ना. काय विचारल फक्त ही सभा कशी चालणार आहे. मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम .................

**निलम ढवण :-**

माझी पर्सनली सगळ्यांना विनंती आहे कारण फेरिवाल्यांचा दिवसेंदिवस प्रश्न मिरा भाईंदर शहरातला वाढत चालला आहे. त्यामुळे शहरातल्या रहिवाशांना देखील किती प्रॉब्लेम होत आहेत. शाळेची मुले असतात, ज्येष्ठ नागरिक आहेत.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

आम्ही तुमच्या मताशी सहमत आहोत.

**निलम ढवण :-**

म्हणून या विषयावर मला चर्चा करायला द्या. आणि त्यानंतर तुमचे विषय असतील ते घ्या. हा पहिला तास आहे. तो प्रश्नोत्तराचा तास आहे.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

पण एक मिनिटात मॅडमनी सांगितले की या सभेचे कामकाज कसे चालणार तर मॅटर एन्ड होईल ना.

**निलम ढवण :-**

नाही मग तुम्ही ते घ्या ना प्रश्नोत्तराच्या तासानंतर.......................

**ध्रुवकिशोर पाटील :-**

हे कामकाज अधिनियमान्वये चालणार आहे का उपविधी वरून चालणार आहे. एवढाच खुलासा करायचा आहे.

**निलम ढवण :-**

जेव्हा ऑफिशियली मिटिंग चालू होईल त्यावेळी तुमचे विषय तुम्ही मांडा ८ ते १० मिटिंग या विषयासाठी थांबलेले आहे.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

महासभा सुरू झालीय का नाही ?

**निलम ढवण :-**

मला या विषयावर बोलायला संधी मिळावी मी तुम्हाला पुन्हा पुन्हा रिक्वेस्ट करते. ८ ते १० मिटिंग मी तुम्हाला संधी दिलेली आहे.

**मा. महापौर :-**

प्रश्नोत्तराचा तास झाल्यानंतर तुम्हाला जवाब मिळणार आता बसा.

**जुबेर इनामदार :-**

प्रश्नाचें उत्तर द्या २ मिनिट फक्त.................

**मा. महापौर :-**

मिळणार नाही बसून जा मी कोणालाच परवानगी दिली नाहीए. निलम ताई बोला.

**जुबेर इनामदार :-**

सभा कामकाज तुम्हालाच चालवायच आहे.

**मा. महापौर :-**

मला काय करावे लागेल या बद्दल तुम्हाला सांगायची गरज नाही. तुम्ही बसुन जा.

**जुबेर इनामदार :-**

सचिवांना सांगा उत्तर द्यायला. सचिवांना कशाला बसवल आहे वरती. गेल्या वेळेस प्रश्नोत्तराचा तास गाळला गेला कोणत्या आधारावर गाळला गेला कोणाला अधिकार आहेत ते.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

कधी तास घ्यायचा कधी नाही घ्यायचा कधी लक्षवेधी ध्यायची कधी नाही घ्यायची हे काय चालले.

**निलम ढवण :-**

महापौर मॅडम या विषयासाठी मला या एक तासामध्ये बोलायला द्या नंतर जे काही प्रश्न असतील ते त्यांनी विचारावे मी सगळयांना विनंती केलेली आहे.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

सचिव साहेब प्रश्नोत्तर एक तासाचा आहे की अर्धा तासाचा.

(सभागृहात गोंधळ)

**निलम ढवण :-**

नाही एक तास देणार मी तर मागणी करते की जर असा गोंधळ प्रश्नोत्तराच्या तासाला असेल आणि मला बोलायला संधी मिळाली नाही तर जेव्हा मला संधी दयाल तेव्हापासुन एक तास मला मिळायला पाहिजे.

**जुबेर इनामदार :-**

आम्ही तुमच्या बरोबर आहोत.

**निलम ढवण :-**

म्हणजे या काही प्रश्नाला अर्थ आहे की नाही, मा. महापौर मॅडम जो विषय मी मांडणार आहे त्याला मला या सभागृहात शांतता पाहिजे कारण हा जो विषय आहे तो सर्वाना रिलेटेड आहे. आणि त्या सर्व सदस्यांनी बसून घ्यावे. मला विषयावर बोलू द्यावे या गोंधळात मला हा विषय ऐकवायचा नाही.

**मा. महापौर :-**

निलम ताई आपण विषय धरून बोला. आपला जो प्रश्न आहे तो बोला.

**भगवती शर्मा :-**

सचिव साहेब, नियम काय सांगतात ते तुम्ही बोला. बाकीचे माहापौरचे अधिकार आहे ते करणार ते आम्हाला माहिती आहे.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

मागच्या महासभेत अर्धा तास चालली मागच्या महासभेत अर्धा तास हा प्रश्नोत्तराचा तास चालला आहे आणि आता तुम्ही तासाचा वेळ दिला कसा काय वेळ दिला सांगा मला.

**जुबेर इनामदार :-**

गेल्या वेळी प्रश्नोत्तराचा तास गाळला गेला कोणत्या अधिकारात गाळला गेला.

**निलम ढवण :-**

सन्मा. सदस्य ७ ते ८ मिटींगला मला तुमच्यामुळे प्रश्नोत्तराच्या तासात बोलता नाही आल. हा विषय ७ ते ८ वेळा पुढे गेलेला आहें.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

मॅडम सत्ता तुमची आहे तुम्ही प्रशासनाला दिलेच नाही पाहिजे सत्ता तुमची आहे.

**निलम ढवण :-**

तुमच्या माहितीसाठी सांगते.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

म्हणजे तुम्ही ही सत्ता चालवण्यात नाकामयाब झाले आहे म्हणजे फेरीवाला वाढलेले आहेत. हा तुमचा ठेकेदार जास्त पैसे वसुल करतो तुम्ही सत्ता चालवण्यात नाकाम झाले आहे.

**निलम ढवण :-**

मा. महापौर मॅडम मी तुमच्या सगळ्याच्या निदर्शनास आणुन देते की हा प्रश्न मी हे लोक सत्तेत असताना हा प्रश्न टाकलेला आहे तेव्हा पासुनचा गोंधळ आहे.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

तुम्ही ६ महिने काय केले. तुम्ही या ६ महिण्यामध्ये हा प्रश्न निकाली काढणार होता म्हणजे तुम्ही.............

**अनिल भोसले :-**

सन्मा. सदस्य ध्रुवकिशोरजी तुम्ही १५ वर्षे केलेली घाण आम्ही काढायला घेतली आहे. ध्रुवकिशोरजी तुम्ही एवढया दिवस सत्तेमध्ये होते, तुम्ही जी केलेली घाण आहे ती ६ महिण्यामध्ये निघणार नाही.

**सुमन कोठारी :-**

हमने ६ महिने में नही किया आपने १५ साल में क्या किया उन फेरीवालो को माहिती आप लोगो ने दि है १५ साल में.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

तो हमारे में और आपमें फरक क्या ? हमने भी नही किया आपने भी नही किया।

**निलम ढवण :-**

हा विषय मागच्या वेळी पण आला आहे. म्हणजे प्रत्येक वेळी सभा चालू दयायच नाही अस काही विषय आहे का तुमचा ? सभा चालवू देणार नाही अस आहे का ?

**अनिल भोसले :-**

विरोधी पक्षाच्या सदस्यांना विनंती आहे शहराचे गंभीर प्रश्न आहे सर्वानी बसून घ्यावे अशी महापौराच्या वतिने विनंती करतो.

**निलम ढवण :-**

तुम्ही या विषयात सामील व्हा ना तुमचे विचार पण या विषयात सामील करा ना महापौर मॅडम माझा विषय मला शांततेत घ्यायचा आहे आणि तो विषय तेवढाच महत्वाचा आहे सगळया सदस्यांनी बसुन घ्या मला या विषयावर चर्चा करायची आहे.

**जुबेर इनामदार :-**

महत्वाचा विषय आहे आम्हालाही चर्चा करायची आहे त्यावर तुमचे अभिनंदन.

**निलम ढवण :-**

प्रश्नोत्तराच्या तासात माझा अधिकार आहे. माझा प्रश्न आहे मी बोलणार. महापौर मॅडम फेरिवाल्यांचा फार मोठा प्रश्न या शहराला भेडसावत आहे.

**सुरेश खंडेलवाल :-**

ढवण मॅडम प्रश्नोत्तरने हा विषय सॉल्व्ह होणार नाही. फेरिवाल्यांच धोरण निश्चित करा तुम्ही सत्तामध्ये आहेत. तुम्ही फेरिवाला धोरण निश्चित करा आणि त्या हिशोबाने कारवाई करा. प्रश्नोत्तर करुन काय होणार आहे. मला सांगा तुम्ही कोणाला प्रश्नोत्तर करता. तुम्ही फेरिवाला धोरण निश्चित करा तुम्ही सत्तेत आहेत.

**निलम ढवण :-**

सत्तेला सहा महिनेच झाले आहेत. सहा महिन्यात एवढी मोठी अपेक्षा काय करता.

**सुरेश खंडेलवाल :-**

मग तुम्ही प्रश्नोत्तर करु नका. डायरेक्ट फेरिवाला धोरण निश्चित करा. डायरेक्ट त्याच्यावर अंमलबजावणी करा. प्रशासन तुमचे, सत्ता तुमचे प्रश्नोत्तरने काय होणार आहे.

**निलम ढवण :-**

याच्यापूर्वी हे धोरण का निश्चित केले नाही.

**सुरेश खंडेलवाल :-**

मी सांगतो ना आता तुम्ही धोरण निश्चित करा. मॅडम मी तेच सांगतो ना तुम्ही सत्तेमध्ये आहेत तुम्ही प्रश्नोत्तर कसं विचारता.

**निलम ढवण :-**

आम्ही प्रशासनाला सगळ्यांच्या माहितीसाठी विचारतो.

**सुरेश खंडेलवाल :-**

तुम्ही फक्त काम करा आम्हाला माहिती आहे.

**अनिल भोसले :-**

विरोधी पक्षाच्या सभासदांना विनंती आहे की सभागृह शांततेने चालु द्यावे. अनेक शहरांचे गंभीर प्रश्न आहेत. पावसाळा जवळ आला कित्येक महिन्यापासुन हेच चालले आहे.

**नरेंद्र मेहता :-**

हे सगळे ठराव सभागृहामध्ये प्रत्येक विषयाचा अभ्यास करुन सदस्य येत असतात कुठल्याही पक्षाचा असु द्या. दरवेळी सभागृहामध्ये अशा प्रकारचे गोंधळ होतात आणि गोंधळामध्ये ठराव होतात आणि कोणालाही बोलायची संधी भेटत नाही. मग ते राष्ट्रवादीचे असु द्या. काँग्रेस असु द्या, भाजप असु द्या, सेना असु द्या सगळे आपआपले मत मांडायला वंचित राहतात. आम्हाला परत सभागृहाला हेच विनंती करायची आहे अर्धा तास आपला आजपासुन आहे.

**जुबेर इनामदार :-**

आमची तयारी आहे अर्धा तास ठेवा.

**सुहास रकवी :-**

तुम्ही निर्णय घ्यायचा मॅडम उत्तर तुम्ही द्यायचे आहे.

**मा. महापौर :-**

तुम्ही परमिशन घेतली आहे का उभ राहायला?

**सुहास रकवी :-**

अर्धा तास ते ठरवणारे कोण? आमच म्हणणे आहे तुम्ही उत्तर द्या.

**जुबेर इनामदार :-**

सभा कामकाज चालवायचा अधिकार तुमचा आहे.

**सुहास रकवी :-**

अर्धा तास का १ तास हे तुम्ही ठरवायचं.

**मा. महापौर :-**

ते त्यांच मत मांडतात.

(सभागृहात गोंधळ)

**नरेंद्र मेहता :-**

आम्हाला काही हरकत नाही. तुम्ही गोंधळ घाला. अर्धा तास संपल्यानंतर सन्मा. सदस्य सर्वांना भाष्य करायच असतं. शहरातली महत्वाची बाबी मांडायची असतात. शेवटी गोंधळामध्ये सगळे ठराव होतात.

**भगवती शर्मा :-**

सभा नियमाप्रमाणे चालवा काही गोंधळ होणार नाही.

(सभागृहात गोंधळ)

**मा. महापौर :-**

निलमताई आपण बोला.

**निलम ढवण :-**

मॅडम इथे एक शब्द ऐकू जात नाहीए मला उत्तरे पाहिजे ती कशी मिळतील.

**मा. महापौर :-**

आम्ही ऐकतोय.

**दिनेश जैन :-**

हर एक महासभा में गोंधळ यह क्या तरीका है।

**जुबेर इनामदार :-**

नियमात बोलतोय नियमाच्या बाहेर कोणी बोलत नाही इथे.

**सुहास रकवी :-**

मॅडम अर्धा तास देणार तर तेवढ डिक्लेर करा आमदार साहेब तुम्ही बोलले तेच आम्ही बोलतोय.

(सभागृहात गोंधळ)

**ध्रुवकिशोर पाटील :-**

जोपर्यंत आमची मागणी पूर्ण होत नाही तोपर्यंत हा गोंधळ चालु राहिल.

(सभागृहात गोंधळ)

**जुबेर इनामदार :-**

सभा कामकाज नियमाप्रमाणे चालले पाहिजे.

**संभाजी पानपट्टे (मा. उपायुक्त) :-**

महापौरांच्या परवानगीने बोलतो.....................

**गणेश देशमुख (मा. उपायुक्त (मु.)) :-**

मा. महापौरांचे आदेश असल्याने ते उत्तर देत आहेत.

**निलम ढवण :-**

माझ्यापर्यंत ते पोहचत नाही.

**प्रभात पाटील :-**

आमदार साहेब आपण असताना सभागृहात काय गोंधळ आहे.

(सभागृहात गोंधळ)

**निलम ढवण :-**

महापौर मॅडम एक रिक्वेस्ट आहे अशा पध्दतीने महासभेमध्ये गोंधळ होणार असेल तर सर्व सदस्यांच्या वेळेचा देखील अपव्यय होतो. विकासाच्या कामांना खिळ बसते. त्यांना जे काही असेल ते उत्तर द्या नाही तर त्यांना खाली बसवा. मागच्या सभेमध्ये देखील असेच गोंधळ झाले. दिवसभर सभा चालवत राहिलो त्याच्यातुन या मिरा भाईंदर शहराच्या विकासाचे काहीच निष्पन्न होत नाही इथे यायचं नाष्टा करायचा खायच बसायच दिवसभर आणि जायचं. एकतर या सदस्याच काय करायची ती गोष्ट करा त्यांना बसवा आम्हाला तरी बोलु द्या. आणि विकासाची कामे पुढे चालु द्या.

**जुबेर इनामदार :-**

आम्हाला फक्त तुमच्याकडून उत्तर पाहिजे सभा कामकाज कसे चालेल. नियमबाह्य चालेल की नियमाने चालेल.

**निलम ढवण :-**

मला जे उत्तर दिल ते माझ्यापर्यंत पोहचल नाही मॅडम.

**सुरेश खंडेलवाल :-**

हरिभाऊ तुम्ही फक्त उत्तर द्या ना ही सभा कुठल्या नियमाप्रमाणे चालते.

**शरद पाटील :-**

जस चालत होत तसच चालेल.

**सुरेश खंडेलवाल :-**

फक्त नियम विचारत आहोत आम्ही काही चुकी करत नाही.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

पारदर्शक प्रशासन कहा गई आपकी घोषणा।

**शरद पाटील :-**

१५ वर्ष नियम कुठे होते?

**ध्रुवकिशोर पाटील :-**

तुमने जो घोषणा दि है की स्वच्छ प्रशासन, सुप्रशासन पारदर्शक कारभार, भ्रष्टाचार हटाओ, महंगाई हटाओ वह सब कैसे चलेगा, जनता के नजर मे धुल झुकी है। और विश्वासघात कीया है जनता का।

(सभागृहात गोंधळ)

**निलम ढवण :-**

महापौर मॅडम काहीतरी निर्णय घ्या आम्हाला पण बोलु द्या.

**जुबेर इनामदार:-**

या सभागृहामध्ये प्रश्नोत्तर नाही चालणार.

**सुरेश खंडेलवाल :-**

महापौर मॅडम हरिभाऊ आहेत उत्तर द्यायला तुम्ही फक्त आदेश करा. सभा कुठल्या नियमाप्रमाणे चालते एवढं उत्तर द्यायला काय हरकत आहे. सर्वांचा वेळ कशाला घालवता.

**निलम ढवण :-**

माझी सभागृहाला एक विनंती आहे महापौर मॅडम तुम्हाला पण विनंती आहे. या फेरिवाल्यांचा विषय घेण्यासाठी एक मुहुर्त काढा आणि ती वेळ आणि तो दिवस मला ठरवून द्या.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

मॅडम तुमच्या महापौरांना तुमच्या आमदारांना फक्त मिरारोडचा एकच वॉर्ड दिसला. संपूर्ण मिरा भाईंदर शहर दिसले नाही. ते मिरा भाईंदर शहराचे आमदार आणि महापौर आहेत. त्यांनी फक्त एकच मिरारोडच्या ठिकाणी रस्त्यामध्ये ना फेरी क्षेत्र आणि तिकडन फेरिवाले हटवून कारवाई केली आणि रस्त्यावरती बसले पण त्यांनी मिरा भाईंदर शहरासाठी काहीच केले नाही. संपूर्ण शहरामध्ये हॉकर्स बसले आहेत. आम्ही सुध्दा सांगितले आहे आणि "ज" चा प्रस्ताव आणलेला आहे. परंतु तुमच्या सन्मा. महापौर आणि तुमचे सन्मा. आमदार फक्त एकाच ठिकाणी बसले आहेत.

(सभागृहात गोंधळ)

**सुमन कोठारी :-**

ध्रुवकिशोरजी भगवतीजी आपको जनताने विकास के कार्यो के लिए चुनके दिया और उस विकास के कार्यो को अगर आप .................

**ध्रुवकिशोर पाटील :-**

लेकिन वो सिर्फ मिरारोड के प्रभाग में जाके बैठे वहाँ पे आंदोलन किया वो गलत नही था क्या? जब आपकी सत्ता आई तो आपने पुरे मिरा भाईंदर शहर को देखना चाहिए ना की एक वॉर्ड का।

(सभागृहात गोंधळ)

**मा. महापौर :-**

सभा १० मिनिटांसाठी तहकुब करण्यात येत आहे.

**नगरसचिव :-**

तहकुब नंतर सभा कामकाजास सुरुवात होत आहे.

**दिनेश नलावडे :-**

महापौर मॅडम.

**मा. महापौर :-**

आपण जो पर्यंत बसणार नाही परमिशन घेऊन तुम्ही बोलायला उभे होणार नाही तोपर्यंत मी बोलु देणार नाही. महापौर मॅडमने बसायला सांगितले की बसुन जायचं.

**जुबेर इनामदार :-**

असा कुठे नियम आहे की बसुनच हात वरती करायचं.

**दिनेश नलावडे :-**

महापौर मॅडम माझा एकच विषय आहे आज कमिशनर साहेब उपस्थित नाही महासभेला.

**मा. महापौर :-**

नलावडे साहेब आपण परमिशन घेतली नाही आपण प्लीज बसुन जा.

**दिनेश नलावडे :-**

मॅडम मी तुम्हाला ५ वेळा बोललो महापौर मॅडम, एवढाच प्रश्न आहे की आज कमिशनर साहेब सुट्टीवर आहेत का? आम्हाला जरा सभागृहाला माहिती पडू द्या. तुम्ही बोलुनच देत नाही मग वेळ आपला वाया जातो.

**मा. महापौर :-**

तुम्ही बसुन जा.

(सभागृहात गोंधळ)

**दिनेश नलावडे :-**

महापौर मॅडम आज महासभा आहे. महत्वाचे विषय आहेत. या आज महासभेला आमचे आयुक्त साहेब या ठिकाणी उपस्थित नाही तर त्याच उत्तर काय, कशासाठी रजा टाकली काय आहे.

**मा. महापौर :-**

बसा उत्तर देते, बोला निलमताई.

**निलम ढवण :-**

महापौर मॅडम, माझ्या या फरिवाला विषयाने महासभेला सुरुवात झाली होती. परंतु प्रत्येक वेळी हा विषय असाच आपले विरोधी सगळे सहकारी आहेत या विषयावर चर्चा देखील होत नाही. मी या सगळ्या सदस्यांना देखील विनंती करते त्यांचे काही समस्या असतील किंवा जे-जे त्यांच्या व्यथा असतील ते-ते त्या सलग्न विषय जेव्हा येईल त्या-त्या वेळी त्यांनी चर्चा करुन मिटवावे. सभागृहाचा वेळ फुकट घालू नये. त्यांनी मगाशी पण त्या फेरिवाला विषयावर चर्चा केली करत होते माझ तेच म्हणणे आहे की ज्या-ज्या वेळी त्या संदर्भातील विषय येतील किंवा या महासभेमध्ये बाकीच्या अंतर्गत विषय घेण्याची तुम्हाला देखील मुभा आहे. असा सभागृहाचा वेळ कशाला वाया घालवता आणि या विषयावर मला पूर्ण चर्चा करायची आहे तर हा विषय पुन्हा पुढच्या महासभेमध्ये मला पूर्ण वेळ इथे मिळायला पाहिजे अन्यथा मीच नाहितर पुढे काही चालु देणार नाही.

**मा. महापौर :-**

नक्की बसा.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

आदरणीय महापौर मॅडम गणेशोत्सव जवळ आला आहे आणि सगळे गणेशोत्सव मंडळाचे पदाधिकारी आपल्या महानगरपालिकेच्या मंडपाच्या परवानगीसाठी परंतु महानगरपालिके तर्फे त्यांना फागर ब्रिगेडची एन.ओ.सी. घेण्याकरिता सांगण्यात आलेले आहे आणि त्या एन.ओ.सी. चे चार्जेस आहेत २२०० रुपये आणि हे सगळ्या मंडळांना परवडणारे नाहीत तर माझी आपणांस विनंती आहे आणि सगळ्या सदस्यांना विनंती आहे की जे २२००/- चार्ज आहे तो नॉमिनल १०० रु. किंवा ५०० रु. ठेवा.

**मा. महापौर :-**

ध्रुवकिशोर पाटील या विषयावर नाही बोलले तरी घेणार आपण बसुन जा.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

मॅडम हा इम्पोंटन्ट विषय आहे आणि आता तुमची मिटींग पण होणार नाही म्हणुन डिसीजन घ्या ना.

**मा. महापौर :-**

बसुन जा आणखी कोणाला बोलायचे आहे. ध्रुवकिशोर पाटील साहेब आपण बसुन जा. मी सांगितल तुम्ही ऐकले नाही तुम्ही या विषयावर नाही बोलले तरी मी हे विषय घेणार अस सांगितल तुम्ही बसा आता.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

आमच सजेशन आहे की ते जे पैसे आहेत ते कमी करावे जेणे करुन मंडळाचा फायदा होईल ना.

**मा. महापौर :-**

ऐकले ना तुमच सजेशन.

**रोहिदास पाटील :-**

महापौर मॅडम हा फक्त गणपती पुरताच विषय नाही हा गोकुळ अष्टमीचा पण विषय आहे कारण गोकुळ अष्टमीच्या वेळी पण जे काही हंडी बांधतात आणि त्यांची फक्त शेड उभी राहते एक ४ तासासाठी, ५ तासासाठी त्यासाठी पण ते परमिशन मागितल आहे.

**अशरफ शेख :-**

महापौर मॅडम, आपली परवानगीने बोलतो, महापौर मॅडम शुक्रवारी आमचे काही सभासद नमाजासाठी जातात आणि नेहमी अस बघितलेल आहे की नेहमी शुक्रवारी आपण महासभा ठेवतो त्याच्या पाठीमागचा हेतु काय? मागच्या वेळी जेव्हा मी स्थायी समितीमध्ये होतो तेव्हा पण सात पैकी पाच सभा लावली होती ती शुक्रवारला लावली होती त्याच्या पाठीमागचा हेतु काय? हे स्पष्ट करावे आम्ही दुपारी १.१५ ते ३.०० वाजेपर्यत आम्हाला सुट्टी द्यावी. सगळयांना सुट्टी द्यावी म्हणजे लंच ब्रेक साठी १.१५ ते ३.०० वाजेपर्यत आम्हाला सुट्टी द्यावी त्याच्या पाठीमागचा हेतु काय हे मला सांगावे एक दिवस आधी लावली म्हणजे गुरूवारी लावली असती किंवा सोमवारी लावली असती तर काय फरक झाला असता शुक्रवारी आपण का लावतो.

**मा. महापौर :-**

बसा.

**भगवती शर्मा :-**

मा. महापौर मॅडम, नगरसेविका सौ. तारा घरत के पति का कल दुःखद निधन हुआ है मेरा यह मानना है की सभी सदस्योंको सर्वानुमती से आज की सभा उनके निधन के कारण से आगे के लिए स्थगित कर दिया जाए।

**नरेंद्र मेहता :-**

आम्ही सर्व त्या दुःखामध्ये सामील आहोत मोठी एक हानी या शहराला झाली आहे या महानगरपालिकेमध्ये नक्कीच आपण त्यांना श्रध्दांजली वाहू. परपंरा आपण १३ वर्षाची बघितली आमची आणि सेनाची भावना ह्यामध्ये जास्तच होती की सभा तहकूब करावी पण हा वेगळा एक पायंडा आणि वेगळी परंपरा पडू नये कारण आतापर्यत या १५ वर्षाचा महानगरपालिकेचा जो इतिहास आहे एखादा सन्मा. सदस्य असतील त्यांच निधन झाले असेल किंवा एखादा शहरातला आपला ज्येष्ठ नेता यांचे निधन झाले असेल तर आपण तहकुब करत असतो याप्रकारे आतापर्यतची आलेली आहे मागच्या वेळी परशुराम पाटील यांच ही निधन झाल होत त्यावेळी ही आम्ही विनंती केली होती पण सभांच महत्वाचे कामकाज होत म्हणून कॉग्रेस राष्ट्रवादीने ते सभेचे कामकाज चालवले आहे आम्ही नक्की त्यांना श्रध्दांजली वाहू कारण बरेचसे काही महत्वाचे विषय आहे त्याचे निर्णय घेणे गरजेचे आहे म्हणून या सभेचे कामकाज चालू करावे याच्यात कुठल्याही प्रकारच आमच त्यांना हानी देण किंवा त्यांच्याबद्दल मनात वेगळ मत नाहीए पण हे कामकाज चालले पाहिजे.

**नगरसचिव :-**

आजच्या सभेला चार लक्षवेधी आलेली आहे पहिली लक्षवेधी प्रशांत दळवी दुसरी लक्षवेधी ध्रुवकिशोर पाटील तिसरी सुरेश खंडेलवाल चौथी नरेंद्र मेहता.

**अशरफ शेख :-**

मा. महापौर मॅडम मला उत्तर दिल नाही अजुनपर्यत शुक्रवारचे.

**मा. महापौर :-**

आप बैठ जाइए हमने कोई ऐसा पर्टीक्यूलर हेतु नही था के शुक्रवार पे रखे हमारे शायद डेट गिनते गिनते यह ध्यान नही रहा। अगली बार से हम जरूर प्रयत्न करेंगे की आप सभी की भावनाओंका ध्यान रखा जाए।

**अशरफ शेख :-**

आज नमाज के लिए १.१५ से ३.०० बजे तक लंच ब्रेक दिया जाए।

**नरेंद्र मेहता :-**

मा. महापौर मॅडम त्यांच्या भावनेचे आदर करतो त्यांनी एक दिड तास जावे एक दिड तास सुट्टी द्यावी काही हरकत नाही सभागृहाची

**मा. महापौर :-**

आजच्या सभेला चार लक्षवेधी आलेली आहेत आपण बसून जा.

**जुबेर इनामदार :-**

लक्षवेधी आपल्या उपविधीतील भाग आहे.

(सभागृहात गोंधळ.)

**मा. महापौर :-**

सुरेश खंडेलवालली ने लक्षवेधी मे अच्छा विषय है लेकीन क्योंकी हमने ये विषय "ज" में लिया है। इसलिए आपको तभी मैं बोलने का मौका दुंगी क्योंकी "ज" में यह विषय ऑलरेडी आ गया है इसलिए मैं आपसे विनंती करती हूँ की आप अपना विषय तभी ............

**सुरेश खंडेलवाल :-**

मॅडम मेरा सिर्फ एकही कहना है की जो चारों लक्षवेधी है ..................

**मा. महापौर :-**

आप पहले मेरी पुरी बात सुन लिजिए प्लीज.

**सुरेश खंडेलवाल :-**

चारो लक्षवेधी आई है पहले या तो हरिभाऊ चारो लक्षवेधी पढके सुनाए। यह सबको मालुम पडना चाहिए की लक्षवेधी क्या है।

(सभागृहात गोंधळ)

**मा. महापौर :-**

नरेंद्र मेहताजी आपण आपला विषय मांडा.

**सुरेश खंडेलवाल :-**

महापौर मॅडम यह आपका स्टेटमेंट है जो लक्षवेधी आई है देखिए लक्षवेधी स्विकार करना नही करना यह आपका व्यक्तीगत अधिकार है। लेकिन कम से कम सभा को यह मालुम होना चाहिए की लक्षवेधी की माध्यम से सदस्यों ने किस विषय पे सभा का ध्यान लाया है। अभी आप बोलेंगे की पढना भी नही है, नियम भी नही बताना है तो इसका मतलब हमें यह समझना चाहिए की आपको सभा आपके हिसाब से चलानी है तो यह सब गोंधळ मॅडम होगा। आप सिर्फ चारो लक्षवेधी पढके बताइए बस।

**नरेंद्र मेहता :-**

महापौर मॅडम आतापर्यंत ज्या-ज्या वेळी लक्षवेधी आली एकापेक्षा अनेक लक्षवेधी आल्या त्यावेळी लक्षवेधीचे वाचन केले गेले नाही. ओमप्रकाशजी गारोडीया या सन्मा. नगरसेवक ..................

**मा. महापौर :-**

भगवतीजी आप बैठिए आपको मैंने उठने की अनुमती नही दी है आप बैठ जाइए।

**जुबेर इनामदार :-**

सचिव महोदय विषय लक्षवेधीच्या चर्चेवर आला आहे.

**नरेंद्र मेहता :-**

तरी एखादा अशी प्रथा नाही याचा पायंडा ही पडू नये १०० टक्के तो अधिकार आपला आहे. आपण त्यावर आता काय निर्णय घ्यायचा आहे. सभागृहासमोर मी विनंती करतो की सुरेश खंडेलवालजीं ची लक्षवेधी आपण वाचावी अशी माझी आमची सभागृहाची विनंती आहे.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

सुरेश खंडेलवालजीवरच मेहेरबानी का? बाकीच्या सदस्यांवर का नाही? हा पण प्रश्न गहन आहे ना. डेंग्यू मलेरीया हा पण प्रश्न गहन आहे.

**जुबेर इनामदार :-**

नियमात आहे का लक्षवेधी दाखवा मला. महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमात लक्षवेधी दाखवा. तुम्ही सचिव महोदय आहात तुम्ही कामकाज बघतात.

**मा. महापौर :-**

हरिभाऊ विषयाला सुरुवात करा.

**राजेंद्र जैन :-**

महापौर मॅडम आजसे पहले इतनी महासभा में लक्षवेधी आई वो बोली नही गई तो पहले वो बोलके बताओ फिर यहाँ बोलना ना।

**मा. महापौर :-**

हरिभाऊ विषय वाचन करा.

**जुबेर इनामदार :-**

तुम्हाला उत्तर द्यावे लागेल, नियमात आहे का लक्षवेधी? नियमात बसते का?

**नगरसचिव :-**

उपविधीमध्ये आहे ना.

**जुबेर इनामदार :-**

उपविधीमध्ये आहे ना मग आम्ही तेच बोलतो.

**मा. महापौर :-**

सचिव साहेब विषय वाचन करा.

**नगरसचिव :-**

प्रकरण क्र. ६६, दि. ०७/०२/२०१५, दि. २७/०२/२०१५, दि. ०२/०३/२०१५ (दि. १५/०१/२०१५ रोजीची निलंबित सभा) व दि. ०२/०३/२०१५ (दि. ०७/०२/२०१५ रोजीची तहकुब सभा) रोजींच्या मा. महासभांचे इतिवृत्तांत कायम करणे.

**सुरेश खंडेलवाल :-**

महापौर मॅडम मेरे को यह जानना है सर कोई भी बात है ठिक है आप कौनसे नियम से चला रहे है वो हमने सवाल पुछा आपने जवाब नही दिया लेकिन यह जो प्रथा अभी चल रही है प्रश्नोत्तर भी चला गया लक्षवेधी भी चली गई क्या हर बार यह ऐसा ही होगा?

**रोहिदास पाटील :-**

दि. ०७/०२/२०१५, दि. २७/०२/२०१५, दि. ०२/०३/२०१५ (दि. १५/०१/२०१५ रोजीची निलंबित सभा) व दि. ०२/०३/२०१५ (दि. ०७/०२/२०१५ रोजीची तहकुब सभा) रोजीच्या मा. विशेष महासभेचे इतिवृत्तांतामध्ये मा. सदस्य यांनी सुचविलेल्या दुरुस्त्यांसह इतिवृत्तांत कायम करण्यांत येत आहे.

**नरेंद्र मेहता :-**

माझे अनुमोदन आहे.

**प्रकरण क्र. ६६ :-**

दि. ०७/०२/२०१५, दि. २७/०२/२०१५, दि. ०२/०३/२०१५ (दि. १५/०१/२०१५ रोजीची निलंबित सभा) व दि. ०२/०३/२०१५ (दि. ०७/०२/२०१५ रोजीची तहकुब सभा) रोजींच्या मा. महासभांचे इतिवृत्तांत कायम करणे.

**ठराव क्र. ४० :-**

दि. ०७/०२/२०१५, दि. २७/०२/२०१५, दि. ०२/०३/२०१५ (दि. १५/०१/२०१५ रोजीची निलंबित सभा) व दि. ०२/०३/२०१५ (दि. ०७/०२/२०१५ रोजीची तहकुब सभा) रोजीच्या मा. विशेष महासभेचे इतिवृत्तांतामध्ये मा. सदस्य यांनी सुचविलेल्या दुरुस्त्यांसह इतिवृत्तांत कायम करण्यांत येत आहे.

**सुचक :- श्री. रोहिदास पाटील        अनुमोदक :- श्री. नरेंद्र मेहता**

**ठराव सर्वानुमते मंजूर**

**सही/-**
**महापौर**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

**नगरसचिव :-**

प्रकरण क्र. ६७, मानधनावरील संगणक चालक / लघुलेखक यांच्या मुदतवाढीबाबत.

**शरद पाटील :-**

मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या प्रत्येक विभागात संगणक चालक व आवश्यकते नुसार लघुलेखक कार्यरत आहेत. सदर संगणक चालक / लघुलेखक मुदतीस १ दिवसाचा तांत्रिक खंड देवून पुढील ११ महिन्यांच्या कालावधीकरीता दि. ०३/०८/२०१५ ते दि. ०२/०७/२०१६ पर्यंत मुदतवाढ देण्यात येत आहे असा ठराव मांडत आहे.

**निलम ढवण :-**

माझे अनुमोदन आहे.

**नरेंद्र मेहता :-**

आम्ही ठराव केलेला आहे. सभागृहाने काही वेगळे दुमत आणि काही वेगळे विचार करायचे कारण नाही. संगणक चालक यांना वेतनवाढ दिले पाहिजे या मताशी आम्ही सहमत आहोत. परंतु मागच्या वेळी त्यांना आपण ७ चे १० केले साडे दहाचे अकरा जे काही केले आताही आमची थिंकींग तशी आहे. पण या

महानगरपालिका आस्थापनेवर ज्या रेशिओने बाकी इतर कर्मचाऱ्यांची वाढ झाली असेल त्याचप्रमाणे त्यांची वाढ व्हायला पाहिजे यामध्ये आमच काही दुमत नाही त्यामध्ये आम्हाला ती माहिती अजुन प्राप्त झाली नाही म्हणून सभागृहाला महापौर मॅडम आपल्याला आणि प्रशासनाला विनंती करणार की मुदतवाढ आम्ही देतोय त्यांना जी वाढ द्यायची आहे मानधनामध्ये ती किती द्यायची इतर कर्मचाऱ्यांना आपल्या महानगरपालिकेमध्ये आपण त्यांना किती वाढ दिली त्यांना असं वाटता कामा नये की आम्हाला कमी आणि त्यांना जास्त, त्यांना यापेक्षा जास्त दिलं तरी आमची काही हरकत नाही जे नियमाप्रमाणे आहेत त्यांना ही वेतन वाढ झाल पाहिजे किंवा मानधन वाढ झाली पाहिजे त्यासाठी आपल्याला विनंती आहे की सूचना जी मांडलेली आहे आपण रितसर तो विषय घेऊन ते निर्णय घ्यावे.

**आसिफ शेख :-**

सन्मा. महापौर मॅडम प्रकरण क्र. ६७ सदर ठरावात आमची सूचना आहे कृपया ती मंजूर करुन घ्यावी ही विनंती आहे. मानधनावरील संगणक चालक लघुलेखक यांच्या मुदतवाढीप्रमाणेच मिरा भाईंदर महानगरपालिका आस्थापनेवर ठोक मानधनावर विविध विभागात सुमारे ३ वर्षापासून कार्यरत असणाऱ्या स्थानिक ७ कनिष्ठ अभियंता यांना मानधनावरील संगणक चालक / लघुलेखक यांच्यासह मा. महासभा दि. १९/०६/२०१४ ठराव क्र. १५ अन्वये १ दिवसाचा तांत्रिक खंड देऊन ११ महिन्यांकरिता दिलेली मुदतवाढ दि. १०/०५/२०१५ रोजी संपल्यानंतर व गेले ३ महिने त्यांना मानधन मिळाले नसताना देखील ते आजपर्यंत प्रामाणिकपणे व निष्ठेने काम करित आहेत. सदरच्या ठोक मानधनावरील ७ कनिष्ठ अभियंता यांना आता ३ महिन्यांनी मा. स्थायी समिती सभा दि. २८/०८/२०१५ ठराव क्र. ५९ अन्वये त्यांच्या सेवेच्या कालावधीत दिलेली मुदतवाढ देखील येत्या २-३ महिन्याने संपणार असल्यामुळे मा. स्थायी समितीच्या सदर ठरावात फेरबदल करुन सदरच्या कार्यरत ७ कनिष्ठ अभियंत्यांना देखील त्यांची मुदत संपल्याच्या तारखेपासून म्हणजे दि. १०/०५/२०१५ पासून १ दिवसाचा तांत्रिक खंड देवून ११ महिन्यांकरिता मुदतवाढ देण्यात यावी तसेच सदरचे ७ कनिष्ठ अभियंता हे स्थानिक असून प्रामाणिकपणे नियमित रेग्युलर अभियंता प्रमाणेच विविध विभागात काम करत आहे.

**राजेश वेतोसकर :-**

सदर सुचनेस माझे अनुमोदन आहे.

**निलम ढवण :-**

महापौर मॅडम या संदर्भातील सूचना मलाही द्यायची होती. शेख साहेबांनी जी सूचना दिलेली आहे त्या सूचनेचा देखील त्या सूचनेशी सहमत आहे. इतक्या वर्षापासून हे लोक इथे काम करत आहेत तर आणि या मनपात विविध आपली विकास कामे देखील काही ठरावित अभियंते असल्यामुळे विकास कामांना गती मिळत नसल्याने या पूर्वी पासून जे काम करतात त्यांना मला वाढते मागच्यावेळी काहीतरी ठेकेदारमार्फत अभियंते भरावे किंवा इतर भरावे असा ठराव झालेला आहे परंतु हे पूर्वीचे सगळे अभियंते असल्याकारणाने त्या अभियंत्यांना या जस ठोक मानधनावर काम करतात त्या यादीमध्येच त्यांना समाविष्ट करुन घ्यावे किंवा शक्यतो जास्तीत जास्त पालिकेच्यामार्फत त्यांना इथे परमनन्ट करुन घेण्यात यावे जेणेकरुन या कामांना विकासांना देखील गती मिळेल आणि त्यानंतर जे तुम्ही भराल किंवा जे काय असेल ते ठरावानुसार जे प्रशासनाच्या अखत्यारित असेल त्यानुसार भरती करावी. परंतु जे आता अभियंते आहेत त्या अभियंत्यांना या लघुलेखक आणि टंकलेखना बरोबर त्यांना इथे समाविष्ट करुन घेण्यात यावे अशी मी देखील सूचना मांडत आहे.

**प्रभात पाटील :-**

एक सूचना आली त्या सूचनेला अनुसरुन मी बोलते की संगणक चालक म्हणजे तुम्ही पण मागच्या वेळेला नगरसेवक होतात जेव्हा पहिल्यांदा इथे संगणक चालक भरले त्यांची संख्या एवढी लिमिटेड होती की आज कदाचित ते आपल्यामध्ये सामावून गेले असते पण प्रत्येक वेळेला आपण कोणत्या ना कोणत्या माध्यमातून स्थायी समितीच्या माध्यमातून नगरसेवकांच्या माध्यमातून आपण आपले लोक भरले याच्यामध्ये आज ती संख्या फुगुन ८७ इतकी झाली आहे आणि म्हणूनच आजच्या घडीला एवढ्या लोकांना आपण कुठे सामावून घ्यायचा हा प्रश्न निर्माण झाला आहे. देशमुख साहेब बरोबर आहे. कदाचित ती संख्या पूर्वी भरली तेव्हा हरिभाऊ माहिती असेल तुम्हाला लिमिटेड असती तर कदाचित हे कर्मचारी इथे समाविष्ट झाले असते आजही आपण सूचना करतो की जे कर्मचारी ठेक्यावर आहेत त्यांना याच्यात समाविष्ट करा. मी तुम्हाला यातला धोका सांगते आजही सांगते आज जे कर्मचारी आहेत ते सुध्दा आपण त्यांना आस्थापनेवर घेऊ शकत नाही इतकी त्यांच्या संख्या फुगलेली आहे आणि आपण जे ठेका पध्दतीने घेतलेली आहेत निविदातुन घेतलेली आहे ते कर्मचारी जर याच्यात समाविष्ट केले तर हे जे १० वर्षापासून काम करणारे कर्मचारी आहेत. त्यांच्यावर आपण खूप अन्याय करणार आहोत. आपल्याला जर याच लोकांच हित साधायच असेल तर कृपया या दोन्ही बाजू वेगळ्या ठेवा. मानधनावरचे कर्मचारी वेगळे ठेवा आणि जे तुमचे ठेक्याने आहेत त्यांना वेगळे ठेवा. कृपया यांची सरविसर करुन नका एवढीच माझी इच्छा आहे. आणि तुम्ही मला वाटते आकृतीबंध तयार करायला घेतले आहे त्याच्यामध्ये बऱ्याचशा लोकांची वर्णी लागणार आहे. तर हे कर्मचारी जर ठेक्यावरचे तुम्ही त्याच्यात आणले तर या लोकांवर अन्याय होणार आहे आणि म्हणून माझी सूचना आहे की जे कर्मचारी मानधनावर आहे ते मानधनावरच राहू द्या ठेक्यावरचे ठेक्यावर राहू द्या आणि मेहता साहेबांनी जे सांगितल मी त्यांच अभिनंदन करते किंवा त्यांचे आभार मानते की पुढच्या वेळेला विषय घेऊन ते या कर्मचाऱ्यांचे पगार किंवा त्यांचे मानधन

वाढवण्याचे निश्चित प्रकारे प्रयत्न करतील आणि आमच्या सर्वांचा त्यांना पाठिंबा राहिल एवढी मी ग्वाही देते. थँक यू.

**आसिफ शेख :-**

सन्मा. महापौर मॅडम, सन्मा सदस्या प्रभातताई पाटील यांनी आता या ठिकाणी सूचना केलेली आहे ते म्हणतात की ठेका पध्दतीने तर ठेका पध्दतीने कर्मचा-यांचा विषय इथे येत नाही इथे जो विषय आहे तो संगणक चालकांच्या ठोक मानधनावरतीचा आहे त्याचप्रमाणे कनिष्ठ अभियंताच्या ठोक मानधनावरचा विषय आहे. ठेक्याचा विषय हा नंतर आहे. ते कुणाच्या मनात असेल तो वेगळा विषय आहे.

**मा. महापौर :-**

ठराव मंजूर.

**शरद पाटील :-**

मॅडम या आमच्या ठरावामध्ये कुठलीही सूचना घ्यायची नाही.

**आसिफ शेख :-**

नाही तस कस करता येईल आता ठराव मांडले आहे. सूचना दिल्या आहेत माझ्या सूचनेला त्यांनीही अनुमोदन दिलेले आहे आणि सन्मा. निलमताई ढवण यांनीही समर्थन दिले आहे.

**मा. महापौर :-**

ठराव सर्वानुमते मंजूर मी एकही सूचना स्विकारलेली नाही. त्यात पुढचा विषय घ्या.

**प्रकरण क्र. ६७ :-**

मानधनावरील संगणक चालक / लघुलेखक यांच्या मुदतवाढीबाबत.

**ठराव क्र. ४१ :-**

मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या प्रत्येक विभागात संगणक चालक व आवश्यकते नुसार लघुलेखक कार्यरत आहेत. सदर संगणक चालक / लघुलेखक मुदतीस १ दिवसाचा तांत्रिक खंड देवून पुढील ११ महिन्यांच्या कालावधीकरीता दि. ०३/०८/२०१५ ते दि. ०२/०७/२०१६ पर्यंत मुदतवाढ देण्यात येत आहे असा ठराव मांडत आहे.

**सुचक :- श्री. शरद पाटील अनुमोदक :- सौ. निलम ढवण**

**ठराव सर्वानुमते मंजूर**

**सही/-**
**महापौर**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

**नगरसचिव :-**

प्रकरण क्र ६८, मिरारोड (पूर्व) क्षेत्रातील नया नगर पोलीस ठाणेसाठी जागा उपलब्ध करुन देणे संदर्भात निर्णय घेणे.

**सिमा शाह :-**

सदर विषयाबाबत सन्मा. पोलिस अधिक्षक व उपअधिक्षक पोलिस विभाग, ठाणे ग्रामीण, ठाणे व मा. आयुक्त यांनी सन्मा. महापौर यांचेबरोबर चर्चा करुन सदर विषय रितसर सादर करण्यात यावा.

**दिनेश जैन :-**

माझे अनुमोदन आहे.

**जुबेर इनामदार :-**

मा. महापौर मॅडम, खर तर हा विषय मी ''ज'' च्या प्रस्तावामध्ये याच्या आधीच्या महासभेमध्ये मांडला होता वेळ कमी पडला ७.०० वाजता सभा संपली. तो ज चा प्रस्ताव माझा प्रलंबित आहे. तर प्रथमतः तुमचा अभिनंदन. तुम्ही हा विषय विषयपटलावर आणला. विषयपत्रिकेवरच घेतला आहे. खर तर परिस्थिती अशी आहे की मिरारोडमध्ये एकच पोलिस स्टेशन आधी होत कनाकिया त्याच विभाजन झाल आणि आता त्याचं दोन पोलिस स्टेशनमध्ये रुपांतर करण्यात आले. एक नयानगर आणि एक कनाकिया. कनाकिया परिसरामध्ये परिपूर्ण इमारत सुरुवातीपासून बांधण्यात आली पूर्ण व्यवस्थित पोलिस स्टेशन त्यांना प्राप्त झाले. नयानगर परिसरामध्ये एक छोट्याशा पोलिस चौकीमध्ये आजच्या तारखेला तिथे ते पोलिस स्टेशन चालु आहे. त्या परिसराची जनसंख्या बघता एक चांगल सुसज्ज पोलिस स्टेशन असणे खरोखर गरजेचे आहे. आरक्षण १८४ (अ) हा आरक्षित भुखंड मिरारोडच्या रसाज सिनेमाच्या बाजुला आहे. त्याला भुसंपादन करण्याची प्रक्रिया हस्तांतरीत होण्याची प्रक्रिया कलेक्टरच्या माध्यमातून पोलिस प्रशासन करुन घेत आहे. त्याला काहीतरी अवधी अजून लागणार आहे. सध्याच्या परिस्थितीत त्यांची परिस्थिती खरोखर त्यांना बसायला जागा नाही, बाहेर टेबल लावून अक्षरशः चौकीच्या बाहेर टेबल लावून त्यांना बसायला लागते. न्यायव्यवस्था राखली गेली पाहिजे. त्याच्यासाठी आपल्याला त्यांना काहीतरी मदत केली पाहिजे त्यांना सुविधा करुन दिल्या पाहिजे आणि आपल्याला कुठे आपली मालमत्ता कायमस्वरुपी त्यांना द्यायची परत त्या विषयावर चर्चा करणे, वेळ मिळणे गणपतीचा सण आहे. येणारे सण बघता आपल्याला परत बसायला म्हणजे तुम्हाला वेळ मिळेल का समिती बसेल हे ते त्याच्या ऐवजी मी माझा एक ठराव करतो तुम्हाला मान्य असेल हा ठराव तर मान्य करा सर्वानुमते

होऊन जाऊ द्या. नाहीतर आमचा ठराव मी आज करणार आहे इथे. मिरा भाईंदर परिसर हा मुंबई लगत असलेल्या मोठ्या प्रमाणात शहरीकरण होत असलेला परिसर असून मुंबईतील नोकरदार वर्गाला मुंबई पासुन येण्याजाण्यास जवळचे ठिकाण म्हणून मुंबईतील बहुतांश लोक मिरा भाईंदर भागात स्थलांतरीत होत आहेत व झपाट्याने सदर परिसरातील लोकसंख्या वाढत आहे. मिरारोड पोलिस ठाणे हद्दीत नयानगर, शांतीनगर, शांती पार्क, पुनमसागर, गोविंदनगर, लोढा कॉम्पलेक्स गितानगर, सेक्टर -१ ते ११, बेव्हर्ली पार्क, कनकिया रोड, अस भाग येत असून नव्याने अनेक ठिकाणी इमारतींचे बांधकाम सुरु आहेत. नजिकच्या काळात मिरारोड पोलिस ठाणे हद्दीत गुन्हेगारीचे प्रमाण देखील वाढल्याचे दिसुन येते. सदर भागात कायदा व सुव्यवस्था अबाधित राहावी याकरीता शासनाने महाराष्ट्र शासन, निर्णय क्र.एपीओ-३१११/प्र.क्र.१०७ (अ)/पु.बा.२/पोल-३ दिनांक ०४/०३/२०१४ अन्वये मिरारोड पोलिस ठाण्याचे विभाजन करुन नयानगर पोलिस ठाण्यास मंजुरी दिली आहे. नविन मंजूर नयानगर पोलिस ठाणे अंतर्गत नयानगर, शांतीनगर परिसर अंतर्भुत करण्यात येत आहे. वस्तुस्थिती पाहता नयानगर पोलिस ठाणे तात्काळ सुरु करणे आवश्यक असुन त्यासाठी महानगरपालिकेने मंजूर केलेल्या जागेवर बांधकाम करण्यास व कायदेशीर बाबींची पुर्तता होणेस विलंब होण्याची शक्यता लक्षात घेता नयानगर व शांतीनगर यामधील मध्यवर्ती ठिकाण म्हणून रसाज येथील प्रभाग क्र. ०५ समोर रसाज एन्क्लेव्ह इमारतीमध्ये समावेश आरक्षणामध्ये तळ अधिक एक अशा स्वरुपाची जागा महापालिकेस हस्तांतरीत केलेली आहे. सद्यस्थितीत सदरची जागा प्राथमिक आरोग्य विभागासाठी वापरली जाते. तरी नया नगर पोलिस स्टेशन सुरु करण्याची आवश्यकता पाहता, उपरोक्त जागेवर तळमजल्यावर असलेले आरोग्य केंद्र पहिल्या मजल्यावर स्थलांतरीत करुन तळ मजल्याची जागा नयानगर पोलिस स्टेशनला तात्पुरत्या स्वरुपात देण्यात यावे. तसेच नयानगर पोलिस ठाण्यासाठी आरक्षित जागा आरक्षण क्र. 184 A पोलिस विभागास पोलिस ठाणे बांधण्यासाठी हस्तांतर करण्याच्या कार्यवाहीस योग्य विभागीय पाठपुरावा करावा असा मी ठराव मांडत आहे.

**अशरफ शेख :-**

माझे अनुमोदन आहे.

**नरेंद्र मेहता :-**

महापौर मॅडम, या शहरामध्ये कनाकिया पोलिस स्टेशनवर अधिक भार होता गेले अनेक वर्षापासून वेगळे पोलिस स्टेशन व्हाव ही सगळ्यांची मागणी होती. अनेक वर्षापासून हा सरकारकडे प्रलंबित होता. मा. आमदार प्रताप सरनाईकजी मी अनेकदा आम्ही गृहमंत्र्यांना भेट देऊन ते शेवटचा अंतिम निर्णय नोटिफिकेशन काढून त्यासाठी आम्ही अनेक पाठपुरावे करुन आज सरनाईक साहेबांनी आणि मी हे पोलिस स्टेशन वेगळे व्हावे यासाठी अनेक प्रयत्न केले. आणि सरकारने त्याला मंजुरी दिली पोलिस स्टेशनला नक्की कुठली जागा पाहिजे किती जागा पाहिजे ज्यावेळी आपली गटाची बैठक झाली त्यावेळी चर्चाही झाली त्यांनी अजुनपर्यंत येऊन काही सांगितल नाही माझ्या माहितीप्रमाणे महापौर मॅडमला की आम्हाला ही जागा द्या, ती जागा द्या किती वेळसाठी द्या, किती काळासाठी द्या. त्यांची जागा त्यांना ज्यांचे जे आरक्षण आहे ते कधी विकसित करणार आहे असं कुठल्याही प्रकारचा फॉलो अप नाही काही नाही. तरी आपली विनंती सभागृहाची हीच आहे की त्यांनी याव आणि तातडीने आमच तर महापौर मॅडम म्हणण राहील की आजच तुम्ही पत्र लिहा आणि सांगा की नक्की त्यांना काय पाहिजे कुठल्या प्रकारच पोलिस स्टेशन करणार, कुठल बांधकाम तोडणार. काय करणार कारण ज्या ठिकाणी सुचविले कारण एका ठिकाणी तुमच प्रभाग कार्यालय आहे दुसऱ्या ठिकाणी आपल ओ.पी.डी. सेंटर चालतय. आता ओ.पीडी. सेंटरला जीना जो आहे तो लोखंडाचा जीना आहे. तो वरती जायला येतील का नागरिकांना. कारण ते रेग्युलर जीना नाही लोखंडी जीना आपण बांधल पेशंट हा वरती जाऊ शकतो का? एखादा सिनियर सिटीजन असेल तो वरती जाऊ शकतो का ओ.पी.डी. मध्ये? हा ही एक महत्वाचा प्रश्न आहे. राहिल त्याचं आरक्षणाचा भाग जिथपर्यंत मला माहितीय आरक्षण विकसित करणे दोन प्रकारे असतात. एक तर जिथपर्यंत त्या आरक्षण बिल्डेबल अकॉरडेशन खाली आपण ते करु शकतात. माझ्या माहितीप्रमाणे त्यावेळी शासनाने त्यांनी राष्ट्रवादी काँग्रेसची सरकार होते. आर.आर. पाटील साहेब होते. आर.आर.पाटील साहेबांनीच परवानगी दिली होती की खालती पोलिस स्टेशन बांधा वरती त्यांना इमारत बांधून द्या. बिल्डरना विकू द्या. त्यांना मोबदला फ्री ऑफ कॉस्ट जागा आणि कन्स्ट्रक्शन हे मिळणार होत पण त्यावेळी सन्मा. सदस्य मुझफ्फर हुसैन साहेब यांचा त्याला विरोध होता आणि ते बांधु दिले नाही. नाहीतर आज त्या ठिकाणी चांगल पोलिस स्टेशन झाल असत ॲक्वीझिशन इज नॉट द स्मॉल प्रोसीजर आतापर्यंतच्या इतिहासात मी कधी बघितल नाही की या लॅन्डला आपण ॲक्वीझिशन ठरवल आणि ते आपण करुन आणल आणि विकसित केल आणि हे ही अशक्य नाही की आपण एखाद्या प्रशासनाने ठरवल, शासनाने ठरवल तर आपण करुन शकत नाही हे ही अशक्य नाही आता पोलिस प्रशासनाचे यामध्ये किती इंटरेस्ट आहे ते किती याला महत्व देतात कारण शेवटी त्या ॲक्वीझिशनला पैसे लागणार आहेत मग पैसे लागतात मग त्यावेळी पोलिस प्रशासन बोलतात हमारे पास फंड कहाँ पे है। आम्हाला परत हे गर्व्हमेंटकडे पाठवावे लागेल आणि या छोट्या-छोट्या गोष्टीकडे विलंब होतात तर त्यांची भूमिका त्यांनी स्पष्ट केल्या शिवाय आपण त्यांना पोलिस स्टेशन किती कालावधीसाठी द्यायचा आपल्याला एकाला त्यांना कुठलीही आर.जी. जागा असेल ते ही उपलब्ध करुन देता येईल. पण पोलिस प्रशासनाने कधी त्यांची भुमिका या गोषवाऱ्यामध्ये स्पष्ट होतच नाही. त्यांनी काय मांडल आहे तुमच्या बरोबरही त्यांची चर्चा झाली नाही त्यांची भुमिका आपण स्पष्ट करावी. पोलिस प्रशासन शेवटी या शहराच्या हितासाठी आहे त्याला नाही कोण म्हणणार आहे. गरज पडली तर आपण त्यांना आपली वेगळी इमारत देवू. पण भुमिका त्यांची स्पष्ट व्हावी की नक्की त्यांना काय करायचंय, किती

दिवसापर्यंत त्याच आरक्षणच काय होणार आहे घोळघोळ नको ही सभागृहाला विनंती आहे की त्यांना बोलवून घ्याव आणि त्यांच ऐकून परत सभागृहाकडे सादर करावे.

**भगवती शर्मा :-**

महापौर मॅडम, विषय क्र. यह जो लिया गया है इसके अंदर में विषय लेना आपका अधिकार है। इसके हिसाब से आपने विषय लिया। प्रशासनने किसी प्रकार का गोषवारा नही देने के कारण से आज यह स्थिती उत्पन्न हुई है। जिसमें सन्मा. सदस्य श्री. नरेंद्र मेहताजी ने भी कहाँ है की उनकी क्या डिमांड है? क्या नही है कैसे चाहते है इसके लिए कोई भी गोषवारा उपलब्ध नही होने के कारण से ऐसी स्थिती परिस्थिती उत्पन्न हो रही है। और इसलिए मा. आयुक्त साहब ने एक परिपत्रक भी निकाला है दि. १/९/२०१५ उसके अंदर में कई चिजे दिखी हुई है। मैं उसकी लास्ट ओळ सुना देता हूँ। महासभा स्थायी समिती यांच्या समोर मंजुरीसाठी आयुक्तांनी कोणताही गोषवारा पाठवलेला नसताना त्वरित झालेल्या ठरावाची अंमलबजावणी करण्याच्या कोणताही प्रस्ताव विभाग प्रमुखाने परस्पर तयार करु नये अशावेळी संबंधित विभाग प्रमुखाने आयुक्तांशी चर्चा करावी त्यानंतर आवश्यकता वाटल्यास परिपूर्ण प्रस्ताव संबंधित विभाग प्रमुखाने तयार करुन गोषवारा सह प्रस्ताव मंजुरीसाठी अवलोकनासाठी महासभा स्थायी समिती समोर आयुक्तांच्या स्वाक्षरी सह सादर करावे इस तरीकेसे उन्होने परिपत्रक निकाला है। तो मेरा यह मानना है और मेरा यह आपके माध्यम से प्रशासन को भी पूछना है आपसे भी जवाब लेना है की इस तरीके के विषय जो प्रशासन के द्वारा गोषवारा नही देने के बावजूद भी अगर लिए जाते है तो इनकी वैधता कितनी है। इसलिए अगर आयुक्त की यही भूमिका रहती है तो बिना गोषवारे के विषय लेना उचित नही है। और भविष्य में आगे भी कई ऐसे विषय है उनका भी गोषवारा नही है। इसलिए उन विषय पे चर्चा न की जाए तो अतिउत्तम रहेगा।

**ध्रुवकिशोर पाटील :-**

मा. महापौर मॅडम एका ठिकाणी आपण म्हणतोय की आपल्याला पौलिस चौकी बांधायची आहे आणि जी पोलिस चौकी सन्मा. सदस्य नरेंद्र मेहता साहेबांच्या नगरसेवक निधीमधून बांधलेली आहे गोल्डन नेस्ट पोलिस चौकी ती गोल्डन नेस्ट पोलिस चौकी तोडण्याची कारवाई बांधकाम विभागामार्फत सुरु आहे तर ॲक्च्युली याच्यात खुलासा करावा की एका ठिकाणी आपण पोलिस चौकी बांधतो आणि एका ठिकाणची पोलिस चौकी तोडतोय. गोल्डन नेस्ट पोलिस चौकी तोडतोय. बांधकाम विभागामार्फत तो पोलिस चौकी तोडण्याचे काम सुरु आहे. हे स्वतः मला एस.पी. साहेब राजेश प्रधान यांनी सांगितल मी आयुक्तांना सांगितल, आयुक्तांना पत्र दिल आयुक्तांना भेटायला गेलो पण आयुक्त भेटले नाही आयुक्तांना पत्र दिल की अस अस तुम्ही जो निर्णय घेतला आहे तो चुकीचा आहे तुम्ही निर्णय घेतला असेल तर त्या पोलिस स्टेशनला विचारा त्या पोलिसांना विचारा आणि सदस्यापुढे हा विषय घेऊन या आणि मगच सगळ्यांनी कारवाई करा. परंतु आयुक्तांनी काही उत्तर दिलेले नाही तरी माझी आपणांस विनंती आहे महापौर मॅडम की जर गोल्डन नेस्ट पोलिस चौकी तोडायची असेल तर त्यांना विचारा विश्वासात घ्या आणि ती तोडू नये कारण की ती शहराच्या मध्यभागी आहे. चांगल्या ठिकाणी आहे आणि संपूर्ण काशिमिरा ठिकाणी याच सगळ सी.सी.टि.व्ही, सी.सी. कॅमेराच कन्ट्रोल रुम त्या पोलिस स्टेशनमध्ये आहे त्याच्यामुळे ती पोलिस चौकी असणे गरजेचे आहे तरी कृपया आपण यामध्ये लक्ष घाला आणि हा विषय फेटाळा.

**नरेंद्र मेहता :-**

महापौर मॅडम ध्रुवकिशोरजींना जी माहिती आहे ती चुकीची आहे. म्हणून त्यांना खुलासा करु इच्छितो की, ती चौकी माझ्याच नगरसेवक निधीतून बांधली गेली आहे. आणि सभागृहाला एक चुकीची माहिती आलेली आहे की चौकी तोडायच आपलं कुठलाही उद्देश नाही. गोल्डन नेस्ट ते इंद्रलोक हा जो रोड आहे त्यामध्ये पूर्वीच्या काळात मोठ्या प्रमाणात हायटेन्शन केल आहे त्याची विथ म्हणजे १०० फिटचा रोड आहे आणि ५० फिटचे हायटेन्शन आहे. तर त्यांनी सरसकट रिलायन्सने आता ते करायला घेतले आहे. आपले हायटेन्शन छोटे करायला घेतले आहे. या हायटेन्शन ला त्यांना चौकीच्या इकडेच करावे लागेल त्यांना मागे ही करता येतो आणि पुढे ही करता येतो. आता त्यांनी मागे केले तर त्यांची अडचण अशी आहे की, ते राईट साईडला फ्लायओव्हर तिकडे मस्जिदचे काम झाले आणि मस्जिद २ माळ्यावर गेली म्हणजे त्याच रोपला ते रोप जाणार, मस्जिदला टच होणार म्हणुन त्यांच आहे की आम्हाला पुढेच घ्यावे लागेल अस क्रॉस करता येईल. रिलायन्सने सांगितले तोडणे त्याच ठिकाणी पोलिस चौकी आहे. त्याच ठिकाणी ते प्लायलिंग येणार ते हायटेन्शनच्या पुढे. एस.पी. साहेबांची त्यांचे संबंध येण्याचे माजी नगरसेवक निधी असल्याने मी ही त्यांना सांगितल आणि त्या लोकांनी एवढीच विनंती केली की मुख्य स्पॉट आहे आम्हाला पाहिजे आम्ही त्याला सांगितल आम्ही तुम्हाला परत बांधुन देवू गरज लागली तर कुठल्या विकासकाला सांगुन निधी मधुन बांधुन देवू कसतरी काही ना काही मार्ग काढू. त्या लोकांनी एवढीच आपल्याला विनंती केली की गणेशोत्सव महत्वाचा आहे आणि तो जो पॉईंट आहे सेंटर पॉईंट आहे तर गणेशोत्सव नंतर आम्ही काढून देतो आणि फक्त ते पण दोन महिन्याकरिता काढायचे आहे. दोन महिन्यामध्ये ते रिलायन्सवाले आपले काम हायटेन्शनवाले काम पूर्ण करतील आणि त्या ठिकाणी परत ती चौकी उभारली जाणार आहे.

**जुबेर इनामदार :-**

मिरा भाईंदर क्षेत्रामध्ये बांधण्यात आलेल्या चौक्या किती अधिकृत किती अनधिकृत या वादामध्ये तिथे गेलेच नाही पाहिजे बहुतेक रस्त्यावरच आहे. अनधिकृत सुध्दा असतील मात्र पोलिसांच्या चौक्या गरजेच्या आहेत. न्यायव्यवस्था राखली गेली पाहिजे. पोलिसांची उपस्थिती गुन्हेगारी प्रवृत्ती करणाऱ्या लोकांवरती आळा

घालते हा महत्वाचा विषय आहे. सन्मा. सदस्य नरेंद्र मेहता साहेबांनी आमच्या संभाषणात अस सांगितल आहे की त्यांना त्याची कल्पना नाही. पोलिसांनी कल्पना दिली नाही म्हणजे त्यांना कुठे चौकी पाहिजे नयानगरमध्ये. तुम्हाला आठवण देऊ इच्छितो की तुम्ही स्वतः पोलिसांच्या बरोबर डि.वाय.एस.पी. बावचे साहेबांबरोबर प्रभाग कार्यालय ५ मध्ये गेला होतात. ते तेथे जागा मागत होते तळ मजल्यावर वरती शाळा आहे उर्दु शाळा ३४ नंबरची लहान लहान मुले वरती शिकायला येतात. म्हणून खालची ती जागा आपण दिली नाही त्याऐवजी समोर २ मजली असली तरी म्हणजे आरोग्य केंद्र पहिल्या माळ्यावरती स्थलांतरीत करायचा असला तरी, साहेब तुम्हाला मी आठवण देवू इच्छितो सन्मा. आमदार मुझफ्फर हुसैन साहेबांनी स्वतःची जागा निःशुल्क आरोग्य केंद्रासाठी किती तरी वर्ष त्यांनी दिलेली आहे नयानगरमध्ये. ते ही जीने चढुन ते वर तिस-या मजल्यावर होते कीती लोक जात होती. डॉक्टरांशी चर्चा केल्यानंतरच की एवढा मोठा जिना काही नाहीए, अडचण तशी काय होणार नाही. सद्यस्थितीत आपल्याला तात्पुरत्या स्वरुपातच त्यांना द्यायच आहे. भूसंपादनाचा विषय जो तुम्ही आता मांडला साहेब आता २०१५ चालू आहे. २०१७ मध्ये आपल्याला परत आपला विकास आराखडा बदलणार आहे. आरक्षण राहतील बदलतील काय त्याची तडजोड होईल काही सांगता येत नाही सध्या त्यांना गरज आहे. आपल्याला त्यांना दिली पाहिजे. शहराच्या न्यायव्यवस्थेसाठी दिली पाहिजे. पोलिस तुमच्याकडे आधी आले असतील कारण तुम्ही आमदार आहात. प्रत्येक आमदाराकडे ते गेले आणि त्यांनी प्रत्येक आमदाराला विनंती केली मला अस वाटते तुम्ही ती भुमिका चांगल्या दृष्टीकोनातून घेऊन त्यांना मी जो ठराव मांडला त्याला संमती द्यावी धन्यवाद.

**मा. महापौर :-**

मतदानाला घ्या ठराव.

**भगवती शर्मा :-**

मॅडम मेरे प्रश्न का उत्तर तो देने दिजीए ना जरा. आपसे एक प्रश्न किया मैने उस प्रश्न का कम से कम आपके माध्यम से आयुक्त साहेब को देने तो दिजीए ना नही तो बोलने का क्या मतलब रह गया।

**जुबेर इनामदार :-**

आमदार साहेब तुमचा विरोध आहे का?

**भगवती शर्मा :-**

कोई भी चीज का उत्तर तो मिलना चाहिए ना।

**जुबेर इनामदार :-**

चौकी झाल नाही पाहिजे अस आहे का दिशाभूल करु नका त्या विषयाची. विषय आता सध्या जे आहे ते आपल्याला द्यायची की नाही. तुमच मत नाही आहे का.

**नरेंद्र मेहता :-**

आम्हाला द्यायची आहे १०० टक्के द्यायची चांगली द्यायची.

**जुबेर इनामदार :-**

म्हणजे ते तुमच्याकडे आले नाही म्हणून तुम्हाला त्याचा की मान अपमानाचा आहे. विषय आहे का.

**मा. महापौर :-**

आप धीरे बोलिए मैं बोल रही हूँ आप बैठ जाइए।

**गणेश देशमुख (मा. उपायुक्त (मु.)) :-**

मा. महापौर महोदया सन्मा. सदस्यांनी जो प्रश्न उपस्थित केला आहे तो ज्या विषयाचा गोषवारा प्रशासनाकडून आलेला नाही त्या ठरावाची अंमलबजावणी बाबत तर आपल्या महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमानुसार निर्णय घेण्याचा संपूर्ण अधिकार हा सभागृहाचा आहे जसाच्या तसा ऑफिसमधून आलेला ठराव तसाच मंजूर झाला पाहिजे असे काही कायद्यात नाही. त्या ठरावाला काही चर्चा येतील, उपसूचना येऊ शकतील. सदस्यांच आपल मतांतर होऊ शकते काही विरोधकांनी किंवा काही सपोर्टनी, सर्वानुमते अशाप्रकारे सुध्दा मतदानाद्वारे तो ठराव मंजूर होऊ शकतो. परंतु ॲक्टमध्ये ही सुध्दा एक तरतूद आहे की सभेने केलेला जसाच्या तसा ठराव अंमलबजावणी करण्याची आयुक्तांची कोणतीच जबाबदारी नाही की मंजूर झाला म्हणजे उद्यापासून इन्क्रीमेंट झालच पाहिजे अस मुळीच नाही. गोषवारा जेव्हा पाठवला जातो. त्यावेळी कायद्यातील विविध तरतुदींचा विचार करुन त्या विभागप्रमुखामार्फत तो पाठविला जातो. आणि सन्मा. सदस्या सूचना किंवा एक प्रशासकीय ठराव आपण ज्याला म्हणतो सभागृहाने पारित केल्यानंतर त्याची सुध्दा पडताळणी केली जाते. म्हणजे सभागृहाने पाठविला तो अशासकीय आहे तर तो एकदम फेटाळून टाकायचा असच मुळीच नाही तो शेवटी ठराव आहे. कायद्यातली पूर्ण परिभाषा जर दोन्ही बाजूने बघितली तर परंतु तो ठराव झाला म्हणून उद्याच त्यावर अंमलबजावणी होणार अस नाही त्यामध्ये जर काही महासभेची पुन्हा काही गोष्टीवर प्रकाश टाकणे आवश्यक आहे काही बाबतीमध्ये महासभेसमोर गोषवारा सादर करणे गरजेचे आहे. तर त्या केसमध्ये तो झालेला अशासकीय ठराव महासभेपूढे सादर केला जाईल. कायद्यातील तरतुदीशी जर तो सुसंगत नसेल तर मात्र त्याची अंमलबजावणी केली जाणार नाही.

**भगवती शर्मा :-**

आपने अभी जो कहाँ है उसके अंदर में इस तरह की कोई भी यह नही आप देखीए इन्होंने क्या लिखा है की ठिक है यह अधिकार महासभा का है विषय लेना महापौर मॅडम का अधिकार है उसके अंदर में सभागृह का निर्णय होना सभागृह को अधिकार है लेकिन उसके बावजुद भी इन्होंने लिखा है ऐसे कोई भी

निर्णय अगर हो जाते है वो विभागप्रमुख के पास चले जाते है तो उसमें कार्यवाही न करते हुए आयुक्त साहब के पास चर्चा में लाए और आयुक्त साहब उसके बाद प्रशासक के माध्यम से जो गोषवारा देंगे वो महासभा और स्थायी समिती के अंदर में प्रस्तुत करके निर्णय ले यह स्पष्ट लिखा हुआ है।

**गणेश देशमुख (मा. उपायुक्त (मु.)) :-**

तो आप जो बोल रहे है वह मैंने भी दोहराया।

**भगवती शर्मा :-**

नही दोहराया नही आप नरोवाना कुंजका बोल रहे है सर एक साईड में कह रहे है महासभा का अधिकार है और दुसरी तरफ यह परिपत्रक निकालके बोल रहे है की उस अधिकार के तहत के लिए हुए निर्णय को मेरे पास लाए गए विभागप्रमुख द्वारा और उसके बाद के अंदर में आयुक्त स्वाक्षरी गोषवारा करके देंगे उसको महासभा और स्थायी समिती में प्रस्तुत करके निर्णय ले सिधा-सिधा लिखा हुआ है।

**गणेश देशमुख (मा. उपायुक्त (मु.)) :-**

मैं सीधा-सीधा बताता हूँ आप सुन लिजिए मेहेरबानी करके मी काय सांगितल बघा सभागृहामध्ये झालेले निर्णय दोन प्रकारचे आहेत एकतर प्रशासनाकडून आलेला गोषवारा जसाच्या तसा ठराव झालेला. दुसरा विषय असा आहे की प्रशासनाकडून गोषवारा आलेला नाही. परंतु सदस्यांनी ठराव पारित केला मग तो पुरक सुचनेद्वारे असेल किंवा एखाद्या ठरावाला उपसूचना देवून असेल दोन्ही गोष्टीमध्ये आयुक्तांनी तेच सांगितले आहे की जर तो अशासकीय ठराव असेल आयुक्तांचा किंवा प्रशासनाचा गोषवारा झालेला नसताना तर असा ठराव आयुक्तांशी चर्चा करावी आणि त्यानंतर मग त्यामध्ये आवश्यकता असल्यास त्याचा गोषवारा पुन्हा महासभेसमोर ठेवण्यात येईल. गोषवारा, अवलोकन. अवलोकनचा अर्थ असा आहे की मी मगाशी अगदी स्पष्ट सांगितल की, जर ते कायद्यातील तरतुदींशी सुसंगत नसेल तर याची अंमलबजावणी करता येणार नाही ही झाली वस्तुस्थिती, अवलोकन आणि गोषवाराचा अर्थ असेल की एखादा कुठला ठराव झाला की जसा आता सन्मा. सदस्यांनी सांगितल की पोलिस चौकी बाबत पुढील सभेला निर्णय घेऊ किंवा प्रशासनाने गोषवारा ठेवा तर तो त्या विभागाशी चर्चा करुन संबंधित विभाग त्याच मत लिहून आपल्या समोर गोषवारा येणार मी जे सांगितले तेच ते परिपत्रक. त्याचच स्पष्टीकरण मी सांगितले.

**आसिफ शेख :-**

सन्मा. महापौर मॅडम, या ठिकाणी सन्मा. उपायुक्त मुख्यालय प्रभारी अतिरिक्त आयुक्त आणि आपल्याला आज मला वाटते साहेबांनी चार्ज दिला आहे फक्त सभागृहाचे कामकाज पाहण बाकी काही चार्ज दिलेले दिसत नाही. या ठिकाणी सन्मा. महापौर मॅडम, आयुक्त महोदयांनी जे परिपत्रक काढले आहे ते दि. १/०९/२०१५ म्हणजे आपला महासभेचा अजेंडा गेल्यानंतरचा हा या ठिकाणी परिपत्रक काढला आहे आणि आयुक्तांची जी भूमिका आहे मला वाटते आयुक्तांच्या असे निदर्शनास आल असेल की महासभेला जे सन्मा. महापौरांचे जे अधिकार आहेत त्या अधिकारानुसार विषय ते विषयपत्रिकेवर येतात पण प्रशासनामार्फत जे विषय येतात त्याला स्वयंस्पष्ट परिपूर्ण असा गोषवारा प्रशासनाच्या वतीने दिला जातो आणि जर गोषवाऱ्याला अनुसरुनच जर ठराव झाला तर त्याची प्रशासन अंमलबजावणी करते त्याला ते प्रशासन बांधील असते पण प्रशासनाने गोषवारा दिल्यानंतर जर त्या गोषवाऱ्यामध्ये काही फेरबदल झाला तर प्रशासन त्यावर कारवाई करत नाही आता या ठिकाणी विषय असा आहे की या ठिकाणी महासभेचे आपले २-३ विषय असे आहेत की त्या ठिकाणी प्रशासनाने अजिबात गोषवारा दिलेला नाही म्हणजे प्रशासनाची भूमिका अशी आहे की ठिक आहे तुमच तुम्ही बघा आम्ही आमच बघतो तर अशी भूमिका घेऊन नरोवा कुंजवाची भूमिका घेऊन ................

**गणेश देशमुख (मा. उपायुक्त (मु.)) :-**

महापौर मॅडम मला सदस्य महोदयांच्या बोलण्यावर आक्षेप आह.

**आसिफ शेख :-**

आक्षेप काय नाही.

**गणेश देशमुख (मा. उपायुक्त (मु.)) :-**

मला अधिकार आहे आक्षेप घेण्याचा. तुमच्या बोलण्यामध्ये माझा आक्षेप आहे. माझी विनंती आहे की तुम्ही ऐकून घ्यावे.

**आसिफ शेख :-**

तुम्ही बोलले आता आम्हाला बोलु द्या ना. तुमच आम्ही शांतपणे ऐकून घेतले की नाही आता आम्हाला बोलु देणार का नाही तुम्ही सभागृहात आमच अस म्हणणे आहे की तुम्ही जो या ठिकाणी म्हणजे तुमची जी अडचण आहे ना ती अडचण आमच्या चांगल्या आम्हाला माहित आहे तुमची काय अडचण आहे.

**गणेश देशमुख (मा. उपायुक्त (मु.)) :-**

नाही नाही आमची काही अडचण नाही.

**मा. महापौर :-**

आसिफ शेखजी अगर आपको सेम चीज पुछनी है तो उन्होंने ऑलरेडी खुलासा कर दिया है, आप बैठ जाईए प्लीज।

**आसिफ शेख :-**

सभागृह को पता होना चाहिए ना मॅडम हम तो सभागृह में बोल रहे तो हमको आप सभागृह में बोलने नही दोंगे तो कैसा चलेगा साहब जो बोल रहे है साहब की भुमिका को हम असहमती नही दर्शाहते ना हम

बोल रहे है साहब ने जो बोला है वो उनके हिसाब से जो बोलना है वो सही है। हम कहा गलत है उनके जगह पर में रहता ना तो इनसे और जादा समर्थन करता महासभेका और महापौर का लेकिन कायदे मे क्या तरतूद है वो आप देखो ना। मी काय म्हटल तुमच्या जागेवर जर मी असतो तरी तुम्ही जेवढ समर्थन महापौराच करतात किंवा सभागृहाचे यापेक्षा जास्त आम्ही समर्थन केल असत कारण आम्ही त्या पदावर असतो तर पण आता प्रश्न असा आहे की आयुक्त महोदयांनी या ठिकाणी स्पष्ट परिपत्रक काढल्यानंतर त्या परिपत्रकामध्ये स्पष्ट अस दिले आहे की संबधित विभागप्रमुखाला यात जबाबदार धरले जाईल विभागप्रमुखाने काय या ठिकाणी आपला गोषवारा पाठविलेला नाही आणि परस्पर हा विषय महापौराच्या अधिकारात आणलेला आहे तर एखादा ठराव या ठिकाणी झाल्यानंतर त्याची अंमलबजावणी निश्चितपणे आपण करणारच नाही ना कारण गोषवाराच नाही कायदयाला धरूनच नाही तर अंमलबजावणी करणार कस पुन्हा शासनाकडे पाठवण्यासाठी मार्ग मोकळा आहे तुमचा की विखंडित करा की काय करा तो तुमचा अधिकार आहे आयुक्तांचा अधिकार आहे पण सभागृहात आलेला जो या ठिकाणी आयुक्त महोदयानंनी जे परिपत्रक काढली आहे एक तारखेला १-९-२०१५ ला त्यांनी स्पष्टपणे सुचना दिलेल्या आहेत की अस करू नका तरी करतात जर तुमच्या हिशोबाने करा अस तुमचा क्लियर कट म्हणण आहे आम्ही तुमच्या वक्तव्याला कुठे छेद देत नाही पण तुमची भुमिका जी आहे.

**गणेश देशमुख (मा. उपायुक्त (मु.)):-**

आमची भुमिका एवढीच आहे की नरोवा कुंजवा नाही ते परिपत्रक आणि मी जे सांगितले ते एकच बाबी आहे.

**मा. महापौर :-**

सचिव साहेब मतदानाला घ्या.

**नगरसचिव :-**

प्रकरण क्र. ६८ करिता दोन ठराव आलेले आहेत पहिला ठराव सुचक सीमा शाह दूसरा ठराव सुचक जुबेर इनामदार अनुक्रमे दुसरा ठराव मतदानास टाकत आहे. श्री. जुबेर इनामदार यांच्या ठरावाच्या बाजुने असतील त्यांनी हात वर करायचे आहे. ह्या ठरावाच्या विरोधात असतील त्यांनी हात वर करायचे आहेत. तटस्थ कोणी. सुचक सीमा शाह यांनी मांडलेल्या ठरावाच्य बाजुने असतील त्यांनी हात वर करायचे आहे या ठरावाच्या विरोधात असतील त्यांनी हात वर करायचे आहेत. तटस्थ.

**मा. महापौर :-**

सुचक सिमा शह ह्यांनी मांडलेल्या ठरावाच्या बाजुने ४१ विरोधात २९ इतकी मते पडलेली आहेत. श्रीमती सिमा शाह ह्यांनी मांडलेल्या ठराव बहूमताने मंजूर करण्यात येत आहे. पुढचा विषय घ्या.

**प्रकरण क्र. ६८ :-**

मिरारोड (पूर्व) क्षेत्रातील नया नगर पोलीस ठाणेसाठी जागा उपलब्ध करुन देणे संदर्भात निर्णय घेणे.

**ठराव क्र. ४२ :-**

सदर विषयाबाबत सन्मा. पोलिस अधिक्षक व उपअधिक्षक पोलिस विभाग, ठाणे ग्रामीण, ठाणे व मा. आयुक्त यांनी सन्मा. महापौर यांचेबरोबर चर्चा करुन सदर विषय रितसर सादर करण्यात यावा.

**सुचक :- श्रीम. सिमा शाह** **अनुमोदक :- श्री. दिनेश जैन**

| अ.क्र. | ठरावाच्या बाजूने | अ.क्र. | ठरावाच्या विरोधात | तटस्थ |
|---|---|---|---|---|
| १ | मेहता नरेंद्र लालचंद | १ | ध्रुवकिशोर पाटील | |
| २ | पाटील रोहिदास शंकर | २ | डिमेलो बर्नड अल्बर्ट | |
| ३ | म्हात्रे कल्पना महेश | ३ | शिल्पा भावसार | |
| ४ | भानुशाली वर्षा गिरीधर | ४ | सँन्ड्रा जेफ्री रॉड्रीक्स | |
| ५ | मीरादेवी रामलाल यादव | ५ | दक्षता राजेंद्र ठाकूर | |
| ६ | कोठारी सुमन रमेश | ६ | पाटील वंदना विकास | |
| ७ | डॉ. नयना मनोज वसाणी | ७ | शबनम लियाकत शेख | |
| ८ | सिमा कमलेश शहा | ८ | प्रभात प्रकाश पाटील | |
| ९ | जैन गिता भरत | ९ | पाटील सुनिता कैलास | **निरंक** |
| १० | रावल भगवती जयशंकर | १० | झिनत रऊफ कुरेशी | |
| ११ | मेहता डिंपल विनोद | ११ | विराणी रेखा अनिल | |
| १२ | मेघना दिपक रावल | १२ | पुजारी कांचना शेखर | |
| १३ | शर्मा सुनिला सत्येंद्र | १३ | पिसाळ मनिषा नामदेव | |
| १४ | प्रतिभा प्रकाश तांगडे-पाटील | १४ | डिसा मर्लिन मर्विन | |
| १५ | सुजाता रविकांत शिंदे | १५ | अनिता जयवंत पाटील | |
| १६ | पाटील प्रेमनाथ गजानन | १६ | बगाजी शर्मिला विल्सन | |
| १७ | सिंग मदन उदितनारायण | १७ | इनामदार जुबेर | |
| १८ | कांगणे यशवंत ठकाजी | १८ | वेतोसकर राजेश शंकर | |
| १९ | अनिल बाबुराव भोसले | १९ | शेख अशरफ मोहम्मद इब्राहिम | |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| २० | कासोदरीया अश्विन श्यामजी | २० | सुर्यकांत खंडोजी म्हात्रे | |
| २१ | जैन दिनेश तेजराज | २१ | सामंत प्रमोद जयराम | |
| २२ | जैन रमेश धरमचंद | २२ | रकवी सुहास माधवराव | |
| २३ | डॉ. राजेंद्र जैन | २३ | पांडे हंसुकुमार कमलकुमार | |
| २४ | निलम हरिश्चंद्र ढवण | २४ | खण्डेलवाल सुरेश | |
| २५ | शुभांगी महिन कोटियन | २५ | डॉ. आसिफ शेख | |
| २६ | जयमाला किशोर पाटील | २६ | नरेश तुकाराम पाटील | |
| २७ | परमार अनिता भरत | ३७ | भोईर कमलेश यशवंत | |
| २८ | गावंड मंदाकिणी आत्माराम | २८ | रविंद्र भिमदेव माळी | |
| २९ | संध्या प्रफुल्ल पाटील | २९ | वंदना मंगेश पाटील | |
| ३० | म्हात्रे प्रभाकर प्रद्माकर | | | |
| ३१ | दळवी प्रशांत ज्ञानदेव | | | |
| ३२ | हरिश्चंद्र रामचंद्र आमगावकर | | | |
| ३३ | प्रविण मोरेश्वर पाटील | | | |
| ३४ | शाह राकेश रतिशचंद्र | | | |
| ३५ | जयंतीलाल गुरुनाथ पाटील | | | |
| ३६ | केळुसकर प्रशांत नारायण | | | |
| ३७ | भोईर भावना राजू | | | |
| ३८ | भोईर राजू यशवंत | | | |
| ३९ | जाधव मोहन महादेव | | | |
| ४० | ॲड. रवि व्यास | | | |
| ४१ | दिप्ती शेखर भट | | | |

**ठराव बहुमताने मंजूर**

**सही/-**
**महापौर**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

**नगरसचिव :-**

प्रकरण क्र. ६९, मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या मालकीचे स्ट्रीट लाईट पोल वार्षिक मुदतीने देखभाल दुरुस्ती करणे कामाच्या खर्चास प्रशासकीय व आर्थिक मान्यता देणे.

**जयमाला पाटील :-**

मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रात रिलायन्स इन्फ्रा मार्फत स्वखर्चाने स्ट्रीट लाईट पोल बसविण्यात येऊन त्यांची देखभाल व दुरूस्ती त्यांच्यामार्फत केली जाते. सन २००७ ते २०१० या काळात रिलायन्स इन्फ्रा लि. यांनी झोपडपट्टी व ३.०० मीटर रुंदीपेक्षा कमी असलेल्या रस्त्यांवर स्ट्रीट लाईट पोल बसविण्याचे काम बंद केल्याने त्या दरम्यान महानगरपालिकेमार्फत स्वतः खर्च करून स्ट्रीट लाईट पोल बसविण्यात आले आहेत. तसेच चेना, काजूपाडा भागात फाऊंटन हॉटेल ते ठाणे मनपा जकात नाका पर्यंतच्या रस्त्यावर महानगरपालिकेमार्फत स्ट्रीट लाईट पोल बसविण्यात आलेले आहेत.

सदर भागात महावितरणामार्फत वीज पुरवठा केला जात आहे. तसेच एम.एम.आर.डी.ए. मार्फत बांधलेले व महानगरपालिकेकडे हस्तांरीत केलेले स्काय वॉक वरील विद्युत दिव्यांची देखभाल दुरूस्ती महानगरपालिकेमार्फत करण्यात येते. अशाप्रकारे विविध ठिकाणी महानगरपालिकेचे २०२७ पोल व २३६३ फिटींग व इतर साहित्य आहे. सदर पोलची देखभाल व दुरूस्ती कामाची मुदत दि.१०/०८/२०१४ पर्यंत आहे. सदर स्ट्रीट लाईट पोलची देखाभाल दुरूस्ती कामी सक्षम मान्यता घेऊन निविदा मागवून कार्यादेश देणे आवश्यक आहे. सदर कामासाठी विभागवार खालील प्रमाणे खर्च अपेक्षित आहे.

| अ.क्र. | कामाचे नांव | अंदाजित खर्च |
|---|---|---|
| १ | मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील मिरारोड (पूर्व) व पेणकरपाडा परीसरातील स्ट्रीट लाईट पोल देखभाल व दुरूस्ती करणे. | रु.२१,४२,०३६/- |
| २ | मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील भाईंदर (प.) अण्णानगर, शास्त्रीनगर, नेहरूनगर, कोठार झोपडपट्टी, आंबेडकर नगर, भोलानगर, गणेश देवल नगर, जय अंबे नगर १ व २ इत्यादी ठिकाणचे स्ट्रीट लाईट पोल देखभाल व दुरूस्ती करणे (एकूण फिटींग-५०८) | रु.१८,२२,७०४/- |
| ३ | मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील चौक, पाली, उत्तन, मुर्धा, राई, मोर्वा, डोंगरी, केशवसृष्टी इत्यादी ठिकाणचे स्ट्रीट लाईट पोल देखभाल व दुरूस्ती | रु.२२,८९,१४४/- |

| | | |
|---|---|---|
| | करणे (एकूण फिटींग-६३८) | |
| ४ | मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील चेना, काजुपाडा इत्यादी ठिकाणचे स्ट्रीट लाईट पोल देखभाल व दुरूस्ती करणे. (एकूण फिटींग-६२०) | रु.२२,२४,५६०/- |
| | **एकूण** | **रु.८४,७८,४४४/-** |

वरील कामांच्या खर्चाची तरतुद सन २०१५-१६ च्या वार्षिक अर्थसंकल्पात **"विजबिलाचा खर्च (पथदिवे)"** या लेखाशिर्षकात रु.१८००.०० लक्ष इतकी तरतुद करण्यात आली असून सद्यस्थितीत रु.१७,३०,१३,०४०/- इतकी तरतूद शिल्लक आहे.

सदर स्ट्रीट लाईट पोल मे. रिलायन्स एनर्जी लि. यांच्याकडे देखभाल व दुरुस्तीसाठी देण्यात यावेत. तसेच आवश्यकता असल्यास सर्व पोल मे. रिलायन्स एनर्जी लि. कडून नव्याने बसवून घ्यावेत. तोपर्यंत नव्याने वार्षिक मुदतीच्या निविदा मागविण्यास व वरील अंदाजपत्रकांना प्रशासकीय व आर्थिक मान्यता देण्यात येत आहे असा ठराव मांडत आहे.

**अनिता परमार :-**

माझे अनुमोदन आहे.

**जुबेर इनामदार :-**

मा. महापौर मॅडम देखभाल दुरूस्तीचा विषय आहे विज पुरवठा लाईट पुरवठा दिवाबत्ती आपल्या ह्या शहरामध्ये गरजेचे आहे तस आम्ही ठरावाच्या बाजुनेच बोलणार पण फक्त माझी एक प्रशासनाला सुचना आहे आपण यांना वार्षिक देखभाल दुरूस्तीसाठी स्ट्रिट लाईट पोल देखभाल दुरूस्ती फक्त म्हणजे दिवे गेले तरच बदली करायचे किंवा केवळ काय फॉल्ट असला तर रिपेअर करायचे एवढेच नाही. त्या पोलाची परिस्थिती बघा खाजगी आपल्या पालिकेचे आहेत ते ही आणि रिलायन्सचा ही विषय तसाच आहे कमीत कमी वर्षात एकदा तरी त्याला रंगरंगोटी करा शहरामध्ये एक सौदंर्य येते. चांगले सुंदर दिसणारे पोल लावा काहीतरी डिझाईन वाले पोल बसवा नविन मुंबईमध्ये तस केलय त्यांनी हे सगळ करता येणारी वस्तू आहे पैसे तितकेच देतो आपण कमीत कमी या वस्तु कुठे तरी केल्यातर एक सौदंर्याचा भाग वाढेल या शहराचा अशी माझी सुचना आहे. धन्यवाद.

**अनिल भोसले :-**

मा. महापौर मॅडम आपल्या परवानगीने बोलतो आपण स्ट्रिट लाईटच्य संदर्भात विषय आणला पूर्ण सदन आपल्याला मनःपुर्वक धन्यवाद देते. पण महत्वाचा विषय असा आहे आपण जे देयक पे करतो इलेक्ट्रिसिटीच्या संदर्भात कोण आहे का? कोणी अधिकारी आहेत? त्यांना विचारा की जवळ जवळ दोन दोन महिने कुठल्या परिसरामध्ये स्ट्रिट लाईटचे पोल बंद आहे. त्यामध्ये झालेल्या अपघाताचे जबाबदार कोण? कुणाचे पाय मोडले, कुणाला साप चावला आहे आपण स्ट्रिट लाईटचे पोल लावले पण त्यात दिवाबत्ती चालू आहे की नाही याची दखल घेणार कोण कारण आपण पोल लावायला खर्च भरपूर केला पण ती बत्तीच जळत नाही तर पोलचा उपयोग काय ? कारण डाचकूलपाडा माझ्या अनेक परिसरामधून अनेक पत्रव्यव्हार केलेले आहेत. ग्रामीण भागामध्ये स्ट्रिट लाईटचे पोल तर आपण लावले पण केबल कापली म्हणून जॉईन्ट करण्याला कमीत कमी दिढ वर्ष लागतो का ? कोण आहे अधिकारी मॅडम उत्तर हव आहे? डाचकूलपाडा माझ्या माहितीप्रमाणे गेली दिढ वर्षापासून आपले स्ट्रिटलाईठचे पोल बंद आहेत. तिथे १७ पोल आहेत ते बंद आहेत मिनाक्षी नगर परिसरामध्ये ८ पोल आहेत ते बंद आहेत. जनता नगर परिसरामध्ये महापौर मॅडम बी.एस.यू.पी चे काम चालू आहे तिथे जवळ जवळ ८ ते ९ महिन्यापासून अनेक स्ट्रिट लाईटचे पोल बंद आहे. मग बंद लाईटचे बिल भरतोय आपण कसले बिल भरतोय?

**शिल्पा भावसार :-**

मा. महापौर मॅडम, आपल्या परवानगीने बोलू इच्छिते. मला पण हेच सांगायच आहे की आपल्या मिरा भाईदर क्षेत्रात जेव्हा जेव्हा स्ट्रिट लाईट बंद असतें तेव्हा आम्हालाच ते बघून फोन करून ते सांगावे लागते त्यांना आणि त्यांच्यानंतर २-३ दिवसांनी ते बल्ब चेन्ज करण्यात येते तर ही दुर्दशा आपली नाही व्हायला पाहिजे. आपण एवढा फंड पास करतोय दुसर आपण इथे जे सांगितल की एवढे स्ट्रिट लाईट फिटिंग ७२० वगैरे असणार किंवा दुसरे जे काही आकडे असतील त्यांची दखलगिरी म्हणजे बघण्यासाठी आपल कोण तरी माणूस असायला पाहिजे की हे जे बिल पास करताय ते तेवढे स्ट्रिट लाईट आहेत की नाहीत ते तरी आपल्याला कळायला पाहिजे माझ्या वॉर्डात एक प्रॉब्लेम झाला आहे की स्ट्रिट लाईट जेव्हा बंद होते केबल जळते तेव्हा त्यांना रस्ता खोदून केबल रिपेयरिंग करण्यासाठी ते रस्ता खोदत आहे. परमिशन घेत नाही ते बोलतात आम्हाला परमिशन घ्यायची गरज नाही आणि ते रस्ता तसाच्या तसाच सोडून निघून जातात आणि लगेच ते बांधकामवाले काम करणार नाही. आत्ताच्या आत्ता आपण नविन रस्ता जो बनविला होता त्या रस्त्याची वाट लावली आणि लोकांना येताना जाताना ही त्रास होत आहे त्याच जबाबदार कोण ?

**सुहास रकवी :-**

मा. महापौर मॅडमच्या परवानगीने बोलतो मॅडम आपण जे दिवे रिलायन्सकडून घेतले स्ट्रिट लाईट त्याच टाईमींग काय ते समजत नाही कारण आपला जसा दिवस कधी लहान असतो कधी मोठा असतो तर सकाळच्या वेळेला लवकर आता दिवे बंद होतात. साहेब या रोडला बघाल ना तर ६.०० वाजताच बंद होतात म्हणजे अस आहे की त्यांना देखील इलेक्ट्रिसिटी वाचवण्याकरीता लोकांची गैरसोय करू नये.

**अनिल भोसले :-**

मॅडम माझ्या एका प्रश्नाचे उत्तर द्यावं त्यांचे अर्धा तास होत आहेत आमचे तर कायमचेच बंद आहे त्याच मला उत्तर हव आहे.

**मा. महापौरः-**

अनिल भोसले साहेब सगळ्या प्रश्नांची उत्तरे एकदमच द्यायला लावते.

**सुहास रकवी :-**

आमच म्हणण संध्याकाळी सुध्दा काही दिवे अल्टरनेट बंद करतात भाईदर वेस्टला एका नतर एक बंद करतात मग तस आपण त्याप्रमाणे त्यांना देयक द्यायला पाहिजे आणि टाईमींग काय आहें साहेब त्यांना विचारून घ्या. आणि ते आम्हाला कळवल तर बर होईल. धन्यवाद मॅडम

**दिपक खांबित :-**

मा. महापौराच्या परवानगीने बोलतो हे रिलायन्सचे जे पोल आहेत त्याच्या टायमरनेच ते बंद होतात आणि ते सिझन प्रमाणे टाईमर हे चेंज करित असतात तर ह्या बाबतीत तुम्ही बोलल्याप्रमाणे मी वेळ चेक करून घेतो.

**अनिल भोसले :-**

खांबित साहेब माझा एक प्रश्न आहे.

**दिपक खांबित :-**

हे जे बिल आहे ते मीटर प्रमाणे असते जे पोल बंद असतात त्याच बिल काय दिल जात नाही जेवढ मीटर कन्झ्यूम होतो, इलेक्ट्रिसिटी कन्झ्यूम होते त्याप्रमाणे दिले जाते.

**अनिल भोसले :-**

त्या लाईट दिड वर्षापासून बंद आहेत. आपल्याकडे अनेक पत्रव्यव्हार डाचकूल पाडयाची माझ्या माहितीप्रमाणे पूर्ण दीड वर्षापासून लाईट बंद आहे. आपल्याकडे ९ ते १० पत्र मी पाठवली आहेत. जनता नगर मधले अनेक लाईट बंद आहेत. लोकांचे अपघात झाले आहे संर्पदंशाने त्या दिवशी एक आदिवासी मुलगा मेला त्याला जबाबदार कोण?

**दिपक खांबित :-**

जबाबदारी ही पूर्णताः रिलायन्स एनर्जीची आहे रिलायन्स एनर्जीला आपण लाईटच्या मिटरप्रमाणे बिल देतो प्लस मेन्टेनसंचे पण पैसे पण दर महिण्याला देतो. पोल व्हाईज....................

**अनिल भोसले :-**

पण बंद पोलचे देतो का चालू लाईट चे देतो.

**दिपक खांबित :-**

बंद लाईट मिटरप्रमाणे मिटर चालणारच नाही ना.

**अनिल भोसलेः-**

म्हणजे मिटर लावले म्हणून पोल शो साठी लावले आहेत का? दिड वर्षापासून लाईट बंद आहे त्याच्यावर काय कारवाई केली आपण माझे आपणाला १० पत्रे आहेत.

**दिपक खांबित :-**

साहेब जशा जशा कम्पलेन्ट येतात आम्ही सुध्दा माणसे ठेवली आहेत त्याकरिता.

**अनिल भोसले :-**

दोन वर्षापासून ती कम्पलेन्ट एकाने बधितली नाही.

**दिपक खांबित :-**

आहेत ना माणसे जे पोल बंद असतात सायकली त्यांना घेऊन दिल्यात.

**अनिल भोसले :-**

आता माझ्याबरोबर महासभा संपल्यानंतर चला दिड वर्षापासून लाईट बंद आहेत त्याच्यावर काय कारवाई करणार?

**दिपक खांबित :-**

आजच माणूस तुमच्या बरोबर पाठवतो आणि कुठे कुठे बंद आहेत.....

**अनिल भोसले :-**

त्यांना दिड वर्ष लापरवाई केली ज्याचे पाय मोडले ज्याला साप चावला आहे ज्यांचा मृत्यू झाला. त्यावर ३०४ प्रमाणे गुन्हा दाखल करा.

**दिपक खांबित :-**

तीन दिवसाच्या आत पोल सुरू करतील.

**अनिल भोसले :-**

संबधित कुठल्या अधिका-यावर गुन्हा दाखल करणार ज्यांच्या मुळे संर्पदंशाने पाय मोडले आहेत किंवा ज्यांचा संर्पदंशाने मृत्यू झाला आहे. तो माणूस परत येणार नाही. ३०४ ने गून्हा दाखल करा दिड वर्ष काय केले त्यांनी म. महापौर मॅडम एक महिना ठिक आहे २ महिने ठिक आहे तरतुद म्हणून चार महिने ठिक आहे दिड वर्ष झाले १०-१० पत्र आहेत आणि १०-१० पत्र असुन सुध्दा अधिकारी कारवाई करत नाही. जनतानगर मध्ये बी.एस.यु.पी. चे काम चालू आहे. अनेक लाईट बंद आहे माझी १४ पत्रे आहेत.

**मा. महापौर :-**

बसा मी ही सुचना देते की त्वरीत ते काम करून घ्याव कारण हे जे झाले आहे नुकसान त्याच ते बघून घेणार?

**अनिल भोसले :-**

मॅडम यांचे कन्ट्रोल नाही. अनेक जंगली जनावरे फिरतात लोकांचे मृत्यू होतात. ही परिस्थिती आहे तिकडची.........................

**मा. महापौर :-**

मी अधिका-यांना तशी सूचना दिली आहे. दोन दिवसाच्या आत तुमच्याकडे जे पोल लाईट जे काही तक्रारी आहेत ती सगळीच दूर करण्यात यावी.

**अनिल भोसले :-**

धन्यवाद मॅडम.

**दक्षता ठाकूर :-**

मॅडम आपल्या परवानगीने बोलते भोसले साहेब सांगतात की, डाचकुल पाड्यामध्ये लाईटचे काम नाही होत. आज बरेच वर्ष झाले आम्ही पण वारंवार पत्रव्यवहार करतो आणि आता तीन दिवस बाकी आहे काम सुरु होणार आहे. ते जानकर साहेब स्वतः आलेले रिलायन्सचे ऑफिसर त्यांना घेऊन आम्ही सगळ दाखवल आता तीन दिवसात ते काम सुरु होणार आहे. मी पण वारंवार पत्र दिलेत त्याच वॉर्डाची मी प्रतिनिधी आहे आणि तीन दिवसात ते काम सुरु होणार आहे. धन्यवाद.

**प्रभात पाटील :-**

महापौर मॅडम फक्त एवढच विचारायचं आहे त्यांना ते म्हणाले की मीटर प्रमाणे रिडिंग होते आणि मग बिल येतात तुम्हाला त्याच्यामध्ये एकच सूचना कराविशी वाटते की आपले लाईटचे पोल किंवा स्ट्रिट लाईट हे दिवसाढवळ्या पण चालू असतात. त्याच्यावर कृपया लक्ष द्यावे कारण मीटर वाढते ना. इंद्रलोकमध्ये नेहमी लाईट चालु असतात दिवसापण...................

**दिपक खांबित :-**

जेव्हा पोल बंद असतात ना रिपेअरिंग करण्याकरिता त्या भागाचे त्या रस्त्यावरचे पूर्णच स्ट्रिट लाईट पोल सुरु आम्हाला ही तस वाटायचं पण ब-याच वेळा पाहणी केल्यावर ते तिकडे रिपेअरिंग काम चालू असते.

**मा. महापौर :-**

ठराव मंजुर पुढचा विषय घ्या.

**प्रशांत दळवी :-**

महापौर मॅडम आपण ज्या विषयाकरिता मी आपल्याकडे परवानगी मागत होतो. फार गंभीर विषय आहे आणि आपण मला बोलायला संधी दिली म्हणून प्रथमतः मी आपले आभार व्यक्त करतो. महापौर मॅडम मी माझे सर्व सहकारी नगरसेवक याकडे लक्ष वेधू इच्छितो की मिरा भाईंदर शहराची लोकसंख्या दिवसेंदिवस वाढत चालली आहे. त्याप्रमाणे गाड्यांचेही प्रमाण वाहतुकीची रहदारी फार मोठ्या प्रमाणात वाढलेली आहे. त्याचाच एक मुद्दा की मिरा भाईंदर क्षेत्रामध्ये अनधिकृत बसणारे फेरिवाले. महापौर मॅडम गेल्या सतत दोन वर्षापासून या फेरिवाल्यांच्या माध्यमातून आम्ही या ठिकाणी सभागृहामध्ये, प्रशासनाचे लक्ष वेधू इच्छितो. परंतु विषय एवढा गंभीर असताना देखील प्रशासनाने गेंड्यांची कातडी पांघरलेली अंगावरती अजिबात लक्ष देत नाही. उडवा उडवीची उत्तरे देतात.

**आसिफ शेख :-**

आता प्रशासन तुमच्या ताब्यात आहे ना.

**प्रशांत दळवी :-**

महापौर मॅडम मी हे जे माझे मत मांडतो आहे हे याच्या अगोदर आमचे विरोधक आहेत ना यांच्या वेळेला पण लक्षवेधी मांडली परंतु त्यांनी ते पांघरुन स्वतःवरती पण अंथरुन घेतल होत. त्यामुळे माझी लक्षवेधी त्या लोकांनी फेटाळली होती. म्हणून मी पहिल्यांदा आपले आभार व्यक्त केले की मला बोलण्याची संधी दिली.

**आसिफ शेख :-**

पहिली गोष्ट म्हणजे तुम्ही विषयाला बोलत नाही प्रशासन तुमच्याकडे आहे. सत्ताधारी तुम्ही आहेत. तुम्ही प्रशासनाला हे अस बोलणे योग्य नाही.

**मा. महापौर :-**

आसिफ शेख साहेब मी त्यांना परवानगी दिली आहे आणि कृपया कोणी मध्ये बोलू नये.

**प्रशांत दळवी :-**

महापौर मॅडम अस असताना प्रभाग क्र. ५ च्या अंतर्गत आमचे सन्मा. सभापती जुबेर इनामदार आहेत तिकडे. त्या ठिकाणी आम्ही ठराव केलेले आहेत परंतु त्या ठरावाला सुध्दा केराची टोपली दाखविली जाते. प्रत्येक महिन्याच्या ५ ते १० तारखेला फक्त कारवाई होते. महापौर मॅडम आपल्या निदर्शनास आणून देऊ इच्छितो की या फेरिवाल्यांचे आणि प्रशासनाचे त्यातील प्रभाग अधिकारी आणि तेथे जे काही लोक त्या अतिक्रमण विभागाचे ठेवले आहेत यांची साटेलोट आहे. महापौर मॅडम आपल्याला लक्षात असेल की गेल्या २ महिन्यांपूर्वी आपण त्या ठिकाणी आंदोलन केल होत. आदरणीय तेथील स्थानिक आमदार नरेंद्रजी मेहता आपण स्वतः आमचे उपमहापौर प्रविणजी पाटील सर्व माझे सहकारी बी.जे.पी. आणि शिवसेनेचे नगरसेवक ही

आपण त्या ठिकाणी ठाण मांडून बसलो होतो. महापौर मॅडम आयुक्त महोदय डबल ढोलकी वाजविण्याचे काम चालु होते. तेथे आम्हाला त्यावेळी त्यांनी सांगितल की या ठिकाणी आजपासुन एकही फेरिवाला बसणार नाही महापौर मॅडम आपण जे फेरिवाला धोरण निश्चित केल २००८ मध्ये धोरण निश्चित केल होत. त्यानंतर आपण तिकडे करोडो रुपये खर्च करुन फेरिवाला क्षेत्र ना फेरिवाला क्षेत्राचे बोर्ड देखील लावले गेले आहेत. अस असताना त्या बोर्डाचे फोटो कित्येक वेळा मॅडम द्यायचे. महापौर मॅडम आपल्या निदर्शनास आणुन देऊ इच्छितो की आमच्या पत्रकार बंधुनी देखील तिकडे जाऊन पाहणी केली ज्यावेळेला आपण आंदोलन केले त्यावेळेलाही ते उपस्थित होते. त्यावेळेलाही त्यांनी आपआपली मते पेपरच्या माध्यमातून मांडली. आम्ही कोणत्या प्रेस नोट त्यांना द्यायला गेलो नव्हतो. आजदेखील तुम्ही बघितल तर दोन दिवसांपूर्वी पण त्यांनी जो उच्छांद मांडला आहे फेरिवाल्यांनी या सकाळ वर्तमानपत्रात, पुण्यनगरी, तरुणभारत सगळ्या पेपरनी त्याला प्रतिसाद दिला आहे. महापौर मॅडम कटिंग रजिस्टर फक्त या सभागृहामध्ये प्रत्येक आयुक्त कमिशनरकडे आहे. फक्त आलेल्या कटिंग आलेल्या बातमीची या ठिकाणी गंभीर दखल घेतली जात नाही. महापौर मॅडम मी आपल्या निदर्शनास आणून देऊ इच्छितो स्थानिक नगरसेवक म्हणून वारंवार पत्र व्यवहार केलेले आहेत. पण एकाही पत्राची दखल घेतली जात नाही. त्या ठिकाणी आमच्याकडे जे प्रभाग अधिकारी दिलेले आहेत स्वतःला आयुक्त समजतात. काही नगरसेवकांना विचारले त्यांनी तुम्ही कुठल्या पार्टीचे नगरसेवक आहेत. म्हणजे नगरसेवक कुठल्या पार्टीचे आहेत हे सांगितल्यानंतर तुम्ही त्याच्यावर कारवाई करणार आहात. आज नविन फंडा त्यांनी अवलंबला आहे महापौर मॅडम प्रत्येक ठिकाणी कारवाई अनधिकृत बांधकामाला कारवाई करायला जातात. त्या ठिकाणी यांची हफ्ते वसुली आहे त्या ठिकाणी हे कारवाईला जातात. त्या ठिकाणी यांना प्रोटेक्शनची गरज लागत नाही. परंतु आता या १० दिवसांपूर्वी जन्म झाला आहे. एका युनियनचा आझाद हाकर्स युनियन त्या ठिकाणी यांचे साटेलोट आहे. महापौर मॅडम गाडी घेऊन जायला लागत नाही आणि काल आमचे आदरणीय आयुक्त महोदयांनी तर नविन फंडा आमच्या समोर महापौर मॅडम तुमच्या समोर आमदारांसमोर ही भाषा वापरली त्यांनी आमचे काही सदस्य व्यापारी इकडे वर्ग आलेला आहे एकही फेरिवाल्याला बसु देणार नाही. अस म्हणून पत्रक काढा आजच्या आज असे बोरसेंना विभाग प्रमुखांना सांगण्यात आलं. परंतु त्याच विभाग प्रमुखांना काल बोलविण्यात आले इकडे कोणत्याही कोर्टाची आदेशाची अंमलबजावणी दाखवतात हे फेरिवाले आझाद हॉकर्स युनियन ही युनियन आमची सभागृह चालविणार ही युनियन. महानगरपालिका चालविणार का महापौर मॅडम? हे मी आपल्याला सांगू इच्छितो महापौर मॅडम एवढच झाल नाही तर काल त्या ठिकाणी आयुक्तांनी आदेश दिलेत बोरसेंना एका बाजुला आमच्या समोर वेगळे आदेश देतात. एका बाजुला बोरसेला सांगितल ठिक आहे तिकडे नो हॉकर्स झोन असल तरी तिकडे त्यांना पट्टे मारुन द्या आणि तिकडे व्यापार करायला लागा. हे काय आहे महापौर मॅडम? म्हणजे आपल्या करदात्या नागरिकांवरती छळ चालु आहे त्या ठिकाणी मुख्य रहदारी आहे. लाखो लोक रोज तिकडे ये-जा करतात. रेल्वेने त्या ठिकाणी महापौर मॅडम पाय ठेवायला जागा नाही. त्या ठिकाणी शाळेच्या बसेस येतात. अर्धा-अर्धा तास शाळेच्या बसेस त्या ठिकाणी उभ्या राहतात. कोणाच लक्ष नाही. मी दरवेळा सांगतो आता फक्त एकदाच सांगतो त्या ठिकाणी महापौर मॅडम आपल्या निदर्शनास आणून देऊ इच्छितो की हे जो लोक हे जे प्रभाग अधिकारी हे जे प्रशासनाचे लोक जे म्हणतात की आम्हाला प्रोटेक्शन दिले जात नाही महापौर मॅडम आपल्या निदर्शनास आणून देऊ इच्छितो आपल्या लोकसभेचे खासदार आदरणीय राजनजी विचारे यांच्या समोर आम्ही सगळे गेले होतो. महापौर मॅडम त्या ठिकाणी एस.पी. साहेबांनी अस सांगितलेल आहे तुम्ही दोन मागाल आम्ही तुम्हाला ४ देऊ. परंतु महापौर मॅडम, वस्तुस्थिती अशी आहे की पोलिस प्रोटेक्शन आपले पी.आय. जाधव साहेब ४.०० वाजता तिकडे रेडी ठेवतात आपला एकही अधिकारी तिकडे पोलिस प्रोटेक्शन घ्यायला जात नाही. आणि जातात तर कधी साडे सहा, सात वाजता जातात. त्यांचे नोकर आहे का तिकडे पोलिस प्रोटेक्शन ४ वाजता मागितले आहे. लेटरहेड वरती आणि जातात ६.३०, ७ वाजता महापौर मॅडम यांना प्रोटेक्शन कस मिळणार आणि जेव्हा आपण त्यांना फोन करतो साहेब काय झाल आले नाही आज तुम्ही कारवाई केलीच नाही. त्यावेळेला उत्तर अस मिळते त्या ठिकाणी आम्हाला पोलिस प्रोटेक्शन दिले जात नाही म्हणजे पोलिसांवरती आरोप करतात. महापौर मॅडम हे काय चालले आहे किती दिवस या करदात्या नागरिकांचा छळ करणार आहेत. महापौर मॅडम या अनुषंगाने मी तुम्हाला सांगु शकतो की आमचे पत्रकार मित्र आहेत ज्या अनधिकृत हॉटेल वरती या लोकांनी काही ऑब्जेक्शन घेतले असतील त्यावेळेला एका पत्रकार बंधुवरती हमला झाला एकाला तर जीव गमवावा लागला. महापौर मॅडम या अनुषंगाने मी तुम्हाला सांगु इच्छितो काय ते आझाद हॉकर्स युनियन आम्हाला यु.पी. बिहार वरुन धमक्याचे फोन देणार आणि महापौर मॅडम तशी रितसर तक्रारही मी इकडे दाखल केली आहे. मला एस.पी. साहेबांकडून पोलिस प्रोटेक्शनही दिले आहे. परंतु महापौर मॅडम आपल्या निदर्शनास आणुन देऊ इच्छितो की हे करदाते नागरिक त्या बिल्डींगच्या आवारात राहतात त्यांना संरक्षण कोण देणार? त्यांची जबाबदारी कोणाची आज महापौर मॅडम जे पत्रके मी दाखवितो तुम्हाला ह्या सगळ्या सोसायटीने पत्रव्यवहार केलेला आहे. गेल्या ३-३, ४-४ वर्षापासून आयुक्त महोदय हे पत्रव्यवहार करतात पण त्यांना केराची टोपली दाखविली जाते. महापौर मॅडम या अनुषंगाने मी सांगू इच्छितो जस त्या हॉटेल मालकांनी काही गुंड प्रवृत्तीच्या लोकांनी आमच्या पत्रकार बंधुनी जसा मार खाल्ला त्या अनुषंगाने आपण कोणाची वाट बघता एखादा लोक प्रतिनिधी किंवा एखादा तिकडचा स्थानिक त्रस्त झालेला नागरिक किंवा तिकडच्या व्यापाऱ्याची बळी जाण्याची तुम्ही वाट बघताय का? आणि त्यानंतर तुम्ही त्या नो हॉकर्स झोनवर बसलेले फेरिवाले उचलणार का? हा एक प्रश्न उपस्थित करण्यात येत आहे

आणि म्हणून महापौर मॅडम तुम्हाला एक कळकळीची विनंती करतो या ठिकाणी आज सभागृहामध्ये सोमवार ते मंगळवार या सभागृहाच्या अनुषंगाने मी आपल्याला सांगु शकतो सोमवार ते मंगळवार पर्यंत आम्ही या ठिकाणी वेळ देत आहोत महापौर मॅडम एक सेनेची युनियन पण तिकडे स्थापन होईल मंगळवारच्या दिवशी त्या दिवशी मी स्वतःही तिकडे पावभाजीची गाडी सुरु करणार. त्या रस्त्यावरती आमचे काही सदस्य हजारो गाड्या तिकडे लावतील त्यानंतर या मुख्य कार्यालयाच्या समोर पण ना फेरिवाला क्षेत्र आहे. त्याच ठिकाणी शेकडो गाड्या लागतील मग आयुक्तांनी ठरवायचं की त्या सेनेच्या युनियनला पाठिंबा द्यायचा की मग या करदात्या नागरिकांना बाजुला ठेवायचं. महापौर मॅडम आज मला आपल्याकडून आदेश पाहिजे आयुक्त महोदय आपण काय कारवाई करणार तेही पाहिजे आणि आयुक्त महोदय मी तुम्हाला सांगु इच्छितो की एक लोक स्थानिक प्रतिनिधी या व्यापाऱ्यांच्या अंगाला तेथील करदात्या नागरिकांच्या अंगाला जराही धक्का पोहोचला तर ही शिवसेना कदापी सहन करणार नाही आणि सर्व सन्मा. सदस्यांना माझे अपिल आहे माझी एक विनंती राहणार आहे की या गोष्टीला मला सगळ्यांनी पाठिंबा द्यावा एवढेच बोलून मी माझे दोन शब्द संपवतो. जय हिंद। जय महाराष्ट्र।

**दिप्ती भट :-**

महापौरांच्या परवानगीने बोलते, प्रभागच्या मिटींगमध्ये १५ दिवस अगोदर आम्ही सगळ्या नगरसेवकांनी हा ठराव केलेला ठरावाखाली अंमलबजावणी करण्यासाठी होता त्यावेळी अस सांगितलेल की कारवाई करु आणि तेव्हा आम्ही त्यांना प्रभाग अधिकारी जुबेर इनामदार त्यांना प्रश्न पण केलेला आणि स्वप्नील सावंत साहेबांना ना फेरिवाला क्षेत्र आहे आपला मिरारोड मध्ये बाजार फी महानगरपालिका वसूल करते त्यांनी बोलले नाही. महानगरपालिका करते. तर महानगरपालिका ना फेरिवाला क्षेत्रामध्ये कस वसूल करु शकते. तर त्यांनी वसूल नाही करावे स्वतः गुन्हा करतात.

**मा. महापौर :-**

मी आयुक्तांना तसे आदेश देते जेथे-जेथे ना फेरिवाला क्षेत्र लागलेला आहे तेथे त्वरीत कारवाई करावी. पुढचा विषय घ्या.

**सुहास रकवी :-**

महापौर मॅडम हा विषय नव्हता आम्हाला बोलु द्या.

(सभागृहात गोंधळ)

**प्रभात पाटील :-**

महापौर मॅडम हा विषय फक्त एका माणसासाठी होता का? शहरामध्ये सगळीकडे हे प्रॉब्लेम आहेत. सगळ्यांना बोलु द्या एका माणसासाठी हा विषय नव्हता.

**प्रकरण क्र. ६९ :-**

मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या मालकीचे स्ट्रीट लाईट पोल वार्षिक मुदतीने देखभाल दुरुस्ती करणे कामाच्या खर्चास प्रशासकीय व आर्थिक मान्यता देणे.

**ठराव क्र. ४३ :-**

मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रात रिलायन्स इन्फ्रा मार्फत स्वखर्चाने स्ट्रीट लाईट पोल बसविण्यात येऊन त्यांची देखभाल व दुरूस्ती त्यांच्यामार्फत केली जाते. सन २००७ ते २०१० या काळात रिलायन्स इन्फ्रा लि. यांनी झोपडपट्टी व ३.०० मीटर रुंदीपेक्षा कमी असलेल्या रस्त्यांवर स्ट्रीट लाईट पोल बसविण्याचे काम बंद केल्याने त्या दरम्यान महानगरपालिकेमार्फत स्वतः खर्च करून स्ट्रीट लाईट पोल बसविण्यात आले आहेत. तसेच चेना, काजूपाडा भागात फाऊंटन हॉटेल ते ठाणे मनपा जकात नाका पर्यंतच्या रस्त्यावर महानगरपालिकेमार्फत स्ट्रीट लाईट पोल बसविण्यात आलेले आहेत.

सदर भागात महावितरणामार्फत वीज पुरवठा केला जात आहे. तसेच एम.एम.आर.डी.ए. मार्फत बांधलेले व महानगरपालिकेकडे हस्तांरीत केलेले स्काय वॉक वरील विद्युत दिव्यांची देखभाल दुरूस्ती महानगरपालिकेमार्फत करण्यात येते. अशाप्रकारे विविध ठिकाणी महानगरपालिकेचे २०२७ पोल व २३६३ फिटींग व इतर साहित्य आहे. सदर पोलची देखभाल व दुरूस्ती कामाची मुदत दि.१०/०८/२०१४ पर्यंत आहे. सदर स्ट्रीट लाईट पोलची देखाभाल दुरूस्ती कामी सक्षम मान्यता घेऊन निविदा मागवून कार्यादेश देणे आवश्यक आहे. सदर कामासाठी विभागवार खालील प्रमाणे खर्च अपेक्षित आहे.

| अ.क्र. | कामाचे नांव | अंदाजित खर्च |
|---|---|---|
| १ | मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील मिरारोड (पूर्व) व पेणकरपाडा परीसरातील स्ट्रीट लाईट पोल देखभाल व दुरूस्ती करणे. | रु.२१,४२,०३६/- |
| २ | मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील भाईंदर (प.) अण्णानगर, शास्त्रीनगर, नेहरूनगर, कोठार झोपडपट्टी, आंबेडकर नगर, भोलानगर, गणेश देवल नगर, जय अंबे नगर १ व २ इत्यादी ठिकाणचे स्ट्रीट लाईट पोल देखभाल व दुरूस्ती करणे (एकूण फिटींग-५०८) | रु.१८,२२,७०४/- |
| ३ | मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील चौक, पाली, उत्तन, मुर्धा, राई, मोर्वा, डोंगरी, केशवसृष्टी इत्यादी ठिकाणचे स्ट्रीट लाईट पोल देखभाल व दुरूस्ती करणे (एकूण फिटींग-६३८) | रु.२२,८९,१४४/- |
| ४ | मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील चेना, काजुपाडा इत्यादी ठिकाणचे | रु.२२,२४,५६०/- |

| | | |
|---|---|---|
| | स्ट्रीट लाईट पोल देखभाल व दुरूस्ती करणे. (एकूण फिटींग-६२०) | |
| | **एकूण** | **रु.८४,७८,४४४/-** |

वरील कामांच्या खर्चाची तरतुद सन २०१५-१६ च्या वार्षिक अर्थसंकल्पात **"विजबिलाचा खर्च (पथदिवे)"** या लेखाशिर्षकात रु.१८००.०० लक्ष इतकी तरतुद करण्यात आली असून सद्यस्थितीत रु.१७,३०,१३,०४०/- इतकी तरतूद शिल्लक आहे.

सदर स्ट्रीट लाईट पोल मे. रिलायन्स एनर्जी लि. यांच्याकडे देखभाल व दुरुस्तीसाठी देण्यात यावेत. तसेच आवश्यकता असल्यास सर्व पोल मे. रिलायन्स एनर्जी लि. कडून नव्याने बसवून घ्यावेत. तोपर्यंत नव्याने वार्षिक मुदतीच्या निविदा मागविण्यास व वरील अंदाजपत्रकांना प्रशासकीय व आर्थिक मान्यता देण्यात येत आहे असा ठराव मांडत आहे.

**सुचक :- सौ. जयमाला पाटील अनुमोदक :- सौ. अनिता पाटील**

**ठराव सर्वानुमते मंजूर**

**सही/-**
**महापौर**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

(सभागृहात गोंधळ)

**नगरसचिव :-**

प्रकरण क्र. ७०, वैद्यकिय विभागाकरीता आवश्यक औषधे, लॅब मटेरीयल, सर्जिकल मटेरीयल, खरेदी करणेकरीता आर्थिक व प्रशासकीय मंजूरी मिळणेबाबत.

**निलम ढवण :-**

प्रशासनाने दिलेल्या गोषवाऱ्यानुसार महानगरपालिकेच्या वैद्यकीय विभागाकरिता आवश्यक औषधे, लॅब मटेरिअल, सर्जिकल मटेरिअल निविदा मागवुन खरेदी करणेस व याकामी येणाऱ्या खर्चास ही सभा आर्थिक व प्रशासकीय मंजूरी देत आहे.

सन २०१५-१६ च्या अर्थसंकल्पीय अंदाजपत्रकात औषधे खरेदीकरिता रु. १,००,००,०००/- रुग्णालय किरकोळ खरेदी / देखभाल कामे करिता रु. १,००,००,०००/- श्वानदंश / सर्पदंश / काविळ लस खरेदी करिता रु. ५०,००,०००/- तरतुदीनुसार खर्च करण्यात यावा.

वरील कामी निविदा तात्काळ काढाव्यात, सदर ठरावाची अंमलबजावणी ठरावाची वाट न बघता त्वरीत करण्यात यावी.

१) शासन निर्देशानुसार महानगरपालिकेला लागणारी औषधे द्यावी.
२) रुग्णालयातून सर्व औषधे, सर्जिकल मटेरिअल रुग्णांना विनामुल्य पुरविण्यात यावीत.

**प्रशांत केळुसकर :-**

माझे अनुमोदन आहे.

मा. महापौर :-

ठराव सर्वानुमते मंजूर.

**प्रकरण क्र. ७० :-**

वैद्यकिय विभागाकरीता आवश्यक औषधे, लॅब मटेरीयल, सर्जिकल मटेरीयल, खरेदी करणेकरीता आर्थिक व प्रशासकीय मंजूरी मिळणेबाबत.

**ठराव क्र. ४४ :-**

प्रशासनाने दिलेल्या गोषवाऱ्यानुसार महानगरपालिकेच्या वैद्यकीय विभागाकरिता आवश्यक औषधे, लॅब मटेरिअल, सर्जिकल मटेरिअल निविदा मागवुन खरेदी करणेस व याकामी येणाऱ्या खर्चास ही सभा आर्थिक व प्रशासकीय मंजूरी देत आहे.

सन २०१५-१६ च्या अर्थसंकल्पीय अंदाजपत्रकात औषधे खरेदीकरिता रु. १,००,००,०००/- रुग्णालय किरकोळ खरेदी / देखभाल कामे करिता रु. १,००,००,०००/- श्वानदंश / सर्पदंश / काविळ लस खरेदी करिता रु. ५०,००,०००/- तरतुदीनुसार खर्च करण्यात यावा.

वरील कामी निविदा तात्काळ काढाव्यात, सदर ठरावाची अंमलबजावणी ठरावाची वाट न बघता त्वरीत करण्यात यावी.

१) शासन निर्देशानुसार महानगरपालिकेला लागणारी औषधे द्यावी.
२) रुग्णालयातून सर्व औषधे, सर्जिकल मटेरिअल रुग्णांना विनामुल्य पुरविण्यात यावीत.

**सुचक :- सौ. निलम ढवण अनुमोदक :- श्री. प्रशांत केळुसकर**

**ठराव सर्वानुमते मंजूर**

**सही/-**
**महापौर**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

**नगरसचिव :-**

प्रकरण क्र. ७१, महानगरपालिका हद्दीतील हॉटेल/दुकानांची अग्निशमन परवाना फी व नुतनीकरण फी कमी करणेबाबत फेरविचार करुन निर्णय घेणे.

**राकेश शाह :-**

मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रात विविध आस्थापनांना उदा. हॉटेल, भोजनालय, उपहारगृह इत्यादींना अग्निशमन विभागाचा नाहरकत दाखला देण्यात येतो. सदर नाहरकत दाखला दरवर्षी अग्निशमन विभागाकडून नुतनीकरण करुन घ्यावयाचा असतो. मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील विविध हॉटेल, भोजनालय, उपहारगृह इत्यादींना नविन नाहरकत दाखला देणे तथा सदर नाहरकत दाखल्याचे नुतनीकरण करणे याकरिता खालील प्रमाणे फी निर्धारित करण्यात येत आहे.

| अ.क्र. | तपशील | नवीन नाहरकत दाखला फी | दाखला नुतनीकरण फी |
|---|---|---|---|
| १ | हॉटेल, भोजनालय, उपहारगृह इत्यादींचे क्षेत्रफळ २००० चौ. फुटपेक्षा कमी असल्यास | रु. १,२००/- | रु. १,२००/- |
| २ | हॉटेल, भोजनालय, उपहारगृह इत्यादींचे क्षेत्रफळ २००० चौ. फुटपेक्षा अधिक परंतु ४००० चौ. फुटापेक्षा कमी असल्यास | रु. १,८००/- | रु. १,८००/- |
| ३ | हॉटेल, भोजनालय, उपहारगृह इत्यादींचे क्षेत्रफळ ४००० चौ. फुटापेक्षा अधिक असल्यास | रु. ३,५००/- | रु. ३,५००/- |

मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील विविध हॉटेल, भोजनालय, उपहारगृह इत्यादींना नाहरकत दाखला देणेकामी दि. ०१/१०/२०१५ रोजीपासून वरिल दरानुसार फी ची आकारणी करण्यात यावी. तसेच मिरा भाईंदर शहरात सर्वधर्मिय उत्सवांसाठी मंडप परवानगी घेते वेळी अग्निशमन विभागामार्फत एन.ओ.सी. घेणे असते सदरसाठी परवानाशुल्क आकारण्यात येते ते फार मोठे आहे. तरी सदर परवाना शुल्क सर्वधर्मियांच्या मंडप परवानगीसाठी नाममात्र १००/- रुपये घेण्यात यावे व सदर परवानगी एका दिवसाच्या आत देण्यात यावी असा ठराव मांडत आहे.

**प्रशांत केळुसकर :-**

माझे अनुमोदन आहे.

**मर्लिन डिसा :-**

महापौर मॅडम मच्छी मार्केट बंद करा प्लीज.

**प्रमोद सामंत :-**

या विषयावरती प्रशासनाने आपल म्हणणे मांडावे.

**भगवती शर्मा :-**

महापौर मॅडम विषय पे तो बोलने दिजीए।

**नगरसचिव :-**

महापौरांनी जेवणाची वेळ घोषित केलेली आहे.

**सुहास रकवी :-**

विषय चालु आहे ना अजुन. अस कस म्हणता तुम्ही विषय चालु आहे अजुन तुम्ही सगळ्याला बंदी घालु नका मॅडम ऐकून घ्या फक्त आमच.

**मा. महापौर :-**

त्यांची विनंती होती तुम्ही लंच ब्रेक द्या.

**जुबेर इनामदार :-**

या विषयाच्या नंतर द्या.

**मा. महापौर :-**

ठिक आहे बोला.

**भगवती शर्मा :-**

महापौर मॅडम इस विषय के अंदर में गोषवारा नही होने के वजह से हमारे जैसे सदस्यों को क्या करने जा रहे है। प्रशासन ने इसके पहले क्या ठराव किया है। प्रशासन की क्या भुमिका थी और अभी क्या करने जा रहे है। कम से कम उसकी सुचना वो तो हमको ज्ञान मिलना चाहिए ना की क्या करने जा रहे है। उसके अलावा सीधा ठराव दिया जा रहा है मेरा आपसे निवेदन है की इसके पहले क्या था। अभी क्या कीया जा रहा है। आपके माध्यम से सभी सदस्यों को अवगत कराइए।

**आसिफ शेख :-**

लंच ब्रेक १.३० ते ३.०० मॅडम.

**सुहास रकवी :-**

थांबा हो आसिफ शेख.

**मा. महापौर :-**

रकवी जी आप बोलिए।

**सुहास रकवी :-**

महापौर मॅडम आता विषय जो दिला परवाना शुल्क प्रशासनाने पण आपली भुमिका मांडायला पाहिजे त्याच काय आहे त्याच्यामध्ये ते कमी करावे ते का जास्त. त्याचप्रमाणे मगाशी दळवी साहेबांनी जे भाषण दिले ते चांगले दिले त्यांनी ते विचार मांडले पण त्याच्यात आमच्या सूचना सुध्दा होत्या. बाजार हा फक्त मिरारोडला नाही मिरा भाईंदरमध्ये आहे. आम्हाला हेच त्यांचे जे प्रॉब्लेम आहेत ते आमचे ही आहेत ना.

**मा. महापौर :-**

नाही रकवी जी अस आहे की वो जो एरिया है पर्टिक्युलर आप सुन लिजीए मैंने किसीको बोलने की इच्छा नही आप बैठिए प्रशांत भाई मैं उनको जवाब दे रही हूँ। ऐसा था की उनको जानसे मारने की धमकी भी आ रही थी। उन्होंने लक्षवेधी डाली और बहुत वहाँ दो दिनसे तीन दिनसे बहुत प्रॉब्लेम हो रहे है।

**सुहास रकवी :-**

मालुम है मॅडम, प्रशांतजी हमारे दोस्त है। उनके बारे में हमने भी जानकारी ली उन्होंने बॉडीगार्ड लिया हुआ है। उनको अगर जान की धमकी आ सकती है, तो हमें नही आ सकती क्या? हम भी ऐसे ही काम करे क्या? हम क्या बोलते है यहाँ पर बात सुनिए।

**मा. महापौर :-**

अगर ऐसा कुछ है आप अगली बार मुझे दिजीए वो विषय रितसर लेती हूँ।

**सुहास रकवी :-**

लेकिन जो लक्षवेधी है उसके अंदर सुचना हम लोग डाल सकते है ना? तुम्ही आमच म्हणणे ऐकून घेत नाही. प्रत्येक सदस्याच्या वॉर्डामध्ये बाजार आहे मॅडम ऐका.

**मा. महापौर :-**

लक्षवेधी हमारा हुआ नही रकवीजी आप सुनिए लक्षवेधी लेने का मौका मिला नही अपने इस जो सभागृह की स्थिती थी और उनके जान को खतरा था इसलिए मैंने उनको बोलने दिया है। आपको फेरिवाला पे जिस जिस को जो भी बोलना है मैं विषय लाऊंगी और तब आप सभी वो बोले।

**सुहास रकवी :-**

मॅडम एक छोटी सुचना है पानपट्टे साहेब को बोलिए हमने जो सूचना दि उसके उपर इम्पलीमेंटेशन करे। आम्ही तुम्हाला सुचना दिलेली आहे तुम्ही मीटर बाय मीटर २५ रुपयाचे ते चुकीचे धोरण आहे. त्याच्यामध्ये थोडासा बदल करा।

**निलम ढवण :-**

महापौर मॅडम म्हणूनच सकाळच्या फेरिवाल्याच्या प्रश्नावर जर व्यवस्थित चर्चा झाली असती तर आज हा विषय असा आला नसता. तो विषयच घेऊ देत नाही त्याच्यावर तुम्हीही चर्चा केली असती ना सगळ्यांनी चर्चा करु दिली नाही मला.

**सुहास रकवी :-**

बरोबर आहे आम्ही कुठे नाकारतो आहे.

**निलम ढवण :-**

पुढच्या वेळी या विषयावर व्यवस्थित चर्चा करु या.

**संभाजी पानपट्टे (मा. उपायुक्त) :-**

मा. महापौराच्या परवानगीने बोलतो मिरा भाईंदर हॉटेल असोसिएशनने प्रशासनला मा. महापौर मॅडमला एक निवेदन दिले होते त्याचे हाय रेट्स होती. कल्याण डोंबिवलीची तसेच उल्हासनगरची आणि रेट्स जास्त असल्यामुळे त्याची रेट्स कमी करण्याचे निवेदन दिले होते त्यानुसार ते सदरचा विषय घेतलेला आहे.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

तुम्ही गोषवारा का दिला नाही.

**संभाजी पानपट्टे (मा. उपायुक्त) :-**

गोषवारा नाही निवेदन केले होते.

**प्रमोद सामंत :-**

महापौर मॅडम किती रिव्हेन्यू त्यांच्याकडे येत होता आता कमी झाल्यामुळे किती रिव्हेन्यूमध्ये फरक पडणार आहे प्रशासन तयार आहे का या विषयाला बजेटमध्ये काय प्रोव्हिजन केल आहे आपण. आमच विरोध नाही पण तुमच काय म्हणण आहे ते कळु द्या.

**संभाजी पानपट्टे (मा. उपायुक्त) :-**

महासभा अंतिम निर्णय घेऊ शकते ना त्याच्यावर.

**प्रभात पाटील :-**

एक मिनिट आयुक्त साहेब आता आम्ही शहरातले सगळे नागरिक म्हणून आपल्याला एक निवेदन देतो की आम्हाला येणारा टॅक्स कमी करण्यात यावा. आणता का विषय बोला? आम्ही पण निवेदन देतो ना आमच टॅक्स कमी करा म्हणून असा विषय देतो आम्ही.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

पानपट्टे साहेब एल.बी.टी. बंद झालेले आहे आर्थिक बाजु महानगरपालिकेची कमकुवत झाली आहे आणि आपण बजेटमध्ये तरतूद केली आहे की एवढे पैसे येणार आहेत आणि आज जर तो चार्ज आपण कमी केला तर आपल्या बजेटवर परिणाम होणार ना मग गोषवारेत खुलासा का नाही केला. प्रशासनाने गोषवाऱ्यामध्ये हा खुलासा केला पाहिजे. गोषवारा दिला पाहिजे.

**मा. महापौर :-**

बसा.

**नरेंद्र मेहता :-**

महापौर मॅडम मिरा भाईंदर हॉटेल असोसिएशनने आपल्याकडे एक विनंती केली होती की जे फायरचे दर त्यांच्याकडून वसूल केले जातात म्हणजे एखादा ३०० फुटचे ज्याचे हॉटेल असेल त्याला आपण साडे पाच हजार रुपये आकारतो. ज्याचे ५००० फुटाचे असेल त्याला ही साडे पाच हजार रुपये आकारतो आणि या प्रकारे त्या लोकांनी स्वतःहुन मेहनत करुन कल्याण डोंबिवली महानगरपालिका, ठाणे महानगरपालिका यांचे सर्वांचे दर आपल्याकडे सादर केले की सगळ्या महानगरपालिकेचे हे दर आहे फक्त मिरा भाईंदरमध्ये डबल नाही ट्रीपल नाही चौपल नाही १० पट हे दर आहेत. त्या लोकांनी आपल्याला रितसर दिले आहे की ६०० रुपये कल्याण डोंबिवलीकडे आहे. ठाण्याकडे साधारण ७००-८०० रूपये ठाणा महानगरपालिकेत आहे तरी त्या लोकांनी आपल्याला निवेदन केल की आमची कमीत कमी १०० रू. म्हणजे १२०० रू. घ्या. जे मोठे आहे त्याचे तुम्ही २४०० घ्या अशाप्रकारे आपल्याला विनंती केली होती आणि राहिला प्रश्न आपण उत्पन्नाची जी चिंता ध्रुवकिशोर पाटीलजीनी जी व्यक्त केली तर त्याच्या माहितीसाठी मी जस्ट या सभागृहाच्या माध्यमातून आणून देतो. हॉटेल असोसिएशनी वारवार विनंती केली याच्या अगोदर ही विनंती केलेली आपण दरवेळी आपल्या करात बजेटमध्ये प्राव्हिजन केल्या पण एक रू. त्यांचा आजपर्यंत आपल्याला उत्पन्न प्राप्त झाले नाही. म्हणजे आपण करतो पण ते प्रॅक्टीकली इम्पलीमेंटच होत नाही. कारण दहा पट एवढा रेट कूठेच नाही. आता हे कमी केल्याने त्या सर्वानी आपल्या मा. आयुक्त,मा. उपायुक्त साहेबसुध्दा होते तरी ग्वाही दिली की आम्ही सगळे असोसिएशनचे येवून एकत्र लायसन्स घ्यायला तीन तीन वर्षाचे पैसे भरायला आम्ही तयार आहोत. पण आम्हाला कुठेतरी न्याय द्यावे. इतर महानगरपालिकेमध्ये जसे आहे त्यापेक्षा थोडेफार तुम्ही जास्त लावले तरी आमची हरकत नाही पण एकदम १० पट इतर महानगरपालिकेपेक्षा तुम्ही लावल जे कुठेही नाही. राहिल त्यांच्यावर कारवाई करायची असेल तर आपल्याकडे कुठल्याही कायदयात अशी तरतूद नाही की त्यांचे आपण सिल करू शकतो. हॉटेल बंद करू शकतो. आपल्याकडे अशी तरतूदच नाही. म्हणून जे जास्त लागलेले होते ते सुधारणा करायचा अधिकार महानगरपालिकेचा आहे आणि आता आम्ही खात्रीने सांगतो आपल्याला की आपल्या काळात जे काही रेव्हेन्यू झाला असेल त्यापेक्षा जास्त रेव्हेन्यू आता या माध्यमातून येणार अस आम्ही ठणकुन सांगतो या सभागृहाच्या माध्यमातून आणि आम्ही सद्बुध्दीने या शहराचा व्यापाऱ्यांचा हिताचा विचार करता इतर महानगरपालिकामध्ये काय परिस्थिती आहे या सगळ्या बाजुचा विचार करता हा योग्य निर्णय या शहरातल्या नागरिकांनी व्यापाऱ्यांसाठी घेतला आहे. धन्यवाद.

**हंसुकुमार पांडे :-**

महापौर मॅडम.

**नरेंद्र मेहता :-**

एक मिनिट त्यामध्ये राहून गेलं. त्यामध्ये आम्ही अजून एक सुचना घेतली आहे की आता उच्च न्यायालयाने जे आदेश दिले आहेत की फायर एन.ओ.सी. घेणे गरजेचे आहे. मिरा भाईंदर शहराला बंधनकारक आहेत की नाही ते मला अजुन त्याबद्दलचे माहिती नाही. कारण आपण आपली एक उपविधी तयार केली होती आणि शासनाला पाठविली होती. ॲफिडेव्हिट करायला किंवा जे काही करायला आपण मागच्या मिटींगमध्ये केल होत त्यामध्ये आयुक्त सगळ ठरवतील अस आपण ठरवल होत. त्यामध्ये २२०० रुपये रेट नव्हत परंतु आपण अस गृहित धरुया कदाचित तो आपल्यावरही बंधनकारक असेल असे गृहित धरुन आपल्याकडे २२०० रुपये साधारण आपण त्या परवानगीला घेत असतो तर आज या ठरावामध्ये आम्हीही सूचना केलेली आहे की धार्मिक संस्था मग ते जन्माष्टमी असू द्या कुठलही धार्मिक उत्सव असु द्या कारण प्रत्येक मंडपाला आता तुम्हाला फायरची एन.ओ.सी. घ्यावी लागेल तर नाममात्र १०० रु. फक्त त्यांच्याकडून घेऊन ती परवानगी देण्यात यावी आणि गणेश उत्सव हे ११ दिवस असले तरी १०० रु. आणि १ दिवस असले तरी १०० रु. अस नाही की तुम्ही ते मल्टीप्लाय ११ करा आणि मल्टीप्लाय ७ करा आणि त्यांना परवानगी सुध्दा आपण एका दिवसाच्या आतमध्ये द्यावी. मग नवरात्र असु द्या कुठलेही धार्मिक उत्सव असू द्या. सामाजिक धार्मिक जे काही कार्यक्रम म्हणजे नॉन कर्मशियल ॲक्टीव्हीटी जे होतात त्या सगळ्यांना आपण जे सार्वजनिक रुपाचे असतात समाजाचा आणि धर्माच्या हिताचा असतात त्यासाठी फक्त मात्र १०० रु. आपण आकारावे अशी आम्ही सूचना सुध्दा केली आहे.

**हंसुकुमार पांडे :-**

महापौर मॅडम आमदार साहेब ने जो विषय लाया है प्रशासनने लाया लेकिन आपने उत्तर दिया इसका लेकिन जिसका हॉटेल ४०० फिट का है उसका १२०० फिट का वापर है छपरा डालके उसको टॅक्स लगाया गया क्या आज तक उसके उपर वो धंदा करता है। हर एक जगह पे उनका धंदा ऐसाही चालु है हर हॉटेल का। अभी यह सोनाली हॉटेल है सोनाली हॉटेल के उपर जो छपरा बांधा है उसके उपर बर्थडे पार्टी वगैरा

सब होता है। उसका कोई टॅक्स लिया जाता है क्या? वो बर्थडे पार्टी का पैसा नही लेता है क्या? तो उसका भी टॅक्स आकारणी किजीए ना। आपने मिरा भाईंदर को रेव्हेन्यू कम हो गया है तो रेव्हेन्यू बढाने की कोशिश करिए। हम लोग टॅक्स कम ही करते जा रहे है उनका। उनका लायसन्स फिस कम करते जा रहे है तो इसके उपर भी कुछ आप सोचिए ना।

**नरेंद्र मेहता :-**

परत सभागृहाला माहिती देऊ इच्छितो हा जो विषय आहे लॉजिंग बोर्डिंग बिल्डींगचा नाही रेस्टॉरंट का है।

**हंसुकुमार पांडे :-**

हॉटेल ही देखिए ना। आप कितने हॉटेल देखिए जो रोड पे ग्राऊंड फ्लोअर पे है उसका भी देखिए ना आप।

**नरेंद्र मेहता :-**

महापौर मॅडम आम्ही जे दर कमी केले आहे.............

**हंसुकुमार पांडे :-**

२०० फिट दुकान है, ४०० फिट का बाहर टेबल डालके बैठा है।

**नरेंद्र मेहता :-**

महापौर मॅडम हंसुकुमार पांडेने जी सुचना मांडलेली आहे त्याच्यावर योग्य कारवाई योग्य वेळी झाली पाहिजे हा भाग आहेच पण आम्ही जो आता विषय मांडला आहे फक्त ओनली फॉर द फायर लायसन्स आम्ही त्यांचे दुकानाच्या लायसन्सचे पण बोलत नाही. दुकानाच्या लायसन्सचे इटिंग चे काही वेगळे असेल आम्ही फक्त फायर एन ओ सी चे केले आहे आणि ते फक्त रेस्टॉरंट कारण बाकीच्यांनी रितसर फायर एन ओ सी घेतलेली आहे. ज्यांनी रितसर फायर ची एन ओ सी घेतली आहे त्याला १० टक्के आपल्याकडे आहेतच सिस्टिम. कॅपिटेशन फिस चे १० टक्के भरायचे मग तो कुठलाही त्यामध्ये सोनाली हॉटेल आणलं की दुसरं कुठलं हॉटेल आणलं ते याच्यात काही मोडत नाहीए. हे फक्त रेस्टॉरंट जे आहे त्याच्यासाठी हे आम्ही आणलेले आहे.

**मा. महापौर :-**

हंसु जी अभी जो विषय है वो सिर्फ रेस्टॉरंट का है।

**नरेंद्र मेहता :-**

बाकी राहिलं त्यासाठी आपण रितसर विषय आणा त्याच्यावर योग्य निर्णय घ्या आम्ही त्याला समर्थन राहू धन्यवाद.

**राजेंद्र जैन :-**

महापौर मॅडम मेहता साहब ने बोला बराबर है की यह विषय फायर एन ओ सी का है। लेकीन हमें बाहर अक्सर सुनना पडता है सरकार आपकी महासभा आपकी राज्य आपका शासन आपका देश आपका किंतु फिरभी हम होटेल वालोंको पैसा कम कर रहे है लेकीन उन्होंने क्लिअरकट फेवर ब्लॅक जो होटेल बनाए है पिछले सालोंमे उन्होंने इतना इललिगल काम किया हुआ है, इसपें कारवाई होनी चाहिए। मेहता साहब ने बोला निश्चित कारवाई होगी लेकिन होगी नही इसपे करवाना हमारा काम है। अगर नही होता है तो हम पिछे हटते है। जितने भी इललिगल होटेल है इनका सुट देणे से पहले मेरा यह मानना है पर्सनल। मै प्रस्ताव के साथ हूँ लेकीन जो उनको फायदा दिया जाए तो साथमें जितना भी इललिगल बांधकाम किया है उसे तुरंत नोटिस दिजीए, तोडा जाए सबको।

**मा. महापौर :-**

ठिक है लंच ब्रेक।

**प्रकरण क्र. ७१ :-**

महानगरपालिका हद्दीतील हॉटेल/दुकानांची अग्निशमन परवाना फी व नुतनीकरण फी कमी करणेबाबत फेरविचार करुन निर्णय घेणे.

**ठराव क्र. ४५ :-**

मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रात विविध आस्थापनांना उदा. हॉटेल, भोजनालय, उपहारगृह इत्यादींना अग्निशमन विभागाचा नाहरकत दाखला देण्यात येतो. सदर नाहरकत दाखला दरवर्षी अग्निशमन विभागाकडून नुतनीकरण करुन घ्यावयाचा असतो. मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील विविध हॉटेल, भोजनालय, उपहारगृह इत्यादींना नविन नाहरकत दाखला देणे तथा सदर नाहरकत दाखल्याचे नुतनीकरण करणे याकरिता खालील प्रमाणे फी निर्धारित करण्यात येत आहे.

| अ.क्र. | तपशील | नवीन नाहरकत दाखला फी | दाखला नुतनीकरण फी |
|---|---|---|---|
| १ | हॉटेल, भोजनालय, उपहारगृह इत्यादींचे क्षेत्रफळ २००० चौ. फुटपेक्षा कमी असल्यास | रु. १,२००/- | रु. १,२००/- |
| २ | हॉटेल, भोजनालय, उपहारगृह इत्यादींचे क्षेत्रफळ २००० चौ. फुटपेक्षा अधिक परंतु ४००० चौ. फुटापेक्षा कमी असल्यास | रु. १,८००/- | रु. १,८००/- |

| | | | |
|---|---|---|---|
| ३ | हॉटेल, भोजनालय, उपहारगृह इत्यादींचे क्षेत्रफळ ४००० चौ. फुटापेक्षा अधिक असल्यास | रु. ३,५००/- | रु. ३,५००/- |

मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील विविध हॉटेल, भोजनालय, उपहारगृह इत्यादींना नाहरकत दाखला देणेकामी दि. ०१/१०/२०१५ रोजीपासून वरिल दरानुसार फी ची आकारणी करण्यात यावी. तसेच मिरा भाईंदर शहरात सर्वधर्मिय उत्सवांसाठी मंडप परवानगी घेते वेळी अग्निशमन विभागामार्फत एन.ओ.सी. घेणे असते सदरसाठी परवानाशुल्क आकारण्यात येते ते फार मोठे आहे. तरी सदर परवाना शुल्क सर्वधर्मियांच्या मंडप परवानगीसाठी नाममात्र १००/- रुपये घेण्यात यावे व सदर परवानगी एका दिवसाच्या आत देण्यात यावी असा ठराव मांडत आहे.

**सुचक :- श्री. राकेश शाह** **अनुमोदक :- श्री. प्रशांत केळुसकर**

**ठराव सर्वानुमते मंजूर**

**सही/-**
**महापौर**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

**नगरसचिव :-**

एक तासाची वेळ जाहिर केलेली आहे. प्रकरण क्र. ७२, आ. क्र. १०२ (बगीचा) आरक्षणामधून विद्यमान इमारतींना वगळणेसाठी महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम १९६६ चे कलम ३७ नुसार कार्यवाही करणेबाबत.

**नरेंद्र मेहता :-**

विषय मॅडम मिरा भाईंदर महानगरपालिकेचा आराखडा १९९२ पासुन. १९९२ साली आपण सुरुवात केली १९९७ साली त्याला शासनाने अंतिम मंजुरी दिली आणि या शहरामध्ये कामकाज आता डिपी प्लॅन आराखडयाप्रमाणे होत आहे. ज्यावेळी आराखडा तयार केला त्यावेळी ओस्तवाल पार्क अशा जेसल पार्क इकडे ३ कि २ इमारत आहे. त्या इमारती वर ९२ मध्ये आरक्षण टाकण्यात आले आणि त्या इमारती ज्या आहेत ते आरक्षणाच्या पूर्वी बांधले गेले होते म्हणजे डिपी तयार व्हायच्या अगोदर पासून ते बिल्डिंग आहे त्या बिल्डिंग वरच आरक्षण टाकले गेले आता ते कसे टाकले गेले का टाकले गेले त्यावेळी एखादे दोन सदस्य यावेळचे त्यावेळी असतील पण ते कुठे तरी आमचे असे मत आहे की दुर्लक्ष झाले असेल किंवा नजर खालुन ते झाले असेल त्यानंतर त्याला प्रोसेस झाले त्याला शासनाने अंतिम मान्यता दिली आणि त्याप्रमाणे कामकाजाला सुरुवात झाली मधल्या काळात याच सभागृहाने म्हणजे माझ्या माहितीप्रमाणे नगरपालिकेचा टाईम आला म्हणजे मनपा त्यावेळी नाही. त्यावेळी आम्ही सदस्य देखील नव्हतो. त्यावेळी तो निर्णय झाला की आरक्षणाचा एरिया हा अर्धा करावे आणि ३७ खाली मोडिफिकेशन किंवा सुधारितसाठी आपल्या महानगरपालिकातर्फे तो शासनाला पाठवले गेले आणि शासनाला पाठविताना तो आरक्षण अशा प्रकारे पाठवले गेले की पुढचं गार्डन करा आणि मागचे आर झोन करा मग त्यामध्ये ही जी बिल्डिंग होती ते ही आर झोन मध्ये आली असती. परंतु शासनाकडे ज्या वेळी अंतिम मंजुरी होऊन प्रस्ताव आला तर पुढचे नाही मधुन असे २ भाग केले गेले. एका साईडला लेफ्टला गार्डन आणि राईटला आर झोन आणि मग ही इमारत होती परत त्या गार्डन रिर्झव्हेशन खाली आले गेले आणि त्यानंतर त्या शासनाच्या आदेशानुसार महानगरपालिकेकडे विकासकांनी प्रस्तावित केले परवानगी द्यावी आणि त्या अनुषंगाने आरक्षणामध्ये जी बिल्डींग आहे तेवढ्या एरियाचा एफ.एस.आय. वगळुन महानगरपालिकेने त्या विकासकाला परवानगी दिली आहे. आता विकासाला परवानगी दिली नाही बरोबर आहे महानगरपालिकेने चुका केली. शासनाने चुका केली कोणी केली हा एक भाग वेगळा झाला परंतु आज मोठ्या प्रमाणात जे रहिवाशी त्या इमारतीमध्ये राहतात जे १९९० च्या अगोदर बांधली गेली त्यांना ही शंका आहे की आम्ही रि-डेव्हलपमेंटला आम्ही ज्यावेळी जाऊ त्यावेळी आम्ही तर खाली येणार मग आमच भविष्य काय? आम्हाला परत परवानगी महानगरपालिका देणार नाही ही त्यांची एक मोठ्या प्रमाणातली भिती आहे आणि स्वाभाविक आहे की १९९० पासून राहत असतात आणि आता माहित पडते बिल्डींग आरक्षणाखाली आहे ते चुकीचे आहे तर त्यासाठी आजचा जो प्रस्ताव आम्ही जो ठराव करतोय की तेवढा एरिया रहिवास भाग ऑलरेडी जुना जो १९९२ डी.पी. तयार करायचा पूर्वीचा एरिया ज्या ठिकाणी तेवढा एरिया त्या ठिकाणी वगळण्यात यावे या संदर्भात हा प्रस्ताव आहे आणि या प्रस्तावावर आम्ही ठराव मांडायचा होता. परंतु गैरसमज असा झाला आहे की आम्ही काय बिल्डरला पाठिशी घालतोय का? बिल्डरला आम्ही मदत करतोय का? विकासकाला आम्ही मदत करतोय का? आमचा हेतु विकासक नाही तर राहणारे नागरिक आहे त्यांच्या भविष्यातला रि-डेव्हलपमेंट काय त्यासाठी हा प्रस्ताव आणला गेला. ज्यावेळी त्या ठिकाणी स्थानिक नगरसेवकांनी गार्डन चालु केल त्यावेळी अनेक प्रकारची घोषणा झाली गेली सत्ताधारी म्हणून आमच्यावरही आरोप प्रतिरोप झाले. आपल्यावरही झाले त्यांचा तो हक्क आहे. त्याबद्दलही आम्हाला काही बोलायचे नाही त्यांना योग्य वाटल तस त्यांनी ते केले. पण आमचे कर्तव्य आहे लोकप्रतिनिधी म्हणून की त्यांना आता न्याय कस देता येईल आणि त्या अनुषंगाने हा विषय पटलावर विषय आणला गेलेला आहे. तरी आज जे आम्ही गॅलरीमध्ये बघितल बरेचशे लोकांचा त्यामध्ये निषेध होता. कदाचित त्यांना पूर्ण विषय माहित नसेल किंवा

एखादा आम्हाला त्याच म्हणण काय हे कदाचित आम्हाला पूर्ण माहित नसेल असं होऊ शकते एखाद्या विषयामध्ये कम्युनिकेशन गॅप आपण सांगु शकतात पण हे सत्य आहे की यामध्ये बिल्डरबद्दल कुठलाही आम्ही विषय आणलेला नाही. या महानगरपालिका सदस्यांमध्ये मी एकमेव सदस्य आहे ज्यांनी मुख्यमंत्र्यांकडे याची तक्रार केली आणि आता आज आयुक्त नाहीत, उपायुक्त त्याला विटनेस आहेत. परवाच त्याची २ तारखेला हेअरिंग झाली की ती बिल्डींग परवानगी तुम्ही दिलेली त्यामध्ये एरिया कमी झालेला आहे आणि आयुक्तांनी सांगितल आम्ही अस पाठवल होत पण सरकारने अस करुन टाकल आणि हे आताच्या सरकारने केलेले नाही पूर्वीच्या सरकारने. तर हे अस झाल म्हणुन हे सगळे प्रॉब्लेम्स आज भोगायला लागतात. शेवटी या प्रॉब्लेमला सामोरे जाऊन कुठेतरी न्याय हा नागरिकांना द्यावा लागेल तर विकासाबद्दल आमची लढाई चालु आहे त्यांना स्टॉप वर्क नोटिस दिली त्यांना कोर्टातुन स्टे आणला तेही कोर्टात लढाई चालु आहे ती बिल्डरची लढाई एका बाजुला आहे जे नागरिक राहतात त्यांना न्याय द्यायची बारी एका बाजुला भुमिका आहे. तर आज आम्ही तो विषय आणला होता की त्यांना न्याय देऊया पण एखादा परत त्या ठिकाणी चुक होता कामा नये त्यांचा काही गैरसमज होता कामा नये मी आपल्याला विनंती करतो मॅडम आताही मी १-२ सदस्यांशी बोललो त्यांच्याशी नक्की काय आहे आम्ही तर तुमच्यासाठी आणतोय तुम्हाला चांगल करण्यासाठी तुम्हाला याच्यात गैरसमज काय होतोय. पण तरी त्यांच कदाचित मोठी कमिटी आहे सगळ्यांचे मत वेगळे वेगळे असतील तर आपल्याला विनंती आहे की, हा विषय पुढील सभेमध्ये घ्यावे आणि त्या आरक्षण बचाव जी समिती घटित झाली त्यांचे पदाधिकारी असु द्या त्या सोसायटीचे पदाधिकारी असु द्या त्यांना आपण आपल्याकडे बोलवावे त्यांचे म्हणणे काय आहे आणि स्थानिक नगरसेवक जे असतील त्यांनाही त्या ठिकाणी बोलवावे आणि त्यामध्ये त्यांना नक्की काय पाहिजे नियमाच्या कायद्याच्या चोखळीत बसुन आपल्याला किती मदत करता येईल ती नक्कीच आपली मदत करण्याची भुमिका आहे या सभागृहाची मदत करण्याची भुमिका आहे तर आपल्या सगळयांना विनंती करतो सभागृहाच्या माध्यमातून हा विषय आम्ही मागे घेतो आणि पुढील सभेच्या अगोदर सोसायटी धारकांना आणि ह्या लोकांना बोलवुन आणावं आणि त्यांच्यावर योग्य निर्णय घ्यावा.

**रोहिदास पाटील :-**

महापौर मॅडम हा अत्यंत भावनेचा, जिव्हाळ्याचा आणि कर्तव्याचा विषय आहे. आमदार साहेबांनी सांगितल्याबद्दल निवेदन केल्याबद्दल मी त्यांना धन्यवाद देतो आणि त्यांचे अभिनंदन ही करतो. कारण त्यांनी सांगितल की माझी मंत्री महोदयाबरोबर यांची हिअरींग झाली आणि कुठे तरी या गोष्टीचा सत्य आहे ते बाहेर पडेल. पण आमदार साहेब हे प्रशासन आहे आणि तो एक नंबरचा बिल्डर आहे हे तुम्ही नीट ऐकुन घ्या. अत्यंत हुशार म्हणुन तुमचं या शहरात व्याख्या आहे. तुमच्या बद्दल लोक असं म्हणतात की आमदार ला कोणी फसवु शकत नाही पण त्या बिल्डरने तुम्हाला कसं फसवले आहे आणि या प्रशासनाने तुम्हाला कसे फसवले आहे ते तुम्हाला दाखवतो. हा एक दिवसाचा विषय नाही ३ वर्ष झाले या सभागृहामध्ये, स्थायी समिती मध्ये आणि महासभेमध्ये पुन्हा पुन्हा विषय आलेला आहे हा. हा पुन्हा विषय असा आहे की १९९६ ला ज्यावेळी आपला प्लॅन मंजुर झाला त्यावेळी झालेला प्लॅन १९९० साली बनलेल्या बिल्डिंग मॅडम विचारात घेतल्या नाहीत तो प्लॅन टेबलावरचा प्लॅन होता असं अनेकांनी त्यामध्ये तज्ञ लोक होते पुढारी होते त्या वेळचे सक्षम लोक होती किंवा ज्या संस्था होत्या त्यांनी सरकारवर आरोप केले होते झाले होते पहिला प्लॅन. पण प्रश्न असा येतोय की ज्यावेळी त्या बिल्डर ने सद्‌विवेकबुध्दीने जेव्हा प्लॅन सबमीट केला ते साल होते २००६. २००६ ला जेव्हा रिवाइज प्लॅन झाला तर रिवाइज प्लॅन झाल्यानंतर त्या विकासकाची बुध्दी कुठे होती तो पक्का व्यापारी त्याची बुध्दी एकदम जागृत होती त्यावेळी त्याचा जो आर्किटेक्ट होता त्याने तो प्लॅन सबमीट केला . त्या आर्किटेक्टकडे त्याचा नकाशा होता की नाही. ज्यांनी त्यांची आपला माणुस जातो महानगरपालिकेचा साइट व्हिजीट करतो त्यांनी बघितल की नाही त्याच्यात आपला टी.पी. आहे अे.टी.पी. आहे. त्याच्यानंतर कमिशनर आणि कमिशनरांनी तो मंत्रालयात जातो. मंत्रालयात तो १२ डिपार्टमेंट मध्ये जातो नंतर ३७ रिवाइज होते असे मंजुर होत नाही. ३७ रिवाइज होते तरी आमदाराला चुकीची माहिती दिली जात नाही. आजच्या घटनेला उभं केल काय की आडवं केल काय? यांच उभाच आहे यांचे कुठेच आडवे पडलेलं नाही कारण ज्यावेळेला प्लॅन बनला पहिल्याच्या प्लॅन मध्ये सुध्दा ते बाधितच होतं उभ्या मध्ये पण ऐकुण घ्या उभ्याच आडवे केल्याबरोबर मयेकरांवर जो अन्याय झाला आणि मयकर आर झोन मधुन गार्डन आले. हे मयेकरांचे म्हणणे आहे. आजची भूमिका अशी आहे की जे आज लोकांच्या हितासाठी त्यावेळी वस्ती नसतांना सुध्दा सरकारने किंवा त्यावेळी आपल्यासारखे कोणी सक्षम अधिकारी असतील त्यांनी ८२०० चौ.मी चे आरक्षण ठेवले होते. ८२०० च्या ठिकाणी ४१०० आले. ४१०० च्या ठिकाणी आत्ताचे जे गार्डन आहे ते २३०० चे आहे. २३०० चे गार्डन म्हटल्यानंतर पुढे जागा नाही पण या बिल्डरच्या करामती कशा ते सांगतोय आपल्या महापालिकानगर ने त्यांना पत्र दिलेले आहे त्यांनी लेखी हे जसं आमदार साहेब बोलले ते खरं आहे. आपण ज्यावेळी जागा लक्षात येते की कमी आहे जेव्हा आम्ही शोधायला जातो ४१०० चा चौरस दिसत नाही. शोधतांना लक्षात आलं की या बिल्डिंग वर हे आरक्षण आहे. आपल्यालाही माहित नव्हत त्यांना ही माहीत नव्हतं ज्यावेळी मी पत्र लिहीले महानगरपालिकेला की हे आरक्षण बाधितच्या बिल्डिंग आहेत त्यांच रि डेव्हलपमेंट ला गेले तर काय होणार आपल्या टिपी ने लेखी उततर दिले की आरक्षण बाधित असलेल्या बिल्डिंग ला रिडेव्हलपमेंट करता येणार नाही आणि ती लोक जागी झाली. जागी झाली ती २४ तास जागीच आहे कारण झोप नाही आता कारण आता कुठेही रिडेव्हलपमेंट ला बिल्डिंग जाते तर तुटलेल्या बिल्डिंग चे त्या घरमालकाला खात्री असते की कधीतरी उद्या बनेल पण यांची जर काही कारणास्तव बिल्डिंग ही जर तुटली किंवा असा अपघात झाला तर ही

बिल्डिंग रिडेव्हलपमेंट होणार नाही यांचा संपूर्ण हक्क निघुन जातोय यांचा त्या सोसायटी त्याच्यावर कशावरही आम्ही ९० पासुन आहोत तरी हक्क राहत नाही हा एक भाग झाला दुसरे ओस्तवाल बिल्डर प्लान सबमिट करते आपली महानगरपालिका तो प्लान मंजूर करते ओस्तवाल बिल्डरने ओस्तवाल बिल्डींग क्र. ३ बनविली ३ बनिविल्यानंतर त्याचा ओपन स्पेस म्हणुन जी मोकळी जागा ठेवली ती मोकळी जागा ही त्याला बांधकाम केल पत्रे लावले आम्ही समजावून सांगितले की गार्डनची जागा कमी झालेली आहे तुम्हाला शक्य आहे तर तुम्ही द्या ती गार्डन मोठी होऊन जाईल. नाही ती जागा माझी आहे माझं स्पष्ट मत आहे आम्ही पत्र दिले आहे महानगरपालिकेला किती बिल्डींग ओपन स्पेस जागा ओस्तवाल पार्क ३-४ ची आहे. ते अनधिकृत बांधकाम आहे. महापौर मॅडम, तुम्ही आदेश द्या ते बांधकाम निघाले पाहिजे. पाया घातला आहे पत्रे लावले आहेत. ते निघायला पाहिजे त्याची परवानगी नाही काही नाही. दुसरी गोष्ट अशी आहे त्यांचे ४१०० साबित आहे आपल ४१०० चे २३०० वर आलो आणि त्यांची स्वतःची जी जागा होती त्याचाही त्यांनी एफ.एस.आय. घेतला त्याच्या पलीकडे कृष्णा पार्क आहे. कृष्णा पार्कची आर.जी. ची जागा आहे त्याच्यावरही त्यांनी ताबा केला आहे. महानगरपालिकेला महापौर मॅडम पुन्हा पुन्हा लिहून सुध्दा महापालिका थातुरमातुर उत्तर देते. महानगरपालिकेची औकात काय? महानगरपालिकेने लिहुन दिले बिल्डरला की महानगरपालिकेचे गार्डन आहे म्हणुन बोर्ड लावा आजपर्यंत लावला नाही प्रमोद महाजन म्हणुन जो उद्यान लावला महापौर मॅडम तो माझ्या खर्चाचा बोर्ड लागलेला आहे. तो बिल्डरचा नाही. आम्हाला प्रमोद महाजनची आस्था आहे त्याच नाव लागल म्हणुन आम्हाला आनंद झाला. त्यांना लिहुन दिले होते आपण की स्टिल लावा म्हणुन स्टिलचा त्यांनी बोर्ड आजपर्यंत लावला नाही. आणि त्यांचा त्यांना हौस सुटले. महानगरपालिकेच्या ताब्यात दिले सुटलो म्हणुन. महापौरांची पण दिशाभुल करुन त्यांना बोलावलं त्याच उद्घाटन केल काय केल त्यांना माहिती पण ही प्रक्रिया नाही. लोक भावनेचा आदर व्हायला पाहिजे परिस्थितीचे गांभीर्य लक्षात घ्यायला पाहिजे आणि कामाची स्पीड किती गार्डन बनवायला ३ वर्ष गेली. बिल्डींग बनवायला आजचा ९ वा माळा चालु आहे. आता साडे पाच महिने झाले. साडे पाच महिन्यामध्ये ९ माळे कामकाजाचा दर्जा कोणता क्वालिटी कशी? आपला प्रश्न आहे तुम्ही बघुन घ्या आमची विनंती आहे मॅडम ओस्तवाल बिल्डरच्या अनेक तक्रारी आहेत फार लांबलचक सांगायच मला कारण नाही पण आपल्याच महानगरपालिकेने शिवार गार्डनच्या त्याच्या २-३ बिल्डींग काढल्या आता ओस्तवाल ऑर्नड बनविली. समस्त जैसलपार्क त्रस्त आहे. ओस्तवाल पार्कची जैसलपार्कमध्ये ओस्तवाल ऑर्नड म्हणुन बिल्डींग बनविली. वन प्लस सेव्हन मॅडम तुम्ही गेल्या असाल तेथे पाय ठेवायला जागा नाही. नो पार्किंग जागाच नाही दोन्ही बाजुला रस्ते लागतात. गाड्या लागतात. एवढे मोठे वैभवशाली जैसलपार्क असताना गाड्या आतमध्ये जाऊ शकत नाही ही स्थिती आहे. तेवढ तुम्ही आता बांधकाम करता वन प्लस सेव्हनची बिल्डींग म्हटल्यावर किती ओपन स्पेस सोडायला पाहिजे होती त्याच्या १०० फुट पण नाही त्याची ड्रेनेजची ही सिस्टम नाही. ड्रेनेज मॅडम जबरदस्तीने ते जैसलपार्कच्या याच्यामध्ये जोडले गेले ही सिस्टम आहे. जस आमदारांनी विषय ठेवला आहे की आपण पुढच्या सभेत घ्यायचं की कधी घ्यायचं पण वस्तुस्थिती आहे ती तुमच्या समोर मांडलेली आहे. प्रशासनाने आणि महापौरांनी त्याच्यावर गांभीर्याने विचार करावा गोर-गरिबांना न्याय द्यावा आणि त्याच्या पलीकडे जस एखाद्या व्यक्तीला, बिल्डरला अस वाटत की महानगरपालिका किंवा ही जनता आमच्या खिशातच आहे हे कुठे तरी पुसुन गेले पाहिजे धन्यवाद.

**नरेंद्र मेहता :-**

माझ्यावर आरोप आहे म्हणून मी भाषण करतोय. माझ नाव घेऊन बोलले म्हणून मी बोलतोय. माझ्याच नावाचा उल्लेख केला म्हणून मी हे बोलत आहे नाहीतर बोललो नसतो. या शहरामध्ये मी ज्यावेळी भाषण करतो त्यावेळी एकदम जबाबदारीने भाषण करत असतो कुठलही कुठून ऐकून भाषण करत नसतो. अभ्यासपूर्वक करत असतो भाषण. काका आडवा कसा झाला लांब कसा झाला हे ठिक आहे हा मंजूर नकाशा हा सरकारचा नकाशा सभागृहाला दाखवतो. हा बघा असा झालेला आपण असा पाठविलेला हा मी केलेला नाही गर्व्हमेंटचा प्लान आहे. हा सरकारने मंजुर केलेला आहे मी केलेला नाही. आणि ९० साली त्यावेळी आम्ही छोटी-छोटी मुले होतो सायकल चालवत होतो. आम्हाला माहित नाही ज्यावेळी बिल्डींग झाली त्यावेळी हे सगळ्यांनी रोकल होत तर आज हे दिवस आम्हाला आला नसते अंगावर घ्यायला आज आम्ही या शहराला न्याय देण्यासाठी आलो आहेत. त्या नागरिकांना न्याय देण्यासाठी विषय आणला आहे. काय अंगाशी घेण्यासाठी नाही. मी पहिलेच माझ्या भाषणामध्ये हे क्लिअर केले आहे की यामध्ये कुठेतरी मिसअंडरस्टॅंडिंग आहे. त्यांना काहीतरी वेगळ समजलय की आम्ही काय करतोय किंवा विकासकाला साथ देतोय का म्हणून महापौर मॅडमनी बैठक लावावी आणि त्याच समजुन घ्यावी ऐकून घ्यावी. काकांना समजल नसेल काकांनाही आपण बैठकीत बोलवा त्यांचही समजुन घ्या आपण. त्यामध्ये बिल्डरला दोष देणे नाही देणे ते काय नियमाप्रमाणे तुम्ही ते करा. आम्ही फक्त विषय आणलाय तर आरक्षण मधली जी बिल्डींग आहे आणि ते पूर्वी पासून आहे त्यामध्ये बिल्डरला दोष देण्यापेक्षा ते आरक्षण डी.पी. प्लान ज्यांनी तयार केला असेल त्यांनी घरी बसून त्यावेळी हा डी.पी प्लान तयार केला म्हणून ही अडचण आज आली आहे आणि मला अभ्यास आहे ना. आम्ही विषय आणला त्याचा एकच उद्देश होता त्या नागरिकांना न्याय देण्यासाठी आणि चांगल्यासाठी आणल तर चांगल व्हाव यासाठी परत आपल्याला विनंती करतो काका आम्ही आणला जबाबदारीने आणला मे जे-जे शब्द सांगितले आहे ते ऑन रेकॉर्ड मंत्र्याचे तिकडचे संबंधित सेक्रेटरी लेवलचे अधिकारी हे प्रोसेडिंग आहे रेकॉर्ड आहे. असच हवेत भाषण केलेल नाही मी जे मांडल तुमच्यापेक्षा जास्त मुद्दे आहेत लेटर तुम्ही वाचा. तुमच्याकडे ४ मुद्दे तर माझ्याकडे १०० मुद्दे असतील त्या विषयावर. आम्ही ते ठामपणे मांडले आहे आणि मला

विश्वास आहे सरकार न्याय देतील त्या प्रश्नावर. पण इकडे बिल्डरचा आज विषय नाही. गार्डन कसा विकसित झाला कस त्यामध्ये गडबड झाली तोही आज विषय नाही आज फक्त एवढा विषय होता आरक्षण खाली जे काही बिल्डींग आहे जुनी इमारती त्यांना त्यांच्यातुन वगळण्यात यावे तेवढच हा विषय होता परत महापौर मॅडम आपल्याला विनंती संबंधित जे कोणी असेल लोक प्रतिनिधी असेल संबंधित पदाधिकारी असेल त्यांना आपण बोलवावे आणि त्यांना विश्वासात घेऊन ते करावे. उपमहापौरला ही आपण बरोबर त्यामध्ये बसवावे आणि त्यामध्ये एकत्रित आपण निर्णय घ्यावा अशी विनंती.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

मा. महापौर धन्यवाद आपण बोलायला परवानगी दिल्याबद्दल. महापौर मॅडम, आमदार साहेब जरा ऐका तुमच्या दोन्ही वेळच्या ज्या, तुम्ही दोन्ही वेळा भाषण केल आपलं मत सभागृहामध्ये मांडले त्या दोन्हीमध्ये आपली प्रतिक्रिया वेगळी होती. तुम्ही पहिल्यांदा फक्त अस सांगितल की हा जो प्रस्ताव आहे हा प्रस्ताव फक्त आरक्षणामध्ये ज्या बिल्डींग आल्यात त्या बिल्डिंग रहिवासी क्षेत्रामध्ये करायला. साहेब तुम्ही या शहराचे आमदार आहात तुम्ही तिकडचे प्रतिनिधी आहात तर तुमच कर्तव्य फक्त त्या रहिवास ज्या बिल्डींगच्या लोकांना रहिवास क्षेत्र नाही तर त्या तिकडच्या लोकांना ४१ मीटर संपूर्ण गार्डन देणे हे आपले कर्तव्य आहे आणि त्याचबरोबर १९९७ ला ज्यावेळी डी.पी. प्लान बनला त्यावेळी त्या बिल्डींग त्या प्लानमध्ये कशा आल्या त्याच्यानंतर सुध्दा तो प्रस्ताव फेरबदलला पाठवला आपण त्याच्यामध्ये सुध्दा आपल्या पालिकेच्या अधिका-यांनी किती चुक केली एकदा नाही दोनदा नाही चुक केलीही चुक सुध्दा आपण पाठीशी घालायची का? त्याच्यावरती पण तुमचा उहापोह झाला पाहिजे पण तो झाला नाही. नंबर २ हे लोक चुक करतात आणि आपण फक्त ॲक्सेप्ट करायचं.

(सभागृहात गोंधळ)

**नरेंद्र मेहता :-**

८००० आरक्षण चे ४००० यांनी केले आम्ही केलेले नाही. सरकार यांची होती.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

जर आम्ही हे आरक्षण केले तर तुम्ही ८२०० आरक्षण पूर्ण करा ना.

(सभागृहात गोंधळ)

**ध्रुवकिशोर पाटील :-**

महापौर मॅडम मिरा भाईंदर महानगरपालिका हद्दीतील भाईंदर पूर्व जैसलपार्क वसाहतीतील ..........

**मा. महापौर :-**

ध्रुवकिशोर पाटील साहेब एक मिनिट ऐका. एक मिनिट शांत बसा सगळ्यांनी शांत बसा हा ठराव आहे?

**ध्रुवकिशोर पाटील :-**

ठराव नाही मी माझे मत यामध्ये मांडतोय.

**मा. महापौर :-**

माझ ऐकून घ्या माझी विनंती आहे.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

ॲक्चुअली खुलासा महत्वाचा आहे याच्यामध्ये एक इर्म्पोटन्ट गोष्ट आहे. ती आता येत आहे.

**मा. महापौर :-**

ध्रुवकिशोर पाटील साहेब माझी विनंती आहे आपण जेव्हा पुढच्या वेळी हा विषय घेऊ तेव्हा आपण सगळ्यांनी या वरती चर्चा करावी.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

आमच मत मांडतोय मी.

**मा. महापौर :-**

साहेब पुढच्या वेळी मांडा ना तुमचे मत.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

मिरा भाईंदर मनपा हद्दीतील भाईंदर (पुर्व), जेसलपार्क वसाहतीतील मौजे खारी सर्व्हे क्र. २६(१५४)/१ अ, १ ब, १ के, ३,७ या जागेसाठी मनपा पत्र क्र. मिभा/मनपा/नर/३५१४/२०१३-१४ दि. १२/१२/२०१३ रोजी रेखांकन नकाशा मंजूरीसह मा. जिल्हाधिकारी, ठाणे यांच्याकडून अकृषित आदेश प्राप्त करण्यासाठी (Non Agriculture) ना-हरकत दाखला (No Objection Certificate) देण्यात आलेला आहे. त्यानंतर मेसर्स ओस्तवाल बिल्डर्स लि. यांना महानगरपालिकेने उपरोक्त जागेमधील (तळ+ पोडीयम+११ मजले) स्वरुपाच्या इमारतीसाठी मनपाने पत्र क्र.मिभा/मनपा/नर/२३७०/२०१४-१५ दि. २८/११/२०१४ अन्वये बांधकाम परवानगी दिलेली आहे. तसेच सदरच्या इमारतीसाठी जोत्याचा दाखला मनपाने पत्र क्र.मिभा/मनपा/नर/२८१७/२०१४-१५ दि. ०३/०१/२०१५ रोजी दिलेली आहे. तसेच सदर जागेच्या बांधकाम प्रारंभ पत्रामध्ये आरक्षण क्र. १०२ (बगीचा) हे आरक्षण महानगरपालिकेच्या निर्देशानुसार विकसित करुन महानगरपालिकेस विनामूल्य हस्तांतरीत करणेबाबतची अट नमूद केलेली आहे.

विकासक मेसर्स ओस्तवाल बिल्डर्स लि. यांनी मा. जिल्हा न्यायालय, ठाणे येथे दिवाणी दावा दाखल केला असून (आर.सी.एस.नं.१२४/२०१५) मा. न्यायालय ठाणे यांनी दि. २६/०२/२०१५ रोजी विकासक व

महानगरपालिकेला जैसे थे (Status quo) आदेश पारित केलेले आहेत. सदर मा. न्यायालयाच्या आदेशानुसार जागेवरील बांधकाम स्थगित ठेवणेबाबत जमीन/जागा मालक/अधिकारपत्रधारक/विकासक मेसर्स ओस्तवाल बिल्डर्स लि. व वास्तुविशारद मेसर्स. तेजस कन्सल्टन्ट यांना मनपाने सूचित केलेले आहे तरीही विकासक यांनी जागेवर बांधकाम सुरु ठेवून मा. जिल्हा न्यायालयाच्या आदेशाचे उल्लंघन केलेले आहे.

आम्ही आपले लक्ष वेधू इच्छितो की, मिरा भाईंदर शहराची विकास योजना (वगळलेला भाग सोडून) दि. १४/०५/१९९७ रोजी मंजूर झालेली असून दि. १५/०७/१९९७ पासून अंमलात आलेले आहे. वगळलेल्या भागाची विकास योजना दि. २५/०८/२००० रोजी मंजूर झालेली असून दि. १५/१०/२००० पासून अंमलात आलेली आहे. मंजूर विकास योजनेमध्ये आरक्षण क्र. १०२ बगीचा हे आरक्षण दर्शविण्यात आले होते. सदर आरक्षणामध्ये महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियमाच्या १९६६ च्या कलम ३७ अन्वये फेरबदलाचा प्रस्ताव तत्कालीन नगरपरिषद काळामध्ये शासनाला सादर झाला होता. त्यानंतर महानगरपालिका कालावधीमध्ये जनतेला माहिती न देता तसेच जागेवर जाऊन त्यावेळची वस्तुस्थिती काय आहे याबाबत अहवाल सादर न करता अंतिम मंजूरीसाठी सन २००६ मध्ये शासनाकडे प्रस्ताव सादर करण्यात आला होता. सदर फेरबदलाच्या प्रस्तावावर शासनाने दि. ०७/०६/२००८ रोजी फेरबदलाचा प्रस्ताव मंजूर केल्यामुळे व मनपा नगररचना विभागातील अधिका-यांच्या चुकीमुळे ओस्तवाल बिल्डींग नं. ३,५,६,७ व निशांत बिल्डींग सन १९९० मध्ये प्लान पास झाला होता त्याची जाणीव अधिका-याने शासनाकडे सादर केली नाही त्यामुळे शासनाने कलम ३७ च्या अधिसूचनेनुसार आरक्षण क्र. १०२ मध्ये ५० टक्के जागा बगीचासाठी राखीव ठेवलेली आहे व ५०% जागा रहिवासी भागात (Residential) भागात समाविष्ट केलेली आहे.

मंजूर विकास योजनेप्रमाणे व आरक्षणाचे दर्शविलेले ८५०० चौ.मी. आहे पण प्रत्यक्षात त्याठिकाणी ५६०० चौ.मी. जागा उपलब्ध असून बाकी जागेवर अतिक्रमण झालेले आहे. प्रशासनाने सादर केलेल्या गोषवारामध्ये उर्वरित २६०० चौ.मी. वर अतिक्रमण करणारे कोण? व प्रत्यक्ष जागेवर कोणी किंवा कोणत्या जागा मालक/विकासकाने बेकायदेशीर बांधकाम किंवा अतिक्रमण केल्याबाबत सविस्तर माहिती दिलेली नाही तसेच सदरच्या अतिक्रमणाबाबत तत्कालीन नगरपरिषद किंवा महानगरपालिकेने कोणती कारवाई केलेली आहे किंवा मा. न्यायालयात प्रकरण न्याय प्रविष्ठ आहे का याबाबत कोणतीही माहिती सभागृहापुढे दिलेली नाही. सदरच्या जागेवर शहराची विकास योजना मंजूर होण्यापूर्वी त्याठिकाणी ४ इमारत प्रत्यक्षात होती. ओस्तवाल पार्क बिल्डींग नं. ५,६,७ व निशांत अपार्टमेंट नगरपालिकेने ELU (Existing Land Use) नकाशा न तपासता त्या चारही इमारतींवर बगीचा आरक्षण टाकलेला आहे. सदरची चूक ही तत्कालीन नगरपरिषदेचे मुख्याधिकारी व नगररचना विभाग यांच्याकडून झालेली आहे पण अन्याय मात्र त्या चारही इमारतीमध्ये राहणा-या सामान्य नागरिकांना झालेला आहे. ओस्तवाल पार्क, चंदनपार्क इ. या वसाहतमध्ये राहणा-या सुमारे ३५-४० रजिस्टर्ड को.ऑप.हौ.सोसायटीने मा. आयुक्त व नगररचना विभागाकडे पत्र दिलेले आहे.

सदरच्या आरक्षणाने बाधीत क्षेत्रामध्ये विद्यमान इमारती ओस्तवाल पार्क ३,५,६,७ व निशांत अपार्टमेंट येत असल्यामुळे सदर इमारतीमधील रहिवाशी यांना भविष्यात त्या इमारतींच्या पुर्नःविकासाबाबत कोणतीही अडचणी निर्माण होणार नाहीत व त्यांना त्यांचे हक्काचे घर उपलब्ध व्हावे त्याबाबत मनपाने कोणतेही धोरण गोषवारामध्ये दिलेले नाही. उलट बगीचाचे क्षेत्रफळ एकूण क्षेत्र ४१०० चौ.मी. वरुन कमी करुन २८६२.५३ चौ.मी. ठेवणेसाठी महाराष्ट्र प्रादेशिक नगररचना अधिनियम १९६६ चे कलम ३७ अनुसार फेरबदलाची कारवाई करण्यासाठी व त्यावर निर्णय होण्यासाठी विषय आज मा. महासभेसमोर मांडलेला आहे. त्याऐवजी प्रशासनाने मिरा भाईंदर शहरातील वाढती लोकसंख्या लक्षात घेता खेळाचे मैदान, बाग-बगीचे इ. सार्वजनिक जागेची संरक्षण भिंत बांधून जागा सार्वजनिक वापर व जन हिताकरिता उपयोगात आणण्याकरिता मार्ग अवलंबिला पाहिजे. प्रशासन तसे न करता विकासकाच्या बाजूने व विकासकाच्या सोईकरिता आज महासभेपुढे विषय मांडलेला आहे.

आम्ही प्रशासनाचे लक्ष वेधु इच्छितो की, ओस्तवाल पार्क बिल्डींग नं. ०३, ओस्तवाल पार्क बिल्डींग नं. ०६, ओस्तवाल पार्क बिल्डींग नं. ०७ व निशांत को.ऑप.हौ.सो.लि. यांनी मेसर्स ओस्तवाल बिल्डर्स लि. यांनी मा. दिवाणी न्यायालय, ठाणे येथे दाखल केलेल्या आर.सी.एस.नं. १२४/२०१५ यामध्ये सिव्हील प्रोसिजर कोड (CPC) प्रमाणे मा. न्यायालयमध्ये अर्ज दाखल केलेला आहे व सदरचे प्रकरण न्यायप्रविष्ठ आहे. तत्कालीन आयुक्त यांनी मा. महासभा दि. ०१/०३/२०१४ (दि. ११/०२/२०१४ ची तहकूब सभा) विकासकाला बांधकाम परवानगी देण्यापूर्वी "सगळ्या गोष्टींबाबत निश्चितपणे लक्ष घातले जाईल व त्यानंतर पुढची कारवाई करण्यात येईल, परंतु आज जी जागा उपलब्ध झालेली आहे, कमी किंवा जास्त असून तो चौकशीचा नंतरचा भाग आहे, परंजु जी जागा विकसित करण्याचे धोरण प्रशासनाचे आहे आणि बगीचा विकसित करण्याची कार्यवाही आपण आपल्या सूचना लवकर दिल्या तर ४ किंवा ६ महिन्यामध्ये पावसाळा सुरु होण्यापूर्वी बगीचा विकसीत केला जाईल, तसेच ज्यावेळेस मा. महासभेने आरक्षण वगळण्याचा ठराव केलेला होता त्यावेळेची परिस्थिती सुध्दा विचारात घेतली जाईल आणि त्याप्रमाणे पुढील कारवाई केली जाईल, तसेच इमारतीचे बांधकाम व बगीचा संबंधी सविस्तर चौकशी करण्यात येईल त्यामध्ये महानगरपालिकेचे हित आणि जनेतेचे हित निश्चितपणे संरक्षित केले जाईल" असे जाहिरपणे महासभेमध्ये आश्वासन दिलेले होते व ते मा. महासभेच्या इतिवृत्तांतामध्ये स्पष्टपणे नमूद आहे.

रविवार दि. २३/०८/२०१५ रोजी भाईंदर (पुर्व) ओस्तवाल पार्क, चंदनपार्क इ. वसाहत येथील सुमारे १०००-१२०० रहिवाशी यांनी वादग्रस्त बगीचाच्या उद्‌घाटनाला काळे झेंड्यांचे निदर्शन करुन विवादस्पद अवैधरित्या घोषित केलेल्यास बगीचा लोकार्पण सोहळ्याचा निषेध दर्शविलेला आहे व नागरिकांनी विकासक ओस्तवाल बिल्डर्स लि. यांनी महानगरपालिकेच्या नगररचना विभागातील अधिकारी यांना हाताशी धरुन उपरोक्त उर्वरित मोकळ्या जागेवर बांधकाम सुरु केल्याबद्दल तसेच ओस्तवाल पार्क ३,५,६,७ व निशांत अपार्टमेंट या इमारतींवरील आरक्षण नियमानुसार न काढता बगीचाचे उद्‌घाटन केल्यामुळे नागरिकांमध्ये नाराजी झाली असून त्यांनी संपूर्ण प्रकरणामध्ये घोटाळा असून चौकशीची मागणी केलेली आहे. तसेच तत्कालीन आयुक्त श्री. सुभाष लाखे साहेब यांनी दि. २१/०२/२०१५ रोजी विकासक मेसर्स ओस्तवाल बिल्डर्स लि. व मेसर्स तेजस कंन्सल्टन्ट वास्तूविशारद यांना आरक्षण क्र. १०२ बगीचाचे काम पूर्ण करुन बगीचा महानगरपालिकेच्या ताब्यात देण्यात यावा तसेच महानगरपालिकेस हस्तांतरीत करावयाचे क्षेत्र शासनाच्या महसूल अभिलेखीत महानगरपालिकेचे नाव नोंद करुन (नमुना ७/१२) तसा अद्ययावत फेरफारपत्रक (नमुना ६) सादर करण्यासंबंधी सदर पुर्ततेच्या अभावी बगीचा आरक्षण खाली २७८५.७७ चौ.मी. क्षेत्राचा T.D.R. वापर बांधकाम क्षेत्रात करता येणार नाही या मुद्दयांची पूर्तता करुन तसा अनुपालन अहवाल महानगरपालिकेकडे सादर करणेबाबत सुचित केले होते व तोपर्यंत जागेवर बांधकाम करु नये अशी लेखी ताकीद देण्यात आली होती. तसेच बांधकाम परवानगी रद्द करणेबाबत अनेक जनप्रतिनिधी व नागरिकांनी लेखी मागणी प्रशासनाकडे केलेली आहे.

मिरा भाईंदर महानगरपालिकेचे तत्कालीन आयुक्त श्री. भरत शितोळे यांनी जमीन/जागा मालक यांना दि. १३/१२/२०१३ रोजी मा. जिल्हाधिकारी, ठाणे यांचेकडून अकृषित आदेश प्राप्त करणेसाठी ना हरकत दाखला देताना चार अटीस अधिन राहून मंजूरी दिली त्यामध्ये इमारतीचे बांधकाम प्रारंभपत्रापूर्वी मा. उप-अधिक्षक, भूमि अभिलेख, ठाणे यांचाकडुन मोजणी नकाशा सादर करणे बंधनकारक होती. तरी विकासकाने अजून मोजणी नकाशा सादर केलेला नाही तसेच सदर जागेच्या मालकी बाबत व न्यायालयात दावा प्रलंबीत नसल्याबाबत प्रतिज्ञापत्र दि. ०३/०९/२०१३ रोजी विकासकाने दिलेली आहे असे नमूद केलेला आहे. तरी आम्ही या ठिकाणी नमूद करु इच्छितो की विकासकाने दिलेल्या प्रतिज्ञापत्रामध्ये कोणतेही न्यायालयात दावा प्रलंबित असल्याबाबत उल्लेख केलेले नाही. सदर आरक्षण क्र. १०२ जागा/जमीन मालक प्रभाकर महादेव तळवणेकर व इतर, रजनीकांत पांडुरंग मयेकर, इंदुमती वसंत सुर्वे व इतर तसेच अन्य लोकांनी विकासक मे. ओस्तवाल बिल्डर्स लि. यांच्या विरुध्द मा. जिल्हा न्यायालय, ठाणे येथे दिवाणी सुट दाखल केलेली आहे व सदरचे दिवाणी सुट अजुनही प्रलंबित आहेत.

मौजे खारी येथील आरक्षण क्र. १०२ बगीचामधील सर्वे क्र. २६/४ व ........ या जमीनी बाबत भाईंदर (पू.) येथे राहणारे रजनीकांत पांडुरंग मयेकर यांनी तत्कालीन विरोधी पक्षनेता, महाराष्ट्र विधान परिषद मा.श्री. विनोदजी तावडे यांचे दि. ०३/०२/२०१४ रोजीचे पत्र दि. ०४/०२/२०१४ रोजी तत्कालीन अतिरिक्त आयुक्त श्री. भरत शितोळे यांना देऊन राजकीय दबाव आणल्यामुळे महानगरपालिकेने दि. ११/०२/२०१४ रोजी मोकळ्या जागेला पत्र्याचे "कंपाऊंड शेड" सुरक्षेसाठी टाकण्यास परवानगी दिलेली होती. पण परवानगी देताना स्थळ पाहणी अहवाल न मागवता परवानगी दिलेली आहेत. श्री. मयेकर यांनी महानगरपालिकेची दिशाभूल करुन कंपाऊंड शेड सुरक्षेसाठी परवानगी घेतलेली होती दि. २७/१२/२०१२ रोजी श्री. मयंकर यांनी महसूल विभागामध्ये सत्यप्रतिज्ञापत्र देऊन त्यामध्ये त्यांचा उपरोक्त नमूद जमीनीवर सन १९९० मध्ये राहूल पॅरेडाईस व राहुल कुंज अशा दोन इमारती बांधण्यात आलेली आहे असे स्पष्ट उल्लेख केलेला आहे व त्यामध्ये सत्यप्रतिज्ञापत्रात नमूद सर्व माहिती खरी व बरोबर असून ती चुकीची अथवा खोटी आढळल्यास होणारा कारवाईस मी जबाबदार राहीन व याची मला जाणीव आहे असे ही नमूद केलेले आहे. श्री. मयेकर यांना त्यांच्या जमिनीवरील बांधकामबाबत संपूर्ण माहिती असताना ही दि. १०/०१/२०१४ रोजी जाणीवपूर्वक खोटी व दिशाभूल करणारी माहिती देऊन महानगरपालिकेची फसवणूक केलेली आहे. भाईंदर (पूर्व) येथील माजी नगरसेविका श्रीम. नर्मदाताई वैती, सत्यप्रकाश ठाकूर भाईंदर (प.) राईगांव येथे राहणारे श्री. गजानन काशीनाथ म्हात्रे (भिवंडीकर) यांनी दि. २७/११/२०१४ रोजी पत्र्याचे कंपाऊंड शेड टाकण्यास दिलेली परवानगी रद्द करण्याबाबत केलेली तक्रार पत्रानुसार अतिक्रमण व अनाधिकृत बांधकाम नियंत्रण विभागाकडील अहवाल व पत्र दि. ३१/१२/२०१४ अन्वये श्री. मयेकर यांनी सदर जागेवर देण्यात आलेल्या कुंपणभिंतीचा परवानगीपेक्षा जास्त वाढीव बांधकाम केल्याने व परवानगीतील अट क्र. ३ चे उल्लंघन होत असल्याने अट क्र.९ व १० अनुसार महानगरपालिकेने दि. ११/०२/२०१४ रोजी पत्र्याचे कंपाऊंड शेड टाकण्यास दिलेली परवानगी मा. आयुक्त श्री. अच्युत हांगे यांनी दि. १३/०४/२०१५ रोजी रद्द केलेली आहे. श्री. मयेकर यांनी यांची मालकी जागा भाईंदर (पू.) येथील मे. राहुल बिल्डर्स विकासक यांना विक्री केल्यानंतर सदर जागेवर राहुल पॅरेडाईस व राहुल कुंज या दोन इमारती विकासकाने सन १९९० मध्ये पूर्ण केलेली आहे. श्री. रजनीकांत पांडुरंग मयेकर यांचे बंधू श्री. रमेश पांडुरंग मयेकर यांनी श्री. रजनीकांत मयेकर यांना त्यांचे वकील श्री. जयंत ए. पटेल यांच्या वतीने दि. ३०/११/१९९४ रोजी कायदेशीर नोटीस पाठवून त्यामध्ये मौजे खारी येथील जमिनिबाबत व राहुल बिल्डर्स यांना जमीन विक्री केल्याबाबत नमूद केलेली आहेत. त्या इमारतीमध्ये श्री. मयेकर व त्यांचा कुटुंबातील अन्य सदस्यांच्या नावे दोन दुकाने व सहा सदनिका आहेत व त्यामध्ये ते आजही राहतात व त्यास महानगरपालिकेने कर आकारणी केलेले आहे व त्याच इमारतीला लागून तळ + १ मजला बेकायदेशीर

बांधकाम करुन त्या ठिकाणी तळ मजल्यावर कोंबडीचे दुकान व भंगार सामानाची दुकान श्री. मयेकर यांनी टाकलेली आहे. तसेच त्यांचे पहिल्या मजल्यावर ट्युशन क्लासेस चालू आहे.

तसेच श्री. रजनीकांत पांडुरंग मयेकर यांनी दि. १०/०३/२०१४ रोजी महानगरपालिकेकडे अर्ज करुन सर्व्हे नं.२६/४ मौजे खारी मोकळा जागेवर कर आकरणी करणेस मागणी केलेली आहे. तत्कालीन कर निर्धारक व संकलक विभाग यांनी मिळकत कर आकारणीची नोटिस दि. २२/०५/२०१४ रोजी काढलेली आहे. प्रभाग समिती क्र. ३ वसुली वार्ड / झोन क्र. २ यांनी जागेवर न जाता १७८२ चौ. फुट इतके जागा श्री. मयेकर यांची मालकीची जागा आहे व जागेला वाणिज्य दराने रुपये ५ प्रमाणे आकारणी केलेली आहे व दि. ०१/०४/२०१४ ते ३१/०३/२०१५ पर्यंत मासीक भाडे रु. ९८१०/- विचारात घेऊन कर योग्य मुल्य रु. ९६२२८/- ठरविलेले आहे. श्री. मयेकर यांनी वेळोवेळी नगररचना विभाग, कर विभाग तसेच प्रभाग अधिकारी व अन्य विभागांना खोटी व चुकीची माहिती देऊन दिशाभूल केलेली आहे. श्री. मयेकर यांनी त्यांची मालकी जमीन विकासक मे. राहुल बिल्डर्स यांना करारनामा करुन विक्री केलेली असताना देखील मा. महापौर सौ. गिता जैन यांनी देखील दिशाभूल केलेली आहे. मा. महापौर गिता जैन यांनी त्यांचे पत्र क्र.मनपा/महापौर/०४७/२०१५-१६ दि. १३/०४/२०१५ रोजी मा.ना.श्री. देवेन्द्रजी फडवणीस, मुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य यांना पत्र लिहून श्री. मयेक यांच्यावर अन्याय झाल्याबाबत उल्लेख केलेला आहे पण सत्यपरिस्थितीत तसे नसून याबाबत मा. आयुक्त यांनी छाननी व तपासणी करुन दिशाभूल करणारे श्री. मयेकर यांच्यावर फौजदारी गुन्हा दाखल करावा.

तसेच मा. उच्च न्यायालय, मुंबई येथे मिरा भाईंदर येथील सामाजिक संस्था नागरीक वेल्फेयर ट्रस्ट यांनी जनहित याचिका क्र. ६५/२०१४ मिरा भाईंदर महानगरपालिका व इतर यांच्या विरुध्द दाखल केलेली आहे. सदरची जनहित याचिका मा.श्री. अभय ओक यांचा खंडपिठापुढेमध्ये प्रलंबित आहे.

महाराष्ट्र शासनाचा नगरविकास खात्याने पारीत केलेल्या आदेशान्वये विकासकर्तांने ४१००.०० स्के. मि. क्षेत्रफळाची बगीचा विकसित करुन महापालिकेच्या ताब्यात देणे बंधनकारक आहे. तरी विकासकाने प्रत्यक्ष जागेवर ४१०० स्के. मि. क्षेत्रफळाची नसून फक्त कागदावर २८६२.५३ स्के.मि. दाखवून जागेवर मात्र २१०० स्के.मि. चा बगीचा विकसीत केलेला आहे. विकासकाने दि. ०३/०९/२०१३ रोजी अनरजिस्टर्ड नोटरी करुन दिलेल्या जमिनिची ताबा पावतीमध्ये दाखवलेली क्षेत्रफळ ४१३२.६३ स्के.मि. असून प्रत्यक्षात बगीचाची क्षेत्रफळ तेवढा नसून खुप कमी आहे. तरी याबाबत प्रशासनाने गोषवाऱ्यामध्ये कोणतीही माहिती स्पष्ट दिलेली नाही.

तत्कालीन सहा. नगररचनाकार श्री. सत्यवान धनेगावे यांनी दि. ०५/१२/२०१३ रोजी मा. आयुक्त यांना सादर केलेल्या आंतरिक अहवालामध्ये (Internal Official Communication) विकासकाने महानगरपालिकेस हस्तांतरीत करावयाचे बगीचा या आरक्षण खालील जागेचा TILR होणे आवश्यक होते परंतु विकासकाने जाणीवपुर्वक अटीचे पालन केलेले नाही व दि. १३/१२/२०१३ रोजी तत्कालीन आयुक्त श्री. भरत शितोळे यांनी मा. जिल्हाधिकारी यांचेकडुन अकृषित आदेश प्राप्त करणेसाठी ना हरकत दाखला देताना देखील अटीशर्तीमध्ये नमूद केलेली आहे. तत्कालीन आयुक्त भरत शितोळे यांनी स्वाक्षरी केलेल्या सर्व परवानगीबाबत चौकशी सुरु असल्याने फेर तपासणी करणे आवश्यक आहे.

मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या हद्दीतील आरक्षीत भूखंडातील घोटाळाबाबत रोज वर्तमानपत्रामध्ये बातमी येत असतात व सुज्ञान नागरीक प्रशासनाच्याविरुध्द व आरक्षण घोटाळामध्ये राजकीय पुढाऱ्यांचा हस्तक्षेप असल्याने मा. उच्च न्यायालयामध्ये जाऊन दाद मागत आहेत. विकास योजनेतील मंजूर झालेली सर्व आरक्षण हे जनहितार्थ असून त्या सर्व जागेची संरक्षण व वेळेवर विकास करणे हे महानगरपालिकेची जबाबदारी आहे. पण अनेक आरक्षित भूखंडावर बेकायदेशीर बांधकाम किंवा अतिक्रमण झालेली आहे. महानगरपालिकेनी आरक्षित भूखंडावर जागेची मोजमाप करुन कुंपणभिंत न बांधल्याने मोठ्या प्रमाणामध्ये अतिक्रमण व बेकायदेशीर बांधकाम झालेली आहे त्यामुळे स्थानिक स्वराज्य संस्थेवर नागरीकांमध्ये मोठ्याप्रमाणामध्ये रोष व असंतोष आहे.

मिरा भाईंदर महानगरपालिकेची तत्कालीन आयुक्त श्री. भरत शितोळे यांनी अनेक प्रकरणावर व प्रस्तावावर घाई-घाईने सह्या व मंजूरी दिलेली आहे. त्यांनी मंजूर व स्वाक्षरी केलेला सर्व प्रकरणार चौकशी सुरु आहे. आरक्षण क्र. १०२ बगीचा बाबतीत देखील त्यांचीच स्वाक्षरी असल्याने पुन्हा छाननी व फेरतपासणी होणे आवश्यक आहे.

नगररचना विभागातील विभागप्रमुख व सर्व कर्मचाऱ्यांची विभागीय चौकशी तसेच महाराष्ट्र नागरी सेवा व वर्तणूक नियम व महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम, १९४९ चे कलम ५६ अन्वये कायदेशीर कारवाई करण्यात यावी.

आरक्षण क्र. १०२ बगीचा या जागा / जमीन मालक तसेच भाईंदर पुर्व येथील जेसलपार्क वसाहत मधील नागरीक यांच्या मागणीनुसार तसेच महानगरपालिकेचे सन्मा. सदस्य श्री. हंसुकुमार क. पांडे यांचे पूरक घोषणा प्रकरण क्र. ९६ मध्ये दि. ०१/०३/२०१४ रोजी आरक्षण क्र. १०२ मध्ये बेकायदेशीरपणे दिलेली इमारत बांधकाम प्रारंभपत्र (मंजुरी) रद्द करणेबाबत या विषयावर सन्मा. सदस्य श्री. नरेंद्र मेहता, प्रेमनाथ पाटील, मा. सभागृह नेता रोहिदास शंकर पाटील, जुबेर इनामदार इ. लोकांनी चर्चा केली होती. तत्कालीन आयुक्त यांनी संपुर्ण विषयाबाबत सखोल चौकशी करुन चार किंवा सहा महिन्यामध्ये पावसाळा सुरु होण्यापूर्वी बगीचा विकसित केला जाईल असे आश्वासन दिले होते व सर्वानुमते मंजूर झालेले ठराव क्र. ९५ (प्रकरण क्र. ९६) प्रमाणे वास्तुविशारद व विकासक यांच्यावर दंडात्मक कारवाई करावी असे ठराव मांडण्यात आलेले होते तरी त्यावर प्रशासनाने आजपर्यंत कोणतेही चौकशी किंवा कायदेशीर कारवाई केलेली नाही. सन्मा सदस्य व मिरा

भाईंदर मतदार संघाचे आमदार श्री नरेंद्रजी मेहता यांनी देखील मिरा भाईंदर महानगरपालिका हद्दीतील आरक्षण क्र. १०२ बगीचा सर्व्हे नं. १५४ मौजे खारी या जमिनीवर होत असलेल्या बांधकामाची परवानगी रद्द करणेबाबत नगरविकास विभागाकडे पत्र व्यवहार केल्यामुळे गुरुवार दि. २७/०८/२०१५ रोजी नगरविकास विभाग, महाराष्ट्र शासन, निर्मल बिल्डींग, दुसरा मजला, नरीमन पॉईंट, मुंबई येथे दुपारी १२.३० वाजता बैठक आयोजित करण्यात आलेली होती.

मौजे खारी येथील आरक्षण क्र. १०२ बगीचा बाबतीत श्री. भरत शितोळे यांचीच स्वाक्षरी असल्याने जनहितार्थ पुन्हा छाननी व फेरतपासणी होणे आवश्यक आहे. तसेच सदर आरक्षणाचा फेरबदलाबाबत सन १९९७ पासून वेळोवेळी दिशाभूल करणारे नगररचना विभागातील विभागप्रमुख व सर्व कर्मचाऱ्यांची विभागीय चौकशी तसेच महाराष्ट्र नागरी सेवा व वर्तणूक नियम व महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ५६ अन्वये कायदेशीर कारवाई करण्यांत यावी. तसेच विकासकांवर व वास्तुविशारद यांच्यावर फौजदारी गुन्हा दाखल करुन बांधकाम थांबवावे तसेच बगीचा आरक्षणात असलेले अनधिकृत बांधकाम त्वरीत निष्काशित करुन बगीचाचे पूर्ण क्षेत्रफळ ४१०० स्के.मी. बगीचा विकसित करुन बगीचा आरक्षणात असलेल्या सन १९९० साली बांधलेल्या इमारतींना बगीचा आरक्षणामधून वगळून त्यांना रहिवास क्षेत्रामध्ये समाविष्ट करुन प्रशासनाने नियमानुसार सर्व कार्यवाही करावी व प्रस्ताव मा. महासभेत फेर सादर करावा असा मी ठराव मांडत आहे.

**जुबेर इनामदार :-**

माझे अनुमोदन आहे.

**निलम ढवण :-**

महापौर मॅडम ही जी १०२ च्या आरक्षणावरुन ही जी द्वीधा मनस्थिती झालेली आहे जी माहिती बसविलेली आहे त्या संदर्भात एक कमिटी स्थापन करावी की जेणेकरुन त्याच्यामध्ये बचाव समितीचे काही लोक येतील तिथल्या इमारतीत राहणारे लोक असतील महापौर, उपमहापौर संबंधित विभागाचे काही अधिकारी अशा पध्दतीने सगळ्यांची एक कमिटी नेमून सगळ्यांनी प्रत्यक्ष पाहणी करुन या विषयावर चर्चा विनिमय करुन त्या विषयाला पूर्ण अहवाल सर्वानुमते सादर करावा पुढच्या महासभेमध्ये सादर करावे अशी मी विनंती करते.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

माझे अनुमोदन आहे.

**सुहास रकवी :-**

मॅडम आता आम्हाला दोन मिनिट बोलु द्या आता प्रत्येकाने आपआपले विषय मांडले फक्त आपले दुर्देव मिरा भाईंदरच काही आरक्षण बचाव समिती ही निर्माण करायला लागते. म्हणजे तत्कालीन जे आता आमदार साहेबांनी सांगितले ९० साली जे काय तेथे रिर्झव्हेशन होते ३७ क खाली ते रिर्झव्हेशन चेंज केले त्यांना त्यावेळेला माहित नव्हत जस आम्हाला हा विषय माहित झाल्यानंतर आरक्षण हा नुसता १०२ पुरता मर्यादित नाही अशा अनेक ठिकाणी अशा इमारती आहे.

**शरद पाटील :-**

जेवढी पाप केली ती सगळी काढा.

**सुहास रकवी :-**

पाप कोणी केली आणि तुम्ही किती पुण्य करताय ते दिसेलच नुसत दाढी वाढवून साधु होत नसतं लक्षात ठेवा. आणि आता राहिले आपण मिळून आरक्षण बचाव समितीची काही लोक आली मॅडम काही लोक इथे आली आहेत.

(सभागृहात गोंधळ)

**अनिल भोसले :-**

हे सगळे आपल्या कार्यकालामध्ये झाले आहे आमच्या कार्यकालामध्ये झालेले नाही.

**सुहास रकवी :-**

आमच्या कार्यकालामध्ये नाही आमदार साहेबांच्या इकडे ९० साली जस त्यांना या गोष्टीची माहिती नव्हती तशी आम्हालाही नव्हती.

**(सभागृहात गोंधळ)**

**सुहास रकवी :-**

मॅडम ओस्तवाल बिल्डरला आपण सी.सी. दिली होती ४१०० मी. ची आहे आणि त्या ४१०० मीटरमध्ये ४१०० मीटरच दुसरे गार्डन आहे तर त्याची तुम्ही आता दिलेली सी.सी. रद्द करा ना. आपल्याला जर खरोखर गार्डन द्यायचं आहे लोकांना...................

**मा. महापौर :-**

मी आताही तेच सांगते माझ आश्वासन तेच आहे का आपण ते समितीमध्ये मी काय ते बोलू आपण बसू परत आणि जे काही आहे ते निर्णय पुढच्या महासभेला.

**सुहास रकवी :-**

पण तुम्ही आता त्याच्यामध्ये नक्की करा की त्या आरक्षण बचाव समितीचे काही जे त्याचे नेते असतील कार्यकारी असतील त्यांना समाविष्ट करा त्यांच म्हणण ऐका.

**जुबेर इनामदार :-**

सन्मा. नरेंद्र मेहता साहेबांनी आमदार साहेबांनी त्यांच्या संभाषणामध्ये असा उल्लेख केला असता की दिलेले बांधकाम तोडा परत ३७ खाली हे सादर करा. आरक्षण आणि जिथे जागा आहे तिथे परत ४१०० चे आरक्षण ठेवावे. जुन्या इमारतींना आरक्षण मधुन वगळाव खर जर त्यांनी त्या समितीच्या लोकांच्या बाजुने बोलतात अस आम्ही समजल असते. त्यांनी तस न करता त्यांनी फक्त आरक्षण कस कमी होईल मग पूर्ण शहराचे चित्र काढा जितके आरक्षण आहेत ते त्याच्यामध्ये घ्या आणि या शहरालाच ओ.एल.एक्स मध्ये विकुन टाका.

**नरेंद्र मेहता :-**

महापौर मॅडम, चांगल वाटल जुबेरजी चांगले बोलले ही जबाबदारी आम्हीच घेतली आहे मी अस वाटते की ज्या वेळेला ही परवानगी दिली त्यावेळी त्यांचे सदस्य हंसुकुमार पांडेजी, कॅटलीनजी महापौर होते त्यावेळी काँग्रेसने प्रश्न मांडला त्या बिल्डींगची परवानगी रद्द करा त्या बिल्डींगला चुकीची दिली त्यावेळी कोणीही हा निर्णय घेतलेला नाही त्यावेळी हेच सत्ताधारी होते.

(सभागृहात गोंधळ)

**नरेंद्र मेहता :-**

आता ते बोलतात विभागीय चौकशीला या. विभागीय चौकशी कुणाची आहे आयुक्तही गेले. ज्यांनी प्लान पास केले तेही गेले आणि नागरिकांना दाखवायचं. आदेश द्या आज ज्यावेळी भाजप, शिवसेना, बहुजन विकास ने विषय आणला.

(सभागृहात गोंधळ)

**सुहास रकवी :-**

आमदार साहेब तुम्हाला आरक्षण ठेवायचं की नाही ते सांगा.

(सभागृहात गोंधळ)

**निलम ढवण :-**

महापौर मॅडम हा विषय जर पुढच्या सभेला घेणार असेल तर आता इथे वेळ फुकट घालवु नका. पुढचा विषय घ्या.

**सुहास रकवी :-**

महापौर मॅडम, ओस्तवाल बिल्डींग इललिगल कन्स्ट्रक्शन करते. त्याच्यावर एम.आर.टी.पी. दाखल केले. त्याची तुम्ही सी.सी. रद्द करा.

**नरेंद्र मेहता :-**

विषय नागरिकांच्या हितासाठी ८१०० आमच नव्हते ना ४१०० केले आम्ही थोडी केले आता आम्हाला बोलता आम्ही ४१०० केले तुम्ही आता ती बिल्डींग काढा मी पहिल्याच शब्दात सांगितल होत बिल्डींग पाडा डायनामिक लावा तोडा कायद्याने जे-जे करता येईल ते सगळ करा. आणि ज्यावेळी हंसुकुमारजी, रोहिदास पाटीलजी हा प्रश्न त्यावेळी उपस्थित केला ज्यावेळी बिल्डींगचे काम पायाभूतला होत त्यावेळी उपस्थित केल होत ना का त्यावेळी सत्ताधारी ध्रुवकिशोर पाटील साहेब सभागृह नेते होत ना. त्यावेळी काही ऐकले का त्यांनी त्यावेळी कोणी ऐकले नाही ते मस्तीमध्ये घेत होते. चाललाय विषय चालला. आज ती बिल्डींग उभारली गेली आम्ही सत्तेत आल्या-आल्या त्याला स्टॉप वर्कचे नोटिस दिले. त्याला कोर्टाने स्टे दिला म्हणून आम्ही त्याचवेळी ते काम थांबवल. मॅडम इथपर्यंत आजही आम्ही तक्रार करतो.

**सुहास रकवी :-**

आमदार साहेब विषय तुम्ही तसा आणायला पाहिजे ना ३७ क खाली ज्या इललिगल बिल्डींग आरक्षणामध्ये आहेत त्या रेग्युलर केल्या आणि याच्या बांधकामामध्ये जे क्षेत्र तुमच्या .........................

**नरेंद्र मेहता :-**

यांना कदाचित माहित नसेल ३७ च्या मॉडीफिकेशनमध्ये स्पेसिफिक विषय आणावा लागतो त्यामध्ये इतर विषय घालून चालत नाही असं आम्ही केले तर परत त्या नागरिकांवर अन्याय होणार कारण आम्ही विषय ३७ मध्ये त्याला ऑब्जेक्शन सजेशन त्याला वेगळी प्रक्रिया आहे. त्यामध्ये कुठलाही विषय अंतर्भुत करुन तुम्हाला चालणार नाही.

सदर विषया संदर्भात सर्व नागरिकांना, पदाधिकारी व संबंधितांना मा. महापौर, उपमहापौर, गटनेते यांना सर्वांना सोबत घेऊन माहिती घेण्यात यावी तद्नंतर विषय पुन्हा घेण्यात यावा असा ठराव मांडत आहे.

**निलम ढवण :-**

माझे अनुमोदन आहे.

**मा. महापौर :-**

पहिला ठराव नव्हता त्यांचे संभाषण होते.

**भगवती शर्मा :-**

अच्छा वो संभाषण है, कोई बात नही देर आए दुरुस्त आए। एक मिनिट बोलने दिजीए। महापौर मॅडम विषय जो लाया गया था इस विषयपर बोलने तो दिजीए। विषय वापस आता है वह तो वापस आएगा ही जब हमने ठराव ही ऐसा किया है।

**मा. महापौर :-**

सचिव साहेब ठराव मतदानाला घ्या.

**नगरसचिव :-**

प्रकरण क्र. ७२ करिता दोन ठराव आलेले आहेत. पहिला ठराव सुचक श्री. ध्रुवकिशोर पाटील, दुसरा ठराव सुचक श्री. नरेंद्र मेहता. अनुक्रमे मी दुसरा ठराव मतदानास टाकतो. सुचक श्री. नरेंद्र मेहता यांच्या ठरावाच्या बाजुने असतील त्यांनी हात वर करायचे आहेत. ठरावाच्या विरोधात असतील त्यांनी हात वर करायचे आहे. सुचक श्री. ध्रुवकिशोर पाटील यांच्या ठरावाच्या बाजुने असतील त्यांनी हात वर करायचे आहेत. ठरावाच्या विरोधात असतील त्यांनी हात वर करायचे आहे. तटस्थ कोणी असतील त्यांनी हात वर करायचे आहेत.

**मा. महापौर :-**

सुचक श्री. नरेंद्र मेहता यांच्या ठरावाच्या बाजुने ३८, विरोधात २४ इतकी मते पडलेली आहेत. श्री. नरेंद्र मेहता यांनी मांडलेला ठराव बहुमताने मंजूर करण्यात येत आहे.

**प्रकरण क्र. ७२ :-**

आ. क्र. १०२ (बगीचा) आरक्षणामधून विद्यमान इमारतींना वगळणेसाठी महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम १९६६ चे कलम ३७ नुसार कार्यवाही करणेबाबत.

**ठराव क्र. ४६ :-**

सदर विषया संदर्भात सर्व नागरिकांना, पदाधिकारी व संबंधितांना मा. महापौर, उपमहापौर, गटनेते यांना सर्वांना सोबत घेऊन माहिती घेण्यात यावी तद्नंतर विषय पुन्हा घेण्यात यावा असा ठराव मांडत आहे.

**सुचक :- श्री. नरेंद्र मेहता** **अनुमोदक :- श्रीम. निलम ढवण**

| अ.क्र. | ठरावाच्या बाजूने | अ.क्र. | ठरावाच्या विरोधात | तटस्थ |
|---|---|---|---|---|
| १ | मेहता नरेंद्र लालचंद | १ | ध्रुवकिशोर पाटील | निरंक |
| २ | शरद केशव पाटील | २ | डिमेलो बर्नड अल्बर्ट | |
| ३ | पाटील रोहिदास शंकर | ३ | शिल्पा भावसार | |
| ४ | म्हात्रे कल्पना महेश | ४ | सँन्ड्रा जेफ्री रॉड्रीक्स | |
| ५ | भानुशाली वर्षा गिरीधर | ५ | प्रभात प्रकाश पाटील | |
| ६ | मीरादेवी रामलाल यादव | ६ | पाटील सुनिता कैलास | |
| ७ | कोठारी सुमन रमेश | ७ | झिनत रऊफ कुरेशी | |
| ८ | डॉ. नयना मनोज वसाणी | ८ | विराणी रेखा अनिल | |
| ९ | सिमा कमलेश शहा | ९ | पुजारी कांचना शेखर | |
| १० | जैन गिता भरत | १० | पिसाळ मनिषा नामदेव | |
| ११ | अरोरा दिपिका पंकज | ११ | डिसा मर्लिन मर्विन | |
| १२ | रावल भगवती जयशंकर | १२ | बगाजी शर्मिला विल्सन | |
| १३ | मेहता डिंपल विनोद | १३ | इनामदार जुबेर | |
| १४ | मेघना दिपक रावल | १४ | वेतोसकर राजेश शंकर | |
| १५ | शर्मा सुनिला सत्येंद्र | १५ | शेख अशरफ मोहम्मद इब्राहिम | |
| १६ | प्रतिभा प्रकाश तांगडे-पाटील | १६ | सुर्यकांत खंडोजी म्हात्रे | |
| १७ | सुजाता रविकांत शिंदे | १७ | सामंत प्रमोद जयराम | |
| १८ | सिंग मदन उदितनारायण | १८ | रकवी सुहास माधवराव | |
| १९ | कांगणे यशवंत ठकाजी | १९ | पांडे हंसुकुमार कमलकुमार | |
| २० | अनिल बाबुराव भोसले | २० | खण्डेलवाल सुरेश | |
| २१ | कासोदरीया अश्विन श्यामजी | २१ | डॉ. आसिफ शेख | |
| २२ | जैन दिनेश तेजराज | २२ | नरेश तुकाराम पाटील | |
| २३ | जैन रमेश धरमचंद | २३ | भोईर कमलेश यशवंत | |
| २४ | डॉ. राजेंद्र जैन | २४ | वंदना मंगेश पाटील | |
| २५ | निलम हरिश्चंद्र ढवण | | | |
| २६ | शुभांगी महिन कोटियन | | | |
| २७ | जयमाला किशोर पाटील | | | |
| २८ | परमार अनिता भरत | | | |
| २९ | गावंड मंदाकिणी आत्माराम | | | |
| ३० | संध्या प्रफुल्ल पाटील | | | |
| ३१ | दळवी प्रशांत ज्ञानदेव | | | |
| ३२ | प्रविण मोरेश्वर पाटील | | | |
| ३३ | ठाकुर अरविंद दत्ताराम | | | |

| | | | |
|---|---|---|---|
| ३४ | शाह राकेश रतिशचंद्र | | |
| ३५ | जयंतीलाल गुरुनाथ पाटील | | |
| ३६ | केळुसकर प्रशांत नारायण | | |
| ३७ | मुन्ना सिंग | | |
| ३८ | दिप्ती शेखर भट | | |

**ठराव बहुमताने मंजूर**

**सही/-**
**महापौर**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

**राजेश वेतोसकर :-**

मा. महापौर मॅडम आता ही समिती जेव्हा आरक्षणाचा निर्णय होईल हे १०२ आरक्षणच नाही तर इतरही आरक्षणाचा विचार व्हावा.

**मा. महापौर :-**

पुढच्या वेळी नक्कीच घेऊ.

**नगरसचिव :-**

प्रकरण क्र. ७३, मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील रहिवास तसेच वाणिज्य वापराच्या इमारतींना जास्तीत जास्त उंची अनुज्ञेय करणेबाबत.

**अनिल भोसले :-**

मिरा भाईंदर शहराची विकास योजना (वगळलेला भाग सोडून) दि. १४/०५/१९९७ रोजी मंजूर झालेली असून दि. १५/०७/१९९७ पासून अंमलात आलेले आहे. वगळलेल्या भागाची विकास योजना दि. २५/०८/२००० रोजी मंजूर झालेली असून दि. १५/१०/२००० पासून अंमलात आलेली आहे.

मंजूर विकास नियंत्रण नियमावलीतील तरतूदी नुसार प्रस्तावित इमारतीसमोरील रस्ता + पुढील बाजूचे सामासिक अंतर या परिमाणाच्या १.५० पट (दिडपट) इतके इमारतीची कमाल उंची अनुज्ञेय आहे.

मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील रहिवास तथा वाणिज्य वापराच्या नियमीत इमारत प्रस्तावास ४५.०० मी. उंचीपर्यंत अग्निशमन विभागाकडून नाहरकत दाखला देण्यात येत असून मा. शासनातील अग्निशमन सेवा संचालनालय यांचेकडील पत्र क्र. मअसे/३२एफ/२०१३/६६१, दि. १४/०५/२०१३ मधील निदेर्शानुसार शहरातील विशिष्ट गृहनिर्माण प्रकल्प जसे भाडेतत्वावरील गृहनिर्माण योजना, म्हाडा प्रकल्प या स्वरुपाच्या जास्तीचे चटईक्षेत्र निर्देशांक असलेल्या प्रकल्पास अटीशर्तीच्या अधिन राहुन ७०.०० मी. उंचीपर्यंत अग्निशमन विभागामार्फत परवानगी देण्यात येते. सद्यस्थितीत मिरा भाईंदर शहरात भाडेतत्वावरील गृहनिर्माण योजने अंतर्गत एकूण १३ प्रस्ताव व म्हाडा गृहनिर्माण योजने अंतर्गत एकूण ०२ प्रस्ताव प्रगतीपथावर आहेत.

मिरा भाईंदर महानगरपालिका शहराचे एकूण क्षेत्रफळ ७९.४० चौ.कि.मी. असून आजमितीस शहराची लोकसंख्या अंदाजे १२ लक्ष इतकी आहे. आता शिल्लक क्षेत्र नाविकास क्षेत्र / सी.आर.झेड. मध्ये येत असून सद्यस्थितीत रहिवासी क्षेत्र अत्यल्प उपलब्ध आहे. शहरातील लोकसंख्या झपाट्याने वाढत असून वाढत्या लोकसंख्येचा विचार करता भविष्यात शहरामध्ये नविन घरांची मागणी वाढणार असल्याचे गृहीत धरुन विकासक ७०.०० मी. पेक्षा जास्तीच्या उंचीच्या इमारतीसाठी परवानगी मिळणेकरिता पाठपुरावा करुन मागणी करित आहेत. भविष्यात मिरा भाईंदर महानगरपालिकेकडे पुर्नःविकासाखालील भूखंडाचे क्षेत्र व मागणी विचारात घेता उंच इमारतींचे प्रस्ताव मोठ्या प्रमाणात प्राप्त होवू शकतात.

मिरा भाईंदर महानगरपालिकेकडे सद्यस्थितीत कमाल ३९.०० मी. उंचीसाठीचे Fire Engine उपलब्ध असून ६२.०० मी. उंचीसाठी Fire Engine मागविणेबाबतची कार्यवाही अग्निशमन विभागामार्फत सुरु आहे.

विद्यमान प्रचलीत पध्दत विचारात घेता उंच इमारतींना बांधकाम परवानगी देतांना अनुज्ञेय करावयाच्या उंचीबाबत विशिष्ट पध्दत अवलंबिने जरुरीचे वाटते. जेणे करुन भुकंपप्रणव क्षेत्र तसेच जमिनीचा दर्जा विचारात घेता उंच इमारतीच्या स्थैर्यतेच्या दृष्टीने तसेच आग प्रतिबंधक यंत्रणा व प्रतिबंधात्मक उपायांबाबत सर्वतोपरी विचार करणेसाठी मिरा भाईंदर महानगरपालिका कार्यक्षेत्रात ७०.०० मी. पेक्षा जास्त म्हणजेच कमाल ९०.०० मी. पर्यंत उंच इमारतींना परवानगी देणेकरिता खालीलप्रमाणे समिती (High rise committee) गठीत करणे आवश्यक आहे.

१) आयुक्त, मिरा भाईंदर महानगरपालिका - अध्यक्ष
२) शहर अभियंता, मिरा भाईंदर महानगरपालिका - सदस्य
३) कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, मिरा भाईंदर महानगरपालिका - सदस्य
४) नगररचनाकार, मिरा भाईंदर महानगरपालिका - सदस्य
५) अग्निशमन अधिकारी, मिरा भाईंदर महानगरपालिका - सदस्य

६) सार्वजनिक बांधकाम विभागाकडील पॅनलवरील नियुक्त - सदस्य संरचना अभियंता - २ प्रतिनिधी

सदर समितीची कार्यपध्दती पुढीलप्रमाणे असेल.

७) कुठल्याही वापराचे ७०.०० मी. पेक्षा जास्त उंचीचे इमारतीचे विकास नियंत्रण नियमावली, भारतीय इमारत संहिता (National Building Code) व अग्निशमन नियमावलीप्रमाणे तांत्रिकदृष्ट्या सविस्तर चर्चा करुन निर्णय घेणे.

८) नोंदणीकृत संरचना अभियंता यांचे सल्ल्याने प्रस्तावांवर स्थैर्यतेबाबत आवश्यक असल्यास अतिरिक्त बाबी सुचविणे.

९) भुकंपप्रणव क्षेत्र विचारात घेवून संरचनेच्या स्थैर्यतेचे अनुषंगाने Design इत्यादी बाबत संबंधीत प्रकल्पाचे नियुक्त संरचना अभियंता यांचेकडुन आवश्यक ते प्रमाणपत्र प्राप्त करुन घेणे.

१०) प्रस्ताव योग्य असल्यास शिफारस करणे अन्यथा त्रुटींची पुर्तता करणेबाबत सुचविणे.

११) मा. अध्यक्ष्यांच्या सहमतीने इतर बाबींवर सारासार विचार करणे.

मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील ७०.०० मी. पेक्षा जास्तीच्या उंच इमारतींसाठी द्यावयाच्या परवानगीबाबत वरिलप्रमाणेची समिती गठीत करणे व बांधकाम परवानगी देणेबाबत निर्णय होणेसाठी हि महासभा मंजूरी देत आहे.

**जयंतीलाल पाटील :-**

माझे अनुमोदन आहे.

**आसिफ शेख :-**

सन्मा. महापौर मॅडम या विषयावर सन्मा. सदस्य भोसलेजी यांनी ठराव मांडला आहे. अनुमोदन झालेले आहे. सभागृहात मेजोरीटी आपली आहे त्यामुळे तो ठराव मंजुर होईल. आम्ही कितीही बोललो, काहीही बोललो त्याचा उपयोग नाही. संख्याबळाच्या हिशोबाने आम्ही बोललो तरी त्याची रेकॉर्डवर नोंद होईल. परंतु बहुमत तुमच्याकडे राहील. आता ही हायराईज कमिटी जी आहे माझ्या माहितीप्रमाणे हायराईज कमिटी ही शासनाची असते. आपण आपल्या स्तरावर अशा प्रकारचा कोणताही निर्णय घेऊ शकत नाही. हायराईज कमिटीमध्ये चिफ सेक्रेटरी महाराष्ट्र शासन त्याचप्रमाणे प्रधानसचिव नगरविकास विभाग त्याचप्रमाणे प्रभाग सचिव, बांधकाम विभाग त्याचप्रमाणे डायरेक्टर टाऊन प्लानिंग व सर्व संबंधित अधिकारांची एक हायराईज कमिटी शासनाची आहे आणि असे जे राज्यातील महानगरपालिकेचे किंवा स्थानिक संस्थांचे असे काही प्रस्ताव आहे हायराईज कमिटी संदर्भात ते प्रश्न त्या ठिकाणी शासनाच्या त्या हायराईज कमिटीत जात असतात. हे सगळ असताना देखील आपण अशा प्रकारचा या ठिकाणी महानगरपालिका स्तरावर ही अशी समिती गठित करणे योग्य नाही. जे-जे निर्णय घ्यायचे मिरा महानगरपालिका क्षेत्राच्या ज्या विकासकर्त्यांना जो न्याय द्यायचा आहे तो न्याय कायद्याच्या चौकटीत बसून द्यायला पाहिजे आणि त्यासाठी शासनाचे ऑलरेडी कमिटी आहेच. त्या कमिटीकडेच आपले सगळे प्रस्ताव त्याच्या अभिप्रायसाठी गेले पाहिजे. आपल्या स्तरावर आपण काहीही निर्णय घेऊ शकतो. उद्या आम्हाला वाटल आपली सदस्य संख्या भरपूर आहे वाटल महानगरपालिका विकायचा तो ही ठराव आपण घेऊ शकतो. बहुमताच्या जोरावर परंतु निर्णय घेताना आपण कायद्याच्या चौकटीत राहूनच निर्णय घेतलेला योग्य राहील तर शासनाची कमिटी आहे त्या कमिटीच्या अनुसरुन आपले काय प्रस्ताव असतील शहरातील विकासकर्त्यांना न्याय द्यायचे आहे. नागरिकांना न्याय द्यायचे आहे तर शासनाकडे आपण त्या हायराईज कमिटी आहेत त्या ठिकाणी पाठवावे अस आमच या ठिकाणी स्पष्ट मत आहे. त्या दृष्टीकोनातून असा जो आपण प्रस्ताव केला तो योग्य नाही अस आमच मत आहे धन्यवाद.

**सुरेश खंडेलवाल :-**

विषय अच्छा है हायराईज यदी बिल्डींग बनेगी तो मिरा भाईंदर को शांघाय बनाने के लिए प्रयास आपण लोगो की तरफ से बहुत अच्छी तरह से मैं इसका आदर करता हूँ। यदी प्रशासन की तरफ से विषय आया है तो प्रशासन ने जो भी कमिटी बनाई है बाकायदा लॉ वगैरे सब देखके बनाई होगी। उनको मालुम होगा। उनके पावर क्या है। वो कर सकते है की नही कर सकते पहिली बात तो लेकिन मिरा भाईंदर शहर में यह बिलकुल जरुरी भी है की पार्किंग की जो समस्या है उसको सुधारने के लिए यदी हायराईज आते है बहुत अच्छी बात है। लेकिन इसमें खाली मेरा एक जो डाऊट है उसको मैं यहाँ पे क्लिअर करना चाहूँगा की हायराईज कमिटी के लिए यह जो बनी है फायर के नॉर्म्स के हिसाब से यदी फायर के अंदर जो भी नॉर्म्स होते है। पानपट्टे साहेब शायद मुझसे जादा जानते होंगे की ॲज पर पॉप्युलेशन जो फायर ॲक्ट है उसके हिसाब से ४५ मीटर की परमिशन पानपट्टे साहब साडे सात लाख से १० लाख तक की यदी किसी शहर की पॉप्युलेशन होती है तो ॲज पर फायर ॲक्ट उसमें ४५ मीटर की परमिशन हायराईज होती है। उसके बाद में हमने एक प्रस्ताव २०१३ में एक लेटर भेजा था महासंचालक फायर को जब हमारी म्हाडा की और यह जो दुसरी बिल्डींग के लिए तो उन्होने उसके लिए स्पेशल हमको परमिशन दी थी। २०१३ के अंदर परमिशन हमको मिली की हम ७० मीटर तक की हाईट तक जा सकते है। लेकिन उसके लिए कुछ टर्म्स ॲन्ड कंडीशन उन्होंने अपनोको दिए थे। जहाँ तक मेरी नॉलेज मैं है २०१३ तक हमने जो परमिशन दी १-२ बिल्डींग को दि होगी। आज तक उनकी फायनल एन.ओ.सी. आज तक नही हुई है। जहाँ तक मेरी नॉलेज है

क्योंकी २०१३ से अभी तक बनी भी नही होंगी तो मैं यह जानना चाहता हूँ की यह जो ९० मीटर की कमिटी जो हम बना रहे है। यदी समजो कमिटी ने कोई डिसिजन ले लिया तो फायर एन.ओ.सी. के लिए आपकी उसमें क्या भूमिका रहेगी क्योंकी फायर एन.ओ.सी. के बिना यह काम आगे बढेगा नही तो यह बताइए की यदी कमिटी ने कोई डिसीजन लिया तो उसमें फायर ॲक्ट में आप चेंज करेंगे या फायर एन.ओ.सी. कीस तरह से देंगे। थोडीसी वह जानकारी यदी दे देंगे तो शायद मुझे लगता है की बहुत अच्छी चीज है यह होनी चाहिए और काम आगे बढे तो अच्छा ही है। पानपट्टे साहब आप जरा क्लिअर कर दो तो आगे।

**भगवती शर्मा :-**

उनको भी नॉलेज नही।

**मा. महापौर :-**

आप बोलो फीर साथ में उत्तर देंगे। एकत्र उत्तर द्या.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

मॅडम बघितल पानपट्टे साहेब म्हणतात घेवारे तुम्ही बोला. घेवारे साहेब म्हणतात पानपट्टे साहेब तुम्ही बोला. म्हणजे या दोघांमध्ये को-ऑर्डिनेशन नाही. मॅडम विषय ॲक्चुअली आहे हा.

**मा. महापौर :-**

बात को-ऑर्डिनेशन की नही है। आप वहाँ बैठके कैसे सोच सकते है को-ऑर्डिनेशन है की नही है। वो एक दुसरे को आदर दे रहे है।

**ध्रुवकिशोर पाटील :-**

बराबर है यह आदर की बात नही है लेकिन जवाब देने की बात है। मॅडम विषय असा आहे की हा जो विषय आलेला आहे हा विषय टाऊन प्लानिंग डिपार्टमेंटने दिलेला आहे. परंतु अग्निशमन विभागाचा याच्यामध्ये काहीही उल्लेख नाही आणि अग्निशमन विभागाचा काही खुलासा पण नाही आज जे आता सन्मा. सदस्य खंडेलवाल साहेबांनी सांगितले आहे की आपल्याला महाराष्ट्र शासनाच्या अग्निशमन सेवा संचालयाने एक पत्र दिले होते की तुम्ही ७० मीटर पर्यंत ऊंचीच्या इमारतींना परवानगी देऊ शकतात परंतु जी आम्ही अट दिली आहे त्या अटीशर्तीच्या अधीन राहून परमिशन देऊ शकतात आणि त्या अटिशर्ती ह्या आहेत बघा मॅडम उन्होने जो बोला ना मॅडम उसमें सिर्फ १० लाख का पॉप्युलेशन का उल्लेख किया। मैं उससे एक कदम और आगे जाऊ शायद खंडेलवालजी भुल गए मैं एक कदम और आगे जा रहा हूँ। त्यांनी अट क्र. ७ मध्ये त्यांनी अस सांगितले आहे की मिरा भाईंदर शहराच्या एकुण लोकसंख्येचा विचार करता खालीलप्रमाणे प्रशिक्षित मनुष्यबळ व अग्निशमन वाहने अग्निशमन केंद्र, टी.टी.एल., ए.एल.पी. डेस्कुटेंडर इत्यादी वाहने उपलब्ध होने आवश्यक आहे. सध्या अग्निशमन दलाकडे फक्त एकच टी.टी.एल. उपलब्ध आहे तथापी एकुण लोकसंख्येचे विचार करता किमान अजुन एक टी.टी.एल. किंवा एक ए.एल.पी. उपलब्ध करुन देणे आवश्यक आहे तसच पॉप्युलेशन ॲज पर २०११ सेन्सेस दहा लाख. १० लाख एरिया इन स्क्वेअर कि.मी. त्याच्यामध्ये बघा ॲडमिसेबल अव्हेलेबल आणि गॅप्स त्याच्यामध्ये फायर स्टेशन आहे आपल्याकडे ॲडमिसेबल आहेत. ८-८ अव्हेलेबल फक्त ३ आहेत गॅप आहे ५ चा म्हणजे अजुन आपल्याकडे फायर सेशन अजुन ५ करणे गरजेचे आहे. नंबर २ याच्यामध्ये आणखीन फायर इंजिन ॲडमिसेबल आहेत १३ आपल्याकडे अव्हेलेबल आहेत फक्त ६ आणि गॅप आहे ७ चा म्हणजे अजुन आपल्याकडे फायर इंजिन ७ बाकी आहे त्याच्यानंतर आणखी दुसऱ्या फायर ऑफिसर ॲडमिसेबल आहेत २६ अव्हेलेबल आहे फक्त १ आणि गॅप आहे २५ चा म्हणजे विचार करा २५ आपल्याकडे ऑफिसर नाहीत. त्याच्यानंतर फायरमन आणि अदर ३९० ॲडमिसेबल आहेत आपल्याकडे फक्त ९८ अव्हेलेबल आहेत. २९२ चा गॅप आहे म्हणजे आपल्याकडे एवढे मनुष्यबळ कमी आहे आणि एवढे मनुष्यबळ कमी असताना आपण ९० पर्यंत परमिशन देणे चुकीचे आहे. अग्निशमन दलाचे सक्षमिकरण करणे व उपरोक्त मुद्दा क्र. ७ जो मी सांगितलेला आहे तो नमुद केलेल्या तरतुदी पैकी किमान ५० टक्के पुर्तता करणे अनिवार्य आहे. मॅडम एवढ असुन सुध्दा आपल्याकडे आपण ती पुर्तता केली नाही. कमीत कमी ५० टक्के पूर्णता केली नाही आणि हे २००७ मध्ये दिलेले आहे. २०१३ चे लेटर आहे आता ह्या म्हाडाच्या इमारती जर पूर्ण होतील आणि जर त्यांना ओ.सी. द्यायची जर वेळ येईल आणि आपण जर ओ.सी. दिली आणि एक वर्षामध्ये जर आपण ही पुर्तता केली नाही तर अग्निशमन सेवा संघाचे हे जे पत्र आहे ते ऑटोमेटिक रद्द होईल आणि त्या इमारतींना सुध्दा आपल्याला ७० मीटरपेक्षा कमी उंची आपल्याला देणे क्रमप्राप्त आहे आणि तुम्ही आता ९० मीटरची ऊंची प्रस्तावित केलेली आहे. मॅडम हे सरळ-सरळ दुध का दुध और पानी का पानी आपके सामने है। जो तुम्ही प्रस्ताव आणलेला आहे तो चुकीचा आहे पानपट्टे साहेब तुम्ही याचा खुलासा कृपया करा.

**संभाजी पानपट्टे (मा. उपायुक्त) :-**

मा. महापौराच्या परवानगीने बोलत आहे की २००६ चा जो कायदा आहे त्यात पॉप्युलेशन ५ ते १० लाख पर्यंत ४५ मीटरची ऊंची अवलंबुन आहे. सध्या पॉप्युलेशन १० लाखाच्या वर आहे त्यामुळे हा प्रस्ताव आणलेला आहे. दुसरे म्हणजे फायर स्टेशन ४ आहेत २ बांधुन झालेले आहेत. दुसरी आपली ३९ मीटरची शिडी. सध्या आहे आणि ६२ मीटर महासभेने मंजुरी दिलेली आहे आणि जो कर्मचारीचा गॅप आहे २२५ कर्मचाऱ्यांना तो शासनाकडे प्रस्ताव पाठविलेला आहे. ठराव झाल्यानंतर डायरेक्ट ऑफ फायर सर्विसचा आपण अभिप्राय घेणार आहोत. नंतरची कारवाई करणार आहोत.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

तुम्ही अस सांगितल की आता ही जी पुर्तता तुम्ही करणार आहात पण तुमच अस यु आर १०० परसेंट कन्फॉम की, जोपर्यंत ९० मीटर ऊंचीचे परवानगीचे प्रस्ताव येतील तोपर्यंत तुमचे सगळे अटीशर्ती पूर्ण होतील.

**संभाजी पानपट्टे (मा. उपायुक्त) :-**

सविस्तर प्रस्ताव फायर स्टेशनला पक्का पाठविणार त्यांचे अभिप्राय घेणार नंतरच कारवाई होणार साहेब.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

मॅडम बघा अभिप्राय घेण्यानंतर कारवाई होणार म्हणजे समजा उद्या एखाद्याने प्रस्ताव टाकला ९० मीटर ऊंचीचा आणि ह्यांनी अभिप्राय जर निगेटीव्ह आला तर तुम्ही काय प्रस्ताव देणार नाही. घेवारे साहेब तुम्ही मंजुरी देणार नाही? नाही देणार. मग हा ठराव आणुन मतलब काय. बघा मॅडम त्यांनी सांगितल अभिप्राय आम्ही रितसर देऊ आणि गरज नसेल तर आम्ही नाही देणार. मग विषय काय. मग हा विषय आणला तरी कशाला म्हणजे आपण हा विषय न अभ्यास करता आणलेला आहे. पण तुम्हाला हा विषय परत घ्यावा लागेल असे माझे मत आहे.

**नरेंद्र मेहता :-**

महापौर मॅडम ४५ मीटर ७० मीटरची परवानगी देताना पण अनेक परवानग्या मिरा भाईंदर महापालिकेने न देता डायरेक्टर फायर सर्विसने आपल्याला अटीशर्ती टाकुन दिलेल्या आहेत आणि त्याप्रमाणे आपण परवानगी देतच असतो आणि आता जे आपण विषय जो आणलेला आहे यांनी त्यासाठी की या शहरामध्ये हायराईस इमारती बांधण्याची अनेक लोकांची मागणी आहेत आणि जुबेर इनामदारांनी जे सांगितल लोकांना प्यायला पाणी नाही हे नाही ते नाही. खंडेलवालजीने जे सांगितल पार्किंग नाही हे नाही ते नाही. आपल्या माहितीसाठी सांगतो की, एफ.एस.आय. तेवढच राहणार आहे. बिल्डींग अशी बांधायची हे ही आपण फक्त अशी बांधणार आहोत त्यामध्ये कुठल्याही प्रकारच पाणीची गरज जास्त भासणार नाही आहे किंवा दुसरे इतर सुखसुविधेची गरज पडणार नाही आहे. जेवढे ते क्षेत्र आहे तेवढ क्षेत्राचे एफ.एस.आय. मिळणार आहे. पार्किंगचे आपण बघितल तर छोट्या बिल्डींगला पार्किंगला नेहमीच प्रॉब्लेम आहे. हायराईज बिल्डींगला स्टिल, पाडिअम, दुसर स्टिल, तिसर डिल, हायराईस बिल्डींगला मल्टीपल पार्किंग आपण करत असतो पण छोट्या बिल्डींगला जी प्लस ७ ची बिल्डींग बनवायची ७ ची त्याला पार्किंग नाही साईट बाजुंनी असतो. या हायराईसला पार्किंगचा प्रश्न सुटतो आणि तुमची बाकी इतर कुठल्याही महापालिका तसा ताण बसत नाही आहे. हा जो विषय आणलेला आहे या शहरामध्ये हायराईस बिल्डींग आता शहराचे सुंदरीकरण होईल, एक ॲसेड व्हॅल्यु वाढणार आणि हा विषय आम्ही का आणलेला आहे फक्त सरकारकडे जे तज्ञ लोक आहेत. डायरेक्टर ऑफिस ते सर्व तपासतील त्यानंतर ते परवानगी देणार त्यांनी नाकारली तर नाकारली दिली तर त्या शहराला परवानगी देऊ ते आम्हाला सुचना करतील काय करायला पाहिजे काय नाही करायला पाहिजे तर महापौर मॅडम आम्ही ठराव मांडलेला आहे.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

मिरा-भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील रहिवास तसेच वाणिज्य वापराच्या इमारतींना ४५.०० मी. उंची पर्यंत अग्निशमन विभागाकडुन ना हरकत दाखला देण्यात येत आहे व महाराष्ट्र शासनाच्या अग्निशमन सेवा संचालनालय यांचा पत्रान्वये शहरातील विशीष्ट प्रकल्पांना काही अटीशर्तीच्या अधिन राहून ७०.०० मी. उंची पर्यंत अग्निशमन विभागा तर्फे परवानगी देण्यात येते.

भारतीय इमारत संहिता (National Building Code) प्रमाणे दहा लाख लोकसंख्येच्या शहरातील इमारतींना ७०.०० मी. उंची पर्यंतच परवानगी मिळु शकते त्याप्रमाणे मिरा-भाईंदर शहराची लोकसंख्या जनगणनेनुसार ८ लाख १४ हजार असून मिरा-भाईंदर शहरातील रहिवास तथा वाणिज्य वापराच्या इमारतींना जास्तीत जास्त ७०.०० मी. उंची पर्यंतच परवानगी अग्निशमन विभाग देऊ शकतात. मिरा-भाईंदर महानगरपालिकेच्या अग्निशमन विभागात सद्यस्थितीत कमाल ३९.०० मी. उंचीसाठी Fire Engine उपलब्ध असून ६२.०० मी. ऊंची साठी Fire Engine येण्यास कमीत कमी दोन ते तीन वर्ष कालावधी लागणार आहे तसेच अग्निशमन विभागात प्रशिक्षीत कर्मचा-यांच्या अभाव असून कर्मचा-यांची संख्या सुध्दा अपुरी आहे व महाराष्ट्र शासनाच्या अग्निशमन सेवा संचालनालय यांच्या अटीशर्तीचे पालन देखील मिरा-भाईंदर महानगरपालिकेने केली नसल्याने ७०.०० मी पेक्षा जास्त उंचीच्या इमारतींना परवानगी नियमाप्रमाणे देता येत नाही. मिरा-भाईंदर शहरात मुबलक पाणी पुरवठा उपलब्ध नसल्याने नवीन इमारतींना नळ कनेक्शन मंजुर करण्याचे बंद आहे व लाखो नागरीकांना पाणी पालिका देत नसून अस्तित्वात असणारा पाणी कनेक्शन मधे पाणी ४० ते ४५ तासाने पाणी पुरवठा होतो. तसेच मिरा-भाईंदर महापालिकेने शासनाला पाठविलेल्या जुन्या इमारतींचा पुन:र्विकासाचा प्रस्ताव शासनाने फेटाळला त्यामुळे गोषवारा नमुद केल्याप्रमाणे प्रस्ताव मोठ्याप्रमाणात प्राप्त होऊ शकत नाही. तसेच मिरा भाईंदर शहरात दळदलीची जमीन आहे. या सर्व बाबींचा विचार केला असता ९०.०० मी. पर्यंत उंच इमारतींना परवानगी देणे सध्या तरी संयुकतीक व नियमाप्रमाणे वाटत नाही म्हणून High Rise Committee गठीत करणे आवश्यक नाही असा मी ठराव मांडत आहे.

**जुबेर इनामदार :-**

माझे अनुमोदन आहे. महापौर मॅडम प्रशासनाला एक प्रश्न आहे माझा गोषवारा दिला होता या विषयावर तुम्ही प्रशासनाने दिलेला आहे, सही केलेली आहे. नॅशनल बिल्डींग कोड त्याला कधी गृहित धरल

होत का तुम्ही देताना? ज्यांनी कोणी दिल असेल किती दिशाभुल करत आहात सभागृहाची ठिक आहे सर्वजण अभ्यास करत नाही. चांगला अभ्यास आमच्याकडील नगरसेवकांनी गोषवाऱ्याचा अभ्यास केला तुमच्यासमोर विषय मांडला आम्हाला कुठेतरी फसवणार बेड्या घालतील आम्हाला. येऊन जे काही द्यायच असेल ते स्पष्ट द्या ना. त्याच्यामध्ये गोषवारा तुम्ही दिलेला आहे. प्रशासनाने सही केलेली आहे कमिशनर साहेब गांभीर्यपूर्वक घेत जा. प्रशासन जेव्हा गोषवारा देतो त्याची जबाबदारी नाही का ती? तांत्रिक बाबी तपासुन दिली पाहिजे. काही ठराविक लोकांना ते असे समजतात काही बिचारे नविन सदस्य आहेत त्यांना माहिती नाही डोळे बंद करुन हात वरती करत आहेत. तेही अडचणीत येतील मेहेरबानी करुन प्रशासनाला माझी सुचना आहे. पुढच्यावेळी गोषवारा देताना निट व्यवस्थित तपासुन द्या नाहीतर आम्हाला तुमच्या विरोधात................

**नरेंद्र मेहता :-**

नॅशनल बिल्डींग कोड त्या ठिकाणी लागु होतात ज्या ठिकाणी डी.सी. रुल नाही आहेत साहेब. डी.सी. रुल आल्यानंतर त्यामध्ये विशेष जी काही इमारत असेल ज्या डी.सी. रुलमध्ये समाविष्ट नाहीत त्यांना नॅशनल बिल्डींग कोड .....................

**जुबेर इनामदार :-**

तुम्ही घ्या डी.सी.रुलमध्ये तुम्ही आणलेला विषय नाही आहे. तुम्ही हा नविन आणलेला आहे.

**नरेंद्र मेहता :-**

महापौर मॅडम, आता जुबेर इनामदार बेड्या हे सांगतो बेड्या तर आतापर्यंत लागले पाहिजे होते. नॅशनल कोडला चालत नाही कारण हे आता सर्वांना माहित आहे रि-डेव्हलपमेंटवर दीड मीटरवर परवानगी आहे. आपल्या नॅशनल कोर्टात दीड मीटरवर आहे का? नाही आहे कारण डी.सी.रुल हा श्रेष्ठ आहे. नॅशनल बिल्डींग कोड हा जो कोड आहे ज्या ठिकाणी डी.सी. रुल नाही त्या ठिकाणी हा लागु होतो. आपल्याला तो लागु होत नाही आणि नॅशनल बिल्डींग कोड आपण लागु केल तर तुम्हाला रि-डेव्हलपमेंट बिल्डींगला परवानगी देता येणार नाही तुम्ही ह्या शहरातील ९० टक्के परवानगी ही चुकीची ठरणार आहे. डी.सी. रुल प्रमाणे आपल्या महापालिकेचे कामकाज चालत. एखाद्या विशिष्ट कुठली इमारत असेल एखाद्या आय.झी. प्रोव्हिजन जे काही असेल तर ज्या ठिकाणी डी.सी. रुल प्रोव्हीजन आहे त्याला नॅशनल बिल्डींग कोडचा फायर ॲक्ट लागु होतो.

**जुबेर इनामदार :-**

सन्मा. सभागृह नेते साहेब कमीत कमी खर बोलण्याच्या संदर्भात तर बोलुच नका साहेब. बाकी दिल्ली वरुन गल्ली पर्यंत कोण रेटून खोटे बोलतो त्याचा कशाला राग ज्या प्रोव्हिजन मधल्या डी.सी. रुलमध्ये जिथे डी.सी. रुल नाही तिथे नॅशनल बिल्डींग कोड आमचा डी.सी. रुलमध्ये ही प्रोव्हिजन नाही. म्हणून हा प्रस्ताव आम्ही आणला. जिथे नॅशनल बिल्डींग कोड लागु होणार त्यांची गरज तुम्हाला लागणार चाचपणी करुन घ्या. माझ परत तेच म्हणणे आहे तुम्हाला साहेब गोषवारा देताना निट विचार करुन द्या. कारण आपल्या इथे प्रत्येक सदस्य इथे केवळ अभ्यासु किंवा त्यांच्याकडे व्यवसाय कंन्स्ट्रक्शनचा नाही की, ते त्यांना प्रत्येक विषयात समजुन येईल.

**मा. महापौर :-**

आपण आपली मते मांडलेली आहेत.

**गणेश देशमुख (मा. उपायुक्त (मु.)) :-**

महापौर महोदया सन्मा. सदस्यांनी उपस्थित केलेला विषय नॅशनल बिल्डींग कोड आणि डी.सी.आर तर डी.सी.आर मधले तरतुदींनुसार हा विषय आहे. किंबहुना हायराईस बिल्डींगच्या समोर एखादा प्रस्ताव चर्चेला आला तर कुठले विषय चर्चा करावी यामध्ये सुध्दा नमुद करण्यात आलेला आहे. नॅशनल बिल्डींग कोड अग्निशमन नियमावली आणि डी.सी.आर मधली तरतुदी या सर्व बाबी विचारात घेऊनच त्या केसवरती आपल्याला निर्णय घ्यायचा आहे म्हणून हे डी.सी.आर मधील तरतुद आहे आपल्याकडे.

**मा. महापौर :-**

आपण ठराव मांडला आहे साहेब बसुन जा आणि ठराव मतदानाला घेतलेला आहे.

**नगरसचिव :-**

प्रकरण क्र. ७३ करिता दोन ठराव आलेले आहेत. पहिला ठराव सुचक श्री. अनिल भोसले, दुसरा ठराव सुचक श्री. ध्रुवकिशोर पाटील. अनुक्रमे दुसरा ठराव मी मतदानास टाकत आहे. श्री. ध्रुवकिशोर पाटील यांनी मांडलेल्या ठरावाच्या बाजुने असतील त्यांनी हात वर करायचे आहेत. या ठरावाच्या विरोधात असतील त्यांनी हात वर करायचे आहे. सुचक श्री. अनिल भोसले यांनी मांडलेल्या ठरावाच्या बाजुने असतील त्यांनी हात वर करायचे आहेत. या ठरावाच्या विरोधात असतील त्यांनी हात वर करायचे आहे.

**मा. महापौर :-**

श्री. अनिल भोसले यांनी मांडलेल्या ठरावाच्या बाजुने ३९, विरोधात २३ तटस्थ १ इतकी मते पडलेली आहेत. मी श्री. अनिल भोसले यांनी मांडलेला ठराव बहुमताने मंजुर करते.

**प्रकरण क्र. ७३ :-**

मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील रहिवास तसेच वाणिज्य वापराच्या इमारतींना जास्तीत जास्त उंची अनुज्ञेय करणेबाबत.

**ठराव क्र. ४७ :-**

मिरा भाईंदर शहराची विकास योजना (वगळलेला भाग सोडून) दि. १४/०५/१९९७ रोजी मंजूर झालेली असून दि. १५/०७/१९९७ पासून अंमलात आलेले आहे. वगळलेल्या भागाची विकास योजना दि. २५/०८/२००० रोजी मंजूर झालेली असून दि. १५/१०/२००० पासून अंमलात आलेली आहे.

मंजूर विकास नियंत्रण नियमावलीतील तरतूदी नुसार प्रस्तावित इमारतीसमोरील रस्ता + पुढील बाजूचे सामासिक अंतर या परिमाणाच्या १.५० पट (दिडपट) इतके इमारतीची कमाल उंची अनुज्ञेय आहे.

मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील रहिवास तथा वाणिज्य वापराच्या नियमीत इमारत प्रस्तावास ४५.०० मी. उंचीपर्यंत अग्निशमन विभागाकडून नाहरकत दाखला देण्यात येत असून मा. शासनातील अग्निशमन सेवा संचालनालय यांचेकडील पत्र क्र. मअसे/३२एफ/२०१३/६६१, दि. १४/०५/२०१३ मधील निदेर्शानुसार शहरातील विशिष्ट गृहनिर्माण प्रकल्प जसे भाडेतत्वावरील गृहनिर्माण योजना, म्हाडा प्रकल्प या स्वरुपाच्या जास्तीचे चटईक्षेत्र निर्देशांक असलेल्या प्रकल्पास अटीशर्तीच्या अधिन राहुन ७०.०० मी. उंचीपर्यंत अग्निशमन विभागामार्फत परवानगी देण्यात येते. सद्यस्थितीत मिरा भाईंदर शहरात भाडेतत्वावरील गृहनिर्माण योजने अंतर्गत एकूण १३ प्रस्ताव व म्हाडा गृहनिर्माण योजने अंतर्गत एकूण ०२ प्रस्ताव प्रगतीपथावर आहेत.

मिरा भाईंदर महानगरपालिका शहराचे एकूण क्षेत्रफळ ७९.४० चौ.कि.मी. असून आजमितीस शहराची लोकसंख्या अंदाजे १२ लक्ष इतकी आहे. आता शिल्लक क्षेत्र नाविकास क्षेत्र / सी.आर.झेड. मध्ये येत असून सद्यस्थितीत रहिवासी क्षेत्र अत्यल्प उपलब्ध आहे. शहरातील लोकसंख्या झपाट्याने वाढत असून वाढत्या लोकसंख्येचा विचार करता भविष्यात शहरामध्ये नविन घरांची मागणी वाढणार असल्याचे गृहीत धरुन विकासक ७०.०० मी. पेक्षा जास्तीच्या उंचीच्या इमारतीसाठी परवानगी मिळणेकरिता पाठपुरावा करुन मागणी करित आहेत. भविष्यात मिरा भाईंदर महानगरपालिकेकडे पुर्नःविकासाखालील भूखंडाचे क्षेत्र व मागणी विचारात घेता उंच इमारतींचे प्रस्ताव मोठ्या प्रमाणात प्राप्त होवू शकतात.

मिरा भाईंदर महानगरपालिकेकडे सद्यस्थितीत कमाल ३९.०० मी. उंचीसाठीचे Fire Engine उपलब्ध असून ६२.०० मी. उंचीसाठी Fire Engine मागविणेबाबतची कार्यवाही अग्निशमन विभागामार्फत सुरु आहे.

विद्यमान प्रचलीत पध्दत विचारात घेता उंच इमारतींना बांधकाम परवानगी देतांना अनुज्ञेय करावयाच्या उंचीबाबत विशिष्ट पध्दत अवलंबिने जरुरीचे वाटते. जेणे करुन भुकंपप्रणव क्षेत्र तसेच जमिनीचा दर्जा विचारात घेता उंच इमारतीच्या स्थैर्यतेच्या दृष्टीने तसेच आग प्रतिबंधक यंत्रणा व प्रतिबंधात्मक उपायांबाबत सर्वतोपरी विचार करणेसाठी मिरा भाईंदर महानगरपालिका कार्यक्षेत्रात ७०.०० मी. पेक्षा जास्त म्हणजेच कमाल ९०.०० मी. पर्यंत उंच इमारतींना परवानगी देणेकरिता खालीलप्रमाणे समिती (High rise committee) गठीत करणे आवश्यक आहे.

१) आयुक्त, मिरा भाईंदर महानगरपालिका - अध्यक्ष
२) शहर अभियंता, मिरा भाईंदर महानगरपालिका - सदस्य
३) कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, मिरा भाईंदर महानगरपालिका - सदस्य
४) नगररचनाकार, मिरा भाईंदर महानगरपालिका - सदस्य
५) अग्निशमन अधिकारी, मिरा भाईंदर महानगरपालिका - सदस्य
६) सार्वजनिक बांधकाम विभागाकडील पॅनलवरील नियुक्त संरचना अभियंता - २ प्रतिनिधी - सदस्य

सदर समितीची कार्यपध्दती पुढीलप्रमाणे असेल.

७) कुठल्याही वापराचे ७०.०० मी. पेक्षा जास्त उंचीचे इमारतीचे विकास नियंत्रण नियमावली, भारतीय इमारत संहिता (National Building Code) व अग्निशमन नियमावलीप्रमाणे तांत्रिकदृष्ट्या सविस्तर चर्चा करुन निर्णय घेणे.
८) नोंदणीकृत संरचना अभियंता यांचे सल्ल्याने प्रस्तावांवर स्थैर्यतेबाबत आवश्यक असल्यास अतिरिक्त बाबी सुचविणे.
९) भुकंपप्रणव क्षेत्र विचारात घेवून संरचनेच्या स्थैर्यतेचे अनुषंगाने Design इत्यादी बाबत संबंधीत प्रकल्पाचे नियुक्त संरचना अभियंता यांचेकडुन आवश्यक ते प्रमाणपत्र प्राप्त करुन घेणे.
१०) प्रस्ताव योग्य असल्यास शिफारस करणे अन्यथा त्रुटींची पुर्तता करणेबाबत सुचविणे.
११) मा. अध्यक्ष्यांच्या सहमतीने इतर बाबींवर सारासार विचार करणे.

मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील ७०.०० मी. पेक्षा जास्तीच्या उंच इमारतींसाठी द्यावयाच्या परवानगीबाबत वरिलप्रमाणेची समिती गठीत करणे व बांधकाम परवानगी देणेबाबत निर्णय होणेसाठी हि महासभा मंजूरी देत आहे.

**सुचक :- श्री. अनिल भोसले** **अनुमोदक :- श्री. जयंतीलाल पाटील**

| अ.क्र. | ठरावाच्या बाजूने | अ.क्र. | ठरावाच्या विरोधात | तटस्थ |
|---|---|---|---|---|
| १ | मेहता नरेंद्र लालचंद | १ | ध्रुवकिशोर पाटील | १. खण्डेलवाल सुरेश |
| २ | शरद केशव पाटील | २ | डिमेलो बर्नड अल्बर्ट | |
| ३ | पाटील रोहिदास शंकर | ३ | शिल्पा भावसार | |
| ४ | म्हात्रे कल्पना महेश | ४ | सॅन्ड्रा जेफ्री रॉड्रीक्स | |
| ५ | भानुशाली वर्षा गिरीधर | ५ | प्रभात प्रकाश पाटील | |
| ६ | मीरादेवी रामलाल यादव | ६ | पाटील सुनिता कैलास | |
| ७ | कोठारी सुमन रमेश | ७ | झिनत रऊफ कुरेशी | |
| ८ | डॉ. नयना मनोज वसाणी | ८ | विराणी रेखा अनिल | |
| ९ | सिमा कमलेश शहा | ९ | पुजारी कांचना शेखर | |
| १० | जैन गिता भरत | १० | पिसाळ मनिषा नामदेव | |
| ११ | अरोरा दिपिका पंकज | ११ | डिसा मर्लिन मर्विन | |
| १२ | रावल भगवती जयशंकर | १२ | अनिता जयवंत पाटील | |
| १३ | मेहता डिंपल विनोद | १३ | बगाजी शर्मिला विल्सन | |
| १४ | मेघना दिपक रावल | १४ | इनामदार जुबेर | |
| १५ | शर्मा सुनिला सत्येंद्र | १५ | वेतोसकर राजेश शंकर | |
| १६ | प्रतिभा प्रकाश तांगडे-पाटील | १६ | शेख अशरफ मोहम्मद इब्राहिम | |
| १७ | सुजाता रविकांत शिंदे | १७ | सुर्यकांत खंडोजी म्हात्रे | |
| १८ | पाटील प्रेमनाथ गजानन | १८ | सामंत प्रमोद जयराम | |
| १९ | सिंग मदन उदितनारायण | १९ | रकवी सुहास माधवराव | |
| २० | कांगणे यशवंत ठकाजी | २० | पांडे हंसुकुमार कमलकुमार | |
| २१ | अनिल बाबुराव भोसले | २१ | डॉ. आसिफ शेख | |
| २२ | कासोदरीया अश्विन श्यामजी | २२ | नरेश तुकाराम पाटील | |
| २३ | जैन दिनेश तेजराज | २३ | भोईर कमलेश यशवंत | |
| २४ | जैन रमेश धरमचंद | २४ | वंदना मंगेश पाटील | |
| २५ | डॉ. राजेंद्र जैन | | | |
| २६ | निलम हरिश्चंद्र ढवण | | | |
| २७ | शुभांगी महिन कोटियन | | | |
| २८ | जयमाला किशोर पाटील | | | |
| २९ | परमार अनिता भरत | | | |
| ३० | गावंड मंदाकिणी आत्माराम | | | |
| ३१ | संध्या प्रफुल्ल पाटील | | | |
| ३२ | दळवी प्रशांत ज्ञानदेव | | | |
| ३३ | प्रविण मोरेश्वर पाटील | | | |
| ३४ | ठाकुर अरविंद दत्ताराम | | | |
| ३५ | शाह राकेश रतिशचंद्र | | | |
| ३६ | जयंतीलाल गुरुनाथ पाटील | | | |
| ३७ | केळुसकर प्रशांत नारायण | | | |
| ३८ | मुन्ना सिंग | | | |
| ३९ | दिप्ती शेखर भट | | | |

**ठराव बहुमताने मंजूर**

**सही/-**
**महापौर**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

**नगरसचिव :-**

प्रकरण क्र. ७४, महानगरपालिका हद्दीतील शाळेची आरक्षणे जॉईंट वेंचर पध्दतीने विकसित करणेबाबत.

**प्रशांत केळुसकर :-**

प्रकरण क्र. ७४ व प्रकरण क्र. ७५ हे दोन्ही विषय अवास्तव सादर करावेत म्हणून विषय मागे घेत आहेत. सदर विषय हा विस्तारीत अहवालासह परत सादर करण्यात यावा असा ठराव मांडत आहे.

**शरद पाटील :-**

माझे अनुमोदन आहे.

**प्रकरण क्र. ७४ :-**

महानगरपालिका हद्दीतील शाळेची आरक्षणे जॉईंट वेंचर पध्दतीने विकसित करणेबाबत.

**ठराव क्र. ४८ :-**

सदर विषय हा विस्तारीत अहवालासह परत सादर करण्यात यावा असा ठराव मांडत आहे.

**सुचक :- श्री. प्रशांत केळुसकर अनुमोदक :- श्री. शरद पाटील**

**ठराव सर्वानुमते मंजूर**

**सही/-**
**महापौर**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

**नगरसचिव :-**

प्रकरण क्र. ७५, डी.पी. रोडमध्ये येणारी घरे, दुकाने, गाळे, इंडस्ट्रीज यांना मोबदला देणे किंवा पुर्नवसण करणेबाबत धोरण ठरविणे.

प्रशांत केळूसकर :-

सदर विषया बाबत सविस्तर अहवाल सादर करणे आवश्यक आहे. त्यामुळे सदर विषय मागे घेण्यात येत आहे. सविस्तर अहवालासह परत सादर करावा असा ठराव मांडत आहे.

**शरद पाटील :-**

माझे अनुमोदन आहे.

**प्रकरण क्र. ७५ :-**

डी.पी. रोडमध्ये येणारी घरे, दुकाने, गाळे, इंडस्ट्रीज यांना मोबदला देणे किंवा पुर्नवसण करणेबाबत धोरण ठरविणे.

**ठराव क्र. ४९ :-**

सदर विषया बाबत सविस्तर अहवाल सादर करणे आवश्यक आहे. त्यामुळे सदर विषय मागे घेण्यात येत आहे. सविस्तर अहवालासह परत सादर करावा असा ठराव मांडत आहे.

**सुचक :- श्री. प्रशांत केळुसकर अनुमोदक :- श्री. शरद पाटील**

**ठराव सर्वानुमते मंजूर**

**सही/-**
**महापौर**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

**नगरसचिव :-**

प्रकरण क्र. ७६, मिरा भाईंदर शहराच्या मंजूर विकास योजनेतील मौजे घोडबंदर सर्व्हे क्र. ८/१ब, १क या जागेपैकी १८ मी. रुंद विकास योजना रस्त्याने बाधीत क्षेत्राचे भुसंपादन करणेकरीता झालेल्या ठरावात फेरबदल करणेबाबत.

**प्रशांत केळुसकर :-**

मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रामधील मौजे घोडबंदर, स.क्र. ६/६, ७/६, ८/१अ, १०/१, २०४/१० या जागेसाठी महानगरपालिकेने जा.क्र. मनपा/नर/२५८८/२०१२-१३, दि.०६/१०/२०१२ अन्वये रेखांकन नकाशा मंजूरीसह बांधकाम परवानगी दिलेली असून सदरच्या जागेमधून जाणा-या १८.०० मी. रुंद विकास योजना रस्त्यामधील स.क्र. ८/१ब व ८/१क या जागा महानगरपालिकेस हस्तांतरीत झालेल्या नसल्यामुळे सदर जागेसाठी जाणेकरिता रस्ता उपलब्ध होत नव्हता. यास्तव सदर जागेच्या विकासकाने १८.०० मी. रुंद विकास योजना रस्ता विकसीत करणेस महानगरपालिकेस आदेशीत करावे म्हणून मा. उच्च न्यायालय, मुंबई येथे रिट याचिका क्र. ७४१९/२०१३ दाखल केलेली आहे.मा. उच्च न्यायालयाच्या आदेशाप्रमाणे विहीत मुदतीत कार्यवाही करणे आवश्यक असल्यामुळे तसेच जागामालकांनी परस्पर वाटाघाटीने व विकास हक्क प्रमाणपत्रान्वये जागा हस्तांतरीत करणेस प्रतिसाद दिलेला नसल्यामुळे सदरच्या विकास योजना रस्त्यामधील स.क्र. ८/१ब, ८/१क या जागेमधील अंदाजित क्षेत्र ६८० चौ.मी. साठी भूसंपादनाचा आगावु प्रस्ताव महानगरपालिकेने जा.क्र. मनपा/नर/७९३/२०१४-१५, दि.२१/०६/२०१४ अन्वये मा. जिल्हाधिकारी, ठाणे यांचेकडे सादर केलेला आहे. सदरच्या प्रस्तावाप्रमाणे महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम १९६६ चे कलम १२६ नुसार व मा. जिल्हाधिकारी, ठाणे यांचेमार्फत भूसंपादन कायदा १९४८ चे कलम ६ नुसार भूसंपादन करण्यासाठी व भूसंपादन करणेकामी येणा-या खर्चास प्रशासकीय व आर्थिक मंजूरी देण्याबाबतचा प्रस्ताव दि.१९/०७/२०१४ रोजीच्या मा. महासभेसमोर सादर करणेत आला असता, मा. महासभेने ठराव क्र. ६ अन्वये या जागेसाठी देण्यात आलेली परवानगी रद्द करुन या जागेचे भूसंपादन करणेबाबत मंजूरी दिलेली आहे. सदरच्या मा. महासभेच्या ठरावाप्रमाणे कार्यवाही करावयाची झाल्यास परवानगी दिलेल्या जागेच्या भूसंपादनासाठी व त्यानंतर

करावयाच्या बांधकामासाठी होणारा खर्च महानगरपालिकेस परवडणारा नाही. तसेच सदरच्या जागेमध्ये विकासकास मंजूरी दिल्यामुळे २५% प्रमाणेचे बांधीव क्षेत्र महानगरपालिकेस बांधकामाचा खर्च + १५% प्रमाणेच्या रक्कमेच्या मोबदल्यामध्ये प्राप्त होणार आहे. त्याप्रमाणे महानगरपालिकेस प्राप्त होणा-या बांधीव क्षेत्रामध्ये विकास योजना रस्त्याने बाधीत किंवा रस्ता रुंदीकरणाने बाधीत लोकांचे पुर्नवसन करणे सोईचे होईल. यास्तव दि.१९/०७/२०१४ रोजीच्या मा. महासभेचा प्रकरण क्र. १४ ठराव क्र. १६ रद्द करणेस व १८.०० मी. रुंद विकास योजना रस्त्याने बाधीत जागेपैकी स.क्र. ८/१ब व ८/१क या जागेमधील क्षेत्राचे भूसंपादन करणेसाठी हि महासभा प्रशासकीय व आर्थिक मंजूरी देत आहे. तसेच आरक्षण क्र. २२२ हाऊस फॉर डिसहाऊस या आरक्षणातील क्षेत्र सर्व्हे क्र. २१९/५ जुना, या जागेतील जागाधारकांना देखील सदर आरक्षणात नगररचना नियमाप्रमाणे योग्य ती बांधकाम परवानगी देण्यास ही सभा मंजूरी देत आहे असा ठराव मांडत आहे.

**अनिल भोसले :-**

माझे अनुमोदन आहे.

**सुरेश खंडेलवाल :-**

महापौर मॅडम इस विषय में थोडासा एक जानकारी यह चाहिए की, यह जो ठराव पहिले हुआ था मुझे लगता है की, शायद मेहता साहबने हमारे आमदार साहबने ही इसका यह ठराव किया था की, यहाँ पे इंडस्ट्रीयल झोन है और मिरा भाईंदर में नही है। तो पहले यहाँ बनाया जाए और मुझे लगता है की, यह जो प्रस्ताव है यह शासन को विखंडीत करने के लिए भेजा है। खाली मुझे यह संशय है जानना चाहता हूँ की जब शासन ने यह विषय विखंडीत करने के लिए भेजा है। और ऑलरेडी भुसंपादन की प्रक्रिया रस्ते की चल रही है। तो फिर इसको यह विषय लानेका उद्देश क्या है। मैं प्रशासन के माध्यम से यह जानना चाहता हूँ की, जब ऑलरेडी विषय विखंडीत करने के लिए भेजा है। हमने सी.सी. दिया है काम वहाँ चल रहा है। विखंडीत करने का तो इतनी जल्दबाजी इस विषय को लाने की क्या की इस विषय को फिरसे वह जो विखंडीत करने को जो भेजा है। प्रस्ताव उसको हम वापस से लेकर आ रहे है। तो क्या ऐसे और भी विखंडीत हो गए है। तो सारे के सारे प्रस्ताव इसतरह से वापीस आऐंगे तो मॅडम में यह जानना चाहता हूॅ की इसका पिछे का उद्देश क्या है। और क्यों इतनी जल्दबाजी दिखाने का रिझन क्या है।

**नरेंद्र मेहता :-**

सदर विषय भुसंपादनच महानगरपालिकेने या जागेवर परवानगी दिली होती आणि दिल्यानंतर त्या ठिकाणी पोहच रस्ता नव्हता म्हणुन ते विकासक उच्चन्यायालयात गेले कोर्टाने तसे आदेश दिले की, महानगरपालिकेने ती जागा रस्त्याची भुसंपादन करावी एक्वीझिशन करावं त्यावेळी ठराव केला होता मा. महासभेने की रस्ता एक्वीझिशन कराव त्याच्यात काही दुमत नाही. त्याला आर्थिक प्रशासकीय मान्यता सुध्दा महासभेने त्यावेळी दिली. त्यावेळी हे निर्णय घेतले गेले. परवानगी रद्द करा आणि जागा पूर्ण ताब्यात घ्यावी आणि त्यानंतर प्रशासनानी हा विषय जो होता विखंडीतला गर्व्हमेंटकडे पाठविलेला आहे आणि त्याला जवळ-जवळ मला वाटत एक वर्षाचा कालावधी झाला असेल. मिरा भाईंदरमध्ये मोठ्या प्रमाणात रस्ते रुंदीकरणाची कामे चालु आहेत ते चालु करीत असताना त्याला एखादा कोणाला पुर्नवसन करायच असेल तर आपल्याकडे कुठेही इंडस्ट्रीजमध्ये घालवु नये याला जर परवानगी दिली त्या अटीशर्तीमध्ये २५ टक्के महापालिकेला फुकट झाले फ्रि ॲन्ड कॉस्ट त्यांनी बांधुन द्यायचे होते तर आमची भुमिका तिच आहे की ती परवानगी विखंडीतला अजुन कदाचित किती वेळ लागेल पण महासभेनेच तो आपला निर्णय घेतला तर विकासाकडील त्वरीत २५ टक्के गाळे बांधुन घेतल्यावर जे लोक बाधित होणार त्यांना आपल्याला कुठेतरी ॲकोमेड करता येईल किंवा नियमाप्रमाणे जो काय असेल त्याचा विचार करता येईल. त्यासाठी आम्ही हा विषय आणलेला आहे बाकी नाही तर सरकारकडून तो आज उद्या तो विखंडीत होईल नाही होईल हा एक प्रश्नचिन्ह कधी होईल तर आपण आपली महासभेची भुमिका जी घेतलेली आहे त्यामध्ये हा नंतर आपल्याला पुढील कारवाई करणे सोपे होईल. त्यासाठी हा विषय आणलेला आहे.

**सुरेश खंडेलवाल :-**

अभी हमारे वैसे तो क्या है की, मॅडम मैंने यह सवाल प्रशासन से पुछा था जैसा की आपने बताया की, सबको जगह देनी है। जो भी अटीशर्ती उसके अंदर थी वो सारी की सारी जो सी.सी. जब दि गई थी मॅडम को यह सारी चीजे उस समय मिलनेवाली थी और यह जो प्रस्ताव भुसंपादन का जीस सम्य हायकोर्ट का ऑर्डर आया था महासभा में प्रशासनने यह प्रस्ताव आया था और उस समय मेहताजी ने ही उस समय विरोध यह किया था की, हमारे इंडस्ट्रीयल पार्क नही है। हमको यह ३७ में यह प्रस्ताव को दिजीए और सी.सी. रद्द करके यहाँ पे इंडस्ट्रीयल पार्क बनाए जाए। यह उसमें ठराव पास होने के बाद में जब यह विखंडीत करने के लिए भेजा तो अभी मुझे लगता है की, मिरा भाईंदर शहर के अंदर ऐसे बहुत सारी चिजे है। बहुत सारे ऐसे रस्ते है, बहुत सारे है। सब चिजो को जो हम इसतरह से यह विखंडीत करने के जाने के बाद एक साल हो गया। मॅडम मैं चाहता हूँ की, मुझे ऐसा लगता है की, इसमें या तो विकासक को या जो प्रोसिजर जो चल रहा है उसको हमारे पास अभी प्रोसिजर चल रहा है। भुसंपादन का हम उसको कर रहे है। जगे का चल रहे है तो विखंडीत करने का आने का उसका इंतजाम किया जाए। वह हमने विखंडीत करने को भेजा है। वहाँ से शासन से आएगा उसके बाद हम करेंगे यदी इसी तरह से प्रस्ताओं को विखंडीत करने भेजेंगे पहिले लाऐंगे फिर विखंडीत करने भेजेंगे फिर वापस लाऐंगे मॅडम ऐसे ३० तारीख की महासभा में

मेरे पास सब इधर है। (ज) के कमसे कम चार प्रस्ताव ऐसे है की, जिसको ३० तारीख के प्रस्ताव में डी.सी. रुल चेंज करने को लाया गया। रिझंर्व्हेशन चेंज करने का प्रस्ताव लाया गया ना तो आजतक उसको विखंडीत करने के लिए भेजा ना। आज तक कुछ हुआ मैं यह जानना चाहता हूँ की, क्या इस तरह की, जो प्रथा है की, एक तरफ हम विखंडीत करते है। एक तरफ हम फिर लेकर आते है। एक तरफ हम (ज) के माध्यम से रिझंर्व्हेशन चेंज करने को देते है। डी.सी. रुल मैं (ज) के माध्यम से कभी भी रिझंर्व्हेशन चेंज नही होता है। गोषवारा प्रशासन के तरफ से आना चाहिए। लेकिन मुझ लगता है की, कही ना कही यह प्रथा शुरु हो गई है की, हम जो प्रस्ताव ला रहे है वह रुल के हिसाब से है नही है। प्रशासन की भी भुमिका मुझे समझ में नही आ रही है की, यदी उनको लगता है की डी.सी. रुल के हिसाब से यदी यह प्रस्ताव सही नही है तो विखंडीत करने के लिए तुरंत भेजना चाहिए। लेकिन ६-६ महिने होने के बाद में भी आज तक वह विखंडीत करने के लिए नही भेजे जाते है। मॅडम में आपके माध्यमसे, पुरे सभागृह के माध्यम से इस प्रथा की जानकारी देना चाहता हूँ की, यह जो प्रस्ताव लाया गया है मुझे कही लगता है की, हम यदी विखंडीत करने के लिए हम उसको भेज चुके है तो मुझे लगता है की, उसका हमको इंतजार करना चाहिए। ताकी हम उसी प्रस्ताव को फिरसे जो है ना महासभा में लाके उसको पास करना चाहिए धन्यवाद।

**नरेंद्र मेहता :-**

महापौर मॅडम त्यांना विषय पहिली गोष्ट भुसंपादन आणि त्या जागेचे भुसंपादन आणि डी.पी. रस्त्याचे करतोय. तर त्यावेळी पण आपण मंजुरी दिली आता ही तो मंजुर होईल त्याला आपण कुठलाही बदल करत नाही. आरक्षणही भुसंपादन करावा अशी आमच पण मत होते. आहे तो इंडस्ट्रीयल झोनच आहे. त्यामध्ये ३७ च्या कुठल्याही प्रकारचा मॉडीफीकेशनचा प्रस्ताव झालाच नव्हता. तो ऑलरेडी इंडस्ट्रीयल झोन आहे त्याला ३७ करण्याची आवश्यकता नव्हती. आमची मानसिकता पहिले अशी होती की, त्यामध्ये आता प्रशासनानेच ती भुमिका घेतली तो विखंडीतला पाठवा आम्ही खाली तो सोप करतोय की जे आपल्याला विखंडीतला पाठवताय तुम्ही जे एक वर्षानी येईल तर मग ते आजच घ्या गाळे म्हणजे कमीत कमी आम्हाला त्या लोकांना देता येईल प्रशासनाने त्यावेळी विखंडीतची भुमिका घेतली नसती तर कदाचित हा विषय आलाच नसता. प्रशासनाने विखंडतेची भुमिका घेतली म्हणून त्याला आम्ही त्यांच्या भुमिकेत सहमत घेऊन शेवटी शहराचा हिताचा विचार करता २५ टक्के ते झाले तर लवकर घेऊया ह्या ॲंगलने हा विषय आणलेला आहे.

**सुरेश खंडेलवाल :-**

प्रशासनाने अभी विखंडीत करने के लिए भेज दिया है।

**नरेंद्र मेहता :-**

प्रशासनाने कराव सभागृहाची भुमिका मांडत आहे. विखंडीतला कदाचित ४ महिने लागतील. ६ महिने लागतील २ वर्षे लागतील, ५ वर्षे लागतील, १० वर्षे लागतील.

**सुरेश खंडेलवाल :-**

सर बी.एस.यु.पी. योजना को ५-५ साल हो गए है। कुछ नही है यह जो है ना मैं आपको बोलना चाहता हूँ की, विखंडीत करने को ३ महिने लगे की, ४ महिने लगे तबतक भुसंपादन की प्रक्रिया चल रही है। उस प्रक्रिया को भी ६ से ८ महिना सालभर जाएगा तो तब तक अपने को प्रशासन यदी अपनी तरफ से देता है। अपने को इतनी जल्दबाजी दिखाने की जरुरत नही है। मुझे समझ में नही आ रहा है की, यह जो एक ही विषय है। बी.एस.यु.पी. की योजना ४-४, ५-५ साल से बहुत सारे विषय ऐसे है। मुझे लगता है की, अभी यह पहिली बार ऐसा होने लगा की, प्रशासन गोषवारा नही देता है। प्रशासन को जानकारी नही होती है। और अपनी तरफ से जो विषय लाए जा रहे है और हम प्रशासन से जवाब मांगते है तो जवाब आप देते है। मुझे समझ में नही आ रहा है की, न हमको इंटरनली ..................

**नरेंद्र मेहता :-**

आपने यह कहा की, हमने ३७ किया था मैंने इसलिए क्यों कहा हमने ३७ नही किया। ३७ का कोई मॉडिफिकेशन नही किया कोई रिझंर्व्हेशन जो है, वह रिझंर्व्हेशन है २५ टक्के गाला हमारी यह सोच थी की, पुरेही आरक्षण ले लो बाकी १०० के १०० गाले हमारे बने अब आपने विखंडीत को भेजा है। इसिलिए हमने लास्ट में कहाँ की चलो जो २५ आते है वह लेलो कमसे कम इनके लिए काम आए ठिक है प्रशासनने अपनी भुमिका चेंज करली शायद उस समय प्रशासन महासभा ठराव के साथ होता तो यह दिन नही आते।

**मा. महापौर :-**

प्रशासन आपको जवाब देगा आप प्लिज बैठीए घेवारेजी आप इनका जवाब दिजीए।

**दिलीप घेवारे :-**

मा. महापौर मॅडमच्या परवानगीने बोलतो हा ठराव झाल्यानंतर तो शासनाला विखंडीत करण्यासाठी पाठविण्यात आलेला आहे आणि विखंडीत करण्याची भुमिका आणि आजचा जो ठराव रद्द करण्याची भुमिका एकच आहे. जस यांनी सांगितले की, त्याला वेळ लागु शकतो आणि आपल्याला आज १६२७.३८ चौ. मीटर इंडस्ट्रीयल जागा आपल्याला गाळ्यांच्या स्वरुपात बांधुन मिळणार आहेत. ते १८ गाळे आहेत आपण २०१२ ला परवानगी दिलेली आहे. आज ३ वर्षे झाली आपण जर त्याचवेळी बांधकाम झाल असत तर ते आपल्याला लवकर मिळाले असते. आपल्याला उशीर झालेला आहे ऑलरेडी आणि याच्यामध्ये आज जी भुमिका आहे प्रशासनाची आणि महासभेची जवळपास एकच आहे आपण विखंडीतला पाठविल्यामुळे परंत अजुन आपण

उशीर लावला तर त्याला आपण जी परवानगी दिली आहे तो आपल्यावर त्याच्यात आर्थिक नुकसानीच सुध्दा आपल्यावर क्लेम करु शकतो.

**भगवती शर्मा :-**

महापौर मॅडम, आजका ठराव तो उन्होंने अभी किया है। ठिक है इसके पहले आपने जो ठराव किया था उसके अंदर मैं स्पष्ट आपने लिखा था की, सदर जागेत दिलेली परवानगी रद्द करण्यात यावी व सदर आरक्षण महानगरपालिकेने विकसित करावे असा ठराव मांडत आहे. यह आपकाही ठराव था की उसकी परवानगी तत्काल रद्द होनी चाहिए ठिक है आज वह बोल रहे है वह करेगी इतना टाईम हो गया गुजर गया। अभी रद्द नही हुई अभी जो आप बोल रहे है करो अभी भी आपका वही मानना है की परवानगी रद्द करके महानगरपालिका डेव्हलप करो।

**नरेंद्र मेहता :-**

त्यावेळी मी परत सांगितल सभागृहाला की, त्यावेळी आमची भुमिका जी होती की, पूर्ण जागाच तुम्ही ॲक्वायर करा १६०० मीटर कशाला ५००० मीटर घ्या परंतु प्रशासन त्या ठरावाच्या बाजुला नव्हते. विखंडीतला ठराव गेलेला आहे. म्हणजे हे ही होत नाही आणि ते ही होत नाही. म्हणुन यासाठी आपण प्रशासन जी भुमिका घेतली कमीत कमी या शहराची गरज बघता ती २५०० म्हणजे १६०० मीटरमध्ये जवळ-जवळ २०,००० स्क्वेअर फुट ही जागा आपल्याला मोफत बांधुन त्या भुमिकेशी आम्ही सहमत होऊन ते रद्द केलेले आहे. आम्ही त्यावेळी सांगितल होत विखंडीतला नाही गेल असतं. तर आमची भुमिका तिच होती पण तो विखंडीतला गेला तर प्रशासनाने आमची भुमिका एक करुन ह्या शहरातली बाकी १६,००० मीटर जागी आपल्याला १६०० मीटर म्हणजे २०,००० फुट गाळे आपल्याला मिळतील.

**सुरेश खंडेलवाल :-**

समजा साहेब तो विखंडीत नाही झाला आणि शासनाने तुमची बाजू स्विकार केली मग काय होणार.

**नरेंद्र मेहता :-**

आम्ही आमची भुमिका आजची महासभेच्या माध्यमातून आता आम्ही घेतलेली आहे आणि ठराव मांडलेला आहे.

**सुरेश खंडेलवाल :-**

महापौर मॅडम प्रस्ताव गया है विखंडीत के लिए हम भी यही चाहते है की, वह इंडस्ट्रीयल पार्क आपकी जो भावना थी अब हमारी भी वह भावना है पुरा की पुरा जो महापालिका को रिर्झव्हेशन मिले हम यह चाहते है की, विखंडीत को जो प्रस्ताव गया है, उसका इंतजार किया जाए। यदी समझो विखंडीत नही हुआ शासनने हमारी भुमिका को मान लिया तो पुरा की पुरा इंडस्ट्रीयल पार्क मिरा भाईंदर शहर को मिल जाएगा।

**नरेंद्र मेहता :-**

तुमच्या बरोबर ही भुमिका घेतली असती तर आम्हाला हे दिवस बघायला लागले नसते. त्यावेळी त्यांना आज असे वाटत आहे की, आम्ही आज योग्य बोलतोय तर तेव्हा यांनी विखंडीतला पाठवायला नको होता. सर्व कामांमध्ये अडथळा आणला.

**भगवती शर्मा :-**

ठराव सर्वानुमते आहे. आम्ही तुम्हाला पाठींबा दिला होता. सर्वानुमते आहे तुम्ही असे सांगु नका.

**नरेंद्र मेहता :-**

मग विखंडीतला कसे गेल.

**भगवती शर्मा :-**

विखंडीतला तुम्ही विचारा.

**सुरेश खंडेलवाल :-**

विखंडीतला पाठवायचा अधिकार आम्हाला नाही आहे. साहेब विखंडीत को भेजने का अधिकार कमिशनर साहब का रहता है। वह अधिकार हमारा या आपका नही है। उन्होंने भेजा होगा लेकिन हम इंतजार करने को तैयार है ना।

**भगवती शर्मा :-**

हम जो चाहते है वो आपभी सुन लेते ठिक है। महापौर मॅडम एकबार हमको प्रशासन से तो जवाब देने दिजीए ना।

**मा. महापौर :-**

प्रशासनने शायद आपको जवाब दे दिया है। आपको ठराव मांडना है आप ठराव मांडीए।

**ध्रुवकिशोर पाटील :-**

विषय असा आहे मॅडम मेहताजी यह लोग भी जरा होशीयार है। यह बिल्डर है तो यह भी होशियार है। आपने जो ठराव मांडा यह कम्पलीट दुतर्फी दुट्टपी भुमिका है। कधी सांगायच आरक्षण करा कधी सांगायच आरक्षण उठवा ही तुमची दुट्टपी भुमिका आहे ही भुमिका तुमची चुकीची आहे आता प्रशासन हा महासभेत विषय घ्यायचा अधिकार महापौरांचा आहे. बरोबर आहे परंतु प्रशासनाने पण गोषवारा दिला पाहिजे ना. प्रशासनाने गोषवारा दिला कुठे. साहेब आम्ही पण सत्ता गाजवली १५ वर्षे आम्ही पण तुम्हाला गोषवारे दिले नाही. परंतु मिटींगच्या दिवशी गोषवारे दिले आणि तुम्ही आता कहर केला. मिटींगच्या दिवशी पण गोषवारा

नाही दिला म्हणजेच काय तुम्हाला काहीतरी लपवायचे आहे. सन्मा. पंतप्रधान मोदी साहेब बोलतात है की, स्वच्छ प्रशासन, सुशासन, पादरर्शक कारभार .................

**मा. महापौर :-**

ध्रुवकिशोर पाटील साहेब आपल्याला ठराव मांडायचा तर ठराव मांडा बाकी संभाषण करु नका.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

हे भाषणबाजी नाही. तुम्ही त्यांच्या पाऊलावरती पाऊल ठेवले पाहिजे ना. स्वच्छ कारभार, पारदर्शक प्रशसन ठेवले पाहिजे ना.

**मा. महापौर :-**

आमचा कारभार स्वच्छ आहे ते तुम्हाला सांगायची गरज नाही. आपण ठराव मांडा.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

गोषवारा दिला पाहिजे गोषवाराच दिला नाही.

**मा. महापौर :-**

आपण ठराव मांडा.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

सदर विषयाचा गोषवारा मिरा भाईंदर महानगरपालिकेने दिला नसल्याने आम्हा सदस्यांना या विषयाची माहिती नाही. विषय आम्हाला समजले नाही. बैठकीच्या दिवशी सुध्दा प्रशासनाने गोषवारा दिला नाही त्यामुळे प्रशासनाने गोषवारा दिला नाही त्यामुळे प्रशासनाने गोषवारा पुढील महासभेत देऊन मा. महासभेने प्रस्ताव पुढील महासभेत घ्यावा असा ठराव मांडत आहे.

**जुबेर इनामदार :-**

माझे अनुमोदन आहे.

**मा. महापौर :-**

ठराव मतदानाला घ्या.

**सुरेश खंडेलवाल :-**

ऑफिशिअली गोषवारे की तहत आने दो ना इसको क्या फरक पडता है। गोषवारा जो है ना प्रशासन भी तयार है जैसे अभी घेवारे साहेबने स्टेटमेंट दिया है तो अगली बार गोषवारा के तेहत आने दो। वैसे भी इसका कुछ होगा नही।

**सुहास रकवी :-**

सचिव साहेब तुम्ही गोषवारा का नाही पाठवत पण हा विषय आम्हाला वारंवार विचारावा लागतो.

**मा. महापौर :-**

सचिव साहेब आपण ठराव मतदानाला घ्या.

**सुहास रकवी :-**

गोषवारा नसेल तर अभ्यास काय देणार आम्ही. हा विषय पुढे ढकला.

**मा. महापौर :-**

सचिव साहेब आपण मतदान चालु करा.

**नगरसचिव :-**

प्रकरण क्र. ७६ करिता दोन ठराव आलेले आहेत पहिला ठराव सुचक श्री. प्रशांत केळुसकर, दुसरा ठराव सुचक श्री. ध्रुवकिशोर पाटील. अनुक्रमे दुसरा ठराव मतदानास टाकतो. श्री. ध्रुवकिशोर पाटील यांनी मांडलेल्या ठरावाच्या बाजुने असतील त्यांनी हात वर करायचे आहेत. या ठरावाच्या विरोधात असतील त्यांनी हात वर करायचे आहेत. तटस्थ कोणी आहे त्यांनी हातवर करायचे आहेत. श्री. प्रशांत केळुसकर यांनी यांनी मांडलेल्या ठरावाच्या बाजुने असतील त्यांनी हात वर करायचे आहेत. या ठरावाच्या विरोधात असतील त्यांनी हात वर करायचे आहेत. तटस्थ कोणी आहे त्यांनी हातवर करायचे आहेत.

**मा. महापौर :-**

सुचक श्री. ध्रुवकिशोर पाटील यांनी मांडलेल्या ठरावाच्या बाजुने ३४, विरोधात ३० इतकी मते पडलेली आहेत. यांनी मांडलेला ठराव बहुमताने मंजुर करण्यात येत आहे.

**प्रकरण क्र. ७६ :-**

मिरा भाईंदर शहराच्या मंजूर विकास योजनेतील मौजे घोडबंदर सर्व्हे क्र. ८/१ब, १क या जागेपैकी १८ मी. रुंद विकास योजना रस्त्याने बाधीत क्षेत्राचे भुसंपादन करणेकरीता झालेल्या ठरावात फेरबदल करणेबाबत.

**ठराव क्र. ५० :-**

सदर विषयाचा गोषवारा मिरा भाईंदर महानगरपालिकेने दिला नसल्याने आम्हा सदस्यांना या विषयाची माहिती नाही. विषय आम्हाला समजले नाही. बैठकीच्या दिवशी सुध्दा प्रशासनाने गोषवारा दिला नाही त्यामुळे प्रशासनाने गोषवारा दिला नाही त्यामुळे प्रशासनाने गोषवारा पुढील महासभेत देऊन मा. महासभेने प्रस्ताव पुढील महासभेत घ्यावा असा ठराव मांडत आहे.

**सुचक :- श्री. ध्रुवकिशोर पाटील        अनुमोदक :- श्री. जुबेर इनामदार**

| अ.क्र. | ठरावाच्या बाजूने | अ.क्र. | ठरावाच्या विरोधात | तटस्थ |
|---|---|---|---|---|
| १ | ध्रुवकिशोर पाटील | १ | मेहता नरेंद्र लालचंद | निरंक |
| २ | डिमेलो बर्नड अल्बर्ट | २ | शरद केशव पाटील | |
| ३ | शिल्पा भावसार | ३ | पाटील रोहिदास शंकर | |
| ४ | सॅन्ड्रा जेफ्री रॉड्रीक्स | ४ | म्हात्रे कल्पना महेश | |
| ५ | प्रभात प्रकाश पाटील | ५ | भानुशाली वर्षा गिरीधर | |
| ६ | पाटील सुनिता कैलास | ६ | मीरादेवी रामलाल यादव | |
| ७ | झिनत रऊफ कुरेशी | ७ | कोठारी सुमन रमेश | |
| ८ | विराणी रेखा अनिल | ८ | डॉ. नयना मनोज वसाणी | |
| ९ | पुजारी कांचना शेखर | ९ | सिमा कमलेश शहा | |
| १० | पिसाळ मनिषा नामदेव | १० | जैन गिता भरत | |
| ११ | डिसा मर्लिन मर्विन | ११ | अरोरा दिपिका पंकज | |
| १२ | काझी रशीदा जमील | १२ | रावल भगवती जयशंकर | |
| १३ | बगाजी शर्मिला विल्सन | १३ | मेहता डिंपल विनोद | |
| १४ | इनामदार जुबेर | १४ | मेघना दिपक रावल | |
| १५ | वेतोसकर राजेश शंकर | १५ | शर्मा सुनिला सत्येंद्र | |
| १६ | शेख अशरफ मोहम्मद इब्राहिम | १६ | प्रतिभा प्रकाश तांगडे-पाटील | |
| १७ | सुर्यकांत खंडोजी म्हात्रे | १७ | सुजाता रविकांत शिंदे | |
| १८ | सामंत प्रमोद जयराम | १८ | पाटील प्रेमनाथ गजानन | |
| १९ | रकवी सुहास माधवराव | १९ | सिंग मदन उदितनारायण | |
| २० | पांडे हंसुकुमार कमलकुमार | २० | कांगणे यशवंत ठकाजी | |
| २१ | खण्डेलवाल सुरेश | २१ | अनिल बाबुराव भोसले | |
| २२ | डॉ. आसिफ गुलाब शेख | २२ | कासोदरीया अश्विन श्यामजी | |
| २३ | नरेश तुकाराम पाटील | २३ | जैन दिनेश तेजराज | |
| २४ | भोईर कमलेश यशवंत | २४ | जैन रमेश धरमचंद | |
| २५ | वंदना मंगेश पाटील | २५ | डॉ. राजेंद्र जैन | |
| २६ | निलम हरिश्चंद्र ढवण | २६ | दळवी प्रशांत ज्ञानदेव | |
| २७ | शुभांगी महिन कोटियन | २७ | शाह राकेश रतिशचंद्र | |
| २८ | जयमाला किशोर पाटील | २८ | केळुसकर प्रशांत नारायण | |
| २९ | परमार अनिता भरत | २९ | मुन्ना सिंग | |
| ३० | गावंड मंदाकिणी आत्माराम | ३० | दिप्ती शेखर भट | |
| ३१ | संध्या प्रफुल्ल पाटील | | | |
| ३२ | प्रविण मोरेश्वर पाटील | | | |
| ३३ | ठाकुर अरविंद दत्ताराम | | | |
| ३४ | जयंतीलाल गुरुनाथ पाटील | | | |

**ठराव बहुमताने मंजूर**

**सही/-**
**महापौर**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

**नगरसचिव :-**

प्रकरण क्र. ७७, सन्मा. सदस्या डॉ. नयना वसाणी यांचा दिनांक २६/०८/२०१५ रोजीच्या पत्रान्वये दिलेला प्रस्ताव. -- मिरारोड (पू.) प्रभाग समिती क्र. ५ येथील बाह्यरुग्ण विभागाअंतर्गत निवासी सदनिकेमध्ये सुरु असलेल्या क्षयरोग दवाखाना अन्यत्र स्थलांतरीत करणेबाबत.

**नयना वसाणी :-**

मा. महापौर यांच्या परवानगीने, ह्या विषयावर चर्चा करु इच्छिते आणि त्याच्यासाठी हे काही पत्रक आहेत ते आपल्या समक्ष मी देऊ इच्छिते. महापौर मॅडम माझ आरोग्य विभागाशी काही प्रश्न मला विचारायचे आहेत. पानपट्टे साहेब आपण प्रभाग समिती क्र. ५ येथे राष्ट्रीय क्षय नियंत्रण कार्यक्रमांतर्गत डॉट क्लिनिक चालवतो तर ते डॉट क्लिनिक स्थापन करण्याकरिता शासनाकडून कुठल्या अटीशर्ती किंवा परवाना आपल्याला घ्यावे लागतात. जिथे-जिथे डॉट क्लिनिक चालु केले आहेत डायरेक्ट ऑब्जरवेशन फॉर टी.बी. पेशंट. त्याच्यासाठी शासनाकडून कुठल्या अटिशर्ती आपल्याला परिपूर्ण कराव्या लागतात.

**संभाजी पानपट्टे (मा. उपायुक्त) :-**

शासनाने जी डॉटची स्किम डॉट प्लस जी स्किम सुरु केली आहे. एकुण आम्ही १० ठिकाणी सदर स्किम राबवतो. जवळपास त्याच्यामध्ये ६०५ नागरिकांना औषध पुरवठा करतोय. त्याच्यामध्ये १० केंद्रामध्ये उत्तन भाईंदर (प.) टेंबा विनायक नगर गणेश देवल नगर, बंदरवाडी, नवघर, मिरारोड, पेणकरपाडा, काशिमिरा या ठिकाणी आपण डॉटची औषधे पुरवठा करतो. त्याला काही स्पेसिफिक अस नाही शासनाकडे.

**नयना वसाणी :-**

डॉट क्लिनिक कसं असायला पाहिजे मॉड्यूल १ ते ४ त्याच्यामध्ये दिलेले आहे डॉट क्लिनिकची रचना कशी असायला पाहिजे.

**संभाजी पानपट्टे (मा. उपायुक्त) :-**

प्रत्येक ठिकाणी आपल्याला जागा उपलब्ध होऊ शकत नाही. मॅडम त्याच्यासाठी आपण प्रत्येकाने …………

**नयना वसाणी :-**

पानपट्टे साहेब आपल्याला हे माहित असेल आपण डॉक्टर आहात. आपल्याला माहित असेल की क्षय रोग हा संक्रमणजन्य रोग आहे.

**संभाजी पानपट्टे (मा. उपायुक्त) :-**

मान्य आहे पण आपण काय करतो त्यांना प्रत्यक्ष समोर बोलवून आपण औषध देतो त्यामुळे पसरायचा प्रश्नच येत नाही.

**नयना वसाणी :-**

पसरायचा प्रश्न येत नाही पण क्षयरोगाचे पेशंट जे आपल्याकडे येतात. नविन पेशंट त्याच्यामध्ये इंन्फेक्शन ॲन्ड ॲक्टीव्ह त्याच्यामध्ये तुम्ही तपासणी केल्यानंतर तुम्ही त्यांच त्यांना सांगणार बरोबर आहे.

**संभाजी पानपट्टे (मा. उपायुक्त) :-**

बरोबर आहे.

**नयना वसाणी :-**

मग त्यांची तपासणी कुठे करता तुम्ही.

**संभाजी पानपट्टे (मा. उपायुक्त) :-**

तिथेच करतो ना आपण.

**नयना वसाणी :-**

तिथेच करता तुम्ही मग तिथेच बाह्य रुग्ण विभाग, जनरल चालले आहे, ए.एम.सी. चाललेली आहे, गर्भवती महिलांची वॅक्सीनेशन चाललेले आहे. १० बाय १० चा एका बाथरुमच्या थोडा मोठा असेल एवढ्या तुम्ही प्रतीक्षा रुममध्ये टी.बी.चे पेशंट, जनरल पेशंट, सगळे पेशंट एकाच कक्षामध्ये ………….असतात मॅडम मी तुम्हाला फोटो काढुन दिलेला आहे. अशावेळी तुम्ही तिकडे डॉट क्लिनिक कसे चालवु शकता.

**संभाजी पानपट्टे (मा. उपायुक्त) :-**

प्रत्येक ठिकाणी आरोग्य केंद्रामध्ये आपल्याकडे जागा उपलब्ध नाही आणि लगेच प्रिकॉशन मेजर सांगतो आम्ही त्यांना त्याच्यामुळे पसरायचा काही विषय नसतो.

**नयना वसाणी :-**

काय प्रिकॉशन मेजर सांगता तुम्ही.

**संभाजी पानपट्टे (मा. उपायुक्त) :-**

की तुम्ही हातरुमाल घेऊन जा, उघड्यावर थुंकू नका.

**नयना वसाणी :-**

मॅडम तुम्ही माझ्याबरोबर स्वतः डॉट क्लिनिकमध्ये चला एकही कर्मचारी त्याला मास्क दिलेला नाही ते थुंकीचे पेशंट सगळे तिकडेच खोकत बसलेले असतात त्या फोटोमध्ये जे दाखवले आहे ते क्षयरोग जर डॉट क्लिनिक आहे ते १० बाय १० च्या रुमपेक्षा लहान आहे. तिथेच त्यांची मायक्रोस्कॉपी लॅब चालते. तिथेच त्यांची ओ.पी.डी. चालते, तिथेच त्यांना औषधे दिली जातात आणि त्याच्यामध्ये सुध्दा स्टाफ नाही. कम्पलसरी आहे डॉट क्लिनिकला १ मेडीकल ऑफिसर पाहिजे, १ अटेंन्डंट पाहिजे. तुम्हाला तिकडे पेशंट चेक करण्याकरिता सुध्दा काही व्यवस्था नाही. तुम्ही अशी कशी डॉट क्लिनिक चालविता.

**संभाजी पानपट्टे (मा. उपायुक्त) :-**

शासनाचे निकष आहेत. शासनाने जे डॉक्टर उपलब्ध करुन दिले जे टेक्नीशिअन उपलब्ध आहे त्यामध्येच आपण ते सुरु केले आहे.

**नयना वसाणी :-**

पण साहेब त्याच्यामध्ये दुसऱ्या लोकांमध्ये पण संक्रमण त्याचे फैलतय ना?

**संभाजी पानपट्टे (मा. उपायुक्त) :-**

तस रस्त्यावरुन जाताना पसरते, हवेतुन पसरतो हा रोग अस शक्य नाही ना.

**नयना वसाणी :-**

मग एक काम करा ना.

**संभाजी पानपट्टे (मा. उपायुक्त) :-**

एस.टी. मध्ये, बस मध्ये सुध्दा रेल्वे मध्ये सुध्दा पसरु शकतो.

**नयना वसाणी :-**

हे तुमच उत्तर नाही. मग तुम्ही क्लिनिक चालवता तुमची जबाबदारी आहे तिकडे संक्रमण फैलु नये. तिकडचे कर्मचारी जे काम करतात ते तोंडावर रुमाल बांधुन काम करतात.

**संभाजी पानपट्टे (मा. उपायुक्त) :-**

त्यांना मास्क दिलेले आहेत, प्रशिक्षण दिले आहे.

**नयना वसाणी :-**

नाही फोटो आहे तुमच्या कर्मचाऱ्याने तोंडावर लाल रंगाचा रुमाल बांधला आहे.

**संभाजी पानपट्टे (मा. उपायुक्त) :-**

ज्याची रोगप्रतिकारक शक्ती कमी असते ना त्यालाच हा रोग होत असतो. तो हवेत पसरणारा रोग आहे मॅडम. मग काय करु सोल्यूशन तुम्ही सांगा ना.

**नयना वसाणी :-**

नाही साहेब गर्भवती महिलांची रोगप्रतिकारक शक्ती कमी असते. लहान मुले जे वॅक्सीनेशनसाठी येतात. सदर माझ एकच म्हणणे तुम्ही माणसांना ट्रीट करता गुरांना नाही लक्षात ठेवून बोला.

**संभाजी पानपट्टे (मा. उपायुक्त) :-**

त्यांचा याचा काही संबंध नाही सांगतो मी.

**नयना वसाणी :-**

मी तुम्हाला स्पष्ट सांगते तुमची ओ.पी.डी. जी आहे ती तुम्ही माझ्या बरोबर येऊन चला आणि बघा काय परिस्थिती आहे.

**संभाजी पानपट्टे (मा. उपायुक्त) :-**

काय सोल्युशन तुमच म्हणणे काय सांगा ना.

**नयना वसाणी :-**

आपल्याकडे जे क्षयरोगाचे पेशंट असतात ते निम्न क्लासमधून येतात त्यांची परिस्थिती चांगली नसते आणि क्षयरोगामध्ये एच.आय.व्ही. इन्फेक्शन हेपटाईटस बी इन्फेक्शन हेपटाईटस सी इन्फेक्शन हे पण असण्याची शक्ता असते. तुम्ही तिकडेच त्यांची ब्लड टेस्ट करता सगळ कॉमनमध्ये आहे त्यांना कुठल्याही प्रिकॉशन्स घेता येत नाही अशावेळेही क्षय ओ.पी.डी. जनरल ओ.पी.डी. बरोबर चालवता येणार नाही तुम्ही ती ओ.पी.डी. स्थलांतरीत करा.

**संभाजी पानपट्टे (मा. उपायुक्त) :-**

कुठे करायची सांगा ना.

**नयना वसाणी :-**

पुनमसागरमध्ये तुम्ही एच.आय.व्ही सेंटर चालवता ए.आय.टी. सेंटर फर्स्ट फ्लोअरला मग खाली ग्राऊंड फ्लोअरला करा ना तुम्ही करा ना मॅडम क्षयरोगासाठी राष्ट्रीय निर्मुलन क्षयरोग कार्यक्रम आहे त्याच्या अंतर्गत जर प्रवेशद्वार आणि क्षयरोग टी.बी. चा जो रुम असतो तो पूर्ण व्हेन्टीलेटेड असायला पाहिजे तुम्ही या ओ.पी.डी. मध्ये शिरा अंधारातून तुम्ही आतमध्ये जाल त्या पुरता व्हेंटीलेशन नाही.

**संभाजी पानपट्टे (मा. उपायुक्त) :-**

असे प्रत्येक ठिकाणी प्रॉब्लेम आहेत अस म्हटल्यावर सगळ्याच ठिकाणी मला हे करावे लागणार आहे.

**नयना वसाणी :-**

मग करा. कारण आपण हा विषय सामाजिक आरोग्याशी निगडीत आहे. आपल्या कर्मचाऱ्यांच्या आरोग्याशी निगडीत आहे तुम्ही अस दुर्लक्ष करु शकत नाही. याच्यामध्ये प्रिकॉशन हेच आहे की ती ओ.पी.डी. जी आहे आज शिवडी चे हॉस्पीटल बघा तुम्ही सर्वोदय हॉस्पीटल बघा जे.जे. हॉस्पीटल, के.ई.एम. हॉस्पीटलमध्ये चेस्ट आणि टी.बी. क्लिनिक हे वेगळे चालवले जाते त्यांना वेगळा प्रवेश असतो. तुमच्याकडे काय आहे तस तुम्ही असच काही लोकांच्या आरोग्याशी खेळता आणि आमच्याकडे जागा नाही अस सांगता आहे ना पुनमसागर हॉस्पीटल आपले इंदिरा गांधी रुग्णालय तिकडे खाली ग्राऊंड फ्लोअरवर तशी व्यवस्था करा.

**गणेश देशमुख (मा. उपायुक्त (मु.)) :-**

मा. महोदया सन्मा सदस्यांना विनंती आहे आपण आपला प्रस्ताव मांडावा आपण तपासुन त्यावर पुढील कारवाई करु.

**प्रभात पाटील :-**

२४/११/२०१४ ला मी पत्र दिले की नवघर प्राथमिक शाळेमध्ये सर्वात जास्त टी.बी. चे पेशंट आहेत. सगळ्यात जास्त टी.बी. चे पेशंट तिथे येतात. रेकॉर्ड आहे तुम्ही तपासल तर आणि त्या शाळेमध्ये बालवाडी, अंगणवाडीसहीत म्हणजे अडीज, तीन वर्षांच्या मुलांपासुन ते सातवी पर्यंतची मुले तिथे शिकतात. हे मुलांचा प्रश्न आहे आणि मी तेव्हा पत्र दिले आहे आपण त्याच्यावर काय कारवाई केली आहे. माझा स्पष्ट आरोप आहे की आपण खरच लोकांच्या बालकांशी खेळतात.

**नयना वसाणी :-**

प्रभाग समिती क्र. ५ त्याच्यामध्ये जे डॉट क्लिनिक चालवण्यात येते त्याच्यावर दुस-या ते ५ व्या मजल्यावर निवासी सदनिका आहेत बाजुला रसाज इंटरनॅशनल स्कूल आहे. समोर न्यू ओवर मॅटर्निटी क्लिनिक आहे मग असे आपण रेसिडेन्शल एरियामध्ये लोकांच्या आरोग्याशी कस खेळू शकतो. नवघर शाळेमध्ये पण मॅडम मी सांगितल हा प्रॉब्लेम आहे.

**संभाजी पानपट्टे (मा. उपायुक्त) :-**

सदरचा रुग्ण हा समाजाशी फिरतो ना मॅडम अस नसत ते नुसत जातानाच तिथे हॉस्पीटलमध्ये आल्यावर ते फैलाव करतो आणि इतरत्र फैलाव करु शकत नाही.

**प्रभात पाटील :-**

साहेब तुम्ही कस सांगु शकता त्याला हेपटाईटस नसेल, त्याला एच.आय.व्ही. नसेल.

**संभाजी पानपट्टे (मा. उपायुक्त) :-**

प्रत्येक शाळेमध्ये किंवा प्राथमिक आरोग्य केंद्रात टी.बी. सेंटर आहेत.

**प्रभात पाटील :-**

हे टी.बी. सेंटर हे रेसिडेन्शीअल एरियाच्या बाजुला असायलाच नाही पाहिजे.

**संभाजी पानपट्टे (मा. उपायुक्त) :-**

जी शासनाची पध्दत आहे त्या पध्दतीनेच करतोय आपण.

**नयना वसाणी :-**

मिरा रोड (पूर्व) येथील प्रभाग समिती क्र. ५ अंतर्गत चालु असलेला बाहयरुग्ण दवाखाना आणि RNTCP (Revised National Tuberculosis Programme) अंतर्गत चालणारे क्षयरोग निवारण दवाखाना (DOT Clinic) हा एकाच इमारतीमध्ये, वास्तविकतः एकाच सदनिकेमध्ये चालु आहे. ही सदनिका निवासी इमारतीच्या तळमजल्यावर असुन त्याच्यावरील २ ते ५ मजल्यावर सदनिकांचा निवासी वापर होत आहे. तसेच त्याच्या बाजुला रसाज इंटरनॅशनल स्कूल ही शाळा आहे. क्षयरोग हा संक्रमणजन्य रोग असुन आपल्याकडे येणा-या रुग्णांमध्ये सहसंक्रमण (HIV Aids, Hepatitis B, C) असल्याची शक्यता नाकारता येत नाही. जे सामाजिक आरोग्याच्या दृष्टीने तसेच बाहयरुग्ण विभागामध्ये एकच प्रतिक्षा कक्ष असुन क्षय हा थुंकी, खोकला या माध्यमाने संक्रमित होत असताना अन्य बालरूग्ण, गर्भवती महिला ज्यांची रोग प्रतिकारक शक्ती कमी असुन त्यांच्यामध्ये सहसंक्रमण होण्याची शक्यता नाकारता येत नाही. हा क्षयरोग दवाखाना फक्त एका खोलीत रक्त तपासणी विभागाबरोबर चालविण्यात येतो. व तेथे हवा येण्या जाण्याची सोयही व्यवस्थित नसल्याने त्या विभागातील कर्मचारी व अन्य कर्मचारी यांना ही क्षयरोग संक्रमण होवू शकते.

उपरोक्त विषय हा आरोग्य कर्मचारी, येणारे अन्य रूग्ण आणि सामाजिक स्वास्थ्याशी निगडीत असल्याने हा क्षयरोग दवाखाना मिरा रोड (पूर्व) पुनमसागर येथे असलेल्या भारतरत्न इंदिरा गांधी रुगणालय येथे स्थालांतरीत करावा व जेथे HIV Aids चे उपचार सध्या सुरू आहेत. त्या इमारतीमध्ये राष्ट्रीय क्षयरोग निर्मुलन कार्यक्रम अंतर्गत सुचविलेल्या रचने आधारीत क्षयरोग रुग्ण विभागाचे निर्माण करून त्यास वेगळे प्रवेशद्वार द्यावे व मिरा भाईंदर शहराच्या मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या अंतर्गत जेथे जेथे (DOT Clinic) असतील ते नियमाप्रमाणे रचना करुन स्थलांतरीत करावे जेणेकरून संक्रमक रोग विभाग हा वेगळा असुन सामाजीक स्वास्थ्यास हानिकारक न राहता रुग्णांना तसेच कर्मचा-यांना सोयीस्कार होईल, असा ठराव मांडत आहे.

**सिमा शाह :-**

माझे अनुमोदन आहे.

**आसिफ शेख :-**

सन्मा. सदस्या डॉ. नयना वसाणी यांनी आता जो या ठिकाणी स्थलांतरीत करण्याचा विषय मांडलेला आहे त्यांच्या मताशी आम्ही सहमत आहोत. पण स्थलांतरीत करताना भारतरत्न राजीव गांधी यांचे जे केंद्र आहे त्या ठिकाणी प्रसुतीचे केंद्र पण आहे हे आपण ध्यानात घ्या आणि त्या ठिकाणी प्रसुती केंद्र असल्यामुळे लहान बालकांना जर त्याची इजा झाली किंवा त्यांना तो रोग झाला तर काय करणार?

**नयना वसाणी :-**

माझं स्वतः आरोग्य अधिकारी यांच्याशी बोलण झाल आहे. डॉ. पडवळ यांच्याशी पण या बाबतीत चर्चा झालेली होती आणि आपल्याकडे भारतरत्न इंदिरा गांधी रुग्णालय येथे टी.बी रुग्णांना वेगळा प्रवेशद्वार आपण देऊ शकतो अशी व्यवस्था आपल्याला निर्माण करता येईल. एच.आय.व्ही. एड्सचे पेशंट फर्स्ट फ्लोअरवर आपण त्यांना ए.आय.टी. ट्रीटमेंट देतो. प्रसुतीकक्ष आहे तर आपल्याला त्यांना वेगळी व्यवस्था प्रवेश कक्ष आणि प्रतिक्षा कक्ष दोन खाली सहसंक्रमणाचे दोन्ही पेशंट आहेत त्यांना ट्रीटमेंट देता येईल अशी व्यवस्था करता येईल आपल्याला.

**आसिफ शेख :-**

करता येईल ते बरोबर पण झाल तर त्याला जबाबदार कोण राहील. पुन्हा नवजात शिशुंना तर अगोदरच ती लागण लागते.

**नयना वसाणी :-**

साहेब प्रसुती कक्ष वेगळे आहे आणि मी तुम्हाला ते एच.आय.व्ही. मग तिकडे एच.आय.व्ही च पण चाललेले मग ते पण काढुन टाका.

**मा. महापौर :-**

आसिफजी जब हम शिफ्ट कर रहे है जिस कारण से शिफ्ट कर रहे है वो कारण नही है। वो ठेकेदारी तो लेंगे ही ना और आगे मैं अधिकारी को सुचना देती हूँ यह नही की इन्होंने जो जगह बताई है वो लेकिन प्रभात पाटील मॅडम ने भी जो कहाँ है वहाँ से भी वो कौनसे सेफ जगह पे हम लेके जा सकते है उसके लिए हम जरुर से प्रयास और अधिकारीयो को में उसमें सुचना देती हूँ वो सब ठेकेदारी रखके उसको शिफ्ट किया जाए।

**जुबेर इनामदार :-**

तो विषय आहे ना मिरारोडशी सलग्न आहे आमच्या प्रभागामध्ये आहे म्हणुन मला बोलावे लागेल सभापती आहे मी. चांगला विषय आहे. डॉक्टर आहेत ते त्यांची काळजी खरोखर चांगली आहे. विषय असा आहे की जे त्यांनी मुद्दे मांडले रहिवाशी क्षेत्र आहे समोर शाळा आहे दुसरी महानगरपालिकेची शाळा आहे. क्षयरोग आहे तो पसरु शकतो, इन्फेक्शियस आहे. इंदिरा गांधी रुग्णालयामध्ये प्रसुतीगृह आहे बाजुला शाळा आहे दिपज्योती आजुबाजुलाही रहिवाशी क्षेत्र आहे. मग सगळ्या वस्तुंना गृहित धरुन प्रशासनाने निर्णय घ्यावा ही माझी विनंती आहे.

**नयना वसाणी :-**

जुबेरभाई डॉट क्लिनिकचे जर तुम्ही बघितले ना मॉडेल बघितले तर ते मोठे हॉस्पिटलमध्ये त्याला पूर्ण एक व्हेन्टिलेशन असलेला कमीत कमी १० बाय १० चा लॅब असलेला अस त्यांना रुम द्यायची आणि त्यांना प्रवेशिका वेगळी द्यायची अस त्याच्यामध्ये लिहीलेले आहे.

**जुबेर इनामदार :-**

तुमच्या भावनाशी मी सहमत आहे मी फक्त माझा मुद्दा मांडला.

**मा. महापौर :-**

तशी सुचना मी दिलेली आहे बसा.

**प्रकरण क्र. ७७ :-**

सन्मा. सदस्या डॉ. नयना वसाणी यांचा दिनांक २६/०८/२०१५ रोजीच्या पत्रान्वये दिलेला प्रस्ताव. -- मिरारोड (पू.) प्रभाग समिती क्र. ५ येथील बाह्यरुग्ण विभागाअंतर्गत निवासी सदनिकेमध्ये सुरु असलेल्या क्षयरोग दवाखाना अन्यत्र स्थलांतरीत करणेबाबत.

**ठराव क्र. ५१ :-**

मिरा रोड (पूर्व) येथील प्रभाग समिती क्र. ५ अंतर्गत चालु असलेला बाहयरुग्ण दवाखाना आणि RNTCP (Revised National Tuberculosis Programme) अंतर्गत चालणारे क्षयरोग निवारण दवाखाना (DOT Clinic) हा एकाच इमारतीमध्ये, वास्तविकतः एकाच सदनिकेमध्ये चालु आहे. ही सदनिका निवासी इमारतीच्या तळमजल्यावर असुन त्याच्यावरील २ ते ५ मजल्यावर सदनिकांचा निवासी वापर होत आहे. तसेच त्याच्या बाजुला रसाज इंटरनॅशनल स्कूल ही शाळा आहे. क्षयरोग हा संक्रमणजन्य रोग असुन आपल्याकडे येणाऱ्या रुग्णांमध्ये सहसंक्रमण (HIV Aids, Hepatitis B, C) असल्याची शक्यता नाकारता येत नाही. जे सामाजिक आरोग्याच्या दृष्टीने तसेच बाहयरुग्ण विभागामध्ये एकच प्रतिक्षा कक्ष असुन क्षय हा थुंकी, खोकला या माध्यमाने संक्रमित होत असताना अन्य बालरूग्ण, गर्भवती महिला ज्यांची रोग प्रतिकारक शक्ती कमी असुन त्यांच्यामध्ये सहसंक्रमण होण्याची शक्यता नाकारता येत नाही. हा क्षयरोग दवाखाना फक्त एका खोलीत रक्त तपासणी विभागाबरोबर चालविण्यात येतो. व तेथे हवा येण्या जाण्याची सोयही व्यवस्थित नसल्याने त्या विभागातील कर्मचारी व अन्य कर्मचारी यांना ही क्षयरोग संक्रमण होवू शकते.

उपरोक्त विषय हा आरोग्य कर्मचारी, येणारे अन्य रूग्ण आणि सामाजिक स्वास्थ्याशी निगडीत असल्याने हा क्षयरोग दवाखाना मिरा रोड (पूर्व) पुनमसागर येथे असलेल्या भारतरत्न इंदिरा गांधी रुगणालय येथे स्थालांतरीत करावा व जेथे HIV Aids चे उपचार सध्या सुरू आहेत. त्या इमारतीमध्ये राष्ट्रीय क्षयरोग निर्मुलन कार्यक्रम अंतर्गत सुचविलेल्या रचने आधारीत क्षयरोग रुग्ण विभागाचे निर्माण करून त्यास वेगळे प्रवेशद्वार द्यावे व मिरा भाईंदर शहराच्या मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या अंतर्गत जेथे जेथे (DOT Clinic) असतील ते नियमाप्रमाणे रचना करुन स्थलांतरीत करावे जेणेकरून संक्रमक रोग विभाग हा वेगळा असुन सामाजीक स्वास्थ्यास हानिकारक न राहता रुग्णांना तसेच कर्मचाऱ्यांना सोयीस्कार होईल, असा ठराव मांडत आहे.

**सुचक :- डॉ. नयना वसाणी** **अनुमोदक :- श्रीम. सिमा शाह**

**ठराव सर्वानुमते मंजूर**

**सही/-**
**महापौर**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

**नगरसचिव :-**

प्रकरण क्र. ७८, सन्मा. सदस्या डॉ. नयना वसाणी यांचा दिनांक २६/०८/२०१५ रोजीच्या पत्रान्वये दिलेला प्रस्ताव. -- भारतरत्न पंडीत भिमसेन जोशी रुग्णालय येथील शवविच्छेदन कक्ष येथील कर्मचारी यांना योग्य ते साधन पुरविणे विषयक तसेच त्यांचे व आरोग्य विभागातील अन्य कर्मचाऱ्यांच्या वैदकीय तपासणीबाबत.

**नयना वसाणी :-**

मा. महापौर मॅडमच्या परवानगीने बोलते मॅडम या विषयासाठी पण मी आपल्याला काही पेपर प्रकरण ७७ याच्या बरोबर दिले आहे. आपल्या निदर्शनास काही गोष्टी आणुन देण्याकरिता काही पेपर्स प्रकरण ७७ बरोबर दिले आहे. याच्यावर सुध्दा माझे मा. आरोग्य अधिकारी उपायुक्त श्री. संभाजी पानपट्टे साहेबांशी थोडीशी माहिति पाहिजे मला. साहेब आपल्याकडे शवविच्छेदन कक्ष हे भारतरत्न पं. भीमसेन जोशी या रुग्णालयात चालु आहे त्याच्या आधीपासुन चालु आहे तर या शव विच्छेदन कक्षाची मान्यता आपल्याकडे कुठल्या सालापासुन आहे.

**मा. महापौर :-**

आपण आपले सगळेच विषय मांडुन घ्या.

**नयना वसाणी :-**

शवविच्छेदन कक्षाची पद आपल्याकडे किती आहे मंजुर किती पद आहेत आपल्याकडे शासनाकडून गणेश सोलंकी व पुरुषोत्तम सोलंकी हे जे शवविच्छेदन कक्षामध्ये काम करतात.

**संभाजी पानपट्टे (मा. उपायुक्त) :-**

सध्या माहिती उपलब्ध नाही तुम्ही "ज" चा ठराव मांडा. आमच्याकडे तुमचा काय प्रस्ताव आहे माहिती नसल्याने आम्ही काही तयारी केलेली नाही.

**नयना वसाणी :-**

महापौर मॅडम, माझ अस म्हणणे आहे की शवविच्छेदन कक्ष हे शासनाची परवानगी त्यासाठी पण अटीशर्ती असतात की तुमच्याकडे किती शवविच्छेदन अधिकारी आहेत किती शवविच्छेदन सहाय्यक आहेत तुम्ही त्यांना कुठल्या सुविधा पुरवतात. मॅडम आपण शवविच्छेदन कक्ष तिथे गेलात तर आपण बघणार की तिकडे २ सफाई कामगार जे आहेत ते बॉडी कटर म्हणून काम करतात आणि त्यांची अजुन सुध्दा शासनाकडून कुठलीही नियुक्ती झालेली नाही. शव विच्छेदन सहाय्यक ऑफिशीअल अशी त्यांची कुठलीही नियुक्ती झालेली नाही. १९८३ पासुन पुरुषोत्तम सोलंकी आणि गणेश सोलंकी हे सफाई कामगार जे आहेत तेच शव विच्छेदन सहाय्यक कटर म्हणून काम करतात. त्यांनी बॉडी कट केल्यानंतर आपले वैद्यकिय अधिकारी जाऊन आपले ओपिनियन देतात तर हे कितपर्यंत योग्य आहे. आणि मॅडम युनिवर्सल ऑटोपसी सेफ्टी रुल हे शवविच्छेदन जे असत त्याच वर्ल्ड वाईड युनिवर्सल व त्यांची नियमावली असते त्याच्यामध्ये आऊट ऑफ जर कक्षामध्ये शवविच्छेदन कक्षामध्ये हे सहाय्यक म्हणून काम करतात किंवा जे ॲक्च्युअली हे शवविच्छेदन करण्याचे काम करतात. शवविच्छेदन ही एका प्रकारची शस्त्रक्रिया असते तर शवविच्छेदन कक्षामध्ये जे आपण सफाई कामगार बॉडी कट करण्याचे काम करतात. बॉडी कटर म्हणून त्यांना जी सुविधा किंवा साधने देण्यात येतात ते बिल्कुल सुरक्षिततेसाठी पुरेसे नाही. तर त्याच्यावर आपण काय म्हणाल? मॅडम युनिवर्सल सेफ्टी रुल.

**संभाजी पानपट्टे (मा. उपायुक्त) :-**

महापौरांच्या परवानगीने बोलतो सदरचे प्रस्ताव आपण शासनाला पाठविले आहेत मॅडम तोपर्यंत सेवा आहे ही आपली तोपर्यंत बंद करायचे का पोस्ट मार्टम मग.

**नयना वसाणी :-**

नाही मी अस नाही सांगत.

**संभाजी पानपट्टे (मा. उपायुक्त) :-**

आपण सेवा देतोय ना मग.

**नयना वसाणी :-**

माझं ऐकून घ्या आपल्याला शासनाकडून २९-११-२००० ला पत्र आले होते की इंदिरा गांधी रुग्णालय व टेंबा शवविच्छेदन कक्षासाठी आवश्यक पदे जी आहेत ती तुम्ही मान्यता प्राप्त करुन घ्या.

**संभाजी पानपट्टे (मा. उपायुक्त) :-**

घेऊन आपण शासनाला पाठविले आहेत.

**नयना वसाणी :-**

त्यांच पत्र तुम्ही त्यांना कधी पाठवल २६-११-२०१२ दोन वर्षानंतर त्यामध्ये सुध्दा त्यांनी फक्त वैद्यकिय अधिकारी वर्ग २ त्यांचीच मागणी केलेली आहे. शव विच्छेदन सहाय्यक या पदाची मागणी केलीच नाही तुम्ही ते पत्र तुम्ही आता २४-८-२०१५ ला पाठविले आहे. महासभेचा ठराव १९-६-२०१४ या दिवशी मा. महासभाने ठराव क्र. १४ अंतर्गत ही पदे मान्य का करुन घ्यावी असा ठराव मंजुर केला होता तरीही अद्याप तो ठराव जो आहे त्याच्याप्रमाणे कारवाई झाली नाही. शासनाकडून शवविच्छेदन सहाय्यक किंवा बाकीची जी पदे आहेत त्यांची पूर्तता करण्यात आलेली नाही. तर एवढी ५ वर्षे का लागली तुम्हाला त्याच्यासाठी. आणि ५ वर्षे लागली ती लागली साहेब तुम्ही गेल्या आठवड्याला पाठवले तिकडे जे सफाई कामगार आहेत त्यांच्याकडून

तुम्ही कामे करुन घेतात. बॉडी विच्छेदन त्यांच्याकडून करुन घेतात त्यांना तुम्ही कुठली सुरक्षा दिली आहे. कुठली साधने पुरविली आहेत. शवविच्छेदन सहाय्यकची त्यांना कुठले प्रशिक्षण दिले आहे.

**संभाजी पानपट्टे (मा. उपायुक्त) :-**

त्यांना आवश्यक ते ॲन्टीसेप्टीक आहेत, ग्लोज् आहेत सगळे जे इक्वीपमेंट लागतात ते आहेत तिथे.

**नयना वसाणी :-**

साहेब माझ्या बरोबर चला युनिव्हर्सल ऑटोपसी सेफ्टी गाइड च्या अंतर्गत त्या कर्मचाऱ्यांना आपण डबल ग्लोजींग हे तुम्ही प्रोव्हाइड करायला पाहिजे त्याच्या ग्लोजवर रबरचे ग्लोज असायला पाहिजे. तुम्ही त्यांना साधारण सर्जरी मध्ये लागणारे लेटस ग्लोज् दिलेले आहेत.

**संभाजी पानपट्टे (मा. उपायुक्त) :-**

ते बघून घेतो मी.

**नयना वसाणी :-**

अजुन सांगते मी त्या लोकांसाठी ते जे बॉडी आपल्याकडे जी शवविच्छेदन करता येते त्याच्यामध्ये अज्ञात इसमांच्या कुठल्या परिस्थितीतुन कुठली बॉडी आणली गेलेली आहे ते आपल्याला माहित नसते त्या बॉडीला कुठला आजार असेल किंवा कुठलं इन्फेक्शन असेल एच.आय.व्ही असेल हेपटाईटस बी असेल सी असेल जे सी मधुन सुध्दा संक्रमण पाळतात त्याची पण आपल्याला माहिती नसते आणि त्याचं पूर्णपणे जे सेफ्टी आहे त्याच्यासाठी तुम्ही त्यांना डबल ग्लोविंग द्यायला पाहिजे. त्यांना एक आतला जो प्लास्टिक चा ॲप्रन आहे त्याच्यावर डिस्पोजेबल ॲप्रॉन द्यायला पाहिजे. सध्याच्या परिस्थितीत त्यांना जे ॲप्रन दिले गेले महापौर मॅडम तुम्ही फक्त असा नख मारला तरी ते ॲप्रन फाटतय आणि तेच ॲप्रन दिवसभरातून चार बॉडी कट केली तर त्या चार बॉडी साठी तेच ॲप्रन वापरते. तो काढून ठेवतो आणि परत तेच फाटक ॲप्रन त्याच दिवशी घालतो. आणि ते सुध्दा इतके दिवस त्यांना प्रोव्हाइड केलं गेलं नव्हत. गेल्या आठवडयाला त्यांना फक्त ४० ॲप्रन देण्यात आलेले आहेत आणि ते पण पुरेशी सुरक्षा त्यांना नाही. त्यांना शु कव्हर बुट कव्हर द्यायला पाहिजे त्यांना फेसमास्क द्यायला पाहिजे, त्यांना आय मास्क द्यायला पाहिजे, त्यांना कॅप दिल्या पाहिजे हे सगळं तुम्ही पुरवलयं त्यांना.

**संभाजी पानपट्टे (मा. उपायुक्त) :-**

त्यांची डिमांड आहे त्याप्रमाणे पुरवले आहे नसेल तर मी बघुन घेतो.

**नयना वसाणी :-**

सर तो अडाणी माणुस आहे तो पाचवी सहावी शिकलेला आहे.

**संभाजी पानपट्टे (मा. उपायुक्त) :-**

सुपरव्हिजन करतो मेडीकल वैद्यकिय अधिकारी का नाही बोलत आम्हाला ..................

**नयना वसाणी :-**

मग काय तुमच्या मेडीकल वैद्यकिय अधिकारी जे करतात त्यांना माहित नाही युनिवर्सल ऑटोपसी सेफ्टी रुल काय आहेत.

**संभाजी पानपट्टे (मा. उपायुक्त) :-**

त्यांनी रिक्वायरमेंट केली तर नक्की देऊ त्यांना.

**नयना वसाणी :-**

साहेब ते सफाई कर्मचारी आहेत त्याच्या जीवनाशी आपण नाही का खेळत? आज त्याला हेपटाईटस बी हेपटाईटस सी झाला त्याने जाऊन त्याच्या बायका मुलांमध्ये पसरवला अशा तऱ्हेने तो समाजामध्ये नाही का पसरवणार? सांगा ना मला हेपटाईटस बी आणि सी नाही का पसरवणार? रक्तामधुन तो प्रसार पावतो.

**संभाजी पानपट्टे (मा. उपायुक्त) :-**

जे काही इक्वीप्मेंट आहे ना ती आपण ऑलरेडी पुरवली आहे.

**नयना वसाणी :-**

साहेब मी बघितल आहे तुम्ही काय इक्वीप्मेंट पुरवले आहे ते चला माझ्या बरोबर शासनाकडे ऑटोपसी डिपार्टमेंटमध्ये चला आणि सांगा तुम्ही जे इक्वीप्मेंट पुरविले आहेत ते योग्य आहेत. साहेब आम्ही सुध्दा शिकलो आहोत आम्ही बी.एम.एम.एस केल आहे. आमची पण ड्यूटी लागते आम्ही पण काम केली आहेत.

**गणेश देशमुख (मा. उपायुक्त (मु.)) :-**

मॅडम विषय असा आहे पोस्ट मार्टम हा मनपाच्या संबंधातला विषयच नाही. सगळ्यात महत्वाची गोष्ट म्हणजे तुम्ही जे म्हणता ते १०० टक्के खर आहे की त्यांना इक्वीप्टेंट दिलेले नाही. सेफ्टी दिलेली नाही. आपण तिकडे फार गांभीर्याने बघत नाही कारण अस आहे की हा विषय महानगरपालिकेशी संबंधित नाही. ज्या-ज्या ठिकाणी रेल्वे स्टेशन, जंक्शन आणि लोकल पोहोचली ज्या ठिकाणी स्टेशनला कनेक्टीव्हीटी आहे या ठिकाणच्या नगरपालिका महानगरपालिकेच्या दवाखान्याला सिव्हील सर्जनने ती एक प्रकारची असाईन ड्यूटी केली आणि ते गृहित धरुन चालले वर्षानुवर्षे की हे नगरपालिकेचे महानगरपालिकेचे काम आहे. आता ही सेम समस्या कल्याणला आहे. सेम समस्या भाईंदरला आहे. आपल्याकडे काही फार मोठ हॉस्पीटलायसेशन ॲन्ड हॉस्पीटल यापध्दतीची यंत्रणा नव्हतीच कधी आपल्याकडे गायनिक सेंटर चालवणे आणि आर.सी.एच. माता बाल संगोपन याच्या व्यतिरिक्त आपला स्कोप नाही. या तुटक्या आणि तुटपुंज्या मशिनरीवर आधारित आपण

ही केंद्र चालवले. दरम्यानच्या काळता एक रिट पिटीशन सुध्दा झाली की जे ऑथराईज सेंटर नाहीत या ठिकाणी पोस्ट मार्टमचा रिपोर्ट अंतिम समजावा का? हायकोर्टाने गर्व्हमेंटला डायरेक्शन दिले की तुम्ही अशा ठिकाणी एक तर अधिकृत करा किंवा तुम्ही पॅरेलल यंत्रणा निर्माण करा मग सेक्रेटरीने आपले त्यामध्ये एक ॲफीडेव्हिट घातल आहे की महानगरपालिकेच्या वैद्यकीय अधिकाऱ्यांना प्राधिकृत करतो आणि ही प्रक्रिया जास्तीत जास्त एक महिन्यापूर्वी झालेली आहे. म्हणजे अस म्हणायला हरकत नाही की एक महिन्यापूर्वी जे काही आपण करत होतो एकप्रकारे इन्फॉर्मल हेल्प म्हणून कारण काय झाले की पोस्टमार्टमसाठी जी बॉडी येते ती कुठल्यातरी अननोन माणसाची असते, रेल्वे खाली सापडलेले त्याची असते आणि ते नातेवाईक मग कुठल्यातरी पदाधिकाऱ्यांकडे जातात किंवा पोलिस स्टेशनचा तगादा असतो की कसेही करुन आम्हाला याचे अर्जन्ट पोस्ट मार्टम रिपोर्ट द्या आणि या सगळ्या गडबडीमध्ये तिकडे फार गांभीर्याने बघितले गेले नाही. आता आम्ही पत्र सुध्दा गर्व्हमेंटला पाठवले आहे की हे जे वैद्यकीय अधिकारी आहेत यांना ट्रेनिंग द्या की, कशाप्रकारे पोस्ट मार्टम करायचे त्यामध्ये कुठल्या प्रकारचे प्रिकॉशन घेणे आवश्यक आहे त्या डॉक्टरकडे हाताखाली जो स्टाफ असेल त्यांनी काय-काय काळजी घ्यायला पाहिजे आणि स्टाफची रचना काय असावी तर हे अजुन त्यांच्याकडून पत्र आलेले नाही आणि थोडे दिवसात आपण जे म्हणता ते अगदी बरोबर आहे तर ती जबाबदारी आता महानगरपालिकेला अधिकृतरित्या नोटिफाय करुन आपली रिस्पॉन्सीबीलीटी फिक्स होती त्यामुळे आपण आता ती संपूर्ण जबाबदारी स्विकारतो.

**नयना वसाणी :-**

साहेब पण तोपर्यंत आपल्याला शवविच्छेदन थांबवता येणार नाही. मग त्यांना सेफ्टी देण्याचं काय?

**गणेश देशमुख (मा. उपायुक्त (मु.)) :-**

आताच तुम्हाला डॉक्टर बोलले की आपण त्यांना इमीजिएट जे-जे काय अव्हेलेबल आहेत ते देऊ परंतु उदा. सफाई कामगार करतात हे काम अपेक्षित नाही. सफाई कामगाराने करणे आपल्याला तो स्टाफिंग पॅटर्न करावे लागेल त्याची रचना करावी लागेल ती कशी असावी ते आपण गर्व्हमेंटला विचारले कारण शासनाने आता ते काम असाईन केलं. परंतु त्या पध्दतीचा स्टाफ आमच्याकडे नाही. त्यासाठी थोडे दिवस आपल्याला अवधी लागेल.

**नयना वसाणी :-**

साहेब पण सध्याचे जे तुम्ही २४/०८/२०१५ ला आपल्याकडून जे पत्र गेलेले आहे तिथे शासनाकडे आपण शवविच्छेदन सहाय्यक वगैरे काहीच मागितले नाही फक्त वैद्यकिय अधिकारी वर्ग क्र. २ एवढेच मागितले आहे तुम्ही मला सांगता की आपण शासनाकडे मागितले आहे हे पत्र तुमचेच आहे माझ्या हातात.

**गणेश देशमुख (मा. उपायुक्त (मु.)) :-**

या पत्राचा अर्थच असा आहे की हे आपली जबाबदारी नाही तारीख बघाना त्याच्यावर किती आहे.

**नयना वसाणी :-**

आपण मंजुरी मागितली आहे सर पदासाठी.

**गणेश देशमुख (मा. उपायुक्त (मु.)) :-**

तारीख सांगा पत्राची.

**नयना वसाणी :-**

२४/०८/२०१५.

**गणेश देशमुख (मा. उपायुक्त (मु.)) :-**

२४/०८/२०१५ आपण हे पत्र पाठवल हे रिट पिटीशन झाली म्हणून की आम्हाला तुम्ही डॉक्टर द्या आपण ते आजही म्हणतोय की तुम्ही आम्हाला डॉक्टर द्या. शवविच्छेदन करण्यासाठी माझ्याकडे मशिनरी नाही माझ्याकडे डॉक्टर नाहीत आणि ते गर्व्हमेंट म्हणते आम्ही तुम्हाला नोटिफाय करतो म्हणून ते पत्र आम्ही त्यांना दिले.

**नयना वसाणी :-**

मग आपण तिकडचे जे वैद्यकिय अधिकारी आहेत किंवा हे जे शवविच्छेदन सहाय्यक आहेत त्यांना पगार, वेतन जे देतो ते कुठल्या हिशोबाने सफाई कामगारचे देतो की शव विच्छेदन सहाय्यकचे.

**गणेश देशमुख (मा. उपायुक्त (मु.)) :-**

सफाई कामगारचे देतो.

**नयना वसाणी :-**

मग हे चुकीचे नाही का साहेब.

**गणेश देशमुख (मा. उपायुक्त (मु.)) :-**

म्हणुन तर गर्व्हमेंटला आम्ही डॉक्टर मागितले. आधी तुम्ही डॉक्टर द्या.

**नयना वसाणी :-**

आधी त्यांच्याकडून कामे करुन घ्यायची त्यांना ते वेतन पण द्यायचे नाही. त्यांनी ती सुविधा पण द्यायची नाही मला एक सांगा १९८३ पासुन पुरुषोत्तम सोलंकी आणि गणेश सोलंकी हे आपल्याकडे कामाला आहेत शवविच्छेदन कक्षामध्ये कामाला आहेत. आपण किती वेळा महानगरपालिकेतर्फे त्याच वैद्यकीय परिक्षण करुन घेतल.

**गणेश देशमुख (मा. उपायुक्त (मु.)) :-**

मी तुम्हाला आधीच सांगितल पाहिजे त्या क्षमतेने.............

**नयना वसाणी :-**

साहेब तुम्हाला जर माहित नसेल तर तुम्ही वैद्यकीय अधिकारी तर ठेवलेत ना हॉस्पीटलसाठी इंदिरा गांधीसाठी टेंबासाठी तुम्ही अजुन चालु झाले नाही ते सर्व डॉक्टर आपण डोक्यावर मारलेत त्यांच्याकडून तुम्ही गायडन्स घेत नाही काय करायला पाहिजे आरोग्य कर्मचाऱ्यांशी, पगार देता ना त्यांना मग त्यांच्याकडून तेवढ तरी जाणुन घ्या की आपले कर्मचारी जे आहेत त्यांचे सफाई कर्मचारी आहेत त्यांच्या आरोग्याशी का खेळावे आपण. रुग्णांच्या रोजच्या रोज कॉन्टॅक्टमध्ये येणाऱ्या नर्सेस आहेत, स्टाफ आहेत त्यांचे वैद्यकीय परिक्षण कधी केल आपण.

**गणेश देशमुख (मा. उपायुक्त (मु.)) :-**

प्रिकॉशन घेऊ आम्ही मॅडम.

**नयना वसाणी :-**

साहेब माझे एवढेच म्हणणे आहे.

**संभाजी पानपट्टे (मा. उपायुक्त) :-**

त्या कर्मचाऱ्यांचे मेडीकल चेक अप करुन घेऊ.

**नयना वसाणी :-**

कर्मचाऱ्यांचे आणि पेशंट आपले जे इंदिरा गांधी रुग्णालय आहे किंवा टेंबा रुग्णालयासाठी पण जे आपण अपॉईंट करणार आहात माझं तेवढच म्हणण आहे की रुग्णांच्या दैनंदिन कॉन्टॅक्टमध्ये येणारे जेवढे स्टाफ आहे त्यांची ॲटलिस्ट दर ६ महिन्यांनी आपण वैद्यकीय तपासणी करावी आणि जे नविन स्टाफ आपण घेतोय त्यांना वैद्यकीय तपासणीचा अहवाल आपण बंधनकारक करावा.

**मा. महापौर :-**

आपली सगळी सुचना मान्य करत आहे. आणि तसा आदेश देतो.

**नयना वसाणी :-**

भाईंदर (प.) येथील भारतरत्न पंडित भिमसेन जोशी रुग्णालय येथील शवविच्छेदन करणारे कर्मचारी हे सन १९८३ पासून कार्यरत आहेत. शवविच्छेदन करणारे कर्मचारी यांना युनिवर्सल ऑटोपसी सेफ्टीचे नियमानुसार साधनसुविधा पुरविणे हे महापालिकेचे कर्तव्य आहे. शवविच्छेदन ही शस्त्रक्रिया असून त्याच्यामध्ये येणारा मृतदेह हा कुठल्या संक्रमित आजाराने ग्रस्त असल्यास शवविच्छेदन करणाऱ्या कर्मचारी यांच्यामध्ये संक्रमण होण्याची शक्यता आहे. सद्यस्थितीत त्यांना देण्यात येणारे सुरक्षिततेचे साधन हे युनिवर्सल ऑटोपसी सेफ्टीचे नियमानुसार पुरेसे नाही. तेव्हा या कर्मचाऱ्यांना डबल ग्लोव्हींग प्लास्टीक ॲप्रन व त्याच्यावर परिधान करावयाचे डिसपोजेबल ॲप्रन, मास्क, कॅप, फेसशिल्ड, प्लास्टीक बुट कव्हर आदी अन्य साधन पुरविण्यात यावेत. त्या व्यतिरिक्त सन १९८३ पासून कार्यरत असलेल्या या कर्मचाऱ्यांचे आजपर्यंत कुठलेही वैद्यकिय परिक्षण करण्यात आलेले नाही. तेव्हा अशा कर्मचाऱ्यांचे व महापालिकाद्वारे संचालित प्रत्येक रुग्णालयातले कर्मचारी जे रुग्णांच्या दैनंदिन सहवासामध्ये येत असते त्यांचे दर ६ महिन्यांनी वैद्यकिय परिक्षण करुन घ्यावे. तसेच नविन कर्मचारी नियुक्त करत असताना त्यांचे वैद्यकिय तपासणीचा अहवाल बंधनकारक करावा. जेणेकरुन रुग्णांपासून कर्मचारी आणि कर्मचाऱ्यांपासून रुग्णांमध्ये प्रसार होणारे सहसंक्रमण थांबविता येईल व सामाजिक आरोग्याच्या दृष्टीने हे सोयीस्कर राहिल असा ठराव मांडत आहे.

**प्रशांत केळुसकर :-**

माझे अनुमोदन आहे.

**प्रकरण क्र. ७८ :-**

सन्मा. सदस्या डॉ. नयना वसाणी यांचा दिनांक २६/०८/२०१५ रोजीच्या पत्रान्वये दिलेला प्रस्ताव. -- भारतरत्न पंडीत भिमसेन जोशी रुग्णालय येथील शवविच्छेदन कक्ष येथील कर्मचारी यांना योग्य ते साधन पुरविणे विषयक तसेच त्यांचे व आरोग्य विभागातील अन्य कर्मचाऱ्यांच्या वैदकीय तपासणीबाबत.

**ठराव क्र. ५२ :-**

भाईंदर (प.) येथील भारतरत्न पंडित भिमसेन जोशी रुग्णालय येथील शवविच्छेदन करणारे कर्मचारी हे सन १९८३ पासून कार्यरत आहेत. शवविच्छेदन करणारे कर्मचारी यांना युनिवर्सल ऑटोपसी सेफ्टीचे नियमानुसार साधनसुविधा पुरविणे हे महापालिकेचे कर्तव्य आहे. शवविच्छेदन ही शस्त्रक्रिया असून त्याच्यामध्ये येणारा मृतदेह हा कुठल्या संक्रमित आजाराने ग्रस्त असल्यास शवविच्छेदन करणाऱ्या कर्मचारी यांच्यामध्ये संक्रमण होण्याची शक्यता आहे. सद्यस्थितीत त्यांना देण्यात येणारे सुरक्षिततेचे साधन हे युनिवर्सल ऑटोपसी सेफ्टीचे नियमानुसार पुरेसे नाही. तेव्हा या कर्मचाऱ्यांना डबल ग्लोव्हींग प्लास्टीक ॲप्रन व त्याच्यावर परिधान करावयाचे डिसपोजेबल ॲप्रन, मास्क, कॅप, फेसशिल्ड, प्लास्टीक बुट कव्हर आदी अन्य साधन पुरविण्यात यावेत. त्या व्यतिरिक्त सन १९८३ पासून कार्यरत असलेल्या या कर्मचाऱ्यांचे आजपर्यंत कुठलेही वैद्यकिय परिक्षण करण्यात आलेले नाही. तेव्हा अशा कर्मचाऱ्यांचे व महापालिकाद्वारे संचालित प्रत्येक रुग्णालयातले कर्मचारी जे रुग्णांच्या दैनंदिन सहवासामध्ये येत असते त्यांचे दर ६ महिन्यांनी वैद्यकिय परिक्षण करुन घ्यावे. तसेच नविन कर्मचारी नियुक्त करत असताना त्यांचे वैद्यकिय तपासणीचा अहवाल बंधनकारक करावा.

जेणेकरुन रुग्णांपासून कर्मचारी आणि कर्मचाऱ्यांपासून रुग्णांमध्ये प्रसार होणारे सहसंक्रमण थांबविता येईल व सामाजिक आरोग्याच्या दृष्टीने हे सोयीस्कर राहिल असा ठराव मांडत आहे.

**सुचक :- डॉ. नयना वसाणी          अनुमोदक :- श्री. प्रशांत केळूसकर**

**ठराव सर्वानुमते मंजूर**

**सही/-**
**महापौर**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

**नगरसचिव :-**

प्रकरण क्र. ७९, सन्मा. सदस्या सौ. निलम ढवण यांचा दिनांक २६/०८/२०१५ रोजीच्या पत्रान्वये दिलेला प्रस्ताव. -- आरक्षण क्र. ११०, भाईंदर (पूर्व) येथील गुरुद्वारा शेजारच्या मैदानाजवळ कविता बिल्डींगच्या समोरच्या परिसराजवळील मोकळ्या जागेमध्ये तात्पुरत्या स्वरुपाची पार्कींग सोय करणेबाबत.

**निलम ढवण :-**

नवघर रोड परिसरामध्ये बरीचशी वाहनांची गर्दी, वाहनांची संख्या वाढत असल्यामुळे आणि पूर्वीपासुन सुनियोजित स्थितीत बिल्डींग नसल्यामुळे न बांधल्यामुळे तेथे पार्किंगचा प्रश्न अतिशय भेडसावत आहे आणि त्यामुळे आज प्रत्येक जण गाडी घेत आहे. काही जण रस्त्यावर पार्किंग करतात तर काही गल्लीमध्ये पार्किंग करतात. अशावेळी जेव्हा काही प्रसंग असे येतात समस्या भेडसावतात आग लागली तर फायर ब्रिगेड जाऊ शकत नाही. कोणी पेशंट आजारी असेल इमरजन्सी असेल तर ॲम्ब्युलन्स आत जाऊ शकत नाही. अशा पध्दतीने नवघर पट्टयातील बिल्डींगची बांधली केलेली आहे आणि त्यामुळे आपण त्या परिसरामध्ये पार्किंगची व्यवस्था करावी आणि तो प्रश्न महासभेमध्ये घेण्यात यावा प्रशासनामार्फत असा देखील मी एक ॲप्लीकेशन महापौर मॅडम आणि आयुक्त साहेबांना दिलेले होते. परंतु आज तो मी ज मार्फत घेतलेला आहे. तर त्यामुळे तिथे पार्किंगची व्यवस्था म्हणजे बाजुलाच असलेला मैदान आरक्षण क्र. ११० हे शाळेसाठी आरक्षित असून परंतु त्याची बांधणी किंवा त्या संदर्भातील काहीच पुढची भुमिका घेतली नसल्यामुळे तात्पुरते त्या ठिकाणी आपण पार्किंगची व्यवस्था करण्यात यावी. जेणेकरुन तिथल्या लोकांना किंवा तेथील रस्ते आपल्याला मोकळे मिळू शकतील आणि जी गर्दी आहे ट्रॅफीक जॅम होतात अशा पध्दतीच्या ज्या समस्या आहेत त्या कमी होऊ शकतील त्यामुळे आपणास विनंती करते की त्या ११० चा जो तेथील मोकळा भुखंड आहे त्यामध्ये तात्पुरती व्यवस्था करावी आणि तेथे १ वॉचमनची देखील सोय करण्यात यावी. भाईंदर (पूर्व) आरक्षण क्र. ११०, नवघर रोड परिसरामध्ये पुर्वी कुठलेही नियोजन न करता बांधलेल्या इमारतीमुळे कुठल्याही इमारती खाली गाडी पार्किंगची सोय नाही. सध्या गाड्यांचे प्रमाणही वाढलेले असल्याने या गाड्या रस्त्याच्या बाजूला व आतल्या गल्लींमध्ये उभ्या केल्या जातात. परिणामी एखादी ॲम्ब्युलन्स किंवा दुसरी गाडी, फायर ब्रिगेडच्या गाड्या आतील रस्त्यावर नेऊ शकत नाही. त्यामुळे नागरिकांना विविध अडचणींना सामोरे जावे लागते.

वरील सर्व गोष्टींचा गांभीर्यपुर्वक विचार करता आतील बाजूस तात्पुरत्या स्वरुपाची पे ॲन्ड पार्क ची व्यवस्था करणे फार गरजेचे आहे. यासाठी गुरुद्वारा शेजारील मैदान किंवा सरस्वतीनगर पुढील कविता बिल्डींग समोरील परिसरामध्ये तात्पुरत्या स्वरुपात पे ॲन्ड पार्क ची व्यवस्था करण्यात यावी व सुरक्षा रक्षकाची नेमणूक करावी. असा ठराव मी मांडत आहे.

**अरविंद ठाकुर :-**

माझे अनुमोदन आहे.

**राजेश वेतोसकर :-**

मॅडम या संदर्भात मला पण एक सूचना करावयाची आहे. हा जो मॅडमने विषय दिला होता त्याच पाठपुरावा मागील दिड वर्षापासून मी सुध्दा करत आहे. आणि शितोळे साहेब असताना मला वाटत या जागेची २-३ वेळा पाहणी पण झाली होती. पण मला त्या संदर्भात सांगण्यात आले होते की या ठिकाणी अप्रोच रोड नाही आणि वाहतुक शाखेची परवानगी देखील नसल्यामुळे अडचण येते म्हणुन. माझी अशी सुचना आहे दुसरी की आरक्षण क्र. १०८ आणि १०६ हे रस्त्यालगत असल्याने अप्रोच रोडची समस्या राहणार नाही तर त्या ठिकाणी पण पार्किंग होत असेल तर आपण याचा सुध्दा विचार करावा.

**दिनेश नलावडे :-**

महापौर मॅडम, ढवण मॅडमने हा विषय आणलेला आहे. चांगला विषय आणला ज प्रस्तावाखाली. मॅडम ढवण मॅडमने सगळी माहिती दिलेलीच आहे सभागृहाला. नवघर रोडवरती गाडी पार्किंगचे फार मोठ्या प्रमाणामध्ये अडचण आहे सर्वांना मान्य आहे. तर त्या ठिकाणी मैदानाच्या आरक्षण जागेत शाळेचे मैदान आहे त्या ठिकाणी पार्किंग जोपर्यंत या शाळेचे आरक्षण होत नाही तोपर्यंत तेथे पार्किंग झाले तर कुठलीही हरकत नाही. नगरपालिकेने तस त्याला मान्यता द्यायला पाहिजे. परंतु महापौर मॅडम मी आपल्याला सांगु इच्छितो की इथे जर बांधकाम कार्यकारी अभियंता असते तर बरे झाले असते. कारण भांडण लावण्यामध्ये आम्हाला बांधकाम खात्याचा हात कोणी धरु शकत नाही. आपसात कशी भांडण लावायची ना परंतु आमच्यामध्ये तसा दुरावा होणार नाही. आजुबाजुला आमची विचारसरणी सारखी आहे. परंतु बांधकाम खात्याने हे जरा सांभाळले पाहिजे.

**मा. महापौर :-**

आपण विषय धरुन बोला अजुन बरेच विषय बाकी आहेत.

**दिनेश नलावडे :-**

महापौर मॅडम, ढवण मॅडम जे आता आपले मार्केटचे आरक्षण आहे तर आपल्या सगळ्या विभागातील जेवढ्या काही गाड्या असतील त्या ठिकाणी रोड पण आहे. ते विषय तुम्ही द्या तुमच्या लेटरवरती आणि ते पास करुन घेऊया. जेणेकरुन त्या विभागातील नवघर रोड वरील सर्व गाडी पार्किंग रोड सोडून आतमधल्या साईडला लागेल त्याच्यामुळे महानगरपालिकेला फायदा होईल. महापौर मॅडम तर आपण हा विषय पारित करुन घ्यावा आणि महानगरपालिकेने ह्या करिता आम्हाला सहकार्य द्यावे. महापौर साहेब आहेत तुम्ही आहेत तर हा विषय चांगला आलेला आहे. मी आपल्याला ऐवढेच सुचित करतो की दोन्ही आरक्षणामध्ये पार्किंगची आम्हाला मान्यता करुन द्यावी धन्यवाद.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

मॅडम असाच एक विषय आहे डॉ. राजेंद्र जैन साहेबांच्या एरिया मधला विषय आहे. गणपती मंदिराच्या समोर जो एक रस्ता आहे तो रस्ता सरळ निघतो इकडे जैन मंदिरकडे तिथे मॅडम संध्याकाळी ६ ते ९ असे गाड्या पार्किंग करतात ना त्याच्यामुळे आतमध्ये गाडी जायला जागा नाही जर उद्या एखादा इन्सीडन्स घडला तर तिकडे खुप मोठा प्रॉब्लेम होईल माझी तुम्हाला अशी विनंती आहे डॉक्टर साहेब आहेत आणि शुभांगी कोटियन आहेत की फक्त संध्याकाळी ६ ते ९ गणपती मंदिराच्या समोर अमरावली बिल्डींग आहे तिथपर्यंत एकाच बिल्डींग पर्यंत नो पार्किंग करावी ६ ते ९ वन साईड हा ओनली आणि जैन मंदिर समोर साई छाया बिल्डींग पर्यंत वन साईड पार्किंग करावी. वन साईड नो पार्किंग करावी असा प्रस्ताव आपण कृपया त्यांच्यामार्फत पाठवून द्यावा.

**राजेंद्र जैन :-**

इस विषय के उपर मुझे इतना बोलना है की, इस विषय के उपर संबंधित अधिकारी से मिटींग हो जाए। क्योंकी अभी थोडा जल्दी प्रस्ताव दिया उसमें कुछ आडातानी गडबड हो सकती है। इसपे अच्छे से अध्ययन करे हम लोग प्रस्ताव डालेंगे।

**मर्लिन डिसा :-**

महापौर मॅडम एस.के.स्टोन ते शितल नगर जी एरिया आहे तिथे आऊट स्टेशन बसेस खुप दिवसाला येतात आणि संध्याकाळीच्या वेळी तिकडे पूर्ण रस्त्यावर पार्किंग असते. प्रायव्हेट बसेस, स्कूल बसेस वगैरे तर संध्याकाळच्या वेळी खूप ट्रॅफिक जॅम असते. शाळा सुटण्याच्या वेळी आणि जे पण तिकडे मंदिर आहे, मस्जिद आहे चर्च आहे लोकांना बाहेर येण्यासाठी खुप त्रास असतो ते लास्ट टाईम पण मी सांगितल होत. मच्छि मार्केट ती पण काढायची प्लीज ओके.

**जुबेर इनामदार :-**

माझा प्रश्न प्रशासनाला आहे याच्या आधी पार्किंग संदर्भात या सभागृहाने शहरामध्ये विविध ठिकाणी २३ ठिकाणी पार्किंगसाठी एक विषय आणला होता आणि ठेकेदाराच्या माध्यमातून त्या २३ ठिकाणी पार्किंगचे नियोजन करण्यात येईल असा विषय या सभागृहाने सर्वानुमते पारित करुन दिला होता त्याच्यावर निविदा प्रक्रिया पण सुरु झाली होती. निविदामध्ये अटी होत्या आम्ही त्याचा विरोध केला म्हणून त्या अटि शिथिल करण्यात आल्या मात्र परत निविदा मागवण्यात आल्या नाही आल्या थोडी काही माहिती उपलब्ध असेल तर द्या हा विषय पार्किंगचाच आहे. २३ ठिकाणी या शहरामध्ये विविध ठिकाणी पार्किंग नियोजित ठिकाणी व्यवस्था करण्यात येणार होती. ठेकेदार नेमण्यात येणार होते. जेणेकरुन जस आपल्या मर्लिन मॅडमने सांगितले. पूर्ण रस्ता भरलेला असतो. कमीत कमी त्याच्यावरती काही नियंत्रण राहील असत जागा उपलब्ध करुन देण्यात आली असती त्यांना तुमच्याकडे त्याची काही माहिती आहे का? असली तर मेहेरबानी करुन द्या.

**गणेश देशमुख (मा. उपायुक्त (मु.)) :-**

सध्या तरी माहिती उपलब्ध नाही. पुढच्या मिटींगला आपण घेऊ.

**मा. महापौर :-**

ठराव सर्वानुमते मंजूर.

**प्रकरण क्र. ७९ :-**

सन्मा. सदस्या सौ. निलम ढवण यांचा दिनांक २६/०८/२०१५ रोजीच्या पत्रान्वये दिलेला प्रस्ताव. -- आरक्षण क्र. ११०, भाईंदर (पूर्व) येथील गुरुद्वारा शेजारच्या मैदानाजवळ कविता बिल्डींगच्या समोरच्या परिसराजवळील मोकळ्या जागेमध्ये तात्पुरत्या स्वरुपाची पार्कींग सोय करणेबाबत.

**ठराव क्र. ५३ :-**

भाईंदर (पूर्व) आरक्षण क्र. ११०, नवघर रोड परिसरामध्ये पुर्वी कुठलेही नियोजन न करता बांधलेल्या इमारतीमुळे कुठल्याही इमारती खाली गाडी पार्किंगची सोय नाही. सध्या गाड्यांचे प्रमाणही वाढलेले असल्याने या गाड्या रस्त्याच्या बाजूला व आतल्या गल्लींमध्ये उभ्या केल्या जातात. परिणामी एखादी ॲम्ब्युलन्स किंवा दुसरी गाडी, फायर ब्रिगेडच्या गाड्या आतील रस्त्यावर नेऊ शकत नाही. त्यामुळे नागरिकांना विविध अडचणींना सामोरे जावे लागते.

वरील सर्व गोष्टींचा गांभीर्यपुर्वक विचार करता आतील बाजूस तात्पुरत्या स्वरुपाची पे ॲन्ड पार्क ची व्यवस्था करणे फार गरजेचे आहे. यासाठी गुरुद्वारा शेजारील मैदान किंवा सरस्वतीनगर पुढील कविता

बिल्डींग समोरील परिसरामध्ये तात्पुरत्या स्वरुपात पे ॲन्ड पार्क ची व्यवस्था करण्यात यावी व सुरक्षा रक्षकाची नेमणूक करावी. असा ठराव मी मांडत आहे.

**सुचक :- सौ. निलम ढवण** **अनुमोदक :- श्री. अरविंद ठाकूर**

**ठराव सर्वानुमते मंजूर**

**सही/-**
**महापौर**
**मिरा भाईंदर महानगपालिका**

**नगरसचिव :-**

प्रकरण क्र. ८०, सन्मा. सदस्य श्री. दिनेश जैन यांचा दिनांक २७/०८/२०१५ रोजीच्या पत्रान्वये दिलेला प्रस्ताव. -- जैन समाजाच्या पर्युषण पर्वामध्ये कत्तलखाने बंद ठेवणेबाबत.

**दिनेश जैन :-**

मिरा भाईंदर शहरातील सर्व समाज एकत्र व खेळीमेळीने राहत असून जैन समाजाच्या बांधवांचे देखील मिरा भाईंदर शहरात मोठ्या संख्येने वास्तव्य आहे. जैन समाजाचे पर्युषण पर्व सुरु होणार असून सदर पर्युषण पर्वामध्ये जैन बांधवांनी आपल्याकडे अशा पवित्र पुर्यषण पर्वामध्ये कोणत्याही प्रकारे पशुहत्या होवू नये अशी भावना आहे.

सदर भावनेच्या आदरार्थ जैन बांधवांच्या श्वेतांबर व दिगंबर समाजाच्या पर्युषण पर्वामध्ये मांस, मटणाची दुकाने बंद ठेवण्यात यावीत असा ठराव मांडत आहे.

**अश्विन कासोदरिया :-**

माझे अनुमोदन आहे.

**अशरफ शेख :-**

मॅडम १८ दिवस जे ठेवलेले आहे जे शासनाचे धोरण २ दिवसाचे आहे. २ दिवस ठेवा तुम्ही.

**मा. महापौर :-**

आपण आपले मत मांडायला मोकळे आहात ना.

**अशरफ शेख :-**

दुसरे याच महिन्यामध्ये आमचे मोहरम आहे. मोहरममध्ये ४० दिवस आम्ही मोहरम पाळतो. ४० दिवस शोक करतो आम्ही आणि ४० दिवसासाठी दारु बंदी करावी आपण.

**मा. महापौर :-**

चालेल ना तुम्ही तसा ठराव आणा ना.

**सुरेश खंडेलवाल :-**

महापौर मॅडम, आपकी परमिशनसे मेरी लक्षवेधी थी इस विषय पर आपने कहाँ की ‘‘ज’’ का प्रस्ताव है। इसलिए मेरी लक्षवेधी आपने कॅन्सल की, मुझे बोलने का मौका दिया इसके लिए पहले तो धन्यवाद. हर वर्ष की तरह इस वर्ष भी जैसे की मेरे मित्र दिनेश भाईने बताया की, मिरा भाईंदर शहर के अंदर सभी धर्मजाती के लोग बडी एक दुसरे से प्रेमभावना के साथ बरसों से रहते आए है। सभी समाज का सभी के मन में एक दुसरे के मन में सभी का आदर है। हर वर्ष की तरह जैसे की आप भी इस बात से परिचित है की जैन समाज की हर वर्ष यह मांग रहती है। उनकी भावना रहती है महावीर स्वामी के सिध्दांतो पर चलनेवाला जैन समाज अहिंसा धर्म को बहुत सिध्दत से पालता है। उसको मानता है इसके लिए हर वर्ष जैन समाज की भावना रही है की इस पर्युषण पर्व के समय मिरा भाईंदर शहर के सभी कत्तलखाने मांसमटन की दुकाने ८ दिन की हमेशा मांग रहते है। लेकिन दिगंबर समाज का भी है तो २७ तारिख तक १० से २७ तक की जो मांग ज के प्रस्ताव के माध्यम से दिनेश भाई ने रखी है। मैं उसका सन्मान करता हूँ। मेरा कहना यह है की देखिए सभी धर्म और हम सभी एक दुसरे की भावना का सन्मान हमें करना चाहिए। और मैं हमेशा से देखता आया हूँ की हमने हर बार यह प्रस्ताव पिछले बार भी था उसके पहले भी था ३-४ बार से प्रस्ताव हम लोग मॅडम पास करते हुए आ रहे है। लेकिन मेरा इस मामले मैं मुझे लगता है की प्रशासन की जो भूमिका है वो जादा महत्त्व रखती है। मैं तो यह चाहूँगा की प्रशासन इस बारे में थोडासा जो पिछले बार जैसा कई सालो से देखते आया हूँ की ठराव पास होने के बाद भी उसके उपर अंमलबजावणी नही हुई। मैं यहॉंपर पुरे सदन से एक यह मांग करता हूँ की हम सभी यह जैन समाज की जो भावना है एक दुसरे के किसी भी समाज की जैसे अभी अशरफ भाई मैं आपके भी भावना की कदर करता हूँ। यदी ऐसा कोई भी समाज का विषय आए और यदी उनकी भावनाओं को उससे सन्मान पहुँचता हो तो मैं तो चाहुँगा सदन के अंदर ऐसे विषय आए तो हम सब मिलके उनके भावना का सन्मान करे। और उसकी अंमलबजावणी करे ताकी यह मिरा भाईंदर का सर्वधर्म समभाव का संदेश है। जोकी हम पुरे महाराष्ट्र में यहाँ से देते है मॅडम मैं आपको बताना चाहूँगा पिछलेबार शायद आपने यह बताया था की अहमदाबाद के अंदर इस तरह की घटना हुई थी और सुप्रिम कोर्टने भी उसके उपर मोहोर लगाई थी तो आज आप महापौर की चेअर पे है। हमारे आमदार साहब भी समाज से तालुख रखते है तो मैं चाहूँगा की सभी इस जैन समाज की और सबकी भावना की कदर करते हुए

इस पर्युषण पर्व पर यह दुकाने बंद रखी जाए और उसका प्रशासन आपकी आज्ञानुसार सक्तीसे पालन करे और उनकी भावना की कदर करे।

**बर्नड डिमेलो :-**

आमचे मित्र सुरेश खंडेलवाल यांनी सांगितल्याप्रमाणे वर्षानुवर्ष या समाजामध्ये जैन समाजाचा आणि धर्माचा आदर करत मग ते राष्ट्रवादीचे सरकार असो सत्ता असो किंवा काँग्रेसची असो आपण त्यांना मुभा आणि सुविधा दिलेल्या आहेत. त्यांच्या धर्माचा आदर करुन परंतु आता आपले दिनेश जैन यांनी जो विचार मांडला की, कत्तलखाने आपल्या मिरा भाईंदर शहरामध्ये किती कत्तलखाने आहेत? कत्तलखाने कीती आहेत सर?

**मा. महापौर :-**

तुम्ही तुमच मांडा.

**बर्नड डिमेलो :-**

मॅडम मलाच माहिती नाही ना कत्तलखाने किती आहेत. ते सांगु तर द्या त्यांना. तुम्ही नका बोलु पण मला उत्तर तर मिळू द्या.

**मा. महापौर :-**

मला एक सांगा, आपल्याला मांडायचे असेल ते मांडा. तुमचे मुद्दे सांगा तुम्हाला उत्तर भेटणार.

**बर्नड डिमेलो :-**

उत्तर देताना मला माहिती असेल तर प्रश्न मांडेल ना. मुद्दा असा आहे की कत्तलखाना उल्लेख केलेला आहे. फक्त जर कत्तलखाना असेल तर ठिक आहे ते बंद ठेवा नका ठेवू तो तुमचा प्रश्न आहे. याच्यामध्ये मासळीचा किंवा याचा उल्लेख केला आणि मग मासळी मार्केट वगैरे बंद राहतील का? त्याच स्पष्टीकरण पाहिजे आम्हाला त्या विषयावर उत्तरावरच मी माझे विचार मांडेन ना. म्हणून मी विचारतो कत्तलखाने आपल्या शहरामध्ये किती आहेत.

**मा. महापौर :-**

मासळी ते कत्तलखान्यामध्ये नसतेच. विषय कत्तलखान्याचा आहे.

**बर्नड डिमेलो :-**

महापौर मॅडम, गेल्यावेळीला असाच प्रकार झाला होता आणि मार्केटमध्ये लोकांच्या टोपल्या उडवल्या.

**मा. महापौर :-**

आपला विषय कत्तलखान्याचा आहे.

**बर्नड डिमेलो :-**

त्यावेळी मी प्रश्न मांडला होता हाच की.

**मा. महापौर :-**

मी कदाचित उत्तर दिलेले आहे आपण पुढचा विषय मांडा. कारण मासळी त्यात नाही.

**सुहास रकवी :-**

आपल्या शहरामध्ये कत्तलखाने एकही नाही स्थायी समितीमध्ये आम्ही तरतुद केली होती.

**जुबेर इनामदार :-**

तुम्ही परवाना देताना त्याच्यामध्ये कत्तल करण्याचा तुम्ही परवाना देता का? नाही देत नाही अर्थात विषय संपून जातो.

**दिनेश जैन :-**

जुबेर साहेब कत्तलखाने और मांस मटन की दुकान दोनो उसमें मेन्शन किया हुआ है। ठराव मैं पहले आप देखो बाद में बोलो।

**जुबेर इनामदार :-**

सिर्फ कत्तलखाना लिखा है आपने।

**सुहास रकवी :-**

आप पढो जरा दिनेशजी आपका विषय क्या है देखो। "ज" च्या विषयामध्ये आहे. दुसरी गोष्ट दुकान कुठे लिहिले आहे आणि मिरा भाईंदर मध्ये माझ्या माहितीप्रमाणे एकही कत्तलखाना नाही.

**अशरफ शेख :-**

मागच्या वर्षी जेव्हा शरदराव सभापती होते स्थायी समितीचे तेव्हा आम्ही तरतुद केली होती. शरदराव १ कोटी रुपयांची तरतुद केली होती.

**दिनेश जैन :-**

अशरफजी आप समझे नही मैं क्या बोलना चाहता हूँ। खुले में मटन की दुकाने, मटन को कटिंग करके बेचते है। हमारे मैं जैन समाज मैं उसको छोटा हो या बडा कत्तलखाना ही बोलते है। और दुसरा उसके अंदर मैंने मेन्शन किया हुआ है कत्तलखाना मांस मटन खुले में विक्री जो पर्युषन जो रहते है। हमारे जैन समाज का बहुत बडा पर्व रहता है तो हम सबकी भावना को ध्यान में रखते है। आज मैं महापौर का भी अभिवादन करना चाहता हूँ की उन्होंने रमजान ईद मैं रमजान के महिने मैं एक इफ्तीयार दावत रखी।

**सुहास रकवी :-**

मॅडम बर्नड डिमेलोने काय विचारल मांस मच्छी मटण बद्दल तुम्ही तर क्लेरिफिकेशन केले की फक्त मटणाची दुकाने मांस मच्छी बद्दल त्याच्यामध्ये उल्लेख नाही. दुसरी गोष्ट आता तुम्ही म्हणालात त्याप्रमाणे महावीर जयंती पर्युषण आमच्या गावामध्ये पहिल मंदिर होते. तुमचे सासरे मिठालालती स्वतः यायचे. माझ्या जन्मापासुन बघतो हे असले प्रकार कधी होत नव्हते. परंतु जशी जैन संख्या वाढली त्यामुळे कुठेतरी यावे म्हणून राज्य शासनाने त्याच्यावर एक जी.आर काढला आहे. त्या जी.आर नुसार आपण दरवर्षी २ दिवसांचा बंद पाळतो. गेल्यावर्षी सुध्दा जो बंद आहे तो २ दिवसांचा ठेवला होता. त्याची तारीख पण वाटल्यास सांगतो. त्याचप्रमाणे बाबासाहेब आंबेडकरांनी घटना लिहिली आहे. त्या घटनेनुसार प्रत्येक व्यक्तीला स्वातंत्र्य दिले आहे. त्याला जगण्याचा अधिकार महानगरपालिकेने कुठल्याही धर्माचा विशेष धर्माचा वापर करुन इतर धर्माचा अनादर करु नये हे त्याच्यामध्ये उल्लेख केलेला आहे. आमच म्हणण धर्माचा पालन म्हणजे कस.

**मा. महापौर :-**

हा विषय धर्माचा नाही. आपली मते मांडायला आपण मोकळी आहात. आपण तस मतदान करु शकता.

**सुहास रकवी :-**

मतदानाचा विषयच नाही आम्ही चर्चा करतोय. चर्चेमध्ये आम्हाला त्या धर्माबद्दल आदर आहे. आमचे काका स्वतः जायचे आम्ही स्वतः जातो. त्या महाराजसा येतात आमची मांगलिक होते सुरेशजी खंडेलवाल असतात जैन धर्माच्या पर्युषणाबद्दल जेवढे दिवस बंद ठेवायचे आहेत तर आपण राज्य सरकारचे जे काही निर्देश असतील त्यांचे जी.आर असतील त्यांचे पालन करावे अशी आमची आपल्याला विनंती आहे. आपण त्यानुसार हा ठराव आणुन काय होतो समाजामध्ये तेढ निर्माण करु नका. तुम्ही तुमच्या धर्माबद्दल १० दिवस बंद ठेवणार इतर धर्मात खात असतील त्यांना कुठे रिस्ट्रीक्शन किती दिवस द्यायच याला ही काही नियम आहेत. आंबेडकरांनी घटना लिहिताना प्रत्येक व्यक्तीचा विचार करुन लिहिलेली आहे. आमच म्हणणं तेच आहे की तुम्ही प्रत्येक धर्माला चांगल्या प्रकारे ट्रीट केले जसे इफ्तीयार पार्टी आग्री कोळी इतर आम्ही सुध्दा आहोत आम्हाला जो आमचा धर्म आहे तो निश्चित आम्हाला सुध्दा जो राज्य शासनाचा जी.आर असेल देशमुख साहेब त्याप्रमाणे प्रशासनाने सुध्दा भुमिका स्पष्ट करावी. डिमेलो साहेबांनी पण सांगितले मच्छी मटण तर मच्छी तुम्ही वगळल पण उद्या जर तुमच्या पर्युषण काळात टोपल्या फेकताना प्रशासन गेले नाही पाहिजे याच्या विषयी आम्ही तुमच्याकडून खुलासा इच्छितो.

**राजेंद्र जैन :-**

रकवीजी आपने बोला जी.आर का जी.आर २ दिन का ३ दिन का बराबर है। लेकिन महानगरपालिका को अधिकार है अपना बढाने का।

**दिनेश जैन :-**

सुप्रिम कोर्ट का आदेश है लोकल बॉडी को अधिकार दिया है।

(सभागृहात गोंधळ)

**सुहास रकवी :-**

राजेंद्र जैन साहब इसका मतलब है हम लोग भी आपके साथ मतलब हमारे जो लोग है। अभी आपका २ दिन है हर साल हम मना रहे है ना। पर्युषण काल में महावीर जयंती है। हम लोग भी मनाते है मॅडम राज्य शासनाचा असेल त्याप्रमाणे करुन घ्या.

**मा. महापौर :-**

आपली भावना कळाली मला बसा जयंती भाई आप बैठिए। मैंने आपको अभी परमिशन नही दी। ध्रुवकिशोरजी आपको बोलना है तो बोलिए मैंने उनको परमिशन नही दी है।

**जयंतीलाल पाटील :-**

वोटिंग का राजकारण मत किजीए। वोटिंग का राजकरण कर रहे है आप।

(सभागृहात गोंधळ)

**प्रभात पाटील :-**

मा. महापौर मॅडम, मला फक्त प्रशासनाला विचारायच आहे राज्यशासनाचा जी.आर. काय आहे.

**मा. महापौर :-**

आपल्याला जवाब भेटणार आहे आपण बसुन जा.

**प्रभात पाटील :-**

त्या उत्तरावर माझा प्रश्न अवलंबुन आहे तुम्ही उत्तर द्या मला.

**जयंतीलाल पाटील :-**

१० ते २८ पासुन तुम्ही बोलता मटण मच्छी बंद करायची. २० ला आमचे गणपती आहेत. गणपती गौरी विसर्जन असल्यामुळे आम्हाला नैवेद्य दाखवावे लागते गौरीला.

**मा. महापौर :-**

आपल्याला परमिशन दिली नाही आपला वेळ येणार तेव्हा बोला बसुन जा.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

महापौर मॅडम, यह महासभे में जो भी विषय आता है आपकी परवानगी से आता है। और आप ही विषय को लेते है और यह ''ज'' के प्रस्ताव आते है जो हमारे सदस्य सन्मा. दिनेश जैन साहबने रखा है।

“ज” का प्रस्ताव, यह “ज” के प्रस्ताव में यह विषय आया है की पर्युषण पर्व पर यह मांस मटन मच्छी का जो भी दुकान है वह बंद रहना चाहिए। मॅडम १०० टक्के सही बात है। लेकिन आप जैन हो आपकी सरकार है तो आपने रेग्युलर विषय क्यों नही लिया यह “ज” के प्रस्ताव में क्यों लाया? आपको रेग्युलर विषय में लाना चाहिए था। आप भी जैन हो और जब भी यह पर्युषण पर्व आता है तो इसीकी राजनिती मिरा भाईंदर शहर का इतिहास खोलके देखो की हर हिंदु, मुस्लीम, सीख-इसाई, जैन हम सब एकसाथ मिलके रहते है कभी राजनिती किया नही है। उनको अगर त्योंहार है तो हम मुसलमान भाई वो दुकान बंद करते है। तो आपको यह रेग्युलर विषय में लाना चाहिए था। पिछले साल में आप भी एक सन्मा. नगरसेवक थे और महापौर कॅटलीन परेरा थी यह उसके रुलिंग है। यह उनके मिनिट्स है उसमें आपने कितना झगडा किया था की, हमको पुर्यषण पर्व पर इतना बंद होना चाहिए।

**मा. महापौर :-**

मैं आज भी उसपे कायम हूँ।

**ध्रुवकिशोर पाटील :-**

तो फिर आपने विषय क्यों नही लिया इसमें यह बताइए ना आपने “ज” के प्रस्ताव में क्यों लिया। यह दिनेश जैन का प्रस्ताव है। १० सप्टेंबर से लेकर २८ सप्टेंबर तक बंद रखने का दिनेश जैन ने किया है। तो इसका मैं स्वागत करता हूँ। अभिनंदन करता हूँ और दिनेश जैन के प्रस्ताव में मैं ध्रुवकिशोर पाटील अनुमोदन देता हूँ की यह ८ दिन बंद रहना चाहिए।

**मा. महापौर :-**

निलमताई बसुन जा पहिले त्यांना बोलु द्या.

**भगवती शर्मा :-**

महापौर मॅडम, यह विषय ४ से ५ साल के अंदर मैं ऐसी स्थिती हो रही है। जब भी पुर्यषण पर्व जब आता है तो यह विषय “ज” के माध्यम से आता है। एक तो ध्रुवकिशोर पाटिल जी ने जैसे कहाँ की रेग्युलर विषय मैं।

**मा. महापौर :-**

अगर आपको सेम चीज बोलनी है तो बैठ जाइए।

**भगवती शर्मा :-**

मुझे बोलने तो दिजीए ना आप मेरे सेन्टेन्स को पूरा ही नही करने देते।

**मा. महापौर :-**

आप रिपिट क्यों कर रहे हो फिर। ध्रुवकिशोरजी ने जो मांडा है वो आप क्यों मांड रहे।

**भगवती शर्मा :-**

हर चीज को जब कभी यह भी बोलते है इन सदस्योंने ऐसे बोला तब आप उनको नही बोलते। लेकिन जब इस पक्ष की तरफ से आता है हर बात दबा देते है।

**मा. महापौर :-**

आप कुछ नया कहिए तो मैं आपको बोलने दुंगी। बोलिए जल्दी आपको २ मिनिट दि जाती है।

**भगवती शर्मा :-**

पिछले बार भी जब ठराव हुआ था तब सभी सदस्योंने ऊस भावना का सन्मान करते हुए कहा था की ८ दिन है उसके अंदर मैं प्रशासन को पुछा गया था। प्रशासन ने जबाब दिया की २ दिन का जी आर है लेकिन हम बाकी के दिन के उस समय में नरेंद्र मेहता जी भी थे। बाकी दिन के अंदर में हम सभी को जो इस तरह के व्यवसाय करते है उनको रिक्वेस्ट करके धंदा बंद रखने के लिए कहेंगे। और पालन करने के लिए कहेंगे। प्रस्ताव होता है ठराव होता है इस बार भी यह ठराव हो रहा है। मै प्रशासन से आपके माध्यम से पुछना चाहता हूँ। जो आज ठराव होगा उसका परिपूर्ण पालन प्रशासन करेगा की नही। यह प्रशासन की तरफ से आप उत्तर इस महासभा के अंदर मै देने को अवश्य लगाइये। मेरी एक ही मांग है।

**मा. महापौर :-**

ठिक है ओके बोला निलमताई.

**निलम ढवण :-**

मा. महापौर मॅडम प्रत्येक वर्षी पर्युषण चा पिरेड आला की त्याच्या अगोदर हे वादविवाद नेहमी चालू राहतात. यामध्ये धार्मिक आणि जातीचे आपआपसात वाद निर्माण होतात. मी प्रशासनाला एक प्रश्न विचारते की या संदर्भात ९-१०-२०१४ ला आमच्या सन्मा. नगरसेविका तारा घरत यांनी शासनाकडे एक लेटर पाठविले होते आणि त्याच उत्तर आपल्या मिरा भाईदर महानगरपालिकेला देखील त्या संदर्भात माहिती ताबडतोब कळविण्यात यावी असा आदेश शासनाकडून इथे मिरा भाईदर महानगरपालिकेकडे आलेला होता तर त्या संदर्भात आपण त्याला उत्तर दिलय किंवा नाही. ते उत्तर पाहिजे. तर जे शासनाचे लेटर आले आहे ते मी वाचून दाखविते. मा. आयुक्त मिरा भाईदर महानगरपालिका विषय :- भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या घटनेचा होणारा अवमान व उल्लंघन तातडीने रोखने शहरातील धार्मिक व जातीय सलोखा व कायदा सुव्यवस्था राखण्यासाठी जैन धर्मियाच्या पवित्र पर्युषण पर्वाचा स्वार्थासाठी केला जाणरा राजकीय गैरवापर थांबविणे,राज्यशासन आदेशांचे पालन करणे व त्याचा प्रशासकीय राजकीय दुरूपयोग थांबविणे बाबत महोदय

उपरोक्त विषय संबधीचे सौ. तारा विनायक घरत नगरसेविका मिरा भाईंदर महानगरपालिका भाईंदर (प) जिल्हा ठाणे यांनी आपणास पाठविलेल्या व शासनास पुष्ठांकित केलेल्या दि. १९/०८/२०१४ रोजीच्या पत्राची प्रत सोबत जोडीत आहे. विषयांकित पत्राच्या अनुषंगाने आवश्यक कार्यवाही करून अर्जदारास परस्पर कळवावे तसेच केलेल्या कार्यवाही बाबतचे मुद्देनिहाय सविस्तर अहवाल आपल्या स्वयंस्पष्ट अभिप्रयासह शासनास विना विलंब सादर करावा ही विनंती आपल्या कक्ष अधिकारी, महाराष्ट्र शासन श्रीकांत जांभवडेकर त्यानंतर प्रशासनाने यांची पुर्तता केली आहे का? माहिती पाठविली आहे का?

**मा. महापौर :-**

ओके बसा आणखी कोणाला काय विचारायच?

**निलम ढवण :-**

नाही, मॅडम त्या नंतरचे आहे हे त्यांने प्रशासनाने जर पाठविली असती तर त्या संदर्भात शासनाचा निर्णय जो काही आहे तो आला होता तत्पूर्वी त्यांनी दोन दिवसांचा जो काही शासनाचा जी.आर आहे. तर मी या संदर्भात ठराव मांडू इच्छिते. मिरा भाईंदर महानगरपालिका सन्मा. सदस्य श्री. दिनेश जैन यांचा दि. २७/०८/२०१५ रोजीच्या पत्रान्वये दिलेला प्रस्तावाप्रमाणे आम्ही सर्व धर्माच्या भावनेचा आदर करतो परंतु या मिरा भाईंदर शहरात जैन धर्माबरोबर आगरी, कोळी, मराठी, मुस्लीम, ख्रिश्चन धर्माचे लोक सुध्दा राहत आहेत. त्यांच्या भावनांचा आदर करता पर्युषण पर्वामध्ये महाराष्ट्र शासनाच्या क्रमांक :- संकिर्ण-१०२००४/प्र.क्र.१२१/नगरविकास विभाग, मंत्रालय मुंबई - ४०००३२ दि. ०७/०९/२००९ च्या शासन निर्णयाद्वारे निर्देशाप्रमाणे प्रति वर्षात श्रावण वंद्य १२ व भाद्रपद ४ या दोन दिवशी राज्यातील सर्व कत्तलखाने व मांस विक्रीची दुकाने यंदाही २ दिवस कत्तलखाने बंद ठेवण्यात यावेत स्वइच्छेने बंद ठेवावे असे आवाहन महापौर मॅडमनी करावे असा मी ठराव मांडत आहे.

**जयंतीलाल पाटील :-**

माझे अनुमोदन आहे.

**नरेंद्र मेहता:-**

महापौर मॅडम दर वेळी हा विषय येतो अनेक विषय त्यामध्ये आले की ३ दिवसांच्या आत मगाशी सन्मा. सदस्य श्री. सुहास रकवी जी माझी काही शंका प्रशासन बरोबर आहे. सन्मा. डॉ. बाबासाहेब आंबेडकर ज्यावेळी घटना लिहिली त्यावेळी ३ दिवस बंद ठेवा हे ही त्यामध्ये म्हटल नव्हतं. त्यामध्ये शासनाने निर्णय घेतला म्हणजे कुठेही त्याचं अवमान किंवा अपमान केलेला नाही. शासनाला या महाराष्ट्रामध्ये हा निर्णय लागु केलेला फक्त मिरा भाईंदर शहरासाठी नाही. आणि त्यांनी सर्व धर्मांना मान देवून त्यांची जी काही मागणी होती ज्या ठिकाणी जैन कम्युनिटीची लोक त्या मोठ्या संख्येत किंवा राहत नसेल महाराष्ट्राच्या कानाकोपऱ्यात हा कायदा ३ दिवसांचा शासनाने लागू जी.आर. मार्फत केलेला आहे. मिरा भाईंदरमध्ये विशेष बाब अशी आहे की, मोठ्या प्रमाणात जैन समाजाची संख्या आहे आणि कोणालाही त्यांच खाण्यावर विरोध नाही. ते मासळी विक्रीला विरोध नाही. कत्तलखानाच डेफिनेशन या मिरा भाईंदरमध्ये आपण सर्वांना माहित आहे की, या शहरात कत्तलखाना त्याप्रकारचे नाही जसं मुंबई किंवा इतर राज्यात किंवा इतर शहरात आहेत. दुकान किंवा दुकानाच्या मागच्या बाजुला किंवा कुठेतरी गल्लीमध्ये कत्तल केले जातात मध्ये तक्रार आलेली. शास्त्रीनगरमध्ये सुध्दा कत्तल खाने केले जात होते आणि त्यावर तक्रार सुध्दा आपल्याकडे आलेली आहे. तर या छोट्या मोठ्या दुकानाच्या आतमध्येच १ मोरी टाइप बनवून त्याच्यातच ते कत्तल केले जाते आणि या प्रशासनाच्या निदर्शनास वारंवार आलेले आहे. मग त्याची व्याख्या ती आहे की ज्या ठिकाणी हे कत्तल होते ते ते कत्तलखाने मटण शॉप ७ दिवस त्यामध्ये १ दिवस जो शेवटचा दिवस आहे गणेशोत्सव ज्या दिवशी गणपती बाप्पा येतात. त्या दिवशी शेवटचा सातवा दिवस. ३ दिवस शासनाने बंद केला तर राहिले ३ दिवस श्रावणचा महिना आहे. खाण्याला आमची परत सांगतो की सभागृहाची ही हे नाही की खाण्यावर बंदी आणतो. त्या दिवशी पशुहत्या होऊ नये या समाजाची भावना असते आणि त्या भावना व्यक्त केलेली आहे. आणि सभागृहाचे आपले कर्तव्य आहे की ३ दिवस आपण ते कत्तलखाने बंद ठेवले तर कुठलाही मोठा काही नुकसान होणार नाही. ३ दिवस खायला मिळणार नाही किंवा खाण्यावर आम्ही बंदी आणतो हा ही विषय नाही. खाणारा व्यक्ती खाणारच आहे. मग ते कस करणार त्याच विषय आहे आणि राहीला प्रश्न आपल्याला तो निर्णय घेता येईल का? संविधानमध्ये आहे का? शासनाचा जी.आर. काय आहे? सुप्रिम कोर्टचे आदेश आहे का महानगरपालिकेवर त्यांनी असच केल आहे आणि त्यावर सुप्रिम कोर्टात हे मॅटर गेले आहे. आय रिस्पेक्टफुली स्टेट दॅट ॲन्ड सबमिट दॅट लुकींग टू द लाँग टर्म इंटरेस्ट ऑफ द सिटी ॲन्ड द हारमोनी विथ विच सिटीझन आर एक्सपेक्टेड टू द कॉर्पोरेशन इज वेल विथ द इट्स राईट फॉर क्लोजिंग डाऊन फॉर अ लिमिटेड पिरेड ऑफ टाईम. म्हणजे महानगरपालिकेला हे अधिकार आहेत त्यांना अस वाटत असेल तर तसं निर्णय ते टाईम बिईंगसाठी घेऊ शकतात. परमनन्ट आपण काही बोलत नाही जस मगाशी सांगितल की जे घटना लिहिली त्यामध्ये कुणाचेही हक्क मारत नाही. आणि दुसऱ्यांची धार्मिक भावना दुखवायचं कारणच नाही ना. एकाची हत्या नाही झाली तर दुसऱ्याची धार्मिक भावना दुखते का याच्यावरुन नक्कीच नाही दुखत. एखादे हे बोलु शकतात की व्यवसायिक व्यक्तीवर त्याचा अन्याय होत आहे किंवा व्यवसायिकांचा नुकसान होत आहे हे आपली भुमिका मांडू शकतात तर एखादा कत्तल नाही झाला म्हणजे धर्म दुखेल, धर्माला दुखेल अशातला भाग जराही नाही आणि परत सभागृहाला आमची हिच विनंती राहील की जैनांची संख्या मोठ्या प्रमाणात आहे ३३ पेक्षा जास्त जैन मंदिर या ठिकाणी आहेत. या महाराष्ट्रातले सर्वात मोठे बावन्न जिनालय तिर्थस्थान मंदिर या

मिरा भाईंदरमध्ये आहे आणि मिरा भाईंदरमध्ये सर्वात जास्त कुठले मंदिर असतील तर ते जैन धर्माचे मंदिर आहे आणि मोठ्या प्रमाणात संच आहे. आणि या संचाला सर्व धर्मात आपण नेहमी मान सन्मान देतो. जयंती साहेबांनी पण सांगितल विषय कोळी आगरीचे खाण्याचे मच्छीचा विषय नाही ना. आणि फक्त ७ दिवस त्यामध्ये १ दिवस आणि ३ दिवस आपण बंद ठेवतोच फक्त राहीला ३ दिवसांचा प्रश्न तर सभागृहाला ही विनंती राहील की सर्वांनी आपण एकमताने निर्णय घेऊया. आणि महापौर मॅडम जे विकणारे असतील आयुक्त महोदयांना विनंती राहील की त्यांना आपण बोलवुन विश्वासात घेऊन हा निर्णय तुम्ही पार पाडावे. जो आज ठराव मांडला आहे श्री. दिनेश जैन यांनी त्याच पालन व्हावे आणि त्या ठरावाच्या अनुषंगाने कारवाई व्हावी. ते दुकानदार ही या शहरातले भाग आहे. सर्व जातीधर्माचे लोक राहतात. त्यांनाही आपण विश्वासात घ्या. आम्ही अस बोलत नाही जाऊन त्यांची दुकाने बंद करा इमीजिएटली. त्यांना आगाऊ आपण बोलवून घ्या. त्यांना विनंती करा महापौर मॅडम आपण ही विनंती करा. आणि हा जो दिनेश जैनने ठराव मांडला आहे ते सर्वांनी एकमताने मंजुर करावे अशी माझी विनंती आहे.

**सुहास रकवी :-**

मा. महापौर मॅडम आमदारांनी सांगितल्याप्रमाणे मी घटनेमध्ये दोन दिवस तीन दिवस बंद ठेवा असा कुठेही उल्लेख नाही आणि बाबासाहेब आंबेडकरांनी घटनेच्या भाग तीन मुलभूत अधिकाराच्या कलम १३(२)मध्ये स्पष्ट म्हटल आहे. की घटनेने दिलेल्या मुलभूत अधिकांरांना हिरावून घेणारी अथवा त्यास बाधा आणणारे विसंगत असे आदेश कायदा राज्यशासन बनवू शकत नाही. त्याचप्रमाणे तसे केले तरी ते शुन्य म्हणजे बेकायदेशीर असतील असे म्हटले आहे कलम १४ च्या नुसार सर्वाना समान अधिकार दिले आहे आणि १५ नुसार जे व्यवसाय करतात व्यापार करतात त्या व्यापा-यावर तुम्ही त्यांचा रोजचा कालबाह्य निर्बंध लागवू शकत नाही इव्हन अल्सो महानगरपालिका तुम्ही ठराव ठेवला तरी राज्यशासन त्याच्यावर जी आर काढणार जस ७/९/२००४ रोजी हा जीआर निघालेला आहे की २ दिवसाचा तुम्ही राज्य शासन पर्युषण काळात मास जे विकणे आहे त्याच्यावर तुम्ही फक्त पालिकेतर्फे तुम्ही त्याच्या वर अंकुश आणु शकता बंद ठेवू शकता आणि आम्हाला जैन धर्माबद्दल अनादर आहे अस तुम्ही बोलु नका कारण की जैन धर्माची सुरूवात आमच्या मी पुन्हा सांगतो आमच्या बाजुच्या देवळाने झाली आहे आम्ही त्यांच सतत नामस्मरण असते महावीर भगवानचे असते सगळे देवतांच्या बरोबर आम्ही त्यांचाही मान करतो परंतु या लोकांच्या भावना या मिरा भाईदर शहरातल्या लोकांच्या भावना लक्षात घेता तुम्ही सुध्दा आम्हाला सहकार्य करा. आणि जे शासनाने निर्देश दिले त्याप्रमाणे तुम्ही ते पर्युषण काळातले ते दोन दिवस आहे ते बंद ठेवा. अशी आपल्याकडून आम्ही आमदार साहेब अपेक्षा ठेवतो. धन्यवाद.

**नरेंद्र मेहता :-**

सुप्रिम कोर्टच्या आदेशाची कॉपी मी आपल्याला देईन त्यामध्ये असे दुकानदार आहेत त्यांचे नाव सुध्दा यामध्ये आहे कुरेशी आणि आसिफ हे त्यांच्या याच राईटसाठी सुप्रिम कोर्टमध्ये गेले होते आणि सुप्रिम कोर्टने तो फेटाळला त्यांच्या आणि सांगितल जे कार्पोरेशन केले ३ दिवस आपण केले. सुप्रिम कोर्टने ज्यावेळी एखादा कार्पोरेशनचा निर्णय दिला तो एखाद्या कायद्याचाच भाग झाला आहे. आपण जे सांगितले घटना जी केली आहे ती घटना पूर्ण देशासाठी आहे. आपल्या मिरा भाईंदर आणि महाराष्ट्रसाठी वेगळी नाही आणि हा जो विषय आहे ते सगळ त्यामध्ये डिटेलमध्ये दिलेले आहे ते आपण ऑर्डर वाचली तर त्यामध्ये अस महानगरपालिकेला करता येते आणि कुठल्याही अशा घटनेचा आपण अनादर करत नाही.

**अशरफ शेख :-**

आमदार साहेब आता तुम्ही जे वाचले आहे ते ऑर्डर वाचली. त्याच्यात तुम्ही स्वतः म्हटल की द म्युनिसिपल कार्पोरेशन इज इम्पावरर्ड टू क्लोज डाऊन द शॉप फॉर अ लिमिटेड पिरेड. कुठे लिहिले ७ दिवस, १० दिवस तस तर कुठेच लिहिले नाही त्या ऑर्डरमध्ये. महापौर मॅडम, या शहरामध्ये कमीत कमी ३५० .....................

**नरेंद्र मेहता :-**

हा जो ऑर्डर आहे त्यातील एकच पॅरेग्राफ वाचला पूर्ण वाचला नाही. साहेबांनी म्हणून ७ दिवस बंद केल म्हणून त्यांनी सांगितल की लिमिटेड पिरेडसाठी तुम्ही करु शकतात. ७ दिवस यामध्ये आह का ऑर्डरमध्ये एका महानगरपालिकेने केलय.

**अशरफ शेख :-**

आता तुम्ही म्हटल फॉर अ लिमिटेड पिरेड. ठिक आहे महापौर मॅडम, या शहरामध्ये कमीत कमी ३५० खाटिक राहतात. त्या लोकांची दुकाने आहेत ते ७ दिवस जर बंद ठेवतील मग त्यांच्या बिजनेसच काय होणार त्यांना मोबदला कोण देणार?

**नरेंद्र मेहता :-**

हे शब्द शोभनीय आहे का? घाटी शब्द वापरणे शोभनीय आहे का.

**अशरफ शेख :-**

खाटिक मराठीमध्ये कसाई, त्याला खाटिक म्हणतो कसाब. ३५० दुकाने आहेत. मॅडम ७ दिवस बंद ठेवल्यावर त्याचा मोबदला कोण देणार?

**मा. महापौर :-**

मला वाटते आपल्या सगळ्यांची भावना मला कळालेली आहे. आपण मतदानासाठी ठेवूया. ज्यांना ज्यांच्यासाठी मतदान करायचे त्यांनी करा. सचिवसाहेब मतदान घ्या.

(सभागृहात गोंधळ)

**नगरसचिव :-**

प्रकरण ८० करिता दोन ठराव आलेले आहेत. पहिला ठराव श्री. दिनेश जैन, दुसरा ठराव सौ. निलम ढवण यांचा. अनुक्रमे मी दुसरा ठराव मतदानास टाकतो. निलम ढवण यांनी मांडलेल्या ठरावाच्या बाजुने असतील त्यांनी हात वर करायचे आहे.

**मा. महापौर :-**

इनामदार साहेब आपण बसुन जा. मी मतदानाला सांगितल आहे. सचिव आपण मतदान घ्या.

**नगरसचिव :-**

निलम ढवण यांनी मांडलेल्या ठरावाच्या बाजुने असतील त्यांनी हात वर करायचे आहेत. या ठरावाच्या विरोधात असतील त्यांनी हात वर करायचे आहेत. तटस्थ असतील त्यांनी हात वर करायचे आहे. श्री. दिनेश जैन यांनी मांडलेल्या ठरावाच्या बाजुने असतील त्यांनी हात वर करायचे आहेत.

**नरेंद्र मेहता :-**

त्यावेळी ध्रुवकिशोर पाटील साहेब आणि निलम ढवण यांनी मांडला त्यावेळी त्यांचा हात वर होता. सुरेश खंडेलवाल आणि ध्रुवकिशोर पाटील यांचा ही हात वर होता.

**आसिफ शेख :-**

आम्ही तटस्थ यासाठी लावला की तुमची या विषयावरुन आपण राजकारण करतात.

**नगरसचिव :-**

एकदा मतदान झाले आहे. डबल नही आएगा। हात खाली घ्या. श्री. दिनेश जैन यांच्या ठरावाच्या विरोधात असतील त्यांनी हात वर करायचे आहेत. तटस्थ कोण आहे.

**मा. महापौर :-**

सूचक श्री. दिनेश जैन यांनी मांडलेल्या ठरावाच्या बाजुने २९, विरोधात २७, तटस्थ ४ इतकी मते पडली आहेत. श्री. दिनेश जैन यांनी मांडलेला ठराव बहुमताने मंजुर करण्यात येत आहे.

**प्रकरण क्र. ८० :-**

सन्मा. सदस्य श्री. दिनेश जैन यांचा दिनांक २७/०८/२०१५ रोजीच्या पत्रान्वये दिलेला प्रस्ताव. -- जैन समाजाच्या पर्युषण पर्वामध्ये कत्तलखाने बंद ठेवणेबाबत.

**ठराव क्र. ५४ :-**

मिरा भाईंदर शहरातील सर्व समाज एकत्र व खेळीमेळीने राहत असून जैन समाजाच्या बांधवांचे देखील मिरा भाईंदर शहरात मोठ्या संख्येने वास्तव्य आहे. जैन समाजाचे पर्युषण पर्व सुरु होणार असून सदर पर्युषण पर्वामध्ये जैन बांधवांनी आपल्याकडे अशा पवित्र पुर्यषण पर्वामध्ये कोणत्याही प्रकारे पशुहत्या होवू नये अशी भावना आहे.

सदर भावनेच्या आदरार्थ जैन बांधवांच्या श्वेतांबर व दिगंबर समाजाच्या पर्युषण पर्वामध्ये मांस, मटणाची दुकाने बंद ठेवण्यात यावीत असा ठराव मांडत आहे.

**सुचक :- श्री. दिनेश जैन** **अनुमोदक :- श्री. अश्विन कासोदरिया**

| अ.क्र. | ठरावाच्या बाजूने | अ.क्र. | ठरावाच्या विरोधात | अ.क्र. | तटस्थ |
|---|---|---|---|---|---|
| १ | मेहता नरेंद्र लालचंद | १ | डिमेलो बर्नड अल्बर्ट | १ | ध्रुवकिशोर पाटील |
| २ | शरद केशव पाटील | २ | भावसार शिल्पा कमलेश | २ | खण्डेलवाल सुरेश |
| ३ | पाटील रोहिदास शंकर | ३ | सँन्ड्रा जेफ्री रॉड्रीक्स | ३ | डॉ. आसिफ शेख |
| ४ | म्हात्रे कल्पना महेश | ४ | दक्षता राजेंद्र ठाकूर | ४ | अशोक तिवारी |
| ५ | भानुशाली वर्षा गिरीधर | ५ | पाटील वंदना विकास | ५ | अनिल बाबुराव भोसले |
| ६ | मीरादेवी रामलाल यादव | ६ | प्रभात प्रकाश पाटील | | |
| ७ | कोठारी सुमन रमेश | ७ | पाटील सुनिता कैलास | | |
| ८ | डॉ. नयना मनोज वसाणी | ८ | झिनत रऊफ कुरेशी | | |
| ९ | सिमा कमलेश शहा | ९ | पुजारी कांचना शेखर | | |
| १० | जैन गिता भरत | १० | डिसा मर्लिन मर्विन | | |
| ११ | अरोरा दिपिका पंकज | ११ | वंदना रामदास चक्रे | | |
| १२ | रावल भगवती जयशंकर | १२ | इनामदार जुबेर | | |
| १३ | मेहता डिंपल विनोद | १३ | वेतोसकर राजेश शंकर | | |
| १४ | मेघना दिपक रावल | १४ | शेख अशरफ मोहम्मद इब्राहिम | | |
| १५ | शर्मा सुनिला सत्येंद्र | १५ | सुर्यकांत खंडोजी म्हात्रे | | |
| १६ | प्रतिभा प्रकाश तांगडे-पाटील | १६ | सामंत प्रमोद जयराम | | |
| १७ | सुजाता रविकांत शिंदे | १७ | रकवी सुहास माधवराव | | |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| १८ | पाटील प्रेमनाथ गजानन | १८ | नरेश तुकाराम पाटील | |
| १९ | सिंग मदन उदितनारायण | १९ | भोईर कमलेश यशवंत | |
| २० | कांगणे यशवंत ठकाजी | २० | निलम हरिश्चंद्र ढवण | |
| २१ | कासोदरीया अश्विन श्यामजी | २१ | जयमाला किशोर पाटील | |
| २२ | जैन दिनेश तेजराज | २२ | परमार अनिता भरत | |
| २३ | जैन रमेश धरमचंद | २३ | गावंड मंदाकिणी आत्माराम | |
| २४ | डॉ. राजेंद्र जैन | २४ | संध्या प्रफुल्ल पाटील | |
| २५ | शाह राकेश रतिशचंद्र | २५ | प्रविण मोरेश्वर पाटील | |
| २६ | केळुसकर प्रशांत नारायण | २६ | ठाकुर अरविंद दत्ताराम | |
| २७ | मुन्ना सिंग | २७ | जयंतीलाल गुरुनाथ पाटील | |
| २८ | दिप्ती शेखर भट | | | |

**ठराव बहुमताने मंजूर**

**सही/-**
**महापौर**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

**नगरसचिव :-**

प्रकरण क्र. ८१, सन्मा. सदस्य श्री. ध्रुवकिशोर पाटील यांचा दिनांक २७/०८/२०१५ रोजीच्या पत्रान्वये दिलेला प्रस्ताव. -- भाईंदर (प.) येथील दर रविवारी भरणारा आठवडा बाजाराची बाजार सिमा निश्चित करणेबाबत.

**नरेंद्र मेहता :-**

महापौर मॅडम आजच्या सभेत आपण बघितल तर ज चा प्रस्ताव हा मोठ्या प्रमाणात आहे. आता जिथपर्यंत मला थोडेफार ज्ञान आहे एक विषय एका सदस्यांनी दोन पेक्षा जास्त ज चे प्रस्ताव देता येत नाही. दुसर सभागृहाला विनंती राहिल मग ते सत्ताधारी असु द्या, विरोधक असु द्या. कारण ज च्या प्रस्तावामध्ये लांबलचक विषय येतात आणि सभागृह पण लांबते त्यामध्ये अनेक चुका पण होतात. सभागृहाला महापौर मॅडम आपल्याला विनंती राहील की जास्तीत जास्त ५ प्रस्ताव हे यापुढे या सभागृहाने २ विरोधकांचे, ३ सत्ताधाऱ्यांचे याप्रकारे आपण आणले.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

अजिबात नाही.

**नरेंद्र मेहता :-**

महापौर मॅडम विषय खाली एवढाच आहे की शेवटी आज जे प्रस्ताव आले ठिक आहे. आमच्या लोकांनी दिले विरोधकांनी दिले. सेनाने सगळ्यांनी दिले प्रस्ताव पण शेवटी कुठे तरी हे किती प्रस्ताव आणायचे यावर एक अंतिम निर्णय झाला पाहिजे. सभागृहाला विनंती आहे आम्ही कोणाचेही कुठल्याही सदस्यांच्या हक्कावर गदा आणत नाही पण एक आपण ठरवल तर त्याप्रमाणे पुढील सभेमध्ये सत्ताधारी असु द्या, विरोधक असु द्या शेवटी संख्या किती हे नक्की आपल्याला करता येईल अशी सभागृहाला विनंती आहे की यापुढे आपण सर्वांच्या सहमती होत असेल तर ५ प्रस्ताव आपण आणावे अशी विनंती आहे.

**भगवती शर्मा :-**

महापौर मॅडम, सचिव साहेब नियमामध्ये काय आहे? आम्ही किती आणु शकतो.

**मा. महापौर :-**

भगवतीजी नियम नही है वो पेहलेही बात हो गई। नियम नही है, इन्होंने विनंती की है।

**भगवती शर्मा :-**

लेकिन बदल करु शकतो का?

**मा. महापौर :-**

बदल करु शकत नाही. बदलायच नाही ही फक्त एक विनंती आहे.

**जुबेर इनामदार :-**

४५५ अंतर्गत बदल करु शकतात. कार्यपध्दत अवलंबुन करायचे आहे का उपविधीमध्ये.

**मा. महापौर :-**

आपण बसुन जा.

**दिनेश नलावडे :-**

महापौर मॅडम, आता जे आमदार साहेब बोलले की किती विषय ज च्या प्रस्तावाखाली घ्यायला पाहिजे मॅडम अगोदर ही महासभेत होते. अगोदर कॉंग्रेस राष्ट्रवादी सत्तेमध्ये होती. महापौर मॅडम ज्यावेळी सत्ताधारी आहे जे सत्ताधारी असतील त्यांचे जर फक्त ज चे प्रस्ताव येत असतील आज आमच्याकडे विषय आहे पण आमचे विषय जेव्हा येतात त्यावेळी सभा संपलेली असते आणि खर म्हणजे जर तुम्ही विषय घेत आहेत तर तुमच्याकडे विषय आहेत ना मग ज चा प्रस्ताव ॲक्चुअली सत्ताधाऱ्यांना द्यायची काय गरज नाही ते विरोधांसाठी आहे. कारण विरोधकाला बोलायला मिळत नाही. आज पण आम्ही पाहिल सत्ताधारीच बोलतात.

विषय पण तुमचे, ज चे प्रस्ताव देखील तुमचेच आहेत. विरोधक नाहीत का. विरोधकांना मान द्या काहीतरी. ज चे प्रस्ताव विरोधकांसाठी ठेवा. मग ते तुम्ही किती ठेवणार तुमचा विषय.

**मा. महापौर :-**

नलावडेजी विरोधकांना कुठेही थांबविले नाही.

**दिनेश नलावडे :-**

पण आज बोलायलाच मिळत नाही मॅडम. आम्हालाही काहीतरी विषय असतात या शहराच आम्हालाही देण घेण आहे ना. पण आम्हाला बोलायलाच मिळत नाही. तुम्ही आमच्या सारख्यांना बसवता आणि सत्ताधाऱ्यांनाच बोलायला देतात.

**प्रशांत केळुसकर :-**

सदर विषयाबाबत सविस्तर लेखी माहिती सादर करुन सदर विषय प्रशासनामार्फत सादर करण्यात यावा असा मी ठराव मांडत आहे.

**नरेंद्र मेहता :-**

माझे अनुमोदन आहे.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

बघितल महापौर मॅडम, हे आता आमच्या हक्कावरती पण गदा आणतात. ज च्या प्रस्तावाने आम्ही प्रशासनाच्या निदर्शनास आणुन देतो हे जे चालले आहे ते किती चुकीचे आहे. आमदार साहेब ऐका आम्ही ज चा प्रस्ताव का आणला. सत्ता तुमची आहे विषय तुम्ही महापौरांच्या माध्यमातून आणु शकता आम्ही नाही आणु शकत. आम्ही प्रशासनाला सांगितल की साहेब हा बघा बाजार पहिला बाजार एवढासा होता. ज्यावेळी आपली नगरपालिका महानगरपालिका होती. बाजार पोलिस स्टेशनपासुन ते आपल्या जुन्या नगरपालिका पर्यंत होता.

**नरेंद्र मेहता :-**

महापौर मॅडम, विषय परत घेऊ असा ठराव मांडला आहे. रितसर आपण आणुया ना.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

प्रस्ताव माझा आहे आणि तुम्ही मलाच बोलु देणार नाही म्हणजे काय? मला बोलायला दिले पाहिजे ना.

**जुबेर इनामदार :-**

खर तर सत्ताधाऱ्यांनी ज चा प्रस्ताव आणायलाच नाही पाहिजे. ज चा प्रस्ताव विरोधकांसाठी आहे.

**राजेंद्र जैन :-**

ऐसा कहाँ लिखा है जुबेर भाई.

**निलम ढवण :-**

महापौर मॅडम, ज चा प्रस्ताव सत्ताधाऱ्यांनी आणु नये म्हणतात तर मागच्या सत्तेत असताना लक्षवेधी पण सत्ताधारी टाकत होते. आमचा जर विषय आला नाही विषयपत्रिकेत आणि अरजंट असेल इमरजन्सी तर आम्हाला घेऊ द्या ना.

**मा. महापौर :-**

ध्रुवकिशोरजी मला वाटते वेळ कमी आहे. मी विनंती करेल की वेळ न घालवता जेव्हा सांगितल आहे की पुढच्या मिटींगमध्ये घेऊ तर तुमचच पुढच आहे तुम्ही पुढच घ्या.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

भाईंदर (प) येथे गेल्या अनेक वर्षापासून दर रविवारी आठवडा बाजार भरत असतो. सदरचा बाजार पुर्वी भाईंदर पोलीस स्टेशन ते नवीन महापालिका कार्यालयापर्यंत मर्यादित होता. परंतु कालांतराने बाजाराची सीमा वाढत गेली आजमितीस हा आठवडा बाजार नगर भवन पासून पोलीस स्टेशन ते जुने क्रॅांग्रेस ऑफीस पर्यंत आता पुढे बॉम्बे मार्केट पर्यंत फेरीवाले बसत आहेत. रविवार संध्याकाळी देवचंद नगर ते ६० फुटी रोड आनंद नगर पर्यंत फेरीवाले बसत आहेत. भाईंदर पश्चिमेस रहदारी करीता छत्रपती शिवाजी मार्ग (स्टेशन रोड) व डॉ. बाबासाहेब आंबेड्कर (६० फूटी रोड) दोनच रस्ते असल्यामुळे दर रविवारी वाहतुकीस मोठ्या प्रमाणात अडथळा निर्माण होऊन वाहतुकीची कोंडी होऊन समस्या आणखीनच बिकट होत चालली आहेत.

तरी महापालिका प्रशासनाने भाईंदर (प.) ची वाहतुक कोंडी काही प्रमाणात कमी करणेकरीता आठवडा बाजाराची सिमा राजेश हॉटेल पर्यंत मर्यादित ठेऊन त्यापुढे बसणा-या फेरीवांल्यावर कारवाई करण्यात यावी असा मी ठराव मांडत आहे.

**सुरेश खंडेलवाल :-**

माझे अनुमोदन आहे.

**मा. महापौर :-**

ठराव मतदानाला घ्या.

**नगरसचिव :-**

प्रकरण क्र. ८१ करिता दोन ठराव आलेले आहेत. पहिला ठराव सुचक श्री. प्रशांत केळुसकर, दुसरा ठराव श्री. ध्रुवकिशोर पाटील. सुचक श्री. ध्रुवकिशोर पाटील यांच्या ठरावाच्या बाजूने असतील त्यांनी हात वर करायचे आहे. या ठरावाच्या विरोधात असतील त्यांनी हात वर करायचे आहेत. तटस्थ असतील त्यांनी हात

वर करायचे आहे. श्री. प्रशांत केळुसकर यांच्या ठरावाच्या बाजूने असतील त्यांनी हात वर करायचे आहेत. या ठरावाच्या विरोधात असतील त्यांनी हात वर करायचे आहेत. तटस्थ असतील त्यांनी हात वर करायचे आहे.

**मा. महापौर :-**

सूचक श्री. प्रशांत केळुसकर यांनी मांडलेल्या ठरावाच्या बाजूने ३८, विरोधात १९ तटस्थ १ इतकी मते पडली आहेत. सूचक श्री. प्रशांत केळुसकर यांचा ठराव बहुमताने मंजूर करण्यात येत आहे.

**प्रकरण क्र. ८१ :-**

सन्मा. सदस्य श्री. ध्रुवकिशोर पाटील यांचा दिनांक २७/०८/२०१५ रोजीच्या पत्रान्वये दिलेला प्रस्ताव. -- भाईंदर (प.) येथील दर रविवारी भरणारा आठवडा बाजाराची बाजार सिमा निश्चित करणेबाबत.

**ठराव क्र. ५५ :-**

सदर विषयाबाबत सविस्तर लेखी माहिती सादर करुन सदर विषय प्रशासनामार्फत सादर करण्यात यावा असा मी ठराव मांडत आहे.

**सुचक :- श्री. प्रशांत केळुसकर          अनुमोदक :- श्री. नरेंद्र मेहता**

| अ.क्र. | ठरावाच्या बाजूने | अ.क्र. | ठरावाच्या विरोधात | तटस्थ |
|---|---|---|---|---|
| १ | मेहता नरेंद्र लालचंद | १ | ध्रुवकिशोर पाटील | १ सुर्यकांत खंडोजी म्हात्रे |
| २ | शरद केशव पाटील | २ | डिमेलो बर्नड अल्बर्ट | |
| ३ | पाटील रोहिदास शंकर | ३ | शिल्पा भावसार | |
| ४ | म्हात्रे कल्पना महेश | ४ | सँन्ड्रा जेफ्री रॉड्रीक्स | |
| ५ | भानुशाली वर्षा गिरीधर | ५ | दक्षता राजेंद्र ठाकुर | |
| ६ | मीरादेवी रामलाल यादव | ६ | पाटील वंदना विकास | |
| ७ | कोठारी सुमन रमेश | ७ | पाटील सुनिता कैलास | |
| ८ | डॉ. नयना मनोज वसाणी | ८ | पुजारी कांचना शेखर | |
| ९ | सिमा कमलेश शहा | ९ | डिसा मर्लिन मर्विन | |
| १० | जैन गिता भरत | १० | वंदना रामदास चक्रे | |
| ११ | अरोरा दिपिका पंकज | ११ | इनामदार जुबेर | |
| १२ | रावल भगवती जयशंकर | १२ | वेतोसकर राजेश शंकर | |
| १३ | मेहता डिंपल विनोद | १३ | शेख अशरफ मोहम्मद इब्राहिम | |
| १४ | मेघना दिपक रावल | १४ | सामंत प्रमोद जयराम | |
| १५ | शर्मा सुनिला सत्येंद्र | १५ | खण्डेलवाल सुरेश | |
| १६ | प्रतिभा प्रकाश तांगडे-पाटील | १६ | डॉ. आसिफ शेख | |
| १७ | सुजाता रविकांत शिंदे | १७ | नरेश तुकाराम पाटील | |
| १८ | पाटील प्रेमनाथ गजानन | १८ | भोईर कमलेश यशवंत | |
| १९ | सिंग मदन उदितनारायण | १९ | अशोक तिवारी | |
| २० | कांगणे यशवंत ठकाजी | | | |
| २१ | अनिल बाबुराव भोसले | | | |
| २२ | कासोदरीया अश्विन श्यामजी | | | |
| २३ | जैन दिनेश तेजराज | | | |
| २४ | जैन रमेश धरमचंद | | | |
| २५ | डॉ. राजेंद्र जैन | | | |
| २६ | निलम हरिश्चंद्र ढवण | | | |
| २७ | शुभांगी महिन कोटियन | | | |
| २८ | जयमाला किशोर पाटील | | | |
| २९ | परमार अनिता भरत | | | |
| ३० | गावंड मंदाकिणी आत्माराम | | | |
| ३१ | संध्या प्रफुल्ल पाटील | | | |
| ३२ | प्रविण मोरेश्वर पाटील | | | |
| ३३ | ठाकुर अरविंद दत्ताराम | | | |
| ३४ | शाह राकेश रतिशचंद्र | | | |
| ३५ | जयंतीलाल गुरुनाथ पाटील | | | |
| ३६ | केळुसकर प्रशांत नारायण | | | |
| ३७ | मुन्ना सिंग | | | |
| ३८ | दिप्ती शेखर भट | | | |

**ठराव बहुमताने मंजूर**

**सही/-**
**महापौर**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

**नगरसचिव :-**

प्रकरण क्र. ८२, सन्मा. सदस्य श्री. ध्रुवकिशोर पाटील यांचा दिनांक २७/०८/२०१५ रोजीच्या पत्रान्वये दिलेला प्रस्ताव. -- सन्मा. पंतप्रधान यांनी सुरु केलेल्या "डिजीटल इंडिया वीक" मिरा भाईंदर महापालिकेचा कारभार पेपरलेस करणेबाबत.

**प्रशांत केळुसकर :-**

सदर विषयाबाबत सविस्तर लेखी माहिती सादर करुन सदर विषय प्रशासनामार्फत सादर करण्यात यावा असा मी ठराव मांडत आहे.

**शरद पाटील :-**

माझे अनुमोदन आहे.

**आसिफ शेख :-**

महापौर मॅडम, प्रस्ताव आणला सन्मा. सदस्य ध्रुवकिशोर पाटील यांनी कथा त्यांची व्यथा. पण त्यांनीच मांडली आहे. इथे कथा कुणाची व्यथा कुणाची चाललय काय? आप लोग इन सदस्यों के अधिकार पर अनर्थ कर रहे हो। मेजोरिटी रहा तो क्या हो गया।

**मा. महापौर :-**

ते बोलतात तुम्ही तुमच मांडा ना.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

एवढा चांगला विषय होता मॅडम ॲक्च्युअली हा विषय तुम्ही घ्यायला पाहिजे होता. पण दुर्देव तुमच हे आम्ही घेतलं. विचार करा सन्मा. आपले आदरणीय पंतप्रधान मंत्री आहत.

**मा. महापौर :-**

ठराव वाचायचा आहे का मंजुर करु.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

अस कस आम्हाला मत मांडायचा अधिकार आहे. तुम्ही बोलु पण देत नाही. हा विषय ॲक्च्युअली तुम्ही घ्यायला पाहिजे. आम्ही घेतला तुम्ही आमच अभिनंदन केल पाहिजे. भारताचे सन्मा पंतप्रधान यांनी "**डिजीटल इंडिया वीकची** सुरुवात केली गेल्या काही दिवसात करण्यांत आलेली आहे. या योजने अंर्तगत इंटरनेटच्या माध्यमातून शहर,ग्राम पंचायत एकमेकांना जोडून देशाचा चेहरामोहरा बदलून पारदर्शक व्यवहार, कार्यक्षम प्रशासन, भ्रष्टाचार निर्मुलन ई. स्वप्ने उराशी बाळगून डिजीटल इंडियाची संकल्पना राबविणारा आहेत.

याच धर्तीवर आपल्या महापालिकेच्या कार्यालयात असणारा फाईलींचा ढिगारा, कागदपत्रांची भरलेली टेबले,कपाटे, झेरॉक्स वर होणार अवाढव्य खर्च, ई. खर्च वाचविण्यासाठी मनपाचा कारभार पेपरलेस होणे आवश्यक आहे.महापालिकेने सन्मा.नगरसेवक/नगरसेविका यांना महापालिका फंडातून गेल्या वर्षी टॅब देण्यांत आलेले होते. सदर टॅब हे महापालिका बैठकींचे इतिवृत्तांत,अजेंडा,गोषवारा छपाई न करता सर्वांना ई-मेल ने पाठवुन पेपरलेस करण्याच्या दृष्टीने वाटप करण्यांत आलेले होते. अजुनही महापालिका महासभा, स्थायी समिती सभा, यांचे गोषवारा, इतिवृत्तांत तसेच इतर महत्वाच्या कार्यक्रमाची माहिती छपाई करुन सन्मा नगरसेवक/नगरसेविका यांच्या घरी किंवा कार्यालयात पोहच केली जात आहे. त्यामुळे महापालिकेचा झेरॉक्स व छपाई खर्च तर वाढतोच तसेच सदर इतिवृत्तांत वाटप करणेत कर्मचारी यांचा वेळही वाया जात आहे. त्यामुळे महापालिकेचा खर्च वाचविण्याकरीता व सन्मा. पंतप्रधान यांनी सुरु केलेल्या डिजीटल इंडिया मोहिमेत आपण ही सहभागी होऊन मिरा भाईंदर महापालिकेचा कारभार पेपरलेस करावा असा मी ठराव मांडत आहे.

**आसिफ शेख :-**

माझे अनुमोदन आहे.

**नगरसचिव :-**

प्रकरण क्र. ८२ करिता दोन ठराव आलेले आहे. पहिला ठराव सूचक श्री. प्रशांत केळुसकर, दुसरा ठराव सुचक श्री. ध्रुवकिशोर पाटील यांचा. श्री. ध्रुवकिशोर पाटील यांच्या ठरावाच्या बाजूने असतील त्यांनी हात वर करायचे आहेत. या ठरावाच्या विरोधात असतील त्यांनी हात वर करायचे आहेत. तटस्थ असतील त्यांनी हात वर करायचे आहे. श्री. प्रशांत केळुसकर यांच्या ठरावाच्या बाजूने असतील त्यांनी हात वर करायचे आहेत. या ठरावाच्या विरोधात असतील त्यांनी हात वर करायचे आहेत. तटस्थ असतील त्यांनी हात वर करायचे आहे.

**मा. महापौर :-**

श्री. प्रशांत केळुसकर यांनी मांडलेल्या ठरावाच्या बाजूने ३८, विरोधात २९ इतकी मते पडलेली आहेत. श्री. प्रशांत केळुसकर यांनी मांडलेला ठराव बहुमताने मंजूर करण्यात येत आहे.

**प्रकरण क्र. ८२ :-**

सन्मा. सदस्य श्री. ध्रुवकिशोर पाटील यांचा दिनांक २७/०८/२०१५ रोजीच्या पत्रान्वये दिलेला प्रस्ताव.

-- सन्मा. पंतप्रधान यांनी सुरु केलेल्या "डिजीटल इंडिया वीक" मिरा भाईंदर महापालिकेचा कारभार पेपरलेस करणेबाबत.

**ठराव क्र. ५६ :-**

सदर विषयाबाबत सविस्तर लेखी माहिती सादर करुन सदर विषय प्रशासनामार्फत सादर करण्यात यावा असा मी ठराव मांडत आहे.

**सुचक :- श्री. प्रशांत केळुसकर** **अनुमोदक :- श्री. शरद पाटील**

| अ.क्र. | ठरावाच्या बाजूने | अ.क्र. | ठरावाच्या विरोधात | तटस्थ |
|---|---|---|---|---|
| १ | मेहता नरेंद्र लालचंद | १ | ध्रुवकिशोर पाटील | |
| २ | शरद केशव पाटील | २ | डिमेलो बर्नड अल्बर्ट | |
| ३ | पाटील रोहिदास शंकर | ३ | शिल्पा भावसार | |
| ४ | म्हात्रे कल्पना महेश | ४ | सॅन्ड्रा जेफ्री रॉड्रीक्स | |
| ५ | भानुशाली वर्षा गिरीधर | ५ | दक्षता राजेंद्र ठाकुर | |
| ६ | मीरादेवी रामलाल यादव | ६ | पाटील वंदना विकास | |
| ७ | कोठारी सुमन रमेश | ७ | पाटील सुनिता कैलास | |
| ८ | डॉ. नयना मनोज वसाणी | ८ | पुजारी कांचना शेखर | |
| ९ | सिमा कमलेश शहा | ९ | डिसा मर्लिन मर्विन | |
| १० | जैन गिता भरत | १० | वंदना रामदास चक्रे | |
| ११ | अरोरा दिपिका पंकज | ११ | इनामदार जुबेर | |
| १२ | रावल भगवती जयशंकर | १२ | वेतोसकर राजेश शंकर | |
| १३ | मेहता डिंपल विनोद | १३ | शेख अशरफ मोहम्मद इब्राहिम | |
| १४ | मेघना दिपक रावल | १४ | सुर्यकांत खंडोजी म्हात्रे | |
| १५ | शर्मा सुनिला सत्येंद्र | १५ | सामंत प्रमोद जयराम | |
| १६ | प्रतिभा प्रकाश तांगडे-पाटील | १६ | खण्डेलवाल सुरेश | |
| १७ | सुजाता रविकांत शिंदे | १७ | डॉ. आसिफ गुलाब शेख | |
| १८ | पाटील प्रेमनाथ गजानन | १८ | भोईर कमलेश यशवंत | |
| १९ | सिंग मदन उदितनारायण | १९ | अशोक तिवारी | निरंक |
| २० | कांगणे यशवंत ठकाजी | | | |
| २१ | अनिल बाबुराव भोसले | | | |
| २२ | कासोदरीया अश्विन श्यामजी | | | |
| २३ | जैन दिनेश तेजराज | | | |
| २४ | जैन रमेश धरमचंद | | | |
| २५ | डॉ. राजेंद्र जैन | | | |
| २६ | निलम हरिश्चंद्र ढवण | | | |
| २७ | शुभांगी महिन कोटियन | | | |
| २८ | जयमाला किशोर पाटील | | | |
| २९ | परमार अनिता भरत | | | |
| ३० | गावंड मंदाकिणी आत्माराम | | | |
| ३१ | संध्या प्रफुल्ल पाटील | | | |
| ३२ | प्रविण मोरेश्वर पाटील | | | |
| ३३ | ठाकुर अरविंद दत्ताराम | | | |
| ३४ | शाह राकेश रतिशचंद्र | | | |
| ३५ | जयंतीलाल गुरुनाथ पाटील | | | |
| ३६ | केळुसकर प्रशांत नारायण | | | |
| ३७ | मुन्ना सिंग | | | |
| ३८ | दिप्ती शेखर भट | | | |

**ठराव बहुमताने मंजूर**

**सही/-**
**महापौर**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

**नगरसचिव :-**

प्रकरण क्र. ८३, सन्मा. सदस्य श्री. ध्रुवकिशोर पाटील यांचा दिनांक २७/०८/२०१५ रोजीच्या पत्रान्वये दिलेला प्रस्ताव. -- भाईंदर (प.) येथील भारतरत्न प. भिमसेन जोशी रुग्णालय (टेंभा हॉस्पीटल) सुरु करणेबाबत.

**प्रशांत केळुसकर :-**

सदर विषयाबाबत सविस्तर लेखी माहिती सादर करुन सदर विषय प्रशासनामार्फत सादर करण्यात यावा असा मी ठराव मांडत आहे.

**शरद पाटील :-**

माझे अनुमोदन आहे.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

आदरणीय महापौर मॅडम, आता बघा दोन विषय घेतले तरी त्यांनी सांगितले पुढे घ्या हा तर किती महत्वाचा विषय आहे. आणि याच विषयाकरिता आमचे आमदार साहेब पोटतिडकीने मागे सभागृह बोलवले होते. बरोबर की नाही हे हॉस्पीटल लवकरात लवकर सुरु व्हायला पाहिजे अस तुम्ही बोलला होता. हे आता आम्ही बोलतोय. आणि आता तुम्ही सांगता की पुढच्या मिटींगमध्ये घ्या. मॅडम हे जे आपले टेंबा हॉस्पीटल आहे हे सुरु करण्याकरिता सगळे सदस्य पाठपुरावा करतात. परंतु महानगरपालिकेचे इंटरनल कारभार आहे तो अतिशय बेकार आहे आणि सुस्त आहे. अजिबात कोणाच कोणाशी को-ऑर्डिनेशन नाही. पानपट्टे साहेबांना विचारल आरोग्य विभागामध्ये साहेब हे टेंबा हॉस्पीटल कधी सुरु होणार. बांधकाम विभाग आम्हाला जर देईल ..................

**मा. महापौर :-**

ध्रुवकिशोर पाटील साहेब आपल्याला वेळ नाही.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

मॅडम चांगला विषय आहे हा शहराचा १० लाख लोकांच्या नागरिकांचा ...........

**मा. महापौर :-**

त्यांना ठराव मांडु द्या, बसा तुम्ही.

**निलम ढवण :-**

नाही या संदर्भात मी १ मिनिटासाठी माहिती देऊ इच्छिते की टेंबा हॉस्पीटल संदर्भात नुकतेच म्हणजे १९/८ ला आदरणीय पालकमंत्री एकनाथजी शिंदे साहेब, आदरणीय खासदार राजनजी विचारे, आदरणीय आमदार प्रतापजी सरनाईक, सन्मा. उपमहापौरजी आणि मी स्वतः आम्ही सर्वांनी मिळून सन्मा. आरोग्यमंत्री डॉ. दिपकजी सावंत साहेब यांना टेंबा हॉस्पीटल लवकरात लवकर चालु करण्यासाठी हल्लीच निवेदन दिले आहे. २१/८ ला आणि त्यांनी या महिन्यातच एक महिन्याच्या आत त्या संदर्भात मिटींग लावुन शासनातर्फे देखील ते चालवण्यासाठी आत त्या संदर्भात मिटींग लावुन शासनातर्फे देखील ते चालवण्यासाठी देखील आम्ही त्यांना विनंती केलेली आहे. तर त्यानुसार त्यांनी एक महिन्याच्या आत मिटींग घेऊन त्यावर मी आपल्याला कळवतो आणि त्यानुसार मी प्रयत्न करतो अशी आपल्याला ग्वाही दिलेली आहे. हे आपल्या सर्वांना सांगु इच्छिते.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

प्रयत्न करतो आम्ही करतो तस नाही मडॅम. तुम्ही सत्तेमध्ये आहे तुम्ही ठोस निर्णय घ्या.

**निलम ढवण :-**

विचार विनिमय केल्याशिवाय होणार का?

**ध्रुवकिशोर पाटील :-**

गेल्या अनेक वर्षा पासुन भारतरत्न पं भिमसेन जोशी रुगणालय (टेंभा हॉस्पीटल) इमारतीचे काम सुरु आहे व कधी संपणार याची निश्चित काळ प्रशासन सांगू शकत नाही. इस्पीताळा लागणारा कर्मचारी वर्ग, डॉक्टर, रुगणांना लागणारी यंत्र सामग्री, इस्पीतळाचे फर्निचर, ई. कामे पालिकेच्या वेगवेगळ्या विभागा मार्फत केली जाणार आहेत. इस्पीतळा करीता इच्छुकांकडुन अनुदान , यंत्र सामग्री ई. घेतली जाणार आहे. पण त्या कडे कोणत्या विभागाने लक्ष दयायचे. Income Tax विभागाकडुन 80 G सर्टीफिकेट कोणी आणायचे त्या साठी लागणारे कागदपत्रे, कार्यवाही कोणता विभाग करणार कोणालाच माहीत नाही.

प्रत्यक्षात कोणत्याही विभागाचा कोणत्याही विभागाशी ताऴमेऴ co-ordination चौकशी केली असता दिसून येत नाही. एकंदरीत हे इस्पीतळ कधी सुरु होईल याचा थांगपत्ता कोणाला ही नाही. टेंभा ईस्पितळ लवकर सुरु करण्या करीता आपण निवृत्त सिव्हील सर्जन ची नियुक्ती केली आहे पण त्यांनाही co-operate कोणताही विभाग करत नाही असे दिसते. गुरुवार दि. २०/०८/२०१५ रोजी रुग्ण सेवा समितीने टेंभा इस्पीतळ लवकर सुरु करण्याबाबत आंदोलन केले. शहरातील अनेक प्रतिष्ठीत व मान्यवर लोक रस्त्यावर उतरले व पुढे ही असे आंदोलन होऊन शहराची शांतता व सुव्यवस्था बिघडु नये, नागरिकांना लवकरात लवकर वैद्यकीय सेवा मिळावी यासाठी हे टेंभा इस्पीतळ लवकरात लवकर सुरु करणे संबंधी आपण केलेल्या उपाययोजना व इस्पीतळ सुरु करण्याची वेळ दिवस निश्चित करुन कळवावे असे प्रशासनास पत्र देऊन सुध्दा प्रशासनाने दखल घेतली नाही त्यामुळे मा.महासभेत **“ज” खाली प्रस्ताव** मांडून आणी चर्चा करुन मा.

यांना इस्पितळ सुरु करण्याबाबत संपूर्ण जबाबदारी निश्चित करुन या तारखे पर्यंत इस्पितळ सुरु करावे असा ठराव मी मांडत आहे

**मा. महापौर :-**

मतदानाला घ्या.

**वंदना चक्रे :-**

माझे अनुमोदन आहे.

**नगरसचिव :-**

प्रकरण क्र. ८३ करिता दोन ठराव आलेले आहेत. पहिला ठराव सुचक श्री. प्रशांत केळुसकर, दुसरा श्री. ध्रुवकिशोर पाटील यांचा मी ठराव वाचन करतो. सुचक श्री. ध्रुवकिशोर पाटील यांच्या ठरावाच्या बाजूने असतील त्यांनी हात वर करायचे आहेत. या ठरावाच्या विरोधात असतील त्यांनी हात वर करायचे आहेत. तटस्थ असतील त्यांनी हात वर करायचे आहे. सुचक श्री. प्रशांत केळुसकर यांच्या ठरावाच्या बाजूने असतील त्यांनी हात वर करायचे आहेत. या ठरावाच्या विरोधात असतील त्यांनी हात वर करायचे आहेत. तटस्थ असतील त्यांनी हात वर करायचे आहे.

**मा. महापौर :-**

श्री. प्रशांत केळुसकर यांनी मांडलेल्या ठरावाच्या बाजूने ३८, विरोधात १८ इतकी मते पडलेली आहेत. श्री. प्रशांत केळुसकर यांनी मांडलेला ठराव बहुमताने मंजूर करण्यात येत आहे.

**प्रकरण क्र. ८३ :-**

सन्मा. सदस्य श्री. ध्रुवकिशोर पाटील यांचा दिनांक २७/०८/२०१५ रोजीच्या पत्रान्वये दिलेला प्रस्ताव. -- भाईंदर (प.) येथील भारतरत्न प. भिमसेन जोशी रुग्णालय (टेंभा हॉस्पीटल) सुरु करणेबाबत.

**ठराव क्र. ५७ :-**

सदर विषयाबाबत सविस्तर लेखी माहिती सादर करुन सदर विषय प्रशासनामार्फत सादर करण्यात यावा असा मी ठराव मांडत आहे.

**सुचक :- श्री. प्रशांत केळुसकर　　　अनुमोदक :- श्री. शरद पाटील**

| अ.क्र. | ठरावाच्या बाजूने | अ.क्र. | ठरावाच्या विरोधात | तटस्थ |
|---|---|---|---|---|
| १ | मेहता नरेंद्र लालचंद | १ | ध्रुवकिशोर पाटील | |
| २ | शरद केशव पाटील | २ | डिमेलो बर्नड अल्बर्ट | |
| ३ | पाटील रोहिदास शंकर | ३ | शिल्पा भावसार | |
| ४ | म्हात्रे कल्पना महेश | ४ | सँन्ड्रा जेफ्री रॉड्रीक्स | |
| ५ | भानुशाली वर्षा गिरीधर | ५ | दक्षता राजेंद्र ठाकुर | |
| ६ | मीरादेवी रामलाल यादव | ६ | पाटील वंदना विकास | |
| ७ | कोठारी सुमन रमेश | ७ | पाटील सुनिता कैलास | |
| ८ | डॉ. नयना मनोज वसाणी | ८ | पुजारी कांचना शेखर | |
| ९ | सिमा कमलेश शहा | ९ | डिसा मर्लिन मर्विन | |
| १० | जैन गिता भरत | १० | वंदना रामदास चक्रे | |
| ११ | अरोरा दिपिका पंकज | ११ | इनामदार जुबेर | |
| १२ | रावल भगवती जयशंकर | १२ | वेतोसकर राजेश शंकर | |
| १३ | मेहता डिंपल विनोद | १३ | शेख अशरफ मोहम्मद इब्राहिम | |
| १४ | मेघना दिपक रावल | १४ | सुर्यकांत खंडोजी म्हात्रे | |
| १५ | शर्मा सुनिला सत्येंद्र | १५ | सामंत प्रमोद जयराम | निरंक |
| १६ | प्रतिभा प्रकाश तांगडे-पाटील | १६ | खण्डेलवाल सुरेश | |
| १७ | सुजाता रविकांत शिंदे | १७ | भोईर कमलेश यशवंत | |
| १८ | पाटील प्रेमनाथ गजानन | १८ | अशोक तिवारी | |
| १९ | सिंग मदन उदितनारायण | | | |
| २० | कांगणे यशवंत ठकाजी | | | |
| २१ | अनिल बाबुराव भोसले | | | |
| २२ | कासोदरीया अश्विन श्यामजी | | | |
| २३ | जैन दिनेश तेजराज | | | |
| २४ | जैन रमेश धरमचंद | | | |
| २५ | डॉ. राजेंद्र जैन | | | |
| २६ | निलम हरिश्चंद्र ढवण | | | |
| २७ | शुभांगी महिन कोटियन | | | |
| २८ | जयमाला किशोर पाटील | | | |
| २९ | परमार अनिता भरत | | | |

| | | | |
|---|---|---|---|
| ३० | गावंड मंदाकिणी आत्माराम | | |
| ३१ | संध्या प्रफुल्ल पाटील | | |
| ३२ | प्रविण मोरेश्वर पाटील | | |
| ३३ | ठाकुर अरविंद दत्ताराम | | |
| ३४ | शाह राकेश रतिशचंद्र | | |
| ३५ | जयंतीलाल गुरुनाथ पाटील | | |
| ३६ | केळुसकर प्रशांत नारायण | | |
| ३७ | मुन्ना सिंग | | |
| ३८ | दिप्ती शेखर भट | | |

**ठराव बहुमताने मंजूर**

**सही/-**
**महापौर**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

**नगरसचिव :-**

प्रकरण क्र. ८४, सन्मा. सदस्य श्री. अरविंद ठाकूर यांचा दिनांक २७/०८/२०१५ रोजीच्या पत्रान्वये दिलेला प्रस्ताव. -- प्रभाग समिती सभेमध्ये सन्मा. सदस्यांनी विभागांना कार्यवाही करणेकरीता दिलेल्या पत्रान्वये झालेल्या ठरावानुसार कार्यवाही होत नसलेबाबत.

**अरविंद ठाकुर :-**

महानगरपालिकेच्या प्रभाग समिती सभेमध्ये लोकप्रतिनिधीची प्रभागातील विकास कामे तसेच इतर जनहितांर्थ कामे समिती सभेमध्ये करणेकामी महाराष्ट्र प्रांतिक महानगरपालिका अधिनियमाच्या तरतुदीनुसार सभेचे आयोजन केले जाते. या सभेमध्ये लोकप्रतिनिधीनी प्रभाग समिती कार्यालयाकडे समिती सभेमध्ये विषय घेणेकरिता दिलेल्या प्रत्येक विषयावर लोकप्रतिनिधीमार्फत योग्य ती चर्चा होऊन त्यावर उचित अशा कामांकरिता आर्थिक व प्रशासकीय तसेच विविध प्रकारच्या मंजु-या त्या ठरावाद्वारे केल्या जातात. सन्मा. नगरसेवकांनी विविध विकासकामांच्या विषयांना तसेच जनहितार्थ कामांना प्रभाग समिती सभेमध्ये ठरावाद्वारे मान्यता देऊनही संबधित विभागामार्फत जाणिवपुर्वक व हेतूपुरस्कर कार्यवाही केली जात नाही. यावर संबंधित सन्मा. नगरसेवकांना लोकांना उत्तर देणे अडचणीचे होत आहे. यावर प्रशासन मात्र मुग गिळून बसल्याची भुमिका बजावत आहेत. या सर्व बाबींवर संबधित अधिका-यांना जबाबदार धरण्यात यावेत. प्रभाग समिती अंतर्गत असलेल्या ठराव व सुचना यावर त्वरीत कार्यवाही करण्यासाठी त्या त्या प्रभाग समितीच्या प्रभाग अधिका-यांना योग्य ते अधिकार देण्यांत यावेत जेणेकरुन सर्व समस्याचे त्वरीत निराकरण होऊ शकेल. व याचा प्रशासनाने गांभिर्यपूर्वक विचार करुन त्वरीत कार्यवाही करावी असा मी ठराव मांडत आहे.

**जयंतीलाल पाटील :-**

माझे अनुमोदन आहे.

**मा. महापौर :-**

मंजुर. पुढचा विषय घ्या.

**प्रकरण क्र. ८४ :-**

सन्मा. सदस्य श्री. अरविंद ठाकूर यांचा दिनांक २७/०८/२०१५ रोजीच्या पत्रान्वये दिलेला प्रस्ताव. -- प्रभाग समिती सभेमध्ये सन्मा. सदस्यांनी विभागांना कार्यवाही करणेकरीता दिलेल्या पत्रान्वये झालेल्या ठरावानुसार कार्यवाही होत नसलेबाबत.

**ठराव क्र. ५८ :-**

महानगरपालिकेच्या प्रभाग समिती सभेमध्ये लोकप्रतिनिधीची प्रभागातील विकास कामे तसेच इतर जनहितांर्थ कामे समिती सभेमध्ये करणेकामी महाराष्ट्र प्रांतिक महानगरपालिका अधिनियमाच्या तरतुदीनुसार सभेचे आयोजन केले जाते. या सभेमध्ये लोकप्रतिनिधीनी प्रभाग समिती कार्यालयाकडे समिती सभेमध्ये विषय घेणेकरिता दिलेल्या प्रत्येक विषयावर लोकप्रतिनिधीमार्फत योग्य ती चर्चा होऊन त्यावर उचित अशा कामांकरिता आर्थिक व प्रशासकीय तसेच विविध प्रकारच्या मंजु-या त्या ठरावाद्वारे केल्या जातात. सन्मा. नगरसेवकांनी विविध विकासकामांच्या विषयांना तसेच जनहितार्थ कामांना प्रभाग समिती सभेमध्ये ठरावाद्वारे मान्यता देऊनही संबधित विभागामार्फत जाणिवपुर्वक व हेतूपुरस्कर कार्यवाही केली जात नाही. यावर संबंधित सन्मा. नगरसेवकांना लोकांना उत्तर देणे अडचणीचे होत आहे. यावर प्रशासन मात्र मुग गिळून बसल्याची भुमिका बजावत आहेत. या सर्व बाबींवर संबधित अधिका-यांना जबाबदार धरण्यात यावेत. प्रभाग समिती अंतर्गत असलेल्या ठराव व सुचना यावर त्वरीत कार्यवाही करण्यासाठी त्या त्या प्रभाग समितीच्या प्रभाग अधिका-यांना योग्य ते अधिकार देण्यांत यावेत जेणेकरुन सर्व समस्याचे त्वरीत निराकरण होऊ शकेल. व याचा प्रशासनाने गांभिर्यपूर्वक विचार करुन त्वरीत कार्यवाही करावी असा मी ठराव मांडत आहे.

**सुचक :- श्री. अरविंद ठाकुर** **अनुमोदक :- श्री. जयंतीलाल पाटील**

**ठराव सर्वानुमते मंजूर**

**सही/-**
**महापौर**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

**नगरसचिव :-**

प्रकरण क्र. ८५, सन्मा. सदस्य श्री. प्रशांत केळूसकर यांचा दिनांक ३१/०८/२०१५ रोजीच्या पत्रान्वये दिलेला प्रस्ताव. -- माजी राष्ट्रपती "स्व. ए.पी.जे. अब्दुल कलाम नाट्यगृह" असे नामकरण करणेबाबत.

**प्रशांत केळुसकर :-**

मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील राष्ट्रीय महामार्ग क्र. ८ लगतच्या मौजे महाजनवाडी येथील सर्व्हे क्र. ९२ पै. (ठाकुर मॉलजवळ) या जागेमधील नागरी सुविधा क्षेत्राच्या भुखंडामध्ये महानगरपालिकेचा एकही रुपया खर्च न करता विकासकामार्फत अद्यावत व सुसज्ज असे तीन मजली नाट्यगृह विकसीत होणार असून दि. ३०/०८/२०१५ रोजी सदर नाट्यगृहाच्या जागेचे भुमीपुजन देखील झाले असून सदर नाट्यगृह आपल्या मिरा भाईंदर शहराचे आकर्षण ठरणार आहे. आपल्या भारताचे माजी राष्ट्रपती डॉ. ए.पी.जे. अब्दुल कलाम यांनी देशास दिलेल्या अमुल्य भेटीस्तव सदर नाट्यगृहात प्रथम दर्शनी डॉ. ए.पी.जे. अब्दुल कलाम यांचा पुतळा उभारुन सदर नाट्यगृहास "भारतरत्न स्व.ए.पी.जे. अब्दुल कलाम नाट्यगृह" असे नाव देण्यात यावे असा मी ठराव मांडत आहे.

**रमेश जैन :-**

माझे अनुमोदन आहे.

**मंदाकिणी गावंड :-**

मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील राष्ट्रीय महामार्ग क्र. ८ लगतच्या मौजे महाजनवाडी येथील सर्व्हे क्र. ९२ पै. (ठाकुर मॉलजवळ) या जागेमधील नागरी सुविधा क्षेत्राच्या भुखंडामध्ये अद्यावत व सुसज्ज असे तीन मजली नाट्यगृह येथे विकसीत होणाऱ्या नाट्यगृहास माजी राष्ट्रपती "स्व.ए.पी.जे. अब्दुल कलाम नाट्यगृह" असे नामकरण करणेबाबतचा प्रस्ताव "ज" अन्वये घेण्यात आलेला आहे "स्व.ए.पी.जे. अब्दुल कलाम " ही व्यक्ती फार मोठे शास्त्रज्ञ असून नामांकित आहेत. त्यांचे नाव पूर्ण देशात दिले तरी कमीच आहे. त्यांनी या देशासाठी मोठे योगदान दिलेले आहे. त्यांच्याबद्दल आमच्या मनात अत्यंत आदर असून त्यांच्या नावाला कोणत्याही प्रकारचा विरोध नसून अशा या प्रतिष्ठीत व्यक्तींच्या नावाची चर्चा मा. महासभेत न होता प्रथम सर्वपक्षीय गटनेत्यांची सभा घेवून तेथे हा विषय घेण्यात यावा व तद्नंतर तो मा. महासभेसमोर ठेवावा असा मी ठराव मांडत आहे.

**जयंतीलाल पाटील :-**

माझे अनुमोदन आहे.

**मा. महापौर :-**

ठराव मतदानाला घ्या.

**नगरसचिव :-**

प्रकरण क्र. ८५ करिता दोन ठराव आलेले आहेत. पहिला ठराव सुचक श्री. प्रशांत केळुसकर, दुसरा ठराव श्रीम. मंदाकिणी गावंड. सुचक श्री. मंदाकिणी गावंड यांनी मांडलेल्या ठरावाच्या बाजुने असतील त्यांनी हात वर करायचे आहेत. या ठरावाच्या विरोधात असतील त्यांनी हात वर करायचे आहेत. तटस्थ असतील त्यांनी हात वर करायचे आहेत. सुचक श्री. प्रशांत केळुसकर यांनी मांडलेल्या ठरावाच्या बाजुने असतील त्यांनी हात वर करायचे आहेत. या ठरावाच्या विरोधात असतील त्यांनी हात वर करायचे आहेत. तटस्थ असतील त्यांनी हात वर करायचे आहेत.

**जुबेर इनामदार :-**

महापौर मॅडम, तुम्ही तुमचा निर्णय द्यायच्या आधी एवढ्या मोठ्या व्यक्तीचा अशाप्रकारे खरतर हा अपमान आहे त्यांचा हा विषय आलाच नाही पाहिजे ज च्या प्रस्तावातून..................

**मा. महापौर :-**

श्री. प्रशांत केळुसकर यांनी मांडलेल्या ठरावाच्या बाजूने २९, विरोधात २५, तटस्थ ० इतकी मते पडलेली आहेत. श्री. प्रशांत केळुसकर यांनी मांडलेला ठराव बहुमताने मंजूर करण्यात येत आहे.

**प्रकरण क्र. ८५ :-**

सन्मा. सदस्य श्री. प्रशांत केळूसकर यांचा दिनांक ३१/०८/२०१५ रोजीच्या पत्रान्वये दिलेला प्रस्ताव. -- माजी राष्ट्रपती "स्व. ए.पी.जे. अब्दुल कलाम नाट्यगृह" असे नामकरण करणेबाबत.

**ठराव क्र. ५९ :-**

मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील राष्ट्रीय महामार्ग क्र. ८ लगतच्या मौजे महाजनवाडी येथील सर्व्हे क्र. ९२ पै. (ठाकुर मॉलजवळ) या जागेमधील नागरी सुविधा क्षेत्राच्या भुखंडामध्ये महानगरपालिकेचा एकही रुपया खर्च न करता विकासकामार्फत अद्यावत व सुसज्ज असे तीन मजली नाट्यगृह विकसीत होणार असून दि. ३०/०८/२०१५ रोजी सदर नाट्यगृहाच्या जागेचे भुमीपुजन देखील झाले असून सदर नाट्यगृह

आपल्या मिरा भाईंदर शहराचे आकर्षण ठरणार आहे. आपल्या भारताचे माजी राष्ट्रपती डॉ. ए.पी.जे. अब्दुल कलाम यांनी देशास दिलेल्या अमुल्य भेटीस्तव सदर नाट्यगृहात प्रथम दर्शनी डॉ. ए.पी.जे. अब्दुल कलाम यांचा पुतळा उभारुन सदर नाट्यगृहास "भारतरत्न स्व.ए.पी.जे. अब्दुल कलाम नाट्यगृह" असे नाव देण्यात यावे असा मी ठराव मांडत आहे.

**सुचक :- श्री. प्रशांत केळुसकर** **अनुमोदक :- डॉ. रमेश जैन**

| अ.क्र. | ठरावाच्या बाजूने | अ.क्र. | ठरावाच्या विरोधात | तटस्थ |
|---|---|---|---|---|
| १ | मेहता नरेंद्र लालचंद | १ | डिमेलो बर्नड अल्बर्ट | |
| २ | शरद केशव पाटील | २ | भावसार शिल्पा कमलेश | |
| ३ | पाटील रोहिदास शंकर | ३ | सँन्ड्रा जेफ्री रॉड्रीक्स | |
| ४ | म्हात्रे कल्पना महेश | ४ | दक्षता राजेंद्र ठाकूर | |
| ५ | भानुशाली वर्षा गिरीधर | ५ | पाटील वंदना विकास | |
| ६ | मीरादेवी रामलाल यादव | ६ | पाटील सुनिता कैलास | |
| ७ | कोठारी सुमन रमेश | ७ | पुजारी कांचना शेखर | |
| ८ | डॉ. नयना मनोज वसाणी | ८ | डिसा मर्लिन मर्विन | |
| ९ | सिमा कमलेश शहा | ९ | वंदना रामदास चक्रे | |
| १० | जैन गिता भरत | १० | इनामदार जुबेर | |
| ११ | अरोरा दिपिका पंकज | ११ | वेतोसकर राजेश शंकर | |
| १२ | रावल भगवती जयशंकर | १२ | शेख अशरफ मोहम्मद इब्राहिम | |
| १३ | मेहता डिंपल विनोद | १३ | सुर्यकांत खंडोजी म्हात्रे | |
| १४ | मेघना दिपक रावल | १४ | खण्डेलवाल सुरेश | |
| १५ | शर्मा सुनिला सत्येंद्र | १५ | भोईर कमलेश यशवंत | **निरंक** |
| १६ | प्रतिभा प्रकाश तांगडे-पाटील | १६ | अशोक तिवारी | |
| १७ | सुजाता रविकांत शिंदे | १७ | निलम हरिश्चंद्र ढवण | |
| १८ | पाटील प्रेमनाथ गजानन | १८ | शुभांगी महिन कोटियन | |
| १९ | सिंग मदन उदितनारायण | १९ | जयमाला किशोर पाटील | |
| २० | कांगणे यशवंत ठकाजी | २० | परमार अनिता भरत | |
| २१ | अनिल बाबुराव भोसले | २१ | गावंड मंदाकिणी आत्माराम | |
| २२ | कासोदरीया अश्विन श्यामजी | २२ | संध्या प्रफुल्ल पाटील | |
| २३ | जैन दिनेश तेजराज | २३ | प्रविण मोरेश्वर पाटील | |
| २४ | जैन रमेश धरमचंद | २४ | ठाकुर अरविंद दत्ताराम | |
| २५ | डॉ. राजेंद्र जैन | २५ | जयंतीलाल गुरुनाथ पाटील | |
| २६ | शाह राकेश रतिशचंद्र | | | |
| २७ | केळुसकर प्रशांत नारायण | | | |
| २८ | मुन्ना सिंग | | | |
| २९ | दिप्ती शेखर भट | | | |

**ठराव बहुमताने मंजूर**

**सही/-**
**महापौर**
**मिरा भाईंदर महानगपालिका**

**निलम ढवण :-**

महापौर मॅडम, शोक प्रस्ताव वाचायचा आहे मला. मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या सन्मा. नगरसेविका ..............................

**आसिफ शेख :-**

७ वाजायला वेळ आहे अजुन. ११ वाजेपर्यंत चालवु शकतो सभागृह.

**भगवती शर्मा :-**

७ नंतर सभा चालवु शकतो का?

**आसिफ शेख :-**

लोकसभा, राज्यसभा, विधानसभा, विधानपरिषद किती वेळ चालतात.

**नरेंद्र मेहता :-**

तुमच म्हणणे बरोबर आहे. सभागृहाने आपल्या सभेच कामकाज १५,२० मिनिट सभागृहाने ठरवल तर ती सभा चालु शकते. महापौर मॅडम आज गणेशोत्सवाची बैठक बोलविली आहे. सर्व नगरसेवकांना त्या ठिकाणी बोलावले आहे. त्या बैठकीला जाणे खूप गरजेचे आहे.

**आसिफ शेख :-**

सभागृहामध्ये शहराच्या लोकांच्यासाठी काम करतोय आम्ही ते. ते महत्वाच नाही का?

**निलम ढवण :-**

मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या सन्मा. नगरसेविका श्रीमती तारा विनायक घरत यांचे पती आणि आमचे ज्येष्ठ शिवसैनिक कैलासवासी श्री. विनायकजी घरत यांचे बुधवारी दि. २/०९/२०१५ रोजी त्यांच्या राहत्या घरी ह्दय विकाराच्या आजाराने निधन झाले. त्यांच्या दुःखात शिवसेना पक्षाच्या वतीने आम्ही सर्व नगरसेवक आणि आमचे सर्व शिवसैनिक सहभागी आहेत. त्यांच्या मृतात्म्यास चिरशांती लाभो हिच ईश्वरचरणी प्रार्थना करतो असा मी शोकप्रस्ताव मांडत आहे.

**आसिफ शेख :-**

त्याचप्रमाणे आमच्या मिरारोडमधील ............

**वंदना चक्रे :-**

त्याचप्रमाणे आमच्या राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या वतीने विनायक घरत यांचे ह्दय धक्क्याने निधन झालेले आहे. आम्ही राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या वतीने त्यांना श्रध्दांजली अर्पण करतो.

**आसिफ शेख :-**

त्याचप्रमाणे मिरारोड परिसरातील सामाजिक कार्यकर्ते आणि शैक्षणिक संचालक आणि संस्थापक इकबाल भाई वाणेगर यांचेही दुःखद निधन झालेले आहे. त्याबद्दल देखील ही सभा शोक व्यक्त करते. आणि सर्व जे दिवंगत आहेत त्यांच्या मृतात्म्यास चिरशांती लाभो आणि त्यांच्या कुटुंबियांना या कठिण प्रसंगामध्ये ईश्वर शक्ती प्रदान करो हे दुःख सहन करण्यासाठी सर्वांनी दोन मिनिटे स्तब्ध राहून त्यांना शांती द्यावी.

**प्रशांत केळुसकर :-**

सभागृहातील सन्मा. सदस्या तारा घरत यांच्या दुःखात सहभागी आहोत.

**प्रमोद सामंत :-**

सन्मा. सदस्या सौ. तारा घरत यांचे पती विनायक घरत आमचे मित्र यांचे अचानक निधन झाले. काँग्रेस पक्ष त्यांच्या दुःखात सहभागी आहोत त्यांना श्रध्दांजली वाहतो.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

सन्मा. सदस्या तारा घरत यांचे पती श्री. विनायक घरत यांच्या दुःखद निधनामध्ये राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी सुध्दा सहभागी आहे. ईश्वर त्यांच्या मृतात्म्यास शांती देवो. त्यांच्या कुटुंबियांना सदर दुःख सावरण्याचे शक्ती देवो ही विनंती.

**दुःखवटा ठराव क्र. ५९अ :-**

श्रीमती तारा विनायक घरत यांचे पती आणि आमचे ज्येष्ठ शिवसैनिक कैलासवासी श्री. विनायकजी घरत यांचे बुधवारी दि. २/०९/२०१५ रोजी त्यांच्या राहत्या घरी ह्दय विकाराच्या आजाराने निधन झाले. त्याचप्रमाणे मिरारोड परिसरातील सामाजिक कार्यकर्ते आणि शैक्षणिक संचालक आणि संस्थापक इकबाल भाई वाणेगर यांचेही दुःखद निधन झालेले आहे.

**सुचक :- सौ. निलम ढवण**  **अनुमोदक :- डॉ. आसिफ शेख**

**ठराव सर्वानुमते मंजूर**

**सही/-**
**महापौर**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

**नगरसचिव :-**

सर्वांनी दोन मिनिटे जागेवर उभे राहून मृतात्म्यास श्रध्दांजली वाहायची आहे.

**(सभा संपण्याची वेळ संध्या. ०७ वाजता)**

**सही/-**
**महापौर**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

नगरसचिव
मिरा भाईंदर महानगरपालिका